अहवाल क्रमांक : १८६

सत्यमेव जयते

# पंचायती राज समिती

## (२०२०-२०२१)

## (चौदावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या सन २०१२-२०१३ च्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत**

**व**

**सन २०१३-१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात**

# सातवा अहवाल

(सदर अहवाल दिनांक मार्च, २०२१ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०२१

# पंचायती राज समिती

## (२०२०-२०२१)

## (चौदावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या सन २०१२-२०१३ च्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत**

**व**

**सन २०१३-१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात**

# सातवा अहवाल

एचबी २५९८—१

## पंचायती राज समिती
## (सन २०२०-२०२१)

**समिती प्रमुख**

(१) श्री. संजय रायमुलकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख,

**सदस्य**

(२) श्री. प्रदिप शिवनारायण जैस्वाल, वि.स.स.

(३) श्री. कैलास बाळासाहेब पाटील (घाडगे), वि.स.स.

(४) डॉ. राहूल वेदप्रकाश पाटील, वि.स.स.

(५) श्री. अनिल भाईदास पाटील, वि.स.स.

(६) श्री. संग्राम अरूणकाका जगताप, वि.स.स.

(७) श्री. दिलीपराव शंकरराव बनकर, वि.स.स.

(८) श्री. शेखर गोविंदराव निकम, वि.स.स.

(९) श्री. सुभाष रामचंद्रराव धोटे, वि.स.स.

(१०) श्री. माधवराव निवृत्तीराव जवळगावकर, वि.स.स.

(११) श्रीमती प्रतिभा सुरेश धानोरकर, वि.स.स.

(१२) श्री. हरीभाऊ किसनराव बागडे, वि.स.स.

(१३) डॉ. विजयकुमार कृष्णराव गावीत, वि.स.स.

(१४) डॉ. देवराव मादगुजी होळी, वि.स.स.

(१५) श्री. कृष्णा धमाजी गजबे, वि.स.स.

(१६) डॉ. संजय श्रीराम कुटे, वि.स.स.

(१७) श्री. राणा जगजितसिंह पाटील, वि.स.स.

(१८) श्री. प्रशांत बंसीलाल बंब, वि.स.स.

(१९) श्रीमती मेघना दिपक बोर्डिकर-साकोरे, वि.स.स.

(२०) श्री. किशोर गजानन जोरगेवार , वि.स.स.

(२१) श्री. अंबादास दानवे, वि.प.स.

(२२) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(२३) श्री. अमरनाथ राजुरकर, वि.प.स.

(२४) श्री. निरंजन डावखरे, वि.प.स.

(२५) श्री. सुरेश धस, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. किशोर आप्पा पाटील, वि.स.स.

(२७) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

(२८) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२९) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

(३०) श्री. रत्नाकर गुट्टे, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेंद्र भागवत, सचिव

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव

(३) श्री. रंगनाथ खैरे, अवर सचिव (समिती)

(४) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

(५) श्रीमती सुषमा लोंढे, कक्ष अधिकारी.

## पंचायती राज समिति
## (सन २०१७-२०१८)

**समिती प्रमुख**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(४) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(५) ॲड.राहुल कुल, वि.स.स.

(६) श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.

(७) डॉ.देवराव होळी, वि.स.स.

(८) ***रिक्त

(९) डॉ.सुधाकर भालेराव, वि.स.स.

(१०) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(११) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(१२) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(१३) श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.

(१४) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(१५) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

(१६) श्री. भारत भालके, वि.स.स.

(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१८) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(१९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(२०) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

(२१) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.

(२२) ***रिक्त

(२३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(२४) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.

(२५) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२७) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२८) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

(२९) *श्री. किशोर दराडे, वि.प.स.

(३०) **श्री. निलय नाईक, वि.प.स.

(३१) **श्री. निरंजन डावखरे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (कार्यभार)

(२) श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का.)

(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(४) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

(५) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी.

*श्री. किशोर दराडे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक ४ डिसेंबर, २०१८ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

**श्री. निलय नाईक, वि.प.स. व श्री. निरंजन डावखरे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक १ मार्च २०१९ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

***श्री. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स. व प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स. यांचा दिनांक १६ जून, २०१९ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त.

**प्रस्तावना**

मी, पंचायती राज समितीचा ‘समिती प्रमुख’ या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा सातवा अहवाल सादर करीत आहे.

सन २०२०-२०२१ या वर्षाकरिता समिती दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा.सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजी केले. समिती पध्दतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती सहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Legislature) या समितीला “Mini Legislature” सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत निःपक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो. परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पध्दतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय ? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय ? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुध्दा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा.सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारुन संबंधित अधिका-यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुध्दा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुस-या सदस्यांनी माहिती विचारण्याची पध्दत जोपासली आहे. या पध्दतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करुन आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करुन विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्यादृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाईदेखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्दयांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पध्दती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पध्दतीचे स्थान व महत्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृध्दिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णयदेखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचनादेखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाईदेखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचा-यांना जरबदेखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करुन ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारुन घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणी पुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करुन काही चांगल्या बाबींचे समर्थन करुन संबंधितांना प्रोत्साहितदेखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २०१२-१३ व सन २०१३-१४ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन व सन २०१३-१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१७-२०१८ साठी गठीत झालेल्या समितीने रत्नागिरी जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने रत्नागिरी जिल्हा परिषदेस दिनांक २६, २७ व २८ एप्रिल, २०१८ रोजी भेट देऊन श्री. आर. के. बामणे, मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरीता गठीत झालेल्या समितीने रत्नागिरी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिका-यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्दयांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक ०४ जून, २०१९ रोजी व दिनांक १६ जुलै, २०१९ जिल्हा परिषद, रत्नागिरी संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या, प्रतिनिधींच्या साक्ष घेतली.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्री. असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, डॉ.प्रदिप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्रीमती विनिता सिंगल, सचिव, महिला व बालविकास विभाग, श्रीमती सुवर्णा खरात, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.संतोषकुमार, व्य.सं.म.ल.ङ महामंडळ, श्री.म.र.शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, श्री.कि.शां.परब, उप सचिव, जलसंपदा विभाग, डॉ.विजय बुंदेवार, सह संचालक, आरोग्य सेवा, श्री.राजाराम माने, विभागीय आयुक्त, नाशिक, श्री.यु.श्रीरंगम, सचिव तथा मु.का.अ. महा. इमारत व इतर बांधकाम मुंबई, श्री.विजयकांत पानबुडे, अप्पर कामगार आयुक्त, नागपूर, श्री.पुंडलिक मिराशे, सह सचिव, (तांत्रिक) म.प्र.न.मंडळ, श्री.विजयकुमार कलवले, सहायक संचालक, मृद व जलसंधारण विभाग, श्री.श.मा.साठे, उप सचिव, कामगार विभाग, डॉ.प्रशांत उईके, जिल्हा आरोग्य अधिकारी, श्री.रमेश चव्हाण, उप सचिव, महसुल विभाग, श्री.रविंद्र जगताप, मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री.अ.बा.मानकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, श्री.एल.एस.पाच्छापुरे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), डॉ. प्रशांत उईके, जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

लेख्यांवरील लेखापरिक्षा पुनर्विलोकन व वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्दयांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०२०-२०२१ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक ३ मार्च, २०२१ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन तो किरकोळ दुरुस्तींसह संमत केला.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ३ मार्च, २०२१.

**संजय रायमुलकर,**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

# सन २०१२-२०१३ च्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन

## अनुक्रमणिका (अ)


| अ.क्र. (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | परिच्छेद क्रमांक (४) | पृष्ठ क्रमांक (५) |
|---|---|---|---|---|
| १ | एक | कर्ली देवघर (तालुका संगमेश्वर) येथील ग्रामपंचायत इमारतीच्या बांधकामाबाबत (सन २०१२-१३) | ३.२२४/९ | १ |
| २ | दोन | करबुडे फाटा ते मुळगांव रस्ता डांबरीकरण करणे (सन २०१२-१३) | ३.२२७/२६ | ६ |
| ३ | तीन | खांदाट, दळवटणे, मोरवणे रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे कामामधील अनियमितता (सन २०१२-१३) | ३.२२८/२८<br>३.२२९/३१<br>३.२३०/३२<br>३.२३१/३५<br>३.२३२/४२<br>३.२३३/४३<br>३.२३४/४७ | ११<br>११<br>१२<br>१३<br>१४<br>१५<br>१६ |
| ४ | चार | मौजे कौंढर बौद्धवाडी येथे वहाळ बंधारा बांधणे (सन २०१२-१३) | ३.४९७/३ | २३ |
| ५ | पाच | थकित आगावू रकमा (थकित अग्रिम) (सन २०१२-१३) | ३.१०७१ (३/९) | २८ |
| ६ | सहा | सन २०१२-२०१३ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी (अपहार/अफरातफर प्रकरणे) (सन २०१२-१३) | ३.१०७२ (२)/९० | ३१ |
| ७ | सात | सन २०१२-१३ या वर्षात पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी (शिक्षक समायोजनाबाबत) (सन २०१२-१३) | ४.४४२ | ३८ |
| ८ | आठ | कशेडी, दरेकरवाडी, गवाणवाडी, पवारवाडी ते कोंडवाडी २/२०० मोरी दुरुस्तीतील अनियमितता (सन २०१२-१३) | ४.१२१/४ | ४४ |
| ९ | नऊ | साखरी भागलेवाडी, बाणकोट किल्लावाडी, गोठे, तिडे (ता. मंडणगड) येथे अंगणवाडी इमारत बांधकाम करणेबाबत (सन २०१२-१३) | ४.१२२/१४<br>४.१२३/१५<br>४.१२४.१८ | ४६<br>४६<br>४८ |
| १० | दहा | लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणेबाबत (सन २०१२-१३) | | ५३ |
| ११ | अकरा | सर्वसाधारण शिफारशी | | ६३ |

# सन २०१३-२०१४ चा वार्षिक प्रशासन अहवाल

## अनुक्रमणिका (ब)


| अ.क्र. (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | पृष्ठ क्रमांक (४) |
| --- | --- | --- | --- |
| १ | एक | रत्नागिरी जिल्हा परिषदेमध्ये बांधकाम व पाणी पुरवठा विभागांमध्ये रिक्त असलेली पदे, रत्नागिरी जिल्ह्याच्या एमआयडीसी मधील सीएसआर निधीचा खर्च व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व एमआयडीसी मधील अधिकारी जिल्हापरिषद बैठकींना उपस्थित राहात नसल्याबाबत. | ६७ |
| २ | दोन | प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजनेच्या पाणी पुरवठा वीज देयक प्रतिपूर्तीबाबत. | ७६ |
| ३ | तीन | पंचायत समिती रत्नागिरी सेस फंड | ८० |
| | | **परिशिष्ट** | |
| | | समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त | ८३ |

प्रकरण एक

## जिल्हा परिषद, रत्नागिरी

### कर्ली देवघर (तालुका संगमेश्वर) येथील ग्रामपंचायत इमारतीच्या बांधकामाबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.२२४/९ (सन २०१२-१३)**

प्रमाणक क्रमांक ५०४ दिनांक ३१ मार्च, २०१३ रक्कम रुपये २,६३,००० अनियमितता खालीलप्रमाणे आहेत :—

(१) कामाच्या टिपणीत दिनांक, लेखाशिर्ष सांकेतांक नमूद नाही. अंदाजपत्रकीय रक्कम आदेश नमूद नाही.

(२) ग्रामपंचायत तांत्रिक व आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेबाबतचा दाखला नाही.

(३) रोख पुस्तकाचा उतारा सन २००६-०७ व सन २००७-०८ चा असून त्यावर सरपंचाची स्वाक्षरी नाही.

(४) कार्यकारी अभियंता यांचे पत्र दिनांक १ जून, २०११ नुसार बयाना रक्कम व अनामत रक्कम वसुल केलेली नाही. तथापि, १५,००० रुपये वसुल करणे आवश्यक आहे.

(५) करारनाम्यावर दिनांक नमूद नाही व मुद्रांक विवरण करारपत्र अपूर्ण राहिलेले आहे.

(६) ग्रामविकास व जलसंधारण विभाग दिनांक ८ मे, २००२ च्या परिपत्रकानुसार कामावर नियुक्त केलेल्या कामगाराचा विमा उतरविला नाही.

(७) जिल्हाधिकारी यांचे प्रशासकीय आदेश दिनांक १० मार्च, २०११ अन्वये सदर काम पूर्ण झालेले असून खर्चही झालेला आहे. सदर कामाचे उपयोगिता प्रमाणपत्र जिल्हाधिकारी यांना सादर केलेले नाही.

(८) उर्वरित वैधानिक विकास मंडळ, मुंबई यांचे आदेश दिनांक ३१ जानेवारी, २०११ तील अट क्र. ८ नुसार काम सुरू करताना कामाच्या ठिकाणी नामफलक लावलेला नाही.

उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—

(१) अनावधानाने सदरच्या नोंदी राहिल्या होत्या. तथापि, प्रथम पूर्ततेवेळी दिनांक व सांकेतांक नंबर व लेखाशिर्ष नमूद करणेत आलेले आहे. आदेशात अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ५,००,००० नमूद केलेली असून वरिष्ठ सहाय्यक यांची दिनांकित स्वाक्षरी आहे.

(२) ग्रामपंचायत आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेबाबतचा गट विकास अधिकारी यांचा दिनांक ६ मे, २०११ रोजीचा दाखला नस्तीसोबत जोडणेत आलेला आहे. ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचा शासन निर्णय क्रमांक झेडपीए-२००८/प्रक्र.४७२/वित्त ९ (३३) मधील दिलेल्या सुचना नुसार तांत्रिक सल्ला संबंधित उपविभागामार्फत देण्यात येतो.

(३) नस्ती मध्ये सन २००६-०७ ते सन २००९-१० नमुना नंबर १३ व १४ जोडण्यात आलेले असून प्रथम पूर्ततेवेळी रोखपुस्तकाच्या सन २००६-२००७ व सन २००७-२००८ च्या उता-यावर सरपंचाची स्वाक्षरी घेणेत आलेली आहे.

(४) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ मधील नियम १३८ (६) नुसार ग्रामपंचायतींना बयाणा रकमेतून सुट देण्यात आलेली आहे व सुरक्षा अनामत रुपये ५,२६० वसूल करून जिल्हा परिषद खाती भरणा केलेले आहे.

(५) प्रथम पूर्ततेवेळी करारनाम्यावर दिनांक १ जून, २०११ नमूद करणेत आलेला असून, मुद्रांक विवरण करारपत्र पूर्ण आहे.

(६) उपविमा संचालक, विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक प्रविनी-२३१०/सांबावि/विमा वसुली/अभि-३ दिनांक ८ सप्टेंबर, २०१० नुसार कामगारांच्या कामावर विम्याची रक्कम सदर कामाचे पहिले रनिंग बिल रक्कम रुपये २,३६,८२९ मधून विम्याची १ टक्के रक्कम रुपये ५,००० वसुल करणेत आलेली आहे.

(७) दिनांक १४ मार्च, २०१३ रोजी उपयोगिता प्रमाणपत्र जिल्हाधिकारी यांना सादर केलेले आहे. छायांकित प्रत सोबत सादर केलेली आहे.

(८) ग्रामपंचायत कर्ली देवघर येथील ग्रामपंचायत इमारतीच्या नावाचा फलक लावणेत आलेला असून त्याची फोटोप्रत नस्तीसोबत जोडणेत आलेली आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

रत्नागिरी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २६ एप्रिल, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, परिच्छेद क्रमांक १ ते ८ मधील कागदपत्रांची पूर्तता लेखा

परिक्षणाच्या वेळी अपूर्ण ठेवण्याची कारणे काय आहेत, कागदपत्रांची पूर्तता केव्हा करण्यात आली, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, कामाच्या टिप्पणीमध्ये दिनांक, लेखाशीर्ष सांकेतांकाच्या नोंदी अनवधानाने करणे राहिल्या होत्या. परंतु पहिल्या पूर्ततेच्या वेळी दिनांक आणि सांकेतांक क्रमांक व लेखाशीर्ष नमूद करण्यात आलेला आहे. ग्रामपंचायत आर्थिकदृष्ट्या सक्षम असल्याबाबत गट विकास अधिकारी यांचा दाखला दिनांक ६ मे, २०११ रोजी घेतलेला आहे. तसेच उता-यावर सरपंचाची स्वाक्षरी घेतलेली आहे. प्रथम पूर्ततेच्या वेळी म्हणजेच दिनांक १२ नोव्हेंबर, २०१४ रोजी करारनाम्यावर दिनांक नमूद करण्यात आलेला आहे.

यावर समितीने अशी विचारणा केली की, लेखा परिक्षणाच्या वेळी आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध करून देण्यात आलेली नव्हती. जर तत्कालिन अधिका-यांनी लेखा परिक्षणाच्या वेळी आवश्यक ते अभिलेखे सादर केले नसतील तर ते दंडनीय कारवाईस पात्र आहेत की नाहीत, यावर प्रभारी कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी होकारात्मक उत्तर दिले. यावर समितीने पुढे अशीही विचारणा केली की, या प्रकरणी चूक झाल्याचे कार्यकारी अभियंत्यांनी मान्य केले आहे. त्यामुळे अभिलेखे सादर न करणा-यांवर दंडनीय कारवाई करावी. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, त्यावेळी अधिकारी/कर्मचा-यांवर कामाचा बोजा असतो. विहित मुदतीत विहित कामे पूर्ण करावी लागतात. कदाचित कार्यबाहुल्यामुळे काही बाबींची पूर्तता करण्याचे राहिले असेल. यावर समितीने विचारणा केली की, लेखा परीक्षण हे पूर्वसूचना देऊनच केले जाते. शिवाय लेखा परीक्षण करणारे पथक जवळजवळ एक महिना आपले काम करीत असते. त्या महिन्याभरात आपण अभिलेख्यांची पूर्तता का करून दिली नाही. काही बाबतीत चुकीचे परिच्छेद काढले जातात. या प्रकरणी ग्रामपंचायत तांत्रिक व आर्थिकदृष्ट्या सक्षम असल्याबाबतचा दाखला घेण्यात आलेला नाही, असा आक्षेप नोंदविलेला आहे. तसेच ग्रामपंचायतीला कामाचे वाटप केल्यानंतर त्यांना करारनामा करण्याबाबत पत्र देण्यात येते. कागदपत्राविना करारनामा कसा केला ? लेखा परिक्षणासाठी पथक आल्यानंतर त्यांना आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध करून द्यावयास पाहिजेत. शिवाय लेखा परीक्षकांनी संधी देऊनही आपण कागदपत्रे सादर केली नाहीत. नंतरच्या कालावधीत जिल्हा परिषदेने सदरहू कागदपत्रांची पूर्तता करून ते लेखा परिक्षकांना दाखविले आहेत काय ?

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी होकारार्थी उत्तर देऊन दिनांक १२ नोव्हेंबर, २०१४ रोजी कागदपत्रांची पूर्तता केल्याबाबत विदित केले. यावर प्रभारी कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी खुलासा केला की, कागदपत्रे उपलब्ध होती, परंतु केवळ तारखांमध्ये चूक होती. यावर समितीने संचालक, स्थानिक निधी (लेखा) यांचे मत काय आहे अशी विचारणा केली असता संचालक, स्थानिक निधी (लेखा) यांनी खुलासा केला की, कागदपत्रे उपलब्ध होती, परंतु त्यातील काही कागदपत्रे अपूर्ण होती. लेखा परिक्षणाच्या वेळी अपूर्ण कागदपत्रांचा मुद्दा उपस्थित झाल्यानंतर त्यांनी नंतरच्या काळात ही कागदपत्रे सादर केली. परंतु लेखा परिक्षणाच्या वेळी परिपूर्ण कागदपत्रे नव्हती.

यावर समितीने विचारणा केली की, मुळात ग्रामपंचायत ही स्थानिक स्वराज्य संस्था आहे. ग्रामपंचायतीने कंत्राटदार म्हणून काम करता कामा नये. अनेकदा ग्रामपंचायतींना करारनामा करण्यास सांगितले जाते. त्या करारनाम्यावर सरपंच स्वाक्षरी करतात. जर कोणी मा. न्यायालयात गेला तर जवळजवळ सर्वच सरपंच हे कलम ३९ नुसार कारवाईस पात्र ठरतील. समितीचे स्पष्ट मत आहे की, ग्रामपंचायतीला काम वाटप केल्यानंतर त्यांना करारनामा करण्यास सांगण्याची काहीच आवश्यकता नाही. करारनाम्यात ज्या अटी व शर्ती नमूद करण्यात येतात त्या कार्यादेशामध्ये नमूद कराव्यात. मला वाटते या बाबतीत आपण धोरण निश्चित केले पाहिजे.

यावर संचालक स्थानिक निधी (लेखा) यांनी खुलासा केला की, ज्या ठिकाणी अनुदान दिले जाते त्या ठिकाणी करारनामा करण्याची आवश्यकता नाही. परंतु जे काम विनानिविदा करण्यात येते त्यावेळी मात्र करारनामा करावा लागेल. परंतु समिती जे म्हणत आहे ते बरोबर आहे. याबाबतीत शासनाला सुधारणा करावी लागेल. कलम १२४ अंतर्गत ग्रामपंचायतीला अनुदान वर्ग करू शकतो. या प्रकरणी कलम १२४ अंतर्गत शासन निर्णय काढला असेल तर ग्रामपंचायतीला करारनामा करण्याची आवश्यकता नाही.

यावर समितीने मत व्यक्त केले की, कामाचा दर्जा टिकून राहण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था ही विश्वसनीय व्यवस्था आहे. लेखा परिक्षकांनी असा आक्षेप घ्यावा की, मुळात ग्रामपंचायतीसोबत करारनामा करण्याची आवश्यकता का भासली, एखाद्या ग्रामपंचायतीचा सरपंच ठेकेदार असेल तर त्याला अशी कामे करता येतात काय, याबाबतीत ग्राम विकास विभागाच्या उप सचिवांनी आपले मत नोंदवावे. या बाबतीत शासनाने आदेश निर्गमित केले पाहिजेत. यावर उप सचिव, ग्रामविकास विभाग यांनी विदित केले की, समितीने जे सुचविलेले आहे त्याची नोंद घेतलेली आहे. सदरहू बाब सचिवांच्या निदर्शनास आणून देण्यात येईल.

यावर समितीने नाराजी व्यक्त करत विचारणा केली की, या गोष्टी आतापर्यंत का निदर्शनास आल्या नाहीत. कायद्यात अशी तरतूद केली आहे की, एखाद्या सरपंचाने ठेकेदारी करून स्वतःच्या नावे देयक काढले तर ते कलम ३९ अन्वये कारवाईस जबाबदार आहेत. या ठिकाणी सुद्धा सरपंच करारनामा करीत आहेत. समिती विचारु इच्छिते की, करारनामा करण्यासाठी सरपंच हे नोंदणीकृत ठेकेदार आहेत काय, या बाबत आपल्याला माहिती नाही काय, यावर उप सचिव, ग्रामविकास विभाग यांनी विदित केले की, ही बाब तपासून घेतो. समितीने सुचविलेल्या बाबीची नोंद घेतलेली आहे. ग्रामपंचायतीला करारनामा करण्याची आवश्यकता नाही, या विषयी सुधारणा करण्याकरिता काय करता येईल, या बाबत विभागाकडून विचार करण्यात येईल.

पुढे समितीने विचारणा केली की, दुसरी बाब अशी की, आता प्रत्येक गावची लोकसंख्या वाढली आहे. प्रत्येकाला घराची आवश्यकता असल्यामुळे गावठाण विस्तार केला जात आहे. गावठाण विस्तार सरकार पैसे कमविण्यासाठी करीत नाही. लोकांना मूलभूत सुविधा देण्यासाठी गावठाण विस्तार केला जातो. परंतु ग्राम विकास विभागाने गोरगरीब जनतेकडून रेडी रेकनरनुसार प्लॉटचे पैसे घेण्याचे सुचविले आहे. समितीला वाटते ग्राम विकास विभाग हे लोकप्रतिनिधींचे काम करीत आहे. गावची लोकसंख्या वाढल्यामुळे घरांची गरज निर्माण झाली व जे भूमिहीन आहेत त्यांच्याकडून रेडी रेकनरनुसार प्लॉटसाठी पैसे घेतले जात आहेत. अशाप्रकारे पैसे वसूल करणे योग्य नाही. जिल्हा परिषदेमध्ये नवनवीन अधिकारी येत असतात, जुने बदलून जात असतात. नवीन आलेल्या अधिका-यांना पूर्वी काय झाले ते ब-याचदा माहिती नसते.

तद्नंतर समितीने निदेश दिले की, कर्ली देवघर येथे ग्रामपंचायत इमारत बांधणे हा मुद्दा सचिवांच्या साक्षीकरीता घेत आहोत. यामध्ये लेखापरिक्षकांस कागदपत्रे सादर न केल्याबाबतचा आक्षेप आहे. या प्रकरणी अपुरे कागदपत्रे दिलेली होती, काही कागदपत्रे नंतर दिली आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सांगण्यात येते की, लेखापरीक्षणाच्या संदर्भातील विषय येतो तत्पूर्वी लेखापरिक्षकाला विभागाने सर्व कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे म्हणजे हा मुददा येणार नाही. नाही तर बरेच उप प्रश्न निर्माण होतात. यानंतर असे होणार नाही याची दक्षता घ्यावी. गावठाण जमिनीबाबत व करारनाम्याबाबत विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात यावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली :—**

कर्ली देवघर ग्रामपंचायत बांधकामासंदर्भात गावठाण जमिनीबाबत व करारनाम्याबाबत सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले. त्यानुसार संबंधितांची जबाबदारी निश्चित करून त्यांचेविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे. नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

कर्ली देवघर येथे ग्रामपंचायत इमारत बांधणे, कामाच्या गावठाण जमिनीबाबत व करारनाम्याबाबत सखोल चौकशी गट विकास अधिकारी पंचायत समिती, देवरुख यांचेमार्फत करण्यात आली आहे.

(१) कर्ली देवघर ग्रामपंचायत गावठाण ही जागा मा. सरपंच ग्राम पंचायत कर्ली यांच्या स्वतंत्र नावे भुमापन क्र. २८/१२ ब नुसार दाखल असून त्याचा स्वतंत्र ७/१२ उतारा आहे. तसे लेखी गटविकास अधिकारी पंचायत समिती, देवरुख यांनी दिनांक ४ जानेवारी, २०१९ च्या पत्रान्वये लेखी कळविले आहे.

(२) कर्ली देवघर येथे ग्रामपंचायत इमारत बांधणे, या कामी करण्यात आलेल्या करारनाम्यावर लेखापरीक्षणाचे वेळी दिनांक नमूद केलेला नव्हता परंतू कामाचा कार्यारंभ आदेश देतानाची तारीख दाखल केलेली होती. सदर तारखेपूर्वीची तारीख करारनाम्यावर दाखल करण्यात येवून लेखापरीक्षणाला दप्तर दाखविणेत आलेले होते. याबाबत संबंधित कार्यासनाचे वरिष्ठ सहाय्यक यांना दिनांक २२ ऑक्टोबर, २०१८ च्या पत्राने ताकिद देणेत आलेली आहे.

सदर कामाच्या निविदा करारनामा बाँड पेपरवर रबरी शिक्का मारुन तपशिलाचे लिखाण करण्यात आले होते. परंतू आता करारनामा करताना स्वतंत्र संगणकावर टंकलेखन करून करारनामा बाँड पेपरवर करून घेण्यात येत आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय.—** (बांधकाम-४) जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी सहमत.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने रत्नागिरी जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ४ जून, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, कर्ली देवघर ग्रामपंचायत बांधकामासंदर्भात गावठाण जमिनीबाबत व करारनाम्याबाबत सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, सदर चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून त्यांच्या विरुध्द कोणती कारवाई करण्यात आली, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत. या प्रकरणात ताकीद देण्यात आली असे नमूद केले आहे. ताकीद देण्यात आली हा शब्द नियमित करण्यात आला आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, कर्ली देवघर येथे ग्रामपंचायत इमारत बांधणे या प्रकरणाबाबत चौकशी करण्यात आली असून ७/१२ चा उतारा स्वतंत्र आहे. यावर समितीने असा मुद्दा उपस्थित केला की, कार्यारंभ आदेशाच्या मुदतीपर्यंत खर्च करण्याची परवानगी दिली पाहिजे. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, २५१५ च्या हेडवरील सर्व कामांसाठी

जिल्हाधिकारी यांच्याकडे निधी देण्यात येत होता. त्या काळात तो देण्यात आलेला आहे. यावर समितीने पुढे विचारणा केली की, पैसा खर्च न झाल्यामुळे तो निधी परत आला आहे. २५१५ च्या हेडवरील निधीला मार्च महिन्यात मंजुरी देण्यात आली. त्यामुळे तो निधी परत आला. जो निधी पूर्वी देत होतो व नंतर देत होतो ती पद्धत आता बंद झाली आहे. २५१५ च्या हेडवरील जिल्हाधिकारी यांना निधी देण्याचे बंद केले आहे. लायबिलिटी नमूद करून विभागाकडे निधी पडून असतो. देयक संगणकावर येते व संगणकावरुन ती कार्यवाही करण्यात येते. दिनांक ३१ मार्च, २०१९ पर्यंत जी देयके आली त्या सर्वांचे देयक झाले आहे. दिनांक ३१ मार्च पर्यंत जी देयके आली ती माझ्या संगणकावर आली असून ती फायनली मान्य झाली नव्हती. ती देयके फिजिकली आली होती. त्यांचे देयक झाले आहे. जी देयके दिनांक ३१ मार्च नंतर संगणकावर आली त्यासंदर्भात खर्च करण्याचा अधिकार यासाठी नाही की, त्यासाठी दोन वर्षांचा कालावधी झाला आहे. म्हणून ग्रामविकास विभाग निधी खर्च करण्यापूर्वी वित्त विभागाची मंजुरी घेत आहे.

यावर समितीने सुचना केली की, अशी अनेक कारणे असू शकतील. काही ठिकाणी निवडणुका किंवा पोट निवडणुका असतात. कार्यारंभ आदेशाचा जो कालावधी असेल त्या कालावधीपर्यंत निधी खर्च करण्याची परवानगी द्यावी. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, वित्त विभाग अशी विचारणा करते की, कार्यारंभ आदेश इतक्या उशीरा का दिला. २५१५ लेखाशिर्षावरील सर्व कामे तीन ते पाच लाख रुपयांच्या वर असतात. या कामांचा कार्यारंभ आदेश माहे मार्च, २०१९ मध्ये देता येत असताना माहे फेब्रुवारी २०१९ मध्ये का दिला आहे. त्यामुळे तसे करता येत नाही. कार्यारंभ आदेश ६० दिवसांचा असेल तर दिनांक ३१ जानेवारी नंतर कार्यारंभ आदेश देऊ नये असे असायला पाहिजे.

यावर समितीने विचारणा केली की, २५१५ च्या हेडवरील कामांच्या यादीला माहे डिसेंबर किंवा माहे जानेवारी मध्ये मंजुरी मिळाली तर दिनांक ३१ मार्च पर्यंत सर्व प्रस्ताव मंजूर करून त्यांचे अंदाजपत्रक तयार करणे, तांत्रिक मंजुरी घेणे या बाबी शक्य नाहीत. समितीची सूचना अशी आहे की, ही बाब वित्त विभागाच्या लक्षात आणून द्यावी की, वर्क ऑर्डरच्या कालावधीपर्यंत खर्च करण्याची परवानगी त्यांना असावी. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी विदित केले की, वित्त विभाग ही बाब मान्य करणार नाही. वित्त विभागाचे असे म्हणणे असते की, विभागाने डिसेंबरमध्ये कामाची यादी का मंजूर केली. जून महिन्यात यादी का मंजूर केली नाही असा प्रश्न ग्रामविकास विभागाला विचारण्यात येईल.

यावर समितीने मत व्यक्त केले की, शासनाने त्यासंदर्भात योजना ठरविली पाहिजे, सचिवांनी शिफारस करावी. जिल्हा परिषदेतील कामांना हे अडथळे येतात. मार्च मध्ये पहिल्या वर्षी पैसे देतात दुस-या वर्षी जुलै महिन्यापर्यंत मार्च महिन्यातील कामे चालतात. ऑगस्ट महिन्यापासून कामांची सुरूवात होते. त्यामुळे मार्च महिना येईपर्यंत निधी खर्च होत नाही. एखादी इमारत बांधकामाच्या वर्क ऑर्डरचा कालावधी हा दोन वर्षांचा असतो. काही कामांचा कालावधी सहा महिने किंवा एक वर्षाचा असतो.

यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी विदित केले की, ज्या कामांचा कार्यारंभ आदेश कालावधी एक वर्षापेक्षा कमी असतो त्या कामांना अडचण येत नाही. एक वर्षापेक्षा जास्त असेल तर विभाग दोन वर्षात निधी देते. यावर समितीने विचारणा केली की, एखाद्या प्रकरणात विभागाने दिनांक ३१ मार्च रोजी निधी दिला तर त्याची प्रक्रिया जुलैपर्यंत सुरू असते. तोपर्यंत नवीन वर्षाच्या कामाला सुरूवात होत नाही. त्यामध्ये सहा महिने जातात त्यानंतर पावसाळा सुरू होतो. ऑक्टोबर मध्ये कामाला सुरूवात केली व कार्यारंभ आदेश ऑक्टोबर महिन्यात झाला तर ठिक आहे. एखाद्या कामाचा कालावधी एक वर्षाचा आहे. तर ते काम तिस-या वर्षात जाते. त्याबाबत सचिवांनी धोरण ठरविण्याबाबत कार्यवाही करावी.

**अभिप्राय व शिफारशी**

सन २०१२-२०१३ या वर्षामध्ये जिल्हा परिषद, रत्नागिरी अंतर्गत संगमेश्वर तालुक्यातील कर्ली देवघर ग्रामपंचायत इमारतीच्या बांधकामासाठी रुपये २,६३,०००/- एवढी रक्कम खर्च करण्यात आलेली असून यासंदर्भात असे लेखा आक्षेप नोंदविण्यात आले आहेत की, सदर कामाच्या टिप्पणीत दिनांक, लेखाशीर्ष सांकेतांक नमूद नाही. अंदाजपत्रकिय रक्कम आदेश नमूद नाही, ग्रामपंचायत तांत्रिक व आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेबाबतचा दाखला नाही. रोख पुस्तकाच्या सन २००६-२००७ व सन २००७-२००८ च्या उता-यावर सरपंचाची स्वाक्षरी नाही. बयाणा रक्कम व अनामत रक्कम रुपये १५,००० वसुल करणे आवश्यक होते. करारनाम्यावर दिनांक नमूद नाही व मुद्रांक विवरण करारपत्र अपूर्ण राहिलेले आहे. कामगाराचा विमा उतरविला नाही. सदर कामाचे उपयोगिता प्रमाणपत्र जिल्हाधिका-यांना सादर केलेले नाही. कामाच्या ठिकाणी नामफलक लावलेला नाही.

उपरोक्त लेखा आक्षेपावर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी खुलाशाच्या आधारे समितीने साक्ष घेतली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, कामाच्या टिप्पणीमध्ये दिनांक, लेखाशीर्ष सांकेतांकाच्या नोंदी अनावधानाने करणे राहिल्या होत्या परंतु पहिल्या पूर्ततेच्यावेळी दिनांक आणि सांकेतांक क्रमांक व लेखाशीर्ष नमूद करण्यात आलेला आहे. ग्रामपंचायत आर्थिकदृष्ट्या सक्षम असल्याबाबत

गटविकास अधिकारी यांचा दाखला दिनांक ६ मे, २०११ रोजी घेतलेला आहे. तसेच उता-यावर संबंधित संरपंचाची स्वाक्षरी घेतलेली आहे. प्रथम पूर्ततेच्यावेळी म्हणजेच दिनांक १२ नोव्हेंबर, २०१४ रोजी करारनाम्यावर दिनांक नमूद करण्यात आलेला आहे. तथापि, लेखापरीक्षणाच्यावेळी आवश्यक ती कागदपत्रे/अभिलेखे सादर केलेली नाहीत. जरी संबंधित अधिकारी/कर्मचा-यांवर कामाचा बोजा असला तरी लेखापरीक्षण हे पूर्वसुचना देऊनच केले जाते तसेच लेखापरीक्षण करणारे पथक जवळपास एक महिना त्या ठिकाणी काम करीत असते. त्या महिन्याभरात अभिलेख्यांची पूर्तता करून देण्यात आली नाही. तसेच कर्ली देवघर येथे ग्रामपंचायत इमारत बांधणे या कामी घेण्यात आलेल्या करारनाम्यावर लेखापरीक्षणाचेवेळी दिनांक नमूद केलेला नव्हता, परंतू कामाचा कार्यारंभ आदेश देतानाची तारीख दाखल केलेली होती. सदर तारखेपूर्वीची तारीख करारनाम्यावर नमूद करण्यात येवून लेखापरीक्षणाला दप्तर दाखविणेत आलेले होते.

समितीच्या मते ग्रामपंचायत ही स्थानिक स्वराज्य संस्था आहे. ग्रामपंचायतीने कंत्राटदार म्हणून काम पाहू नये. अनेकदा ग्रामपंचायतींना करारनामा करण्यास सांगितले जाते. त्या करारनाम्यावर सरपंच स्वाक्षरी करतात याबाबत जर कोणी मा. न्यायालयात दावा दाखल केला तर संबंधित सरपंच कलम ३९ नुसार कारवाईस पात्र ठरतील. त्यामुळे करारनाम्यात ज्या अटी व शर्ती नमूद करण्यात येतात त्या कार्यारंभ आदेशामध्ये नमूद कराव्यात, याकरीता धोरण निश्चित करण्यात यावे व ज्याठिकाणी कामासाठी अनुदान दिले जाते त्याठिकाणी करारनामा करण्याची आवश्यकता नाही. परंतू जे काम विनानिविदा करण्यात येते त्यावेळी करारनामा करण्यात यावा. तसेच एखाद्या प्रकरणात ग्रामविकास विभागाने त्या आर्थिक वर्षाच्या दिनांक ३१ मार्च रोजी निधी दिला तर त्याची प्रक्रिया माहे जुलैपर्यंत सुरू असते तो पर्यंत नवीन वर्षाच्या कामाला सुरूवात होत नाही, त्यामध्ये जवळपास सहा महिने जातात. दरम्यान पावसाळा सुरू झाल्यास प्रत्यक्षात कामाला माहे ऑक्टोबर मध्ये सुरूवात केल्यास व कामाचा कालावधी एक वर्षाचा असल्यास उक्त काम तिस-या वर्षात पूर्ण होते. ज्या कामाकरिता शासनाने निधी दिला आहे ते काम वेळापत्रकानुसार पूर्ण होणे आवश्यक असते. मात्र प्रत्यक्षात निधी प्राप्त होण्यास होणा-या विलंबामुळे निश्चित कालमर्यादेत कामे पूर्ण होत नाहीत. त्यामुळे कामाच्या खर्चात वाढ होऊन त्याचा शासनाच्या तिजोरीवर अतिरिक्त ताण पडतो. मूळ प्राकलनापेक्षा कामाच्या खर्चात जास्त वाढ होत असल्याने जनतेच्या पैशाचा अपव्यय होतो. मूळ काम वेळेत झाले तर जनतेच्या पैशाची बचत देखील होते. याकरीता शासनाने बांधकामे, त्यासंबंधातील वेळापत्रक व निधीची तरतुद यांचा साकल्याने विचार करून नव्याने धोरण निश्चित करावे व जून्या धोरणात सुधारणा करावी अशी समितीतर्फे शिफारस करण्यात येत आहे व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्याच्या आत सादर करण्यात यावा.

## प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, रत्नागिरी

### करबुडे फाटा ते मुळगांव रस्ता डांबरीकरण करणे

**परिच्छेद क्रमांक ३.२२७/२६ (सन २०१२-१३)**

प्रमाणक क्रमांक ९१६ दिनांक ३१ मार्च, २०१३ रक्कम रुपये ४,९९,९६२ खर्च केलेला आहे. याबाबत झालेल्या अनियमितता खालीलप्रमाणे आहेत :—

(१) ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन क्र.व्ही.पी.एस/१०९९/प्र.शा.५८/०८ दिनांक २५ मे, २००४ च्या तरतुदीनुसार रुपये २०,००० च्या वरील कामासाठी कामाच्या ठिकाणी माहितीदर्शक फलक लावणे आवश्यक आहे. परंतू तसा नामफलक दाखला तपासणीत उपलब्ध झाला नाही. परंतु देयकात रक्कम रुपये १,४०० खर्च घालण्यात आली असून ती संबंधित मक्तेदाराकडून वसूल करून शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

(२) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय ग्रामीण पाणी पुरवठा १०९८/प्र.क्र.४२५ पा.पु.दिनांक ११ जानेवारी, १९९९ परि.क्र.४० नुसार कामासाठी वापरण्यात येणा-या साहित्याची तपासणी शासकीय प्रयोगशाळेकडून करणे आवश्यक आहे. परंतू तसा चाचणी अहवाल तपासणीत उपलब्ध झाला नाही. त्यामुळे अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १० टक्के रक्कम रुपये ४९,९६२ वसूल करून शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

(३) मोजमाप नोंदवहीत बिलातून बाबनिहाय कपात केलेली नोंद नाही.

(४) कामावर नियुक्त केलेल्या कामगारांना विमा कामास सुरूवात करणेपूर्वी उतरविणे आवश्यक असून तसे न करता देयकातून विम्याची रक्कम रुपये ५,००० कपात केलेली आहे.

(५) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग प्र.क्र.४४/३३ दिनांक १२ ऑक्टोबर, २००० अन्वये मोजमाप घेताना कनिष्ठ अभियंता व ते तपासताना उपविभागीय अभियंता यांनी मोजमाप नोंदवहीत दिनांकित स्वाक्षरी करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही.

(६) मोजमाप नोंदवहीत रोड मेटल रिटर्न रिपोर्ट आवश्यक असताना तो नोंदविला नाही.

(७) लेखासंहिता नियम १८० नुसार तपशिलवार मोजणी असलेले प्रत्येक पृष्ठ त्यात लाल शाईने कर्णरेषा काढून मोजमाप नोंदवही खोडणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

(१) सदर कामावर माहिती दर्शक फलक लावणेत आला होता परंतू त्याचा फोटो सोबत जोडणे नजरचुकीने राहून गेले होते. तरी आता फोटो नस्ती सोबत जोडणेत आलेला आहे.

(२) अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांचेकडील जा.क्र.दवगुणीम/नमु/चाशु/द-३/३११ दिनांक ८ फेब्रुवारी, २०१० नुसार दुप्पट दराने (रुपये २८०० x २) रुपये ५६०० ची वसुली प्रमाणक क्रमांक ९१६ दिनांक ३१ मार्च, २०१३ ने करणेत आलेली आहे.

(३) मोजमाप नोंदवहीत बाबनिहाय कपात केलेची नोंद घेणेत येत नाही. देयकाच्या अंतिम पृष्ठावर बाबनिहाय कपातीची नोंद घेणेत आलेली आहे.

(४) उपविमा संचालक, विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक प्रविनी-२३१०/सांबावि/विमा वसुली/अभि-३ दिनांक ८ सप्टेंबर, २०१० नुसार विम्याची रक्कम प्रथम देयक प्र.क्र.९१६, दिनांक ३१ मार्च, २०१३ अन्वये वसुल केलेली आहे.

(५) प्रथम पूर्ततेवेळी मोजमाप नोंदवहीत कनिष्ठ अभियंता उप अभियंता यांच्या दिनांकित स्वाक्षरी घेण्यात आलेली आहे.

(६) सदरचे काम डांबरीकरणाचे होते, मोजमाप नोंदवहीत आलेल्या खडी व डांबर यांची नोंद घेणेत आलेली आहे.

(७) देयक पारित करताना मोजमाप नोंदवहीत प्रत्येक पृष्ठ लाल शाईने कर्णरेषा काढून खोडणेत आलेले आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

रत्नागिरी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २६ एप्रिल, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, साहित्याच्या दर्जाच्या चाचणी अहवालाअभावी खात्री कशी केली, संपूर्ण साहित्याची वसुली का करू नये. अधीक्षक अभियंता यांचे पत्रानुसार साहित्याच्या चाचण्या नसताना देयके अदा केल्यास त्याची गंभीर दखल घेतली जाईल असे सूचित केलेले आहे, त्याप्रमाणे अधीक्षक अभियंता यांनी कोणती कार्यवाही केली. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, अधीक्षक अभियंता दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, कोकण भवन मुंबई यांच्या दिनांक ८ फेब्रुवारी, २०१० रोजीच्या सुचनेनुसार दुप्पट दराने रुपये ५६०० रकमेची वसुली दिनांक ३१ मार्च, २०१३ रोजी करण्यात आलेली आहे. ज्यावेळी चाचणी होत नाही त्यावेळी दुप्पट दराने त्याची आकारणी केलेली आहे.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, चाचणी अहवाल आला नाही म्हणून कंत्राटदाराची रक्कम कपात करणे योग्य नाही. कारण ते यापूर्वीच साहित्य वापरलेले असते. साहित्य वापरण्याची परवानगी आपण दिलेली असते. कंत्राटदाराने याबाबत आक्षेप घेतला तर तुमची केस कोर्टामध्ये टिकू शकत नाही. कंत्राटदाराची रक्कम कपात करण्यापेक्षा दोष पाहिला पाहिजे. साहित्याचा वापर करण्यापूर्वी चाचणी अहवाल मागवून त्यास जोडावा. चाचणी अहवाल आला नाही म्हणून दुप्पट पैसे कपात करणे योग्य नाही. कंत्राटदाराचे पैसे कपात करणे योग्य नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, परिपत्रकाप्रमाणे कारवाई केलेली आहे.

यावर समितीने पुढे विचारणा केली की, अधीक्षक अभियंता यांनी यास कशी परवानगी दिली, परिपत्रक कसे काढले. नियमामध्ये तसे आहे का, ब-याच प्रकरणामध्ये चुकीच्या किंवा दुस-याच माणसाला दोषी म्हणून पकडले गेले आहे. अधीक्षक अभियंता यांनी असे परिपत्रक काढणे ही चुकीची बाब आहे. ग्रामविकास खात्याचे या विषयाकडे दुर्लक्ष का झाले आहे. तसेच विभागीय आयुक्त कार्यालयही जिल्हा परिषदेची पाहणी करते. विभागीय आयुक्त कार्यालयाकडून वार्षिक तपासणी केली जाते, त्यावेळी हे लक्षात का येत नाही. आपण वार्षिक तपासणी व्यवस्थित केली तर लेखा परीक्षाणामध्ये आक्षेप येण्याची संधीच मिळणार नाही. आक्षेप आल्यानंतरही आपण स्पष्ट करीत नाही. जिल्हा परिषदेची पुनर्विलोकन व पाहणी करण्याचा अधिकार हा विभागीय आयुक्तांचा आहे. विभागीय आयुक्तांच्या वतीने ते सहायक आयुक्तांना पाठवितात, त्यांच्याकडूनही दुर्लक्ष का होते. शासनाने याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

यावर कोकण विभागाचे उप आयुक्त यांनी माहिती दिली की, विभागीय आयुक्त कार्यालयास सहायक आयुक्तांच्या पदाखाली स्थानिक लेखा तपासणी हे पद आहे, त्यांना दोन सहाय्यक आहेत. विभागीय आयुक्त कार्यालयाकडे तांत्रिक मनुष्यबळ नाही. जिल्हा परिषदेचे संपूर्ण कामकाम म्हणजे कर्मचारी, सेवापुस्तिका, तसेच इतर कामाचा संपूर्ण आढावा घेण्यात येतो. त्यांना इन्स्ट्रक्शन मेमो देऊन त्यांच्याकडून पूर्तता करून घेण्यात येते. यामध्ये ब-याचदा लेखापरीक्षणाचे मुद्दे विभागीय आयुक्त कार्यालयाकडे येत नाहीत.

यावर समितीने विचारणा केली की, एखाद्या जिल्हा परिषदेचे लेखापरीक्षण केल्यानंतर त्या लेखापरीक्षणाचा अहवाल विभागीय आयुक्त कार्यालयास पाठविला जातो. त्यावर पूर्तता करणे व त्याचा जिल्हा परिषदेला जाब विचारण्याचा अधिकार विभागीय आयुक्त कार्यालयास आहे. तसेच नियमित तपासणीमध्ये विभागीय आयुक्त कार्यालयाने चुका काढल्या असत्या तर हे आक्षेप आले नसते. हे आक्षेप येणे म्हणजे आपल्या कामकाजावर ठपका ठेवणे आहे. नियमबाह्य कामकाज होऊ नये म्हणून विभागीय आयुक्त कार्यालयातर्फे तपासणी करण्यात येते. मध्यंतरी शासनाने सहायक आयुक्त हे पद या तपासणीसाठी निर्माण केले. तुम्हाला मागील अहवाल तपासणीसाठी शासनाने नेमलेले आहे, आजच्या बैठकीसमोरील अहवालामध्ये ७३ मुद्दे आहेत, पण आपण त्या त्या वेळी लक्ष घातले असते तर त्यावेळीच आक्षेप दूर झाले असते. यावर कोकण विभागाचे आयुक्त यांनी समितीचे मत मान्य केले.

यावर समितीने अशी विचारणा केली की, विभागीय आयुक्त कार्यालयाने कोणत्या बाबींची तपासणी केली पाहिजे, याचा ठोकताळा अगोदरच शासनाने ठरवून दिलेला आहे. यावर कोकण विभागाचे उप आयुक्त यांनी खुलासा केला की, याबाबत १९७० चा शासन निर्णय आहे. १९८३ मध्ये यामध्ये सुधारणा झाली. यानुसार आयुक्त कार्यालय जिल्हा परिषद कामकाजाची संपूर्ण तपासणी करते, लेखापरिच्छेदांची पूर्तता करणे, स्थानिक निधी लेखा विभागाला पाठविणे याबाबत आयुक्त कार्यालय पाठपुरावा करते. तांत्रिक बाबी वेगळ्या असतात.

यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, आयुक्त कार्यालयाकडून पाठपुरावा करून सुद्धा एवढे आक्षेप व मुद्दे राहतात हे बरोबर नाही. या संदर्भात विभागीय आयुक्तांनी तपासणी केली पाहिजे. तसेच या संबंधी तयार केलेल्या अहवालावर विभागीय आयुक्तांकडून सही केली जाते. हा विषय नेहमी उपस्थित होत आहे. यावर कोकण विभागाचे उप आयुक्त यांनी खुलासा केला की, आम्ही यासंबंधी नियमितपणे तपासणी करीत आहोत. यावर समितीने या संदर्भात महसूल आणि ग्रामविकास विभागाचे सचिव त्याचप्रमाणे संपूर्ण आयुक्तांसमवेत एकत्रित साक्ष घेण्यात येईल असे निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली :—**

शासन परिपत्रकानुसार साहित्याच्या दर्जाचा चाचणी अहवाल प्राप्त नसल्यामुळे संबंधित कंत्राटदाराला देय असलेल्या रकमेतून कपात करण्यात आल्याप्रकरणी सदरहू परिपत्रकातील त्रुटी निवारणार्थ कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

सदर रस्त्याच्या कामासाठी वापरण्यात आलेल्या साहित्याचे चाचणी अहवाल सादर करण्याबाबत संबंधित मक्तेदार यांना सूचना देण्यात आल्या होत्या. कामाचे अंदाजपत्रकाचे दर जिल्हा दरसूची २०१२-१३ प्रमाणे असून सदर दरामध्ये १ टक्के रक्कम चाचणी अहवालासाठी अंतर्भूत होती. कामाचे अंतिम देयक मार्च, २०१३ मध्ये देण्यात आले आहे. कामाचे अंतिम देयक पारित करेपर्यंत मक्तेदार यांनी चाचणी अहवाल सादर न केल्याने अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांचे पत्र क्रमांक दवगुनिम/नमु/चाशु/द-३/३११, दिनांक ८ फेब्रुवारी, २०१० नुसार दुप्पट दराने (रुपये २८०० × २) रुपये ५६०० ची वसुली दिनांक ३१ मार्च, २०१३ रोजी करण्यात आलेली आहे.

परिपत्रकातील त्रुटी निवारणाची कार्यवाही करणे हा मुद्दा अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, मुंबई यांच्याशी संबंधित आहे. त्याअनुषंगाने अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांनी त्रुटींचे निवारण करण्याबाबत पत्र क्र.रजिप/बांधकाम/पंरास/अे-५/२३८/२०१९ दिनांक ९ जानेवारी, २०१९ अन्वये कळविण्यात आले आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय.—** (बांधकाम-३) जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी सहमत.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने रत्नागिरी जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ४ जून, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, शासन परिपत्रकानुसार साहित्याच्या दर्जाचा चाचणी अहवाल प्राप्त नसल्यामुळे संबंधित कंत्राटदाराला देय असलेल्या रकमेतून कपात करण्यात आल्या प्रकरणी सदरहू परिपत्रकातील त्रुटी निवारणार्थ कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत. यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग) यांनी खुलासा केला की, या संदर्भात जिल्हापरिषदेने संबंधित अधिका-यांस कळविले आहे. याच मुद्यावर मागील बैठकीत चर्चा झाली होती. मुळात दोन बाबी आहेत. कामाचा चाचणी अहवाल घेतल्यानंतर काम मंजूर करावयाचे आहे. प्रत्येक साहित्य किती वेळा चाचणी करायचे याची वारंवारता आहे. त्यासाठी दरामध्ये एक टक्का रक्कम अंतर्भूत होती. हे काम सन २०१२-२०१३ मधील असून फक्त ३०० मीटरचे काम होते. या कामामध्ये चाचणी अहवाल घेतले नव्हते. परिपत्रकानुसार कामाचे अंतिम देयक पारित करेपर्यंत मक्तेदार यांनी चाचणी अहवाल सादर न केल्यामुळे अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ यांनी दुप्पट दराने वसुली केली आहे. परंतु दुप्पट दराने रक्कम वसूल केली याचा अर्थ ते मंजूर केले असा नाही. ठेकेदारास जादा रक्कम प्रदान होऊ नये म्हणून ती वसुली आहे त्याप्रमाणे ती केली आहे. जी वसुली करण्यात आली ती बरोबर आहे, परंतु ते काम मंजूर केले असे नाही. हे काम छोटे असल्यामुळे अधिका-यांनी साहित्य पाहून स्विकारले असण्याची शक्यता आहे.

यावर समितीने पुढे विचारणा केली की, कामाच्या ठिकाणी जमा झालेल्या साहित्याचा वापर होण्यापूर्वी साहित्याची चाचणी होणे आवश्यक आहे. परंतु जिल्हा परिषदेमार्फत साहित्याचा वापर झाल्यानंतर चाचणी अहवाल जोडण्यात येत आहे. चाचणी अहवाल प्राप्त न होताच साहित्याचा वापर करता हे कितपत योग्य आहे. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या कामाच्या ठिकाणी असलेल्या लॅबचा वापर होत नाही. ती फक्त शो-पीस म्हणून ठेवली आहे.

यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग) यांनी खुलासा केला की, मोठी कामे असल्यास एकाच क्वॅारीतून साहित्य आणले जाते. समितीने म्हटल्याप्रमाणे रस्ता दुरुस्त करणे अपेक्षित आहे. त्याप्रमाणे पुन्हा एकदा अधिका-यांना सूचना देण्यात येतील. आम्ही ते दुरुस्त करून घेतो, याबाबत दक्षता घेण्यात येईल. यावर समितीने विचारणा केली की, पंतप्रधान ग्रामसडक योजनेंतर्गत करण्यात आलेल्या रस्त्यांची पाच वर्षांची देखभाल दुरुस्ती ठेकेदाराने करावयाची आहे. पाच वर्षात जितक्यावेळा रस्ता खराब होईल तितक्या वेळा ठेकेदाराने दुरुस्त करावयाचा आहे. पण ठेकेदार ठिगळ लावल्याप्रमाणे रस्त्यांची दुरुस्ती करतात. दुरुस्तीचे निकष ठरलेले आहेत त्याप्रमाणे रस्ते दुरुस्त केले पाहिजेत. रस्ता दुरुस्त केल्यावरही तो जुनाच दिसतो. राष्ट्रीय महामार्गावरील रस्त्यांची कामे बांधा, वापरा व हस्तांतरीत करा तत्त्वावर केली जातात. त्या रस्त्यांवर एखादा खड्डा पडला तर तो रस्ता पातळीमध्ये आणल्याशिवाय ठिगळ करीत नाही. त्यामुळे तो रस्ता नवीन दिसतो. ठेकेदाराकडून ते पुन्हा नव्याने बनविण्यास सांगावे. डांबर रस्ता दुरुस्त करता येईल पण सिमेंटचा रस्ता कसा दुरुस्त करणार आहात.

यावर समितीने पुढे विचारणा केली की, ग्रामपंचायतीचे उत्पन्न ५० हजार रुपयापर्यंत असेल तर त्यांना १० लाख रुपयांची कामे देण्याचा अधिकार आहे. जर ग्रामपंचायतीचे उत्पन्न ५० हजार रुपयांपेक्षा जास्त असेल तर त्यांना १५ लाख रुपयांची कामे देण्याचा अधिकार आहे. येथे कामाच्या साहित्य चाचणी अहवालाचा विषय आहे. येथे बारकाईने पाहिले असता असे लक्षात येते की, पहिले काम करून घेण्यात येते नंतर चाचणी अहवाल घेण्यात येतो. दरामध्ये एक टक्का रक्कम चाचणी अहवालात अंतर्भूत असते. त्याऐवजी दोन टक्के वसुली केली म्हणजे चाचणी अहवालाची आवश्यकता नाही असा ठेकेदाराचा समज होतो. पण ते तसे नाही. रत्नागिरी, पुणे, ठाणे अशा मोठ्या जिल्ह्यांत बांधकाम विभागामध्ये प्रचंड प्रमाणात अनागोंदी कारभार आहे. ग्रामपंचायतीकडे कोणत्याही प्रकारचे तांत्रिक मनुष्यबळ नाही. ग्रामसेवकाला ऑनलाईन निविदा काढता येत नाही, त्याला कार्यारंभ कसा द्यायचा हे देखील माहीत नसते. गुणनियंत्रणाच्या संदर्भात ग्राम विकास विभाग तातडीने काही मार्गदर्शक तत्वे काढणार आहे काय, यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग) यांनी खुलासा केला की, विभागाकडून मार्गदर्शक तत्वे काढण्यात येतील. यापूर्वी काढण्यात आलेल्या परिपत्रकांचे कसोशीने पालन करण्याबाबत आदेश काढण्यात येतील. या संदर्भात परिपत्रक काढण्यात येईल.

यावर समितीने नाराजी व्यक्त केली की, आपण अनेकदा परिपत्रक काढण्यात येईल असे सांगितले आहे. येथे असा प्रश्न उपस्थित झालेला आहे की, चाचणी अहवाल सादर न करता देयके अदा केलेली आहेत. समितीसमोर हा विषय अनेकदा चर्चेला आलेला आहे. या सर्व बाबी पाहण्याची जबाबदारी ज्या अधिका-यावर होती त्यांनी ती जबाबदारी पार पाडलेली नाही. संबंधित अधिकारी कारवाईस पात्र असताना त्याच्यावर कोणती कारवाई केली. वर्तमानपत्रात जो फोटो आला आहे त्याची दखल घ्यावी पण ज्या खराब रस्त्यांचे फोटो आले नाहीत त्यांची देखील दखल घ्यावी. पहिल्यावर्षी पाऊस झाल्यानंतर पूर्ण रस्त्याला नाल्या पडतात. मुख्यमंत्री ग्रामसडक योजना आमच्यासाठी वरदान ठरली असे आम्हाला वाटले. पण फक्त डांबराचा भाग चांगला दिसतो साईडचा मुरुम पूर्ण खराब असतो. नीट रोलर दबाई होत नाही.

यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग) यांनी पाहणी करून जेथे कुठे कमी असेल तेथे दुरुस्ती करून घेण्यात येईल. या सर्व रस्त्यांची पाहणी करण्यास एका पथकास सांगण्यात येईल. जर काही त्रुटी आढळल्या तर त्या दुरुस्त करून घेण्यात येतील असे समितीला आश्वासित केले. यावर समितीने विचारणा केली की, विभागाकडे काळ्या यादीत टाकण्याची शिफारस आली असता त्यास काळ्या यादीत का टाकले नाही, त्याची कारणे सांगावीत किंवा समितीला कळवावीत. यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग) यांनी विदित केले की, या संदर्भात समितीला एका आठवड्यात सविस्तर कळविण्यात येईल. यावर समितीने माहिती दिली की, त्या रस्त्यावर अपघात होऊन काही माणसे मेली आहेत. वर्षभरानंतर निविदा काढण्यात आली आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, चाचणी अहवालासंदर्भात परिपत्रक काढण्यात येईल असे सचिवांनी सांगितले. सचिव खालच्या स्तरावरील अधिका-यांना सूचना देतात पण त्याची अंमलबजावणी होत नाही. सचिवांनी दिलेल्या सूचनांची अंमजबजावणी होत नसेल तर भरारी पथकाच्या माध्यमातून पाहणी करून जर काही त्रुटी आढळून आल्या तर तात्काळ कारवाई केली पाहिजे. राज्यामध्ये अशा अनेक प्रकारच्या गोष्टी घडत आहेत. आपण रिझल्ट ओरिएन्टेड करून दाखवा. या प्रकरणी आठ दिवसांत कारवाईसह समितीला माहिती कळवावी.

**अभिप्राय व शिफारशी**

करबुडे फाटा ते मुळगांव रस्ता डांबरीकरण करणे या कामासाठी सन २०१२-२०१३ या वर्षामध्ये रुपये ४ लाख ९९ हजार ९६२ एवढा खर्च केलेला आहे. याबाबत पुढील प्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत.

कामाच्या ठिकाणी माहितीदर्शक नामफलक लावण्यात आलेला नाही. कामासाठी वापरण्यात येणा-या साहित्याची तपासणी शासकीय प्रयोगशाळेकडून करणे आवश्यक आहे परंतु तसा चाचणी अहवाल तपासणीत उपलब्ध झाला नाही त्यामुळे अंदाजपत्रकीय रकमेच्या १० टक्के रक्कम रुपये ४९,९६२ वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे. मोजमाप नोंदवहीत देयकातून बाबनिहाय कपात केलेली नोंद नाही, कामगार विमा काढणे आवश्यक असताना तसे न करता देयकातून विम्याची रक्कम रुपये ५००० कपात केलेली नाही. कनिष्ठ अभियंता व उपविभागीय अभियंता यांनी मोजमाप नोंदवहीत दिनांकित स्वाक्षरी केली नाही. तसेच रोड मेटल रिटर्न रिपोर्ट नोंदविला नाही. लेखासंहिता नियम १८० नुसार तपशिलवार मोजणी असलेले प्रत्येक पृष्ठावर लाल शाईने कर्णरेषा काढून मोजमाप नोंदवही खोडणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही.

उपरोक्त लेखा आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने साक्ष घेतली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, कामावर माहितीदर्शक फलक लावण्यात आला होता परंतु फोटो जोडणे नजरचुकीने राहून गेले होते. तसेच कामासाठी वापरण्यात आलेल्या साहित्याच्या तपासणीसंदर्भात अधीक्षक अभियंता दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, कोकण भवन, मुंबई यांच्या

सुचनेनुसार दुप्पट दराने रुपये ५,६०० एवढ्या रकमेची वसुली दिनांक ३१ मार्च, २०१३ रोजी कंत्राटदाराकडून करण्यात आलेली आहे. तथापि, जिल्हा परिषदेने परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही केली असली तरी चाचणी अहवाल आला नाही म्हणून कंत्राटदाराची रक्कम कपात करणे योग्य नाही, कारण कामाचे साहित्य यापूर्वीच वापरलेले असते. साहित्य वापरण्याची परवानगी जिल्हा परिषदेने दिलेली असते. याबाबत कंत्राटदाराने आक्षेप घेतला तर मा. न्यायालयामध्ये जिल्हा परिषदेचा दावा टीकू शकणार नाही, त्यामुळे कंत्राटदाराने दुप्पट पैसे कपात करणे योग्य नाही असे समितीचे मत आहे. तसेच परिपत्रकानुसार कामाचे अंतिम देयक पारित करेपर्यंत कंत्राटदाराने चाचणी अहवाल सादर न केल्यामुळे अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ यांनी दुप्पट दराने वसुली केली आहे. परंतू दुप्पटदराने रक्कम वसुल केली याचा अर्थ ते मंजूर केले असा होत नाही. ठेकेदारास जादा रक्कम प्रदान होऊ नये म्हणून ती वसुली आहे. त्याप्रमाणे ती केली आहे त्यामुळे करण्यात आलेली वसुली योग्य असली तरी संबंधित अधिका-यांनी कामाच्या ठिकाणी जमा झालेल्या साहित्याचा वापर होण्यापूर्वी साहित्याची चाचणी करणे आवश्यक आहे.

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ च्या नियम ८७ अन्वये कंत्राटदाराच्या मार्फत केल्या जाणा-या बांधकामाच्या बाबतीत कामावर वापरण्यात येणा-या साहित्याचा वापर करण्यापूर्वीच संबंधित शासकीय संस्थेकडून किंवा कार्यालयाकडून चाचणी अहवाल प्राप्त करून घेणे आवश्यक असल्याची तरतुद आहे. तसेच यासंबंधात अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, कोकण भवन, मुंबई यांच्या दिनांक ६ ऑगस्ट, २००९ रोजीच्या पत्रान्वये 'राज्य शासनाच्या निधीमधून सुरू असलेल्या कामांच्या साहित्याच्या वारंवारितेप्रमाणे चाचण्या दक्षता व गुण नियंत्रण मंडळाच्या प्रयोगशाळेतूनच करून घेणे आवश्यक आहे.' तसे न केल्यास त्याबाबत कंत्राटदाराकडून दंडनीय (दुप्पट दराने) करणे आवश्यक असल्याचेही नमूद केले आहे. असे असतानाही जिल्हा परिषदेने साहित्याचा वापर झाल्यानंतर चाचणी अहवाल जोडणे व चाचणी अहवाल प्राप्त नसताना देखील साहित्याचा वापर करणे ही बाब योग्य नाही, त्यामुळे ग्रामविकास विभागाने गुण नियंत्रणाच्या संदर्भात तातडीने मार्गदर्शक तत्वे निर्गमित करावी व त्याबाबत काढण्यात आलेल्या परिपत्रकाचे कसोशीने पालन करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात यावेत, अशी समिती शिफारस करीत आहे व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा.**

प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, रत्नागिरी

### खांदाट, दळवटणे, मोरवणे रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे कामामधील अनियमितता

**(१) परिच्छेद क्रमांक ३.२२८/२८ (सन २०१२-१३)**

सदर कामावर रक्कम रुपये १० लाख एवढा खर्च केलेला असून सदर काम रस्ते दुरुस्ती गट-अ अंतर्गत करण्यात आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :—

(१) लेखासंहिता १९६८ च्या नियम ८७ नुसार कामासाठी वापरलेल्या साहित्याची गुणवत्ता चाचणी अहवाल घेतलेला नाही.

(२) या कामासाठी एकूण १५.८४ मेट्रिक टन डांबर वापरणे आवश्यक. देयकासोबत चलन क्रमांक ६०००१०१९१२, दिनांक २ फेब्रुवारी, २०१२ नुसार १४.७९० मेट्रीक टन डांबराचे चलन जोडले आहे. कामासाठी १.०५ मेट्रीक टन डांबर कमी वापरले आहे. जिल्हा दर सुचीनुसार ३५२९५ * १.०५ = ३७०६० संबधितांकडून जबाबदारी निश्चित करून वसूल करणे आवश्यक आहे व प्रमाणकानुसार डांबर का वापरले नाही याबाबत खुलासा करणे आवश्यक आहे.

(३) कामासाठी वापरलेल्या गौण खनिज चलनानुसार मेटल दिनांक ७ फेब्रुवारी, २०१२ ते दिनांक १८ फेब्रुवारी, २०१२ या कालावधीत आणले असताना संबधित अभियंता यांनी मोजमाप नोंदवही ५०७१ पान क्रमांक १६ वर दिनांक ३ फेब्रुवारी, २०१२ रोजी मेटलची नोंद कशी घेतली.

(४) कामासाठी ८५ ब्रास गौण खनीज आणले असताना आरएमआर विवरणपत्रात १२३ ब्रास मेटलची नोंद संबधीत अभियंता यांनी दर्शविली आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

(१) लेखासंहिता १९६८ च्या नियम ८७ नुसार कामासाठी वापरलेल्या साहित्याचा गुणवत्ता चाचणी अहवाल घेणेत आलेला असून अवलोकनार्थ गुणवत्ता चाचणी अहवालाची छायांकित प्रत सोबत जोडणेत येत आहे.

(२) सदर कामाच्या अंदाजपत्रकामध्ये बीबीएम करिता डांबरासाठी १७५ कि.ग्रॅ/१०० चौ.मीटर एवढी तरतूद करणेत आलेली होती. त्यानुसार ५२८३.४३ कि.ग्रॅ. म्हणजेच ५.२८ मेट्रीक टन एवढे डांबर वापरणे आवश्यक होते व तेवढेच डांबर वापरणेत आलेले आहे परंतू देयक तयार करतेवेळी नजरचुकीने डांबर वापर तक्त्यामध्ये वापरलेले डांबर १७५ कि.ग्रॅ. लिहीणे आवश्यक असताना त्याठिकाणी २२५ कि.ग्रॅ. लिहीणेत आले. मात्र प्रत्यक्षात सदर कामावर १४.३३ मेट्रीक टन एवढे डांबर वापरणे आवश्यक होते व तेवढेच डांबर वापरणेत आले व तशी दुरुस्तीची नोंद डांबर वापर तक्त्यामध्ये ठेवणेत आलेली आहे. तसेच प्रत्यक्ष वापलेल्या डांबराच्या चलनाची छायांकीत प्रत सोबत जोडणेत आली आहे.

(३) कामासाठी वापरलेल्या ८५ ब्रास गौण खनीजाची वसुली संबधीत मक्तेदार यांच्या सुरक्षा अनामत रक्कमेतून रक्कम रुपये १७,००० मात्र वसूल करणेत आलेली असून सदर वसुली मा. जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेकडे जमा करणेत आलेली आहे. सदर वसुलीच्या धनाकर्षाची व पत्राची छायांकीत प्रत सोबत जोडणेत आली आहे.

(४) मोजमाप पुस्तक क्रमांक ५०७१ पान क्रमांक १६ वर ८५ ब्रास गौण खनिजाची नोंद करणेत आलेली आहे. परंतु आरएमआर तक्त्यामध्ये नजरचुकीने संगणकीकरण करताना चुकीच्या परिमाणाची नोंद करणेत आलेली होती. मात्र मोजमाप पुस्तिकेप्रमाणे आरएमआरवर सुधारित हस्तलिखित नोंद ठेवणेत आलेली आहे.

**(२) परिच्छेद क्रमांक ३.२२९/३१ (सन २०१२-१३)**

हडकणी, घागवाडी, बौद्धवाडी, गावणांगवाडी रस्ता किलोमीटर ०/४०० ते १/० मजबुतीकरण व डांबरीकरण करणे, तालुका चिपळूण या कामातील अनियमितता.

**उपरोक्त नमूद कामावर रक्कम रुपये ७,७१,६६४ एवढा खर्च झाला असून सदर काम गट अ अंतर्गत केले आहे. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :—**

(१) हिंदुस्थान पेट्रोलियम कंपनीकडून चलन क्रमांक १२६०५, दिनांक २२ मार्च, २०१२ नुसार डांबर आणले असताना डांबराची तपासणी केल्याचा अहवाल दिनांक ०९ फेब्रुवारी, २०१२ रोजी पंतप्रधान ग्रामसडक योजना प्रयोगशाळा, चिपळूण यांनी कसा दिला.

(२) डांबर दरवाढ दिलेली आहे. प्रति मेट्रीक टन ४३,३३६ प्रत्यक्ष डांबर खरेदी दर रुपये ४२,६०७ प्रति मेट्रीक टन जादा प्रदान ४३,३३६ – ४२,६०७ = ७२९ एकूण डांबर वापर ७.०४ * ७२९ = ५,१३२ वसूल करणे आवश्यक आहे.

(३) रोड मेटल विवरण नमुना ७७ तपासता सदर विवरणामध्ये ६ एमएम ट्रॅप मेटल १४ घनमीटरची नोंद नसताना मोजमाप नोंदवही पान क्र. २५ वर सदर नोंद कशी घेतली. लेखा संहिता नियम २०४ अन्वये कामासाठी आणलेल्या सर्व साहित्याची नोंद आरएमआर विवरणामध्ये दाखविणे आवश्यक असताना देखील साहित्याची नोंद का घेतली नाही.

(४) सदर कामाचे चेनेज ०/४०० ते १/० म्हणजेच ४०० मीटरचे आहे. बाब क्रमांक १ नुसार मात्र गटाराचे काम १/० ते १/३०० या चेनेजमध्ये अनावश्यक केले असल्याने केलेली प्रदान ३०० * ७० = रुपये २१,००० अनुज्ञेय नाही.

(५) सदर कामासाठी मऊ मुरुम ४५ घनमीटर जादा वापरला असल्याने रक्कम रुपये ४५ * ११.५५ (दर) = रुपये ४२० अनुज्ञेय नाही.

(६) कामाच्या संचिकेसोबत जोडलेल्या आरएमआर नमुना ७७ प्रमाणे कामासाठी ४३२ घनमीटर गौणखनिज वापरले आहे. म्हणजेच १५३ ब्रास संचिकेमध्ये ७० ब्रासची चलने जोडलेली असल्याने उर्वरीत ८३ ब्रासची प्रति ब्रास रुपये २०० प्रमाणे ८३ * २०० = १६,६०० संबधितांकडून वसूल न करता प्रदान केलेला आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

(१) कामासाठी वापरणेत आलेले डांबर दिनांक २२ मार्च, २०१२ अन्वये उपलब्ध झालेले असून सदर डांबराचा गुणनियंत्रण चाचणी अहवाल पंतप्रधान ग्रामसडक योजना प्रयोगशाळा, चिपळूण यांचेकडून दिनांक २६ मार्च, २०१२ रोजी देणेत आलेले आहे. परंतू सदर चाचणी अहवालावर पंतप्रधान ग्रामसडक योजना प्रयोगशाळा, चिपळूण यांचेकडून नजरचुकीने दिनांक २६ मार्च, २०१२ ऐवजी ०९ फेब्रुवारी, २०१२ अशी दिनांक नोंदविणेत आलेली होती त्यामुळे प्रत्यक्षात असलेली दिनांक २६ मार्च, २०१२ प्रमाणे दुरुस्ती करून उपअभियंता, पंतप्रधान ग्रामसडक योजना प्रयोगशाळा, चिपळूण यांची दुरुस्तीसाठी प्रतिस्वाक्षरी घेणेत आलेली आहे. त्याची छायांकीत प्रत अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

(२) डांबराच्या फरकाची रक्कम रुपये ५,१३२ मात्र वसुल करणेत आलेली असून चलनाची प्रत अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

(३) सदर कामासाठी ६ मिमी आकाराची खडी जमा केल्यानंतर मोजमाप पुस्तकामध्ये मोजमाप पुस्तक क्रमांक १८७५ मध्ये पृष्ठ क्रमांक २५ वर १४ क्यूबीक मीटर ची नोंद घेणेत आली आहे. मात्र देयक सादर करताना आरएमआर मध्ये टंकलेखन चुकीमुळे १४ क्यूबीक मीटर ऐवजी ३ क्यूबीक मीटर करणेत आली होती. सदरची दुरुस्ती मोजमाप पुस्तकाप्रमाणे आरएमआर मध्ये करणेत आली असून मोजमाप पुस्तक व आरएमआरची छायांकीत प्रत अवलोकनार्थ ठेवणेत आली आहे.

(४) सदर कामाच्या ठिकाणी कामाची निकड लक्षात घेता व ग्रामस्थांच्या मागणीनुसार व आवश्यकतेनुसार गटाराचे खोदकाम कि.मी. १/०० ते १/३०० मध्ये करणेत आलेले आहे. जरी गटाराचे खोदकाम कि.मी. १/०० ते १/३०० पर्यंत करणेत आलेले असले तरी मुळ अंदाजपत्रकापेक्षा जादा खर्च झालेला नाही.

(५) जादा प्रदान करणेत आलेल्या रक्कमेची वसुली ४५ घनमीटर * ११.५५ = ५२० रूपये मात्र करणेत आलेली असून त्याच्या चलनाची छायांकीत प्रत अवलोकनार्थ ठेवणेत आलेली आहे.

(६) वसुलपात्र रक्कम रुपये १६,६०० पैकी सुरक्षा अनामत मधून १५,४३३ मात्र वसुल करणेत आलेले आहेत उर्वरीत रक्कम रुपये ११६७ मात्र मक्तेदार यांनी रोखीने भरलेली असून एकूण रक्कम रुपये १६,६०० वसुल करणेत आलेली आहे, सदर वसुलीची चलनाची व धनाकर्षाची छायांकीत प्रत अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

**(३) परिच्छेद क्रमांक ३.२३०/३२ (सन २०१२-१३)**

**भोपण पणदेरी बौध्दवाडी, भोईवाडी मोहल्ला डांबकरीकरण करणे. (ता.दापोली ग्रामीण मार्ग ३४४ कि.मी. ०/० ते १/३००)**

सदर काम खासदार निधी अंतर्गत केलेले असून कामावर रक्कम रु. १०,२६,७१७ एवढा खर्च केलेला आहे. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :—

(१) कामासाठी बाब क्रमांक १,२,७,९ अन्वये एकूण ५७९ घन मिटर वापर केला. सदर गौणखनिजाची कपात करणे रक्कम रु. ४०,९१८ देयकातून कपात रु. १२,०६८ केली असून कमी कपात रु. २८,८५० वसुल केलेली नाही.

(२) या कामासाठी एकूण १०.१०५ मेट्रीक टन डांबर वापरणेचे डांबर विनियोग विवरणपत्रात नमूद आहे. मात्र संचिका सोबत डांबराचे चलन क्रमांक ००५१३६७ दिनांक ११ जानेवारी, २०१३ एकूण डांबर ७.७८० मेट्रीक टनाचे जोडले आहे. बाब क्र. १, २, ३ मध्ये बीबीएम, कारपेट, शिलकोटचे प्रत्येकी प्रमाण २१५५ घन मिटर आणलेल्या डांबरापैकी ५००० म्हणजेच ५ मेट्रीक टन डांबराच्या वापराबाबत मोजमाप नोंदवही क्र.३७१७ पान क्र.२२ वर नोंद आहे. कामासाठी आवश्यक १०.१०५ मेट्रीक टन टनापैकी फक्त ५ मेट्रीक टन डांबर वापरले असून उर्वरित ५.१०५ मेट्रीक टन डांबराचे चलन नाही. तसेच मोजमाप नोंदवहीत नोंद नसल्याने ५.१०५ मेट्रीक टन डांबराचे प्रमाण अनुज्ञेय ठरत नाही. त्यामुळे ५.१०५ मेट्रीक टन डांबर * ४५,७८७ (दर) = रुपये २,३३,७४३ संबंधितावर जबाबदारी निश्चित करून वसुल करणे आवश्यक आहे.

(३) डांबर दरवाढ अंदाजपत्रकानुसार दिलेली आहे. दरसूची दर रुपये ४५,७८७ खरेदी दर रुपये ४४,७८६ प्रती मेट्रीक टन रु. १००१ वापरलेल्या ५ मेट्रीक टन जादा प्रदानाची रक्कम रुपये १००१ * ५ = ५,००५ वसुल केलेली नाही.

(४) कार्पेट परिमाण २१५५ घन मिटर वापरावयाचे डांबर २०६ किलो प्रमाणे ४४३९ किलो डांबर वारणे आवश्यक वापरले ४२३३ किलो कमी वापर २१५.५० किलोची रक्कम रुपये २१५.५० * ४४.७८ = ९,६५० देयकातून वसुल केले नाही.

(५) बाब क्र. ११ साठी एमएम मापाचे पाईप टाकणेचे ७५० आरएमटीचे काम का केले नाही, याबाबत खुलासा करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला** :—

(१) कामासाठी बाब क्र. १, २, ७, ९ अन्वये एकूण ५७९ घ.मि. गौणखनिज वापर केलेला आहे. सदर गौणखनिजाची रक्कम रुपये ४०,९१८ कपात करणेची होती त्यापैकी रक्कम रुपये १२,०६८ वसुली कामाचे देयकातून घेणेत आली आहे. उर्वरित शिल्लक वसुली रक्कम रुपये २८,८५० मक्तेदार यांचे सदर कामाचे अनामत रक्कमेच्या देयकातून वसुलीने घेणेत आली आहे. सदरचे वसुलीच्या चलनाची छायाकिंत प्रत सोबत जोडणेत आलेली आहे.

(२) कामासाठी १०.१०५ मे. टन डांबर वापरणेचे डांबर विनियोग विवरणपत्रात नमूद केले आहे त्याप्रमाणे डांबरांची वापराप्रमाणे १०.१०५ मे. टन डांबर वापराचे चलन सोबत जोडणेत आले आहे. सदर कामामधील २० एमएम कारपेटसाठी हॉटमिक्स प्लॅट मधून तयार मटेरीयल असल्याने त्यासाठी वापरणेत आलेल्या डांबराची नोंद मापवहीत घेता आली नाही तथापी सदर डांबराचे चलनाची प्रत सोबत जोडणेत आली आहे.

(३) दरसूची मधील डांबराचे दर ४५,७८७ असून खरेदी केलेले दर रक्कम रुपये ४४,७८६ मे. टनाप्रमाणे रक्कम रुपये १००१ नुसार ५ मे.टनाची जादा प्रदानाची रक्कम रुपये ५००५ चलनाद्वारे मक्तेदार यांच्याकडून वसुल करणेत आलेली आहे. सदर वसुलीच्या चलनाची छायाकिंत प्रत सोबत जोडणेत आली आहे.

(४) सदर कामाचे कारपेट करिता हॉटमिक्स प्लॅट मधील मटेरीयल वापरुन २१५५ चौ.मि. काम करणेत आलेले आहे. हॉटमिक्स पध्दतीने काम करताना डांबराचे प्रमाणे १.४६ किलो व टॅक कोटसाठी ०.५० किलो असे एकूण १.९६ किलो चौ.मी. याप्रमाणे २१५५ चौ.मी.साठी १.९६ किलो चौ.मी. प्रमाणे ४२२३.८० किलो डांबर वापरणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे वापरणेत आले आहे. त्यामुळे डांबर वसुली रक्कम रुपये ९६५० घेणे आवश्यक नाही.

(५) बाब क्र.११ मध्ये ८०० मिमि व्यासाचे ७.५० आरएमटी पाईप टाकणेचे होते प्रत्यक्षात काम करतेवेळी ज्या ठिकाणी पाईप टाकणेचे होते त्या ठिकाणी खालील बाजूस असलेल्या जागा मालकाने शेतीचे नुकसान होणार असल्याने पाईप टाकणेस हरकत घेतली. त्यामुळे अंदाजपत्रकाच्या तरतूदीप्रमाणे पाईप टाकणेत आलेली नाही. सदर पाईपची रक्कम मक्तेदार यांना अदा करणेत आलेली नाही.

**(४) परिच्छेद क्रमांक ३.२३१/३५ (सन २०१२-१३)**

**बाणकोट किल्लावाडी रस्ता ग्रामीण मार्ग १० किलोमिटर ०/० ते ०/४०० सुधारणा करणे यामधील अनियमितता.**

सदर काम १२ वा वित्त आयोग (पर्यटन विकास) अंतर्गत केलेले असून कामावर खर्च रुपये १७,४३,२९७ एवढा झाला आहे. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :—

(१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए २००८/प्र.क्र.४२८/वित्त-९, दिनांक ३० डिसेंबर, २००८ अन्वये रक्कम रुपये १०.०० लाखापर्यत रुपये १०० व पुढील प्रत्येक लाखास रुपये १०० प्रमाणे करारनामा करणे आवश्यक आहे. अनुज्ञेय करारनामा रुपये १००० केलेला आहे. रुपये ८०० चा करारनामा केलेला आहे व रुपये २०० चा करारनामा कमी रक्कमेचा केला आहे.

(२) माननीय जिल्हाधिकारी यांचे आदेशानुसार या कामासाठी दिलेला निधी अट क्र.६ अन्वये मार्च, २०१२ पर्यत खर्च करण्याचे अधिकार दिले होते. माहे मार्च, २०१२ नंतर सदर निधी खर्च करणेस माननीय जिल्हाधिकारी यांचे आदेश घेतलेले नाहीत.

(३) कामासाठी ४२.९७ घनमीटर गौणखनिज वापरावयाचे आहे. ६४३ घनमीटर गौणखनिजाची कपात करावयाची रक्कम ६४३ * ७०.६७ = ४५,४४१ कपात केलेली रक्कम रुपये ११,२२२ असून कमी कपात रुपये ३४,२१९ वसुल केलेली नाहीत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

(१) सदर कामाचे पोटी करारनाम्याची रक्कम रुपये २०० भरणा करणेत आली असून सोबत चलनाची छायांकित प्रत जोडणेत आली आहे.

(२) महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील दिनांक ६ जून, २००८ चे शासन निर्णयानुसार सदर देयक लगतच्या पुढील वर्षात खर्च करणेस मान्यता असल्याने त्यानुसार सदर कामाचे देयक डिसेंबर २०१२ मध्ये खर्च टाकण्यात आले आहे.

(३) सदरची गौणखनिज वसुली रक्कम रुपये ३४,२१९ मक्तेदार यांच्याकडुन वसुल करणेत आली असून सदर चलन व धनाकर्षाची छायांकित प्रत सोबत जोडणेत आली आहे.

**(५) परिच्छेद क्रमांक ३.२३२/४२ (सन २०१२-१३)**

**रत्नागिरी जिल्हा परिषद बांधकाम विभागाचा सन २०१२-२०१३ च्या अनुदान वितरणातील अनियमिततेबाबत.**

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :—

(१) हस्तांतरित योजना २०१२-१३ मध्ये रुपये ७,६१,४०,३९० एवढे अनुदान अखर्चित आहे. सदर अखर्चित अनुदान चलनाने भरणा करणे आवश्यक आहे.

(२) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय दिनांक ६ जून, २००८ मधील तरतुदीनुसार सन २०१२-१३ ची किती रक्कम पुढील आर्थिक वर्षात खर्च करण्यासाठी सक्षम प्राधिका-याने दिलेल्या आदेशाची प्रत लेखापरीक्षणास दाखविण्यात आली नाही.

(३) वार्षिक लेखा विवरणपत्र क्र.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सन २०११-१२ चा अखर्चित निधी रुपये ३,४६,९९,२०५ एकूण रक्कम रुपये १७,८२,२२,१२७ अंतर्भूत असून सन २०१२-१३ मध्ये सन २०११-१२ ची अखर्चित रक्कमेपैकी किती रक्कम खर्च झाली ? याबाबत खुलासा करणे आवश्यक आहे.

(४) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक ६ जून, २००८ मध्ये विद्यमान आर्थिक वर्षातील अखर्चित रक्कम पुढील आर्थिक वर्षात खर्च करणेसाठी शासनाची अनुमती मिळाली आहे. तरी सुद्धा सन २०११-१२ चा अखर्चित निधी २०१२-१३ मध्ये नंतरही अखर्चित राहिलेला आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला** :—

(१) सन २०१२-१३ अखेर रुपये ७,६१,४०,३९० एवढे अखर्चित अनुदानापैकी सन २०१३-१४ मध्ये रुपये ६,११,९१,५६९ एवढा खर्च झालेला असून अखर्चित अनुदान रुपये १,२४,२८,९३९ शासन सदरी भरणा करण्यात आलेले आहे व दिनांक ०५ मे, २०१७ व दिनांक २१ सप्टेंबर, २०१७ चे शासन मान्यतेनुसार रुपये २५,१९,८८२ सन २०१७-१८ मध्ये खर्च करणेत आलेले आहेत. सोबत विवरणपत्र व चलन प्रती जोडणेत आलेल्या आहेत.

(२) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग यांचेकडील दिनांक ६ जून, २००८ मधील तरतूदीनुसार सन २०१२-१३ ची रक्कम पुढील वर्षी खर्च करणेत येते त्यासाठी सक्षम प्राधिका-यांच्या आदेशाची आवश्यकता नाही.

(३) एकूण अखर्चित निधी रुपये १७,८२,२२,१२७ पैकी सन २०११-१२ चा अखर्चित निधी रुपये ३,४६,९९,२०५ इतका आहे. त्यापैकी सन २०१२-१३ मध्ये रुपये २,९१,८१,०६० इतका निधी खर्च झालेला आहे.

(४) सन २०११-१२ चा अखर्चित निधी रुपये ३,४६,९९,२०५ पैकी रुपये २,९१,८१,०६० इतका खर्च सन २०१२-१३ मध्ये होऊन रुपये ५५,१८,१४५ इतका निधी अखर्चित राहिला होता. सदरचा अखर्चित निधी सन २०१३-१४ मध्ये रुपये ३०,७९,२३५ इतका शासन सदरी भरणा केलेला असून रुपये २५,१९,८८२ इतका अखर्चित निधी दिनांक ०५ मे, २०१७ व २१ सप्टेंबर, २०१७ चे शासन मान्यतेनुसार सन २०१७-१८ मध्ये खर्च करणेत आलेला आहे.

**(६) परिच्छेद क्रमांक ३.२३३/४३ (सन २०१२-१३)**

**वांद्री प्राथमिक आरोग्य केंदाची मुख्य इमारत बांधणे ता. संगमेश्वर :-**

वांद्री प्राथमिक आरोग्य केंद्राची मुख्य इमारत बांधणेकामी ५ प्रमाणकान्वये एकूण रक्कम रुपये २८,७६,०९७ खर्च करण्यात आलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :—

(१) करारनामा केल्याचे दिसून येत नाही.

(२) मक्तेदार यांनी मुदतवाढीसाठी अर्ज केला आहे परंतू जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १४४ नुसार मुदत संपणेपूर्वी १५ दिवस अगोदर अर्ज देवून मुदतवाढ मंजूरी आवश्यक असताना तशी कार्यवाही झालेली नाही.

(३) अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १ ते १० टक्के पर्यंत दंड आकारता येत असताना सदर मक्तेदाराला विनादंड मुदतवाढ कशाच्या आधारे दिली. याबाबत खुलासा करणे आवश्यक आहे.

(४) दिनांक ०१ जानेवारी, २०११ ते दिनांक २८ फेब्रुवारी, २०१२ पर्यंत ४२७ दिवसांची दुसरी मुदतवाढ दिनांक २८ फेब्रुवारी, २०१२ उलटून गेल्यानंतर दिनांक १९ मार्च, २०१२ ला मुदतवाढ कशी दिली. याबाबत खुलासा करणे आवश्यक आहे.

(५) तिसरी मुदतवाढ विना दिनांक, विना जावक क्रमांक व विना दंड आकारुन त्यास दिनांक २९ फेब्रुवारी, २०१२ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१२ पर्यंत मुदतवाढ अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी कशाच्या आधारे दिली. याबाबत खुलासा करणे आवश्यक आहे.

(६) महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक व सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक सी ३ टी १२६८/३८२ दिनांक १४ फेब्रुवारी, १९७४ नुसार करारनाम्यातील ३८ (१) नुसार बाबवार २५ टक्के पेक्षा जास्त वाढ झाल्यास अधिक्षक अभियंता यांची मंजूरी घेणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

(१) दिनांक ९ जानेवारी, २००९ रोजी करारनामा केलेला आहे.

(२) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ नियम १४८ नुसार मक्तेदाराने दिनांक १० डिसेंबर, २००९ रोजी मुदतवाढ मागणी केलेली दिसून येते. परंतु उपअभियंता, देवरूख यांनी दिनांक २० ऑगस्ट, २०१० रोजी मुदतवाढ प्रस्तावाला शिफारस करून प्रस्ताव सादर केलेला दिसून येत आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही केलेली आहे.

(३) मुदतवाढ दंड आकारणेचे अधिकार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आहेत. सदर इमारत दुर्गम भागात दळणवळण वीज व पाणी अशा मुलभूत सुविधा नसलेल्या ठिकाणी आहे. सदर कामासाठी बांधकामावेळी लागणारी वीज व पाणी उपलब्ध न झाल्याने त्यावर अवलंबून असणारी सर्व कामे वेळेत पूर्ण करता आलेली नाहीत ही वस्तुस्थिती विचारात घेवूनच विनादंड मुदत वाढ देणेत आलेली होती.

(४) मक्तेदाराने दिनांक १३ फेब्रुवारी, २०१२ रोजीच्या अर्जाने मुदतवाढीसाठी दिनांक १ जानेवारी, २०११ ते २८ फेब्रुवारी, २०१२ पर्यंत मागणी केल्याने दिनांक १७ फेब्रुवारी, २०१२ ने उप अभियंताकडून शिफारस देणेत आली. त्यानंतर बांधकाम विभागाने दिनांक २९ फेब्रुवारी, २०१२ रोजी प्रस्ताव सादर केला. त्याला अंतिम मंजूरी दिनांक १९ मार्च, २०१२ ने मिळाल्याने मुदत वाढ दिनांक १९ मार्च, २०१२ ने दिलेली दिसून येत आहे.

(५) मुदतवाढ आदेशावर दिनांक १७ डिसेंबर, २०१२ नमूद करणेत आली आहे. तसेच प्रमाणक क्रमांक २६१ दिनांक २९ मार्च, २०१३ अन्वये रक्कम रुपये ५०,५६० एकत्रित दंडाची रक्कम वसुल करणेत आलेली आहे. पूर्वी १ टक्का वसूल केलेला असल्याने व दरसूची सन २००९-२०१० असूनही मक्तेदाराने डिसेंबर, २०१२ अखेर काम पूर्ण करून दिलेले असून निविदेमध्ये दराच्या फरकाची रक्कम देय नसल्यामुळे तत्कालिन कार्यकारी अभियंता यांच्या शिफारशीनुसार त्यावेळीच्या परिस्थितीनुरुप अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तिसरी मुदतवाढ विनादंड देणेत आलेली आहे.

(६) वांद्री प्राथमिक आरोग्य केंद्राची मुख्य इमारत बांधणे या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम ५०,५६,००० तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देणेत आलेली होती. त्यामध्ये निविदा रक्कम रुपये ४८,६१,३७४ होती. परंतु प्रत्यक्षात काम करतेवेळी तेथील जागेवरील कामाच्या स्थितीमुळे बाब क्रमांक १ ते ५५ मध्ये अंदाजपत्रक तरतुदीपेक्षा कमी/जादा खर्च झालेला असला तरी प्रत्यक्षात संपूर्ण कामावरती फक्त रुपये ४४,१८,२२३ एवढाच खर्च झालेला आहे. सदर कामावर झालेला एकूण खर्च हा अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा व निविदा रकमेपेक्षाही जादा झालेला नाही. अधिक्षक अभियंता यांची कार्योत्तर मंजुरी घेणेची कार्यवाही करणेत येत आहे.

**(७) परिच्छेद क्रमांक ३.२३४/४७ (सन २०१२-१३)**

**मळे आगरवायंगणी ओणनवसे रस्ता (इजिमा -१६) किलोमीटर ५/० ते ५/३३० वरील अनियमितता. ता. दापोली**

उपरोक्त काम जिल्हा वार्षिक योजनेमधून करणेत आले असून कामावर रक्कम रुपये ४९५२४६ एवढा खर्च केला आहे. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :—

(१) काम पूर्ण झाल्यानंतरच्या कालावधीचे महसूल विभागाकडील गौणखनिजाची चलने संचिकेत आहेत. सदर चलने मान्य कशी केली, याबाबत खुलासा करणे आवश्यक आहे.

(२) काम दिनांक १० फेब्रुवारी, २०१२ रोजी पूर्ण झाले असताना कामाची मापे दिनांक १२ मे, २०१२ रोजी म्हणजेच तीन महिने विलंबाने मोजमाप नोंदवहीत नोंदविणेत आले आहे.

(३) संचिकेत डांबराच्या चलनाची छायांकित प्रत जोडली आहे. डांबराच्या दराचा उल्लेख दिसत नसल्याने दिलेली डांबर दर वाढ प्रती मेट्रिक टन ५५८६ अनुज्ञेय नाही.

(४) एकूण डांबर वापर ६.०९४ * ५५८६ = ३४,०४१ वसूल करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

(१) कामासाठी वापरलेल्या गौणखनिजाचे रॉयल्टी बाबतची महसूल विभागाकडील चलन अन्य कामाची नजरचुकीने लावणेत आली असल्याने वापरलेल्या गौणखनिजाची रॉयल्टीची वसुली सदर कामाचे पहिल्या देयकातून रक्कम रुपये ४०००, प्र. क्र. ९२० दिनांक ३१ मार्च, २०१२ मधून वसुलीने घेण्यात आली आहे.

(२) सदर कामाची मोजमापे ३ महिन्यांपर्यंत म्हणजे दिनांक १० मे, २०१२ पर्यत लिहिणे आवश्यक होते. तथापि सदरची मोजमापे कार्यबाहुल्यामुळे दोन दिवस उशिरा लिहिण्यात आली आहेत.

(३) कामासाठी वापरणेत आलेल्या डांबराच्या चलनाच्या प्रतीमध्ये अक्षराचे मुद्रांकन रेषेवर आल्यामुळे अस्पष्ट वाटते.

(४) कामाकरिता वापरलेले डांबर अंदाजपत्रकांचे दरापेक्षा जादा दर देऊन अदा केलेली रक्कम रुपये ३४०४१ संबधितांकडून वसूल करणेत आली असून वसुलीच्या चलनाची छायाकिंत प्रत सोबत जोडण्यात आली आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

रत्नागिरी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २६ एप्रिल, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, अनुक्रमांक ७ खांदाट, दळवटणे, मोरवणे रस्ता (ता. चिपळूण) मजबुतीकरण व डांबरीकरण, अनुक्रमांक ८ हडकणी, घागवाडी, बौद्धवाडी गावणांगवाडी रस्ता (ता. चिपळूण), अनुक्रमांक ९ भोपन पणदेरी बौद्धवाडी, भोईवाडी मोहल्ला डांबरीकरण (ता. दापोली), अनुक्रमांक १० बाणकोट किल्लावाडी रस्ता सुधारणा, अनुक्रमांक ११ रत्नागिरी जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या सन २०१२-१३ च्या अनुदान वितरणातील अनियमितता, अनुक्रमांक १२ वांद्री प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत बांधणे (ता. संगमेश्वर), अनुक्रमांक १३ मळे आगरवायंगणी ओणनवसे रस्ता अनिमितता या अनुक्रमांक ७ ते १३ या सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित ७ परिच्छेदांमध्ये मोठ्या प्रमाणात लेखा आक्षेप काढण्यात आले आहेत. यामधील अनुक्रमांक ९ परिच्छेदातील लेखी स्पष्टीकरणात कामासाठी बाब क्र. १,२,७,९ अन्वये एकूण ५७९ घ.मि. गौणखनिज वापर केलेला आहे. त्याकरिता रु. ४०,९१८ कपात करायची होती. परंतु रक्कम रु. १२,०६८ वसुली कामाच्या देयकातून घेण्यात आली. उर्वरित शिल्लक वसुली रक्कम रु. २८,८५० मक्तेदार यांच्या कामाच्या अनामत रकमेच्या देयकातून वसूल करण्यात आली आहे. याचा अर्थ ही बाब ऑडिटरच्या निदर्शनास आली नसती तर सदर रक्कम वसूल करण्यात आली नसती. याबाबतची माहिती समितीला द्यावी.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, दिनांक २० डिसेंबर, २०१३ रोजी पहिल्या बिलातून रुपये १२,०६८ आणि दिनांक २७ फेब्रुवारी, २०१५ रोजी उर्वरित रक्कम रुपये २८,८५० कपात केली आहे. यावर समितीने पुढे विचारणा केली की, लेखा परिच्छेदामध्ये सदरचा आक्षेप घेतल्यानंतर त्यांच्या अनामत रकमेतून उर्वरित रक्कम कपात करण्यात आली. त्यावेळी कार्यरत असलेले तत्कालीन कार्यकारी अभियंत्यांचे नाव काय आहे. यावर प्रभारी कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी खुलासा केला की, त्यावेळी श्री.महाले तत्कालिन कार्यकारी अभियंता होते. परंतु आज ते बैठकीला अनुपस्थित आहेत.

यावर समितीने पुढे विचारणा केली की, बिलांच्या मंजुरीबाबतची देयके मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्याकडे येत असल्यामुळे सर्व गोष्टी तपासण्याची जबाबदारी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची आहे. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्याकडे सर्व यंत्रणा उपलब्ध

आहे. तसेच पैशाची उचल होत असताना सुद्धा त्याबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना माहित नसणे ही गंभीर बाब आहे. त्यामुळे यात सर्व दोषी आहेत. तत्कालिन मुख्य लेखा व वित्त अधिकारी आले आहे आहेत का, यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी विदित केले की, तत्कालिन मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्रीमती पाटोळे मॅडम आलेल्या असून त्या कक्षाबाहेर आहेत. त्या सध्या सेवेत कार्यरत आहेत.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, लेखी स्पष्टीकरणातील पृष्ठ क्रमांक २१ वर हॉटमिक्स पद्धतीने काम करीत असताना डांबराचा वापर करण्यात आला आहे. या संदर्भात कार्यकारी अभियंत्यांचे १०० टक्के पर्यवक्षण असणे अत्यावश्यक असते. सध्या जिल्हा परिषदेत बांधकाम विभागात कार्यकारी अभियंत्यांचे पद रिक्त आहे. दिनांक ३१ मार्च मध्ये मोठ्या प्रमाणात कामे असताना उक्त कामाच्या संदर्भात आवश्यक तेवढे डांबर वापरल्याबाबत कसे प्रमाणित करणार आहात, यावर प्रभारी कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी खुलासा केला की, हॉटमिक्सकरिता येणा-या साहित्याची तपासणी केली जाते.

यावर समितीने पुढे विचारणा केली की, अंदाजपत्रकानुसार शाखा अभियंत्याने रेकॉर्ड केलेले नाही. तसेच मोजमाप पुस्तिकेवरून नोंदी घेतलेल्या आहेत. मूळ बाब अशी आहे की, हॉटमिक्स प्लँटवर येणा-या साहित्याचा वापर होण्यापूर्वी त्याची तपासणी करण्यासाठी शाखा अभियंत्याने कार्यवाही केली पाहिजे. त्यासंबंधी तापमान सुद्धा तपासले पाहिजे. हॉटमिक्स प्लँटवरील डांबर योग्य होते का, या संदर्भात १०० टक्के पर्यवेक्षण करणे अत्यावश्यक असते. परंतु सदर प्लँट मूळ कार्यालयापासून ५० ते १०० कि.मी. अंतरावर असल्यामुळे तेथे जाऊन पर्यवेक्षण होऊ शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. यावर प्रभारी कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी खुलासा केला की, त्या स्थळावर येणा-या साहित्याची तपासणी केली जाते.

तद्नंतर समितीने असे निदेश दिले की, त्या स्थळावर जाऊन तेथील साहित्याची तपासणी करीत नाही. बांधकाम विभागाच्या संदर्भात अनुक्रमांक ८ ते १३ पर्यंतचे सर्व परिच्छेद आहेत. त्या संदर्भात लेखा परीक्षणामध्ये मोठ्या प्रमाणात आक्षेप काढण्यात आलेले आहेत. या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रत्येक मुद्याची सखोल चौकशी करावी. त्यात जे कोणी कारवाईसाठी पात्र असतील त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करून कारवाई करावी तसेच ज्यांच्याकडून वसुली करणे आवश्यक आहे त्यांच्याकडून वसुली करावी व त्याबाबत प्रत्येक प्रकरणनिहाय अहवाल तयार करावा आणि तो समितीकडे एक महिन्याच्या आत सादर करावा. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी होकारार्थी उत्तर दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली :—**

खांदाट, दळवटणे, मोरवणे रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे या रस्त्यासंदर्भात झालेल्या अनियमितते प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रत्येक मुद्यांची सखोल चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांची जबाबदारी निश्चित करून कोणती कारवाई करण्यात आली आहे तसेच ज्यांच्याकडून वसुली करणे आवश्यक आहे त्यांच्याकडून वसुली करण्यात आली आहे काय, असल्यास प्रकरणनिहाय अहवाल सादर करण्यात यावा ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

खांदाट, दळवटणे, मोरवणे रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे या रस्त्यासंदर्भात झालेल्या अनियमितते प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी केली आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केलेल्या चौकशीनुसार मोजमाप पुस्तक क्र.५०७१ पान क्रमांक १६ वर ८५ ब्रास गौण खनिजाची नोंद करण्यात आली आहे. परंतु सदर कामाची आर.एम.आर विवरणपत्रात गौण खनिजाची नोंद नजरचुकीने संगणकीकरण करताना चुकीच्या परिमाणाची नोंद करण्यात आली होती. तथापि, मोजमाप पुस्तिकेप्रमाणे आर.एम.आर वर सुधारित हस्तलिखित नोंद करण्यात आली आहे. सदर चुक केल्याबाबत संबंधित शाखा अभियंता श्री.व्ही.टी.बनसोडे यांना सक्त ताकीद देण्यात आली आहे.

संबंधित मक्तेदार यांच्याकडून स्वामित्वधनाची (रॉयल्टीची) रक्कम रुपये १७,००० वसूल करण्यात आलेली आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय.—** (बांधकाम-३) जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी सहमत.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने रत्नागिरी जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ४ जून, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, खांदाट,

दळवटणे-मोरवणे रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे या रस्त्या कामासंदर्भात झालेल्या अनियमितते प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना चौकशी करण्याचे निर्देश दिले होते. सदर प्रकरणी चौकशी केली असता चूक केल्याप्रकरणी शाखा अभियंता श्री. बनसोडे यांना सक्त ताकीद दिली असल्याचे तसेच मक्तेदाराकडून स्वामित्वधनाची रक्कम १७ हजार रुपये वसूल करण्यात आल्याची माहिती समितीला कळविली आहे. आपण मक्तेदाराकडून स्वामित्वधनाची रक्कम वसूल केली. ज्या अधिका-यांनी ही स्वामित्वधनाची रक्कम कमी वसूल केली त्यांच्यावर कोणती कारवाई केली.

यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग) यांनी खुलासा केला की, या प्रकरणी रॉयल्टीची रक्कम रुपये १७ हजार वसूल केलेली आहे. मोजमाप पुस्तिकेतील मापांचे पुन्हा कनिष्ठ अभियंता आर.एम.आर. विवरणात नोंद घेतात. संगणकावर ही नोंद करताना टाईपिंग मिस्टेक झाल्यामुळे कमी स्वामित्वधन वसूल झाले. याप्रकरणी सुधारणा करून स्वामित्वधनाची रक्कम वसूल केलेली आहे. संबंधित अधिका-यास ताकीद दिलेली आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, कार्यकारी अभियंता कामाचे देयक मंजूर करतात. देयकासोबत सर्व कागदपत्रे जोडली आहेत किंवा कसे या सर्व बाबी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना तपासाव्या लागतात. त्यानंतर मुख्य लेखा व वित्त अधिकारी विथ्ड्रॉवल देतो. या गोष्टी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी का तपासल्या नाहीत. ठेकेदाराकडून पैसे वसूल केले म्हणजे काम झाले असे नाही. मुळात ज्या ज्या टेबलावरुन हे देयक मंजूर होऊन पुढे गेले त्या टेबलावरील अधिका-यांची या सर्व गोष्टी पाहण्याची जबाबदारी होती. तेव्हा या सर्वावर जबाबदारी का निश्चित केली नाही.

यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग) यांनी खुलासा केला की, जिल्हा परिषदेने कपात केली नाही याचा अर्थ ठेकेदाराला अतिरिक्त देयक झालेले आहे. त्यामुळे त्यांच्याकडून ती रक्कम वसूल करणे आवश्यक आहे. अगोदर सांगितल्याप्रमाणे मोजमाप पुस्तिकेतील नोंद आर.एम.आर.वर घेताना टाईपिंग मिस्टेक झाली. हे काम रस्ते दुरुस्ती अ गट मधील हेडखाली होते.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, आरएमआरवर चुकीची नोंद झाली होती आणि त्याप्रमाणे जे कॅलक्युलेशन करण्यात आले ते बरोबर होते, त्याप्रमाणे देयक काढण्यात आले. अभियंत्याकडून नोंद घेताना चूक झाली. यावर समितीने विचारणा केली की, या प्रकरणी जिल्हापरिषदेतील कर्मचारी आणि अधिकारी जबाबदार आहेत. त्यांनी कोणतीही कागदपत्रे न तपासता देयक मंजूर कसे केले. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, ज्या अधिका-याकडून ही चूक झाली त्यांना सक्त ताकीद दिलेली आहे. या प्रकरणी शाखा अभियंत्यांची चूक आढळून आली.

यावर समितीने विचारणा केली की, लेखा परिक्षणापूर्वी जी काही कार्यवाही करावयाची आहे ती कार्यालय प्रमुखाने करावयाची आहे. लेखापरीक्षणानंतर स्पष्टीकरण करण्यासाठी तीन वेळा संधी देण्यात येते. विभागास तीन वेळा संधी देऊनही विभागाने कोणतीही कार्यवाही केली नाही. पंचायती राज समितीसमोर आक्षेप आल्यानंतर विभागाने कारवाई केलेली आहे. लेखापरिक्षकांनी विभागाच्या लक्षात ही बाब आणून दिल्यानंतर विभागाने कोणतीही कारवाई केली नाही. ज्यांना कोणी ताकीद दिली असेल त्यांनी पगार देयक मंजूर कसे केले. शाखा अभियंत्याच्या पगाराचे देयक कोण मंजूर करते, त्यांनी ३० दिवसांच्या कार्यालयीन दिवसामध्ये जी कामे दाखविली ती त्यांनी योग्य प्रकारे पार पाडली किंवा नाही हे पाहणे आवश्यक आहे. ही चूक जिल्हा परिषदेच्या कोणत्याच अधिका-याच्या लक्षात आली नाही. परंतु ती लेखा परीक्षणात निदर्शनास आली.

यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग) यांनी खुलासा केला की, कनिष्ठ अभियंत्यांनी मोजमाप पुस्तिकेतील नोंदी आरएमआरवर नोंद घेताना टाईपिंग मिस्टेक झाली. ती आकडेवारी तशीच पुढे गेली आणि त्यानुसार गणन झाले. ही वस्तुस्थिती आहे. यावर समितीने पुढे विचारणा केली की, समितीने बैठकीच्या वेळी स्पष्ट निर्देश दिले होते की, लेखापरीक्षणात जे आक्षेप काढण्यात आलेले आहेत त्या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रत्येक मुद्याची सखोल चौकशी करावी. विभागाने संबंधितांना फक्त पत्र दिलेले आहे. संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करावयास पाहिजे होती. समितीसमोर आक्षेप येण्यापूर्वी कारवाई करावयास पाहिजे होती. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, समितीने जिल्ह्यास भेट देण्यापूर्वी दिनांक ६ फेब्रुवारी, २०१८ रोजी कारवाई झाली होती. चौकशी अहवाल बंचमध्ये आहे. चौकशी अहवालाचे वेगळे पुस्तक दिलेले आहे. या प्रकरणात चार मुद्दे असून चारही मुद्यांची पूर्तता केलेली आहे. विभागाने समितीस चौकशी अहवाल सादर केलेला आहे.

यावर समितीने विचारणा केली की, विभागीय सचिवांनी स्वतः स्पॉटवर जाऊन तपासणी करून अहवाल सादर करावयास पाहिजे होता. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, त्या स्वतः तेथे गेल्या होत्या. हे काम सन २०१२-२०१३ मधील आहे. आता कागदपत्रावर जी वस्तुस्थिती आहे त्याप्रमाणे कार्यवाही करावी लागेल. अधिका-यांनी आरएमआरमध्ये कशी चूक केली हे सांगता येईल. डांबराची नोंद करताना एक आकडा चुकला होता. तद्नंतर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग) यांनी खुलासा केला की, कनिष्ठ अभियंत्यांनी मोजमाप पुस्तिकेमधून आरएमआरवर नोंद करताना ही चूक झालेली आहे. त्या चुकीमुळे हे सर्व प्रकरण घडले आहे. आपण मक्तेदाराकडून स्वामित्वधनाची रक्कम वसूल केलेली आहे.

यावर समितीने आक्षेप घेत विचारणा केली की, लेखापरीक्षणामध्ये स्पष्ट नमूद केलेले आहे की, कामाच्या संचिकासोबत डांबराचे विवरणपत्र जोडलेले आहेत. त्यानुसार सदर कामासाठी एकूण १५.८४ मे.टन डांबर वापरणे आवश्यक होते. मात्र देयकासोबत डांबराचे चलन १४.७९ मे.टन खरेदी केलेले आहे. कामासाठी १४.८९ मे.टन डांबर वापरणे आवश्यक असताना १४.७९ मे.टन डांबर वापरण्यात आले म्हणजे १.५ मे.टन डांबर कमी वापरले. जेवढे डांबर खरेदी करावयाचे असेल तेवढे डांबर शासकीय रिफायनरीकडून खरेदी केले पाहिजे. त्यासाठीचे सर्व इनव्हाईस तपासले गेले पाहिजेत. या कामासाठी वापरण्यात आलेले डांबर हे शासकीय रिफायनरीकडून खरेदी करण्यात आलेले आहे काय, जर कंत्राटदार शासकीय रिफायनरीमधून डांबर खरेदी करीत नसतील तर ते कोठून खरेदी करतात, त्यामुळे या सर्व प्रकारावर विभागाकडून कोणत्या उपाययोजना करण्यात येणार आहेत.

यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग) यांनी खुलासा केला की, या प्रकरणामध्ये चौकशी करण्यात आलेली आहे. यामध्ये जे १५८४ मेट्रीक टन डांबर दर्शविण्यात आलेले आहे. परंतु प्रत्यक्षात १४.३३ मेट्रीक टन डांबर वापरले आहे. एमबीमधील आर.ए. बिल शिट्स असतात त्यावर नोंद घेतेवेळी फरक झालेला आहे. १४.३३ मेट्रीक टन डांबर वापरण्यात आलेले असून त्याप्रमाणेच देयक करण्यात आलेले आहे. त्यामुळे अधिकचे डांबर वापरण्यात आलेले नाही.

यावर समितीने आक्षेप घेत विचारणा केली की, १५.८४ मेट्रीक टन डांबर वापरणे अपेक्षित होते. विभागाचा कनिष्ठ अभियंता लक्ष देत असेल तर अशा प्रकारची चूक कशी होऊ शकते. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, प्रत्यक्षात १४.३३ मेट्रीक टन डांबराचा वापर करण्यात आलेला आहे. बीओक्युप्रमाणे १५.८४ मेट्रीक टन डांबर वापर करणे अपेक्षित होते. परंतु कंत्राटदाराने १४.३४ मेट्रीक टन डांबराचा वापर केलेला आहे. त्यामुळे शासकीय रिफायनरीमधून विकत घेण्यात आलेले डांबर त्या कामासाठी वापरण्यात आलेले नाही. उर्वरित डांबर दुसरीकडे वापरण्यात आलेले आहे, कंत्राटदाराने जेवढे डांबर वापरलेले आहे तेवढ्याच डांबराची नोंद झालेली असून त्याप्रमाणेच कंत्राटदाराला वेतन अदा करण्यात आलेले आहे. प्रत्यक्षात काम करीत असताना जेवढे डांबर वापरावयास पाहिजे होते, तेवढे वापरण्यात आलेले आहे. परंतु प्रश्न असा आहे की, कंत्राटदाराने १५.८४ मेट्रीक टन डांबर विकत घेऊन १४.३३ मेट्रीक टन डांबर एवढे वापरलेले आहे. त्यामुळे राहिलेले डांबर दुसरीकडे वापरण्यात आलेले आहे, असे समितीचे म्हणणे आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, भारत पेट्रोलिअम कॉर्पोरेशन लिमिटेडकडून १४.७९ मेट्रीक टन डांबर घेतलेले होते. त्याप्रमाणे असफाल्ट कंझम्पशन स्टेटमेंट आहे. याबाबतची कागदपत्रे समितीला सादर करण्यात आलेली आहेत. त्यामध्ये मटेरिअलची डेन्सिटी २२५ एवढी वापरण्यात आलेली आहे. परंतु अंदाजपत्रकामध्ये प्रत्यक्षात १७५ एवढी होती. त्याप्रमाणे १४.७९ मे.टन डांबराची उचल करण्यात आलेली होती आणि १४.३३ मेट्रीक टन डांबर सदरहू रस्त्यावर वापरण्यात आलेले आहे. ही बाब चौकशीमध्ये आढळून आलेली आहे. त्याप्रमाणे समितीला अहवाल सादर करण्यात आलेला आहे.

यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, रस्त्यावर जेवढे साहित्य वापरणे आवश्यक होते तेवढे वापरण्यात आलेले नाही. सदरहू शाखा अभियंत्यांनी कमी साहित्याचा वापर का केलेला आहे. यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग) यांनी खुलासा केला की, जेवढे साहित्य वापरावयास हवे होते तेवढे साहित्य वापरलेले आहे. परंतु कनिष्ठ अभियंत्यांकडून खडी, डांबर याबाबत प्रत्यक्षात वापराप्रमाणे आरएमआर तयार केला गेला नाही. यामध्ये संगणकावर टाईप करीत असताना चूक झाली असल्याचे नमूद करण्यात आलेले आहे. तसेच या प्रकरणामध्ये अधिकचे देयक अद्यापपर्यंत अदा करण्यात आलेले नाही. यामध्ये शासनाकडून कमी स्वामित्वधनाची रक्कम वसूल झाली आहे. तसेच कमी वसूल झालेल्या स्वामित्वधनाची रक्कम पुन्हा वसूल करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे श्री. बनसोडे, कनिष्ठ अभियंता यांना मुख्य कार्यकारी अधिका-यांनी सक्तीची ताकीद दिलेली आहे.

तद्नंतर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, एकूण कामाच्या देयकामधून स्वामित्वधनाची रक्कम वजा करून देयक अदा केले जात असते. यावर समितीने विचारणा केली की, कंत्राटदाराने जर स्वामित्वधनाची पावती दाखविली तर कंत्राटदाराकडून स्वामित्वधनाची रक्कम कपात केली जात नाही. त्यामुळे त्यांना एक प्रकारे फायदा होत असतो. त्यामुळे ट्रॅक्टर मालक साहित्य चोरी करून आणतात आणि ते चोरी करून आणलेले साहित्य विभाग वापरित असते. विभागाकडून स्वामित्वधन का कपात करण्यात येत नाही. गौण खनिज स्वामित्वधनासाठी आरक्षित करून द्यावे, अशा प्रकारचे पत्र विभागाकडून जिल्हाधिका-यांना का देण्यात येत नाही, स्वामित्वधनाचे पास जर जोडण्यात आलेले नसतील तर विभागाने चोरी करून आणलेले साहित्य वापरले.

यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, जर कंत्राटदार किंवा ठेकेदार स्वामित्वधनाचे पास दाखवू शकले नसतील तर स्वामित्वधन कपात करता येते. स्वामित्वधन कपात करून जिल्हाधिकारी यांच्याकडे भरण्यात येत असते. त्यावेळी ज्या कंत्राटदारांकडून अशा प्रकारची पास किंवा पावती दाखविण्यात आली नसेल तर त्या कंत्राटदारावर जिल्हाधिका-यांमार्फत कारवाई करण्याचे आदेश देता येतील.

तद्नंतर समितीने असे मत व्यक्त केले की, कंत्राटदारावर कारवाई होणे अपेक्षित नाही. महसूल विभागाच्या एका शासन निर्णयामध्ये असे नमूद करण्यात आलेले आहे की, विभागाला जेवढे साहित्य लागत असते तेवढी मागणी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे करण्यात यावी. परंतु विभागाकडून अशा प्रकारची मागणी करण्यात येत नाही. कंत्राटदार चोरी करून आणलेले साहित्य वापरतात आणि त्याच्या देयकामधून स्वामित्वधनाचे पैसे वसूल करण्यात येतात. महसूल विभागाचा अधिकारी एखाद्या व्यक्तीच्या कामासाठी गौण खनिज वाहून नेत असेल तर त्याला पकडण्यात येत असते. त्यावेळी आपण त्या अधिका-यांना असे म्हणू शकत नाहीत की, देयकामधून स्वामित्वधनाची कपात करण्यात येणार आहे. विभागाला जेवढे साहित्य लागत असते तेवढी मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात यावी, असा शासन निर्णय असताना विभागाकडून अशा प्रकारची मागणी का करण्यात येत नाही. कंत्राटदार स्वामित्वधनाचे पासेस जोडत नसल्यामुळे देयकामधून स्वामित्वधनाची रक्कम कपात करण्यात येते. याबाबत महसूल विभागाने शासन निर्णय निर्गमित केलेला आहे.

यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, जेवढे साहित्य वापरलेले आहे तेवढ्याच साहित्याचे पास दाखविण्यात यावे, असे कंत्राटदाराला सांगण्यात येते. परंतु जर अशा प्रकारचे पासेस किंवा पावती दाखविण्यात आली नसेल तर स्वामित्वधनाची रक्कम कपात करून ती जिल्हाधिकारी कार्यालयाकडे भरण्यात येईल, असे सांगितले जाते. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांना पावती दाखविता आली नसेल तर त्यांनी चोरीचा माल आणलेला आहे, हे सिद्ध होते. यानंतर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग) यांनी खुलासा केला की, यामध्ये कंत्राटदाराची जबाबदारी आहे. विभाग मान्यताप्राप्त खाण ठरवित असते. ते अंदाजित कारणासाठी असते. अनेक प्रकरणांमध्ये कंत्राटदार स्वतः स्वामित्वधनाची रक्कम भरणा करीत असतात. जेवढी कमी भरलेली असेल तेवढीच स्वामित्वधनाची रक्कम शासन वसूल करीत असते.

तद्नंतर समितीने असे मत व्यक्त केले की, सदरहू विषयावर अनेक दिवसांपासून चर्चा केली जात आहे. समितीच्या अनेक साक्षीमध्ये हा विषय समोर आलेला आहे. त्यामध्ये गौण खनिज, स्वामित्वधन आणि इतरही अनेक विषय समोर आलेले आहेत. या विषयावरील चर्चा कधीही न संपणारी आहे. असे विषय राज्यात निर्माण झालेले आहेत. त्यामुळे यासाठी विभागाने एक धोरण तयार केले पाहिजे. जेणेकरून अशा प्रकारच्या अडचणी राज्यात उद्‌भवणार नाहीत. म्हणून या विषयाबाबत विभागाने एक बैठक आयोजित करावी आणि या विषयाच्या अनुषंगाने उद्‌भवणा-या अडचणीबाबत मायक्रो प्लॅनिंग करावी आणि पुढील काळामध्ये अशा प्रकारचे प्रश्न निर्माण होणार नाहीत, यासाठी एक धोरण तयार केले पाहिजे. अन्यथा अशा प्रकारचे प्रश्न सातत्याने निर्माण होतील.

पुढे समितीने विचारणा केली की, गत दीड वर्षापासून वाळूचे लिलाव न झाल्याचा विषय या निमित्ताने पुढे आलेला आहे. त्याचप्रमाणे अनेक ठिकाणी चोरी करून आणलेले साहित्य वापरण्यात येत आहे. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, ठेकेदारांनी पैसे देण्यापूर्वी हा माल चोरीचा आहे किंवा नाही, याची खात्री केलेली असते. त्यामुळे अंतिम देयक देत असताना त्यामधून स्वामित्वधनाची रक्कम कपात केली जाते. चोरीचा माल पकडला तर तो शासनाच्या कामासाठी वापरण्यात येत आहे, असे समितीने म्हटल्याप्रमाणे काही वेळा सांगण्यात येते. तसेच जर तो माल पकडला गेला नसेल तर तो इतर ठिकाणी वापरला जातो, अशा प्रकारची शंका यामध्ये निर्माण होते. जो माल वापरण्यात आलेला आहे, त्या मालाच्या स्वामित्वधनाची रक्कम शासनाकडे भरणा केली पाहिजे. त्यामुळे ज्यावेळी देयक देण्यात येते त्यावेळी खात्री करण्यात येत असते की, स्वामित्वधनाची रक्कम कपात केली आहे किंवा नाही. जर ती कपात केली नसेल तर ती वजा करून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यात येते. विभागाच्या निदर्शनास वसुली आली तर त्यावेळी जिल्हाधिकारी कार्यालय तपासू शकते की, विभागाकडून स्वामित्वधनाची रक्कम कपात करण्याची गरज यामुळे निर्माण झाली आहे की नाही. ती व्यक्ती गौण खनिजाचे वहन करीत असताना त्यांच्याकडे परवाना नव्हता. त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून त्या व्यक्तीवर कारवाई केली जाऊ शकते. परंतु जिल्हा परिषदेने ही देयके अदा करण्यापूर्वी स्वामित्वधनाच्या रकमेचा भरणा केलेला आहे किंवा नाही, याची खात्री करून घेणे ही जिल्हा परिषदेची जबाबदारी आहे.

पुढे समितीने असे निदेश दिले की, चोरीचे गौण खनिज, स्वामित्वधन रकमेचा भरणा या विषयासंदर्भात विचार करून सामान्य माणसाला त्रास होणार नाही, यासाठी नियमांची योग्य अंमलबजावणी झाली पाहिजे. यासाठी सर्वसमावेशक धोरण तयार करावे. जेणेकरून पुढील काळामध्ये अशा प्रकारचे काम होणार नाही आणि सामान्य माणसांना त्रास होणार नाही, याची काळजी घ्यावी. त्यासाठी योग्य ते धोरण तयार करून संपूर्ण राज्यामध्ये ते लागू करावे. त्याचप्रमाणे तयार करण्यात आलेल्या धोरणाची माहिती समितीला एक महिन्याच्या आत कळविण्यात यावी.

तसेच ग्राम विकास विभाग मार्च महिन्यामध्ये सर्व कामे अभिलेख्यावर दाखवित असते. परंतु स्वामित्वधन ऑनलाईन असते आणि त्याचे देयक एप्रिल महिन्यामध्ये जाईल, याची भीती विभागाच्या अधिका-यांना असते. कार्यारंभ आदेशाच्या कालावधीमध्ये पैसे खर्च करण्याच्या मंजुरीची शिफारस शासनाकडे करावी. परंतु मार्च महिना समाप्त झाला की, विभागाकडून शासनाकडे पैसे समर्पित करण्यात येतात. एका वर्षाचे काम दुस-या वर्षामध्ये गेले तर त्यासाठी लागणारे पैसे खर्च करण्यासाठी शासनाकडे परवानगी घेण्याची आवश्यकता नाही, अशा

प्रकारचे परिपत्रक काढले पाहिजे. यासाठी गोंदिया, भंडारा या जिल्ह्यांसाठी भरारी पथक किंवा सुक्ष्म नियोजन करण्यात यावे. कार्यारंभ आदेशाचा कालावधी विचारात घेण्यात यावा. जेणेकरून खर्चाची मंजुरी घेण्याची आवश्यकता राहणार नाही. गोंदिया जिल्ह्यापासून ही मोहिम सुरू करण्यात यावी.

**अभिप्राय व शिफारशी**

खांदाट, दळवटणे, मोरवणे रस्ता (ता.चिपळूण) मजबुतीकरण व डांबरीकरण करणे, हडकणी, घागवाडी, बौध्दवाडी, गावणगवाडी रस्ता (ता.चिपळूण), भोपण पणदेरी बौध्दवाडी, भोईवाडी मोहल्ला डांबरीकरण (ता.दापोली), बाणकोट किल्लावाडी रस्ता सुधारणा, रत्नागिरी जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या सन २०१२-२०१३ च्या अनुदान वितरणातील अनियमितता, वांद्री प्राथमिक आरोग्य केंद्राची मुख्य इमारत बांधणे (ता.संगमेश्वर) मळे आगर वायंगणी ओणनवसे रस्ता ता.दापोली या सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित परिच्छेदांबाबत पुढील प्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आले आहेत.

कामासाठी वापरलेल्या साहित्याचा गुणवत्ता चाचणी अहवाल घेतलेला नाही. रस्त्यासाठी प्रमाणकानुसार डांबर वापरण्यात आले नाही, कामासाठी वापरलेल्या गौण खनिज चलनानुसार मेटलची नोंद कशाप्रकारे घेतली, कामासाठी आणलेले गौण खनिज असताना आरएसआर विवरणपत्रात नोंदविलेली मेटलची नोंद उपरोक्त लेखा आक्षेपाच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने घेतलेल्या साक्षीदरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, अनुक्रमांक ९ भोपण, पणदेरी, बौध्दवाडी, भोईवाडी मोहल्ला डांबरीकरण करणे (ता.दापोली) या कामासाठी एकूण ५७९ घनमीटर गौण खनिज वापरण्यात आलेले आहे. त्याकरीता रुपये ४०,९१८ कपात करणे आवश्यक होते. सदर वसुलीची रक्कम रुपये १२,०६८ कामाच्या देयकातून घेण्यात आली. उर्वरित शिल्लक वसुली रक्कम रुपये २८,८५० मक्तेदार यांच्या कामाच्या अनामत रकमेच्या देयकातून घेण्यात आली आहे. सदर वसुलीची रक्कम लेखापरीक्षकांनी आक्षेप घेतल्यामुळे कपात करण्यात आल्याचे दिसून येते. वास्तविक पहाता मंजुरीची देयके मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्याकडे येत असल्यामुळे देयकातील सर्व बाबी तपासण्याची जबाबदारी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची आहे. त्यांच्याकडे सर्व यंत्रणा उपलब्ध असताना व पैशाची उचल झालेली असताना याबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी अनभिज्ञ असणे ही बाब अत्यंत गंभीर आहे. त्यामुळे समिती याप्रकरणी तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी खुलाशानुसार उपरोक्त रस्त्याच्या डांबरीकरणासाठी वापरण्यात आलेले डांबर हॉटमिक्स पद्धतीने वापरण्यात आले आहे. यासंदर्भात कार्यकारी अभियंत्यांचे १०० टक्के पर्यवेक्षण असणे अत्यावश्यक असते. सध्या रत्नागिरी जिल्हा परिषदेत बांधकाम विभागात कार्यकारी अभियंत्यांचे पद रिक्त आहे. दिनांक ३१ मार्च दरम्यान मोठ्या प्रमाणात बांधकाम विभागाची रस्ते मजबुतीकरण व डांबरीकरणाची कामे मोठ्या प्रमाणात सुरू असताना उक्त कामाच्या संदर्भात आवश्यक तेवढे डांबर वापरल्याबाबत प्रमाणित करण्यासाठी कोणत्या पद्धतीचा अवलंब करण्यात आला याचा बोध होत नाही. तसेच हॉटमिक्सकरीता येणा-या साहित्याची तपासणी करणे आवश्यक असताना अंदाजपत्रकानुसार शाखा अभियंत्याने अभिलेखे तयार केलेले नसून मोजमाप पुस्तिकेवरुन नोंदी घेतलेल्या आहेत. मूळ बाब अशी आहे की, हॉटमिक्स प्लँटवर येणा-या साहित्याचा वापर होण्यापूर्वी त्याची गुणवत्ता तपासणी करण्यासाठी शाखा अभियंत्याने कार्यवाही केली पाहिजे, परंतु सदर प्लँट मूळ कार्यालयापासून ५० ते १०० कि.मी. अंतरावर असल्यामुळे तेथे जाऊन पर्यवेक्षण होऊ शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. खांदाट, दळवटणे, मोरवणे रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण रस्त्याच्या अनियमिततेप्रकरणी ८५ ब्रास गौण खनिजाची नोंद नजरचुकीने संगणकीकरण करताना चुकीच्या परिमाणाची नोंद करण्यात आली होती. तथापि, मोजमाप पुस्तिकेप्रमाणे आर.एम.आर वर सुधारीत हस्तलिखित नोंद करण्यात आली आहे. सदर चूक केल्याप्रकरणी संबंधित शाखा अभियंता यांना सक्त ताकीद देण्यात आली आहे व संबंधित मक्तेदाराकडून स्वामित्वधनाची रक्कम रुपये १७,००० वसूल करण्यात आले असल्याचे समितीला लेखी माहितीद्वारे कळविण्यात आले आहे. तथापि, समितीच्या मते कामाचे देयक कार्यकारी अभियंता मंजूर करतात. उक्त देयकासोबत सर्व कागदपत्रे जोडली आहेत किंवा कसे या सर्व बाबी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना तपासाव्या लागतात त्यानंतर मुख्य लेखा व वित्त अधिकारी देयक अदा करण्यास मान्यता देतात.

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ च्या नियम ८७ अन्वये कंत्राटदाराच्या मार्फत केल्या जाणा-या बांधकामाच्या बाबतीत कामावर वापरण्यात येणा-या साहित्याचा वापर करण्यापूर्वीच संबंधित शासकीय संस्थेकडून किंवा कार्यालयाकडून चाचणी अहवाल प्राप्त करून घेणे आवश्यक असल्याची तरतुद आहे. तसेच यासंबंधात अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, कोकण भवन, मुंबई यांच्या दिनांक ६ ऑगस्ट, २००९ रोजीच्या पत्रान्वये 'राज्य शासनाच्या निधीमधून सुरू असलेल्या कामांच्या साहित्याच्या वारंवारितेप्रमाणे चाचण्या दक्षता व गुण नियंत्रण मंडळाच्या प्रयोगशाळेतूनच करून घेणे आवश्यक आहे.' तसे न केल्यास त्याबाबत कंत्राटदाराकडून दंडनीय (दुप्पट) दराने करणे आवश्यक असल्याचेही नमूद केले आहे. असे असतानाही जिल्हा परिषदेने साहित्याचा वापर झाल्यानंतर चाचणी अहवाल जोडणे व चाचणी अहवाल**

प्राप्त नसताना देखील साहित्याचा वापर करणे ही बाब योग्य नाही, त्यामुळे ग्रामविकास विभागाने गुण नियंत्रणाच्या संदर्भात तातडीने मार्गदर्शक तत्वे निर्गमित करावी व त्याबाबत काढण्यात आलेल्या परिपत्रकाचे कसोशीने पालन करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात यावेत, अशी समिती शिफारस करीत आहे व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा.

समितीच्या अनेक साक्षीमध्ये गौण खनिज, स्वामित्वधन (रॉयल्टी) इत्यादी विषय समोर आलेले आहेत. गौण खनिजाची मागणी जिल्हाधिका-याकडे केली पाहिजे व कंत्राटदारातर्फे स्वामित्वधनाची रक्कम जेवढी भरणा करण्यात येते तेवढी स्वामित्वधनाची रक्कम शासन वसूल करीत असते त्यामुळे यासंदर्भात विभागाने एक निश्चित धोरण तयार करावे. याकरीता ग्रामविकास विभाग व संबंधित मंत्रालयीन विभागांनी एकत्रित बैठक आयोजित करावी व गौणखनिज व स्वामित्वधन व तदनुषंगिक अडचणीबाबत सुक्ष्म नियोजन करावे व भविष्यात अशा स्वरुपाच्या अडचणी निर्माण होणार नाहीत याकरिता स्वयंस्पष्ट शासन निर्णय निर्गमित करण्यात यावे, अशी समिती शिफारस करीत आहे. याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.

## प्रकरण चार

# जिल्हा परिषद, रत्नागिरी

## मौजे कौंढर बौध्दवाडी येथे वहाळ बंधारा बांधणे

**परिच्छेद क्रमांक ३.४९७/३ (सन २०१२-१३)**

प्रमाणक क्रमांक : ४२४ दिनांक ३१ मार्च, २०१३ रुपये ७,५३,८१८ खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :—

(१) प्रशासकीय मान्यतेच्या टिप्पणीवर दिनांक नमूद नाही. त्यामुळे प्रशासकीय मान्यता कोणत्या दिनांकाला मिळाली याबाबत लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही.

(२) दिनांक १८ जानेवारी, २०१३ चे टिपणीमध्ये ग्रामपंचायत आर्थिकदृष्टया सक्षम असलेबाबतचा प्रमाणपत्राचा उल्लेख नाही व ग्रामपंचायत काम करणेस सक्षम असलेबाबतचा अभिप्राय नाही.

(३) कामाचा करारनामा विहित मुद्रांकावर करताना कामासंबंधीच्या सर्व अटी व शर्ती टंकलिखित करून त्यावर दोन साक्षीदारांच्या स्वाक्ष-यांसह कार्यकारी अभियंता व ठेकेदारांच्या स्वाक्ष-या नाहीत तसेच दिनांक नमूद नाही.

(४) सदर कामाचे मूळ प्रमाणकामध्ये प्रमाणकाच्या प्रथम भाग (१) वर विहित ठिकाणी प्रमाणक क्रमांक दिनांक व महिना नोंद नाही. ॲग्रीमेंट नंबर, योजनांतर्गत/ योजनेतर लेखाशिर्ष आणि अनुदान सदर रकान्यात विहित ठिकाणी रक्कम (भाग-३) मध्ये अनुक्रमांक १, २, ३, ४, ५ प्रदानातून केलेल्या वजाती रक्कमांची नोंद नाही. प्रदानाचा धनादेश क्रमांक व दिनांक नोंद नाही. प्रदान प्राप्त झाल्या संबंधिताची रक्कम प्राप्त झाल्याची अक्षरी व अंकी नोंद नाही.

(५) मोजमाप पुस्तिकेमध्ये सदर कामाची मापे नोंद केलेली आहेत तेथे लाल पेनाने कर्ण रेषा काढून दुबार प्रदान होऊ नये म्हणुन विरुपित केलेले नाही तसेच मोजमाप पुस्तिकेत देयकाच्या शेवटी प्रदानार्थ शेरा धनादेश क्रमांक दिनांक/सही नोंदविलेला नाही.

(६) बी १ विहित नमुन्यातील विवरणपत्रात १ ते ४ तसेच ७ ते १० व १२ ते २६, २८, ३० व ३१ वर कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्ष-या नाहीत. याचाच अर्थ निविदा प्रक्रिया पुर्ण केलेली नाही.

(७) खोदाई कामातून काढलेल्या बाब क्र. ३ कठीण मुरुम ४५.२१ घनमीटर व बाब क्रमांक ५ कठीण खडक १६३.९४ घनमीटर अशा एकुण २०९.१५ घनमीटर मटेरियलचा विनियोग कसा केला, याबाबत खुलासा करणे आवश्यक आहे.

(८) कामावर नियुक्त केलेल्या कामगारांचा विमा उतरविला नाही.

(९) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ च्या परिच्छेद क्रमांक १५१ नुसार तांत्रिक मंजूरीपूर्वी प्रशासकीय मान्यता घेतलेली नाही.

(१०) कामाच्या कार्यादेशामध्ये कामाचा कालावधी ६ महिने असताना मोजमाप पुस्तक व देयकातील नोंदीनुसार सदर काम १९ दिवसांत दिनांक २९ मार्च, २०१३ पर्यंत ७७ टक्के पूर्ण केले. कामाचा कालबद्ध कार्यक्रमासह लेखापरीक्षणास खुलासा सादर करणे आवश्यक आहे.

(११) सदर कामाला सुरूवात दिनांक ११ मार्च, २०१३ ला केली आहे. सदर कामासाठी लागणा-या पाण्यासाठी वापरलेल्या पंपाचे लॉगबुक तपासले असता ५ एच. पी. चे ३ पंप दररोज ६ तास प्रमाणे दिनांक ५ मार्च, २००५ ते दिनांक ७ मार्च, २००५, दिनांक ८ मार्च, २०१० ते दिनांक १ मार्च, २०१०, दिनांक १० मार्च, २०११ ते दिनांक ११ मार्च, २०११ व दिनांक १२ मार्च, २०१२ ते दिनांक १३ मार्च, २०१२ असा कालावधी आहे. म्हणजे सदर कालावधी कामाला सुरूवात करणेपुर्वीचा असल्यामुळे जादा केलेल्या प्रदानाची रक्कम रुपये १५,३०९ वसूल करून चलनाची प्रत लेखापरीक्षणास सादर करणे आवश्यक आहे.

(१२) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र झेडपीए-२०००/प्र.क्र. १८६४/३३ दिनांक १४ नोव्हेंबर, २००१ अन्वये ग्रामपंचायत तांत्रिक व आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेबाबतचा दाखला नस्तीसोबत जोडलेला नाही.

(१३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चा परि. क्र. १४४ तसेच सामाजिक बांधकाम नियम पुस्तिका परि. क्र. २०४ व २०५ मंजूर निविदेतील पान क्र. ११ अनु. क्र. २१ (सी व डी नुसार) ठेकेदाराकडून कामाच्या करारनाम्यापूर्वी अंदाजपत्रकीय रकमेच्या १ टक्के इसारा रक्कम व २ टक्के अनामत रक्कम रुपये २९,४६६ वसूल करणे आवश्यक आहे.

(१४) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/१०८८/ सीआर-३०४१/२६ दिनांक १४ सप्टेंबर, १९८८ नुसार बांधकामाची जागा ताब्यात असलेबाबत व जिल्हा परिषदेच्या मालकीची असलेबाबत ७/१२ अथवा बक्षिसपत्र असलेबाबत कागदपत्र लेखापरीक्षणास प्राप्त झाले नाही.

(१५) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे परिपत्रक क्रमांक सिमेंट १०९३/एम ७२७/५३ दिनांक ५ जानेवारी, १९९४ नुसार सिमेंट आयएसआय मार्कचे असलेबाबतचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणास आढळले नाही.

(१६) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएस/१०८९/ प्रशा ५८/०८ दिनांक २० जुलै, २००४ नुसार कामाच्या ठिकाणी ५ × ४ आकाराचा लोखंडी फलक कामाचे ठिकाणी लावलेला नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

(१) प्रशासकीय मान्यतेसाठीच्या टिपण्णीवर प्रशासकीय मान्यतेचा दिनांक नमूद करणेत आला आहे.

(२) ग्रामपंचायत आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेबाबत दाखला जोडणेत आला आहे.

(३) कार्यकारी अभियंता यांच्या समक्ष ठेकेदाराची व साक्षीदारांची स्वाक्षरी घेणेत आलेली आहे. तसेच दिनांक नमूद करण्यात आलेला आहे.

(४) विहित ठिकाणी प्रमाणक क्रमांक व दिनांक यांची नोंद घेणेत आली आहे. विहित ठिकाणी ॲग्रीमेंन्ट नंबरची नोंद केली आहे. योजनांतर्गत / योजनेतर यापैकी एक चिन्हांकित केलेले आहे. विहित ठिकाणी लेखाशिर्ष व त्याखाली विशिष्ट वर्षासाठी एकूण वसूल प्रमाणकाची रक्कम धरून होणारा खर्च वजा जाता शिल्लक तरतूद इत्यादीचा उल्लेख करणेत आला आहे. विहित ठिकाणी प्रदानासंबंधीच्या व प्रदानातून केलेल्या वजाती संबंधीच्या नोंदी प्रथम देयकाच्या अंतिम पानावर करण्यात आल्या आहेत, दिलेल्या धनादेशाच्या नोंदी घेणेत आल्या आहेत. धनादेशान्वये प्रदान केले प्रित्यर्थ received Rs. या रकान्यात रक्कम अंकी व अक्षरी धनादेश क्र. व दिनांक याची नोंद घेणेत आली आहे.

(५) मोजमाप पुस्तिकेत लाल शाईने कर्ण रेषा काढून विरूपित मोजमाप पुस्तक व देयकाच्या शेवटी प्रदानार्थ शेरा लाल शाईने धनादेश क्रमांक व दिनांक, प्रमाणक क्रमांक नोंदविणेत आले आहेत.

(६) कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्ष-या घेणेत आल्या आहेत.

(७) सदर खोदकामातील कठीण मुरुम व कठीण खडक हे बंधा-याच्या ठिकाणी पसरण्यात आलेले आहे.

(८) शासन निर्णय दिनांक ८ मे, २००२ नुसार कामाचा विमा उतरवला नसल्यास प्रथम देयकामधून १ टक्के रक्कम वसूल करण्याची तरतूद असल्याने देयकामधून १ टक्के रक्कम वसुल करणेत आलेली आहे.

(९) तांत्रिक मंजुरीचे अंदाजपत्रक व पूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतरच कामाला प्रशासकीय मान्यता देणेत येते. त्यानंतर सदरचे कामाला तांत्रिक मान्यता देण्यात येते. त्यामुळे कार्यवाही नियमानुसार करणेत आली आहे.

(१०) सदर कामाच्या ठेकेदाराने जादा मजुरांमार्फत कमी वेळात काम केलेले आहे. गुणवत्तेनुसार काम झाले असून सोबत टेस्ट रिपोर्ट देणेत आलेले आहेत. पावसाळ्यापूर्वी काम करणे आवश्यक असलेने ठेकेदाराने जादा मजूरांकडून काम करून घेतले आहे.

(११) पंप लॉगबुक छपाईमध्ये नजरचुकीने तारखेमध्ये बदल झालेला आहे. सदर काम बारमाही वाहत्या नाल्यावर मंजूर असल्याने खोदकाम करतेवेळी पाणीसाठा जास्त लागला. जसजसे खोदकामाची खोली वाढत गेली तसतसे पाणी उपसा जादा पंप लावून काम करावे लागलेले आहे. त्यामुळे पाण्याचा उपसा जास्त प्रमाणात करावा लागला. सदरची रक्कम अंदाजपत्रकाप्रमाणे अदा केलेली आहे.

(१२) गटविकास अधिकारी यांचा दाखला नस्तीसोबत जोडणेत आलेला आहे.

(१३) सदर कामाचा ठेकेदार ग्रामपंचायत असलेने जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम १३८ (६) नुसार परिषदेच्या बांधकामासाठी निविदा पाठविणा-या ग्राम पंचायतीला या नियमांमधील काहीही लागू होणार नाही. त्यानुसार ग्रामपंचायत मक्तेदार असल्याने इसारा रक्कम व अनामत रक्कम घेणेस सूट देण्यात आली आहे.

(१४) सदर बंधा-याचे काम ग्रामपंचायत गोंधळे-मजरे कौंढर ग्रामसभेमध्ये मागणी केलेली असल्याने सर्वसंमत्तीने काम करणेत आलेले आहे. बंधा-याच्या कामाची जागा ही स्मशानभूमीच्या लगत आहे. संबधीत ग्रामपंचायतीकडील नोंदवही नमुना नंबर २२ चा उतारा सोबत जोडला आहे.

(१५) सिमेंट चांगल्या प्रतीचे असल्याबाबत शासन मान्यताप्राप्त संस्थेचा चाचणी अहवाल बिलासोबत जोडलेला आहे.

(१६) काम पुर्ण झाल्यावर सदर कामाचे नामफलकासह छायाचित्र नस्तीला जोडण्यात आलेले आहेत.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

रत्नागिरी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २६ एप्रिल, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, मौजे कौंढर बौद्धवाडी येथे वहाळ बंधा-याचे ६ महिन्याचे काम असताना १९ दिवसांमध्ये ७७ टक्के काम कसे केले, तसेच या संदर्भात दिलेला खुलासा समाधानकारक नसल्यामुळे रक्कम रुपये १५,३०९ वसूल करावी. तसेच ८ तास पाणी उपसा कसा होऊ शकतो व ८ दिवसांमध्ये ९६ टक्के काम कसे पूर्ण केले, उन्हाळ्यामध्ये एवढे पाणी उपलब्ध होते काय, यावर प्रभारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा यांनी खुलासा केला की, मशिनरी लावून सदर काम पूर्ण केलेले आहे. तेथे बारमाही नाला होता. तसेच सातत्याने पाण्याचा उपसा केलेला नाही. कामाचे फोटो उपलब्ध असून लॉग बुक अद्ययावत केलेले आहे. सदर काम वळण बंधा-याचे होते. दिनांक ३ नोव्हेंबर, २०१३ रोजी पूर्ण झालेले आहे.

यावर समितीने विचारणा केली की, १९ दिवसांमध्ये वळण बंधा-याचे काम केलेले आहे असे असताना काम पूर्ण करण्यासाठी ६ महिन्यांचा कालावधी का नमूद केला तसेच दिनांक २४ मार्च, २०१३ ते २९ मार्च, २०१३ या कालावधीत पाणी उपसा केल्याची मापे मोजमाप नोंदवहीमध्ये दिनांक २३ मार्च, २०१३ रोजी कशी नोंदविण्यात आली. यावर प्रभारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा यांनी खुलासा केला की, दिनांक १६ ते २३ मार्च, २०१३ पर्यंत पाणी उपशाचे दिनांक २३ मार्च, २०१३ रोजी मोजमाप पुस्तिका केलेली आहे. तसेच दिनांक २५ ते २९ मार्च, २०१३ पर्यंतचे मोजमाप पुस्तिका दिनांक २९ मार्च रोजी केले आहे.

पुढे समितीने असे मत व्यक्त केले की, कामावर असलेल्या कामगारांचा विमा उतरविला नसताना सुद्धा शासन निर्णय दिनांक ८ मे, २००२ नुसार कामाचा विमा उतरवला नसल्यास प्रथम देयकातून एक टक्का रक्कम वसूल करण्याची तरतूद असल्याचे देयकामधून एक टक्का रक्कम वसूल करण्यात आल्याचे लेखी स्पष्टीकरणात नमूद केलेले आहे. कामे सुरू असताना कामगारांच्या सुरक्षेसाठी विमा काढला जातो. तसेच कामाचा कार्यारंभ आदेश दिल्यानंतर कामाचा विमा काढणे अत्यावश्यक आहे. परंतु काम पूर्ण झाल्यानंतर विम्याची रक्कम वसूल करण्यात आली आहे. ही बाब योग्य नाही. हा विषय यापूर्वी सुद्धा उपस्थित झाला होता. काम संपल्यानंतर विम्याची रक्कम वसूल करण्यात आल्यामुळे ती रक्कम विमा कंपनीकडून ताबडतोब वसूल केली पाहिजे. काम करीत असताना एखादा अपघात घडल्यास विमा नसल्यामुळे सदर कामगारांना विम्याचा फायदा मिळू शकत नाही. त्यामुळे काम संपल्यानंतर विम्याची रक्कम वसूल करण्याचे काही कारण नाही. कार्यारंभ आदेश झाल्यानंतर कामगारांचा विमा उतरविणे अत्यावश्यक आहे. काम सुरू असताना त्याच काळाकरिता कामगारांचा विमा काढला पाहिजे. कामे सुरू असताना सुरक्षिततेच्या हेतुने कामगारांचा विमा न काढता काम संपल्यानंतर विम्याची रक्कम वसूल केली जात असल्यास ही बाब गंभीर आहे. या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करावी.

तद्नंतर समितीने मत व्यक्त केले की, विभागातील अधिकारी परिपत्रक काढतात. त्या परिपत्रकावर सचिव स्वाक्षरी करतात. परंतु, ते परिपत्रक कायद्याच्या कसोटीवर खरे उतरते किंवा नाही हे बघितल्याशिवाय त्याची अंमलबजावणी कशी काय होते. सर्व जिल्हा परिषदांमध्ये हीच परिस्थिती आहे. खरे म्हणजे कार्यारंभ आदेश झाल्याबरोबर विम्याची रक्कम कापून घेतली पाहिजे. जेणेकरून काम सुरू असताना अपघात झाला तर त्या मजुराला मदत मिळू शकेल. शासन निर्णयानुसार विहित मुदतीत विमा काढला पाहिजे. काम संपल्यानंतर विमा काढणे बरोबर नाही. तसेच, ज्यांनी पैसे स्वीकारले ते सुद्धा यामध्ये दोषी आहेत. विम्याचे पैसे नंतर भरण्यात आलेले आहेत. यामध्ये नियमाचे उल्लंघन झालेले आहे. जिल्हा परिषदेने ही बाब तपासून घ्यावी आणि दोषींवर कारवाई निश्चित करावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली :—**

मौजे कौंढर बौद्धवाडी येथे वहाळ बंधारा बांधणे या कामाचा कार्यारंभ आदेश निर्गमित झाल्यानंतर तात्काळ कामगारांचा विमा उतरविणे आवश्यक असताना सदर काम संपल्यानंतर कामगारांचा विमा उतरविल्याप्रकरणी संबंधित विमा कंपनीकडून विम्याची रक्कम वसुल करण्यात आली आहे काय, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत, प्रस्तुत प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांची जबाबदारी निश्चित करून कोणती कारवाई करण्यात आली आहे.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी केलेल्या चौकशीनुसार खालीलप्रमाणे अहवाल दिलेला आहे.

कामाचे नाव - मौजे कौंढर बौद्धवाडी येथे वहाळ बंधारा बांधणे, ता. चिपळूण

लेखाशिर्ष - ५ लघुपाटबंधारे चालू व नवीन कामे

अंदाजपत्रक रक्कम रुपये - ९,८२,२०५

निविदा रक्कम रुपये - ९,३५,४३३

कामाची मुदत - ६ महिने

मक्तेदाराचे नाव - सरपंच, ग्रामपंचायत, गोंधळे मजरे कौंढर ता.चिपळूण

सदर कामाचा कार्यारंभ आदेश सरपंच, ग्रामपंचायत गोंधळे मजरे कौंढर ता. चिपळूण यांना दिनांक ५ मार्च, २०१३ रोजी देण्यात आला आहे. सदरच्या कार्यारंभ आदेशामध्ये संबधित मक्तेदार यांनी काम सुरू करण्यापूर्वी संबंधित कामाचा व कामगारांचा विमा हा विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे उतरवून विमा पत्राची प्रत त्वरीत सादर करणेबाबत नमूद करण्यात आलेले आहे.

परंतु संबंधित मक्तेदाराने काम सुरू होणेपूर्वी विमा संचालनालयाकडून कामाचा व कामगारांचा विमा न काढल्यास विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील क्र. प्रविनि-२३१०/सांबावि/विमावसुली/अभि-३ दिनांक ८ सप्टेंबर, २०१० चे पत्रामध्ये विमा हप्त्याची रक्कम कंत्राटदारास कंत्राट कामापोटी देय असलेल्या रकमेतून कंत्राटदाराच्या प्रथम देयकातून वसुल करणेचे नमूद केले आहे. त्याप्रमाणे सदर कामाच्या प्रथम देयकातून १ टक्के विम्याची रक्कम रुपये ९,३५४ प्रमाणक क्र.४२४ दिनांक ३१ मार्च, २०१३ नुसार वसुल केलेली आहे.

तरी वरील चौकशीनुसार सदर योजनेच्या कामाच्या विम्याची रक्कम ही काम सुरू असतानाच प्रथम देयकातून वसुल करून विमा संचालनालयाकडे भरणा केलेली आहे. त्यामुळे सदर रक्कम शासकीय विमा निधी यांचेकडून वसुल करणेत आलेली नाही. याबाबत ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई यांचेकडील शासन परिपत्रक क्र.पंरास-२०१५/प्र.क्र.३४६/ बांध-३ दिनांक ५ ऑक्टोबर, २०१८ अन्वये कंत्राटदाराने कार्यारंभ आदेश घेतेवेळी विमा, शासकीय विमा निधीकडे उतरविणे बंधनकारक असल्याचे कळविले असून विमा उतरविल्यानंतरच कार्यारंभ आदेश देण्यात यावा अशी सुचना केलेनुसार या परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही करणेत येत आहे व तसे अधिनस्त कार्यालयांना कळविणेत आले आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**मृद व जलसंधारण विभागाचे अभिप्राय.—** जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी दिलेल्या माहितीशी सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने रत्नागिरी जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ जुलै, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, मौजे कौढर, बौद्धवाडी येथे बंधारा बांधणे या कामाचा कार्यारंभ आदेश निर्गमित झाल्यानंतर कामगारांचा विमा उतरविल्याप्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, या ठिकाणी विम्यासंबंधी प्रश्न विचारला होता. विम्याची रक्कम वसूल केलेली आहे. सदर कामगारांचा विमा पूर्वी काढला नव्हता. याबाबत ग्राम विकास विभागाने माहे ऑक्टोबर, २०१८ अन्वये समितीच्या शिफारशीनुसार स्पष्टीकरण दिलेले आहे. कार्यारंभ आदेश देण्यापूर्वी त्यांचा विमा काढल्याची पावती आणून नंतर कार्यारंभ आदेश द्यावयास हवा. यावर समितीने विचारणा केली की, हा विषय अनेकदा समितीसमोर आला होता. कार्यारंभ आदेश दिल्यानंतर विमा काढला पाहिजे. काम झाल्यानंतर विम्याची रक्कम कपात केली जाणार असेल तर तो निधी परत मागावा, या बाबत शिफारस केली होती. विमा कंपनीला हा निधी मिळाला. यामुळे शासनाच्या १ टक्के निधीचे नुकसान झाले आहे. कामावर मजुराला काही दुखापत झाली तर त्यासाठी विमा असला पाहिजे. कामाचा बांधकाम परवाना झाल्यानंतर विम्याचे पैसे कापले जात असतील तर ते पैसे परत मागितले पाहिजे.

यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी विदित केले की, आता असे केले जात नाही. तद्नंतर अधिक खुलासा करत सचिव, मृद व जलसंधारण विभाग यांनी विदित केले की, काम सुरू असताना त्याचे पहिले रनिंग बिल सुरू होते त्याचा विमा कापून घेतलेला आहे काम सुरू करण्यापूर्वी विमा घेतला पाहिजे. कार्यारंभ आदेश दिल्यानंतर विमा घेतला पाहिजे. काही ठिकाणी नंतर विमा काढला गेला आहे. प्रथम देयकातून विम्याची एक टक्का रक्कम रुपये ९ हजार ५४ दिनांक ३१ मार्च, २०१३ रोजी कपात केली होती. दिनांक ५ मार्च, २०१२ रोजी कामाचे वर्क ऑर्डर दिले होते. ही कपात ग्रामपंचायती मार्फत केली होती. रनिंग बिल मधून रक्कम कपात केली जाते. २५ लाख रुपयांचे आत असेल तर ०.५ टक्के रक्कम कपात करावी लागते.

समितीने अशी विचारणा केली की, राज्यात अशी अनेक कामे आहेत तेथे काम झाल्यानंतर विमा काढला गेला आहे. हा मुद्दा यापूर्वी देखील अनेकदा चर्चेला आला होता. यामुळे निधीचा विनाकारण अपव्यय झालेला आहे. त्यात काही सुधारणा केली आहे काय, यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, या बाबत अनेकदा चर्चा झाली, आपण निर्देश दिलेले आहेत. मागील १०-१२ वर्षात जे झालेले असेल ते काढणे अव्यवहार्य होईल. अंतिम बिलातून रक्कम कापली असेल, ती रक्कम भरली नसेल तर ही रक्कम गृहित धरुन अंदाजपत्रक दिले असेल. कपात करणे गरजेचे आहे. ती रक्कम भरली पाहिजे.

यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी खुलासा विदित केले की, बिलातून ही रक्कम वसूल केली तर विमा कंपनीच्या नावावर काही ठिकाणी ही रक्कम अनामत रक्कम म्हणून ठेवल्याची शक्यता असू शकते. तद्नंतर समितीने असे मत व्यक्त केले की, या संदर्भात विभागाने टिप्पणी तयार करावी व ती संपूर्ण राज्यातील ३६ जिल्हा परिषदेमध्ये पाठवावी. सन २०११ मध्ये कामगार कल्याण मंडळ स्थापन झाले. तेथे साडे आठ हजार कोटी रुपये जमा झाले. तेथे एक टक्का रक्कम विमा उतरविण्याकरीता घेतली जाते. सदर एक टक्का रक्कम जिल्हा परिषदेपेक्षा बरीच जास्त आहे. लेखापरीक्षणामध्ये मुद्दा काढला पाहिजे. स्थानिक निधी लेखा संचालनालयाने हा मुद्दा कधीच घेतला नाही. बांधकाम परवान्यानंतर जे विम्याचे पैसे कापले असतील तर ते परत मागितले पाहिजे.

**अभिप्राय व शिफारशी**

मौजे कौंढर बौद्धवाडी येथे वहाळ बंधारा बांधण्यासाठी सन २०१२-२०१३ या वर्षामध्ये रुपये ७ लाख ५३ हजार ८१८ एवढी रक्कम खर्च करण्यात आली असून याबाबत पुढील प्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत. प्रशासकीय मान्यतेच्या टिप्पणीवर दिनांक नमूद नाही, टिप्पणीमध्ये ग्रामपंचायत आर्थिकदृष्ट्या सक्षम असल्याबाबतचा प्रमाणपत्राचा उल्लेख नाही. करारनाम्यावर दोन साक्षीदारांच्या स्वाक्ष-यासह कार्यकारी अभियंता व ठेकेदारांच्या स्वाक्ष-या नाहीत तसेच दिनांक नमूद नाही. सदर कामाच्या मुळ प्रमाणकामध्ये दिनांक व महिना नोंद नाही. मोजमाप पुस्तिकेमध्ये सदर कामाची मापे नोंद केलेली आहेत. तेथे लाल पेनाने कर्ण रेषा काढून दुबार प्रदान होवू नये म्हणून विरुपित केलेली नाही. विहित नमुन्यातील विवरणपत्रात कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्ष-या नाहीत. त्याअर्थी निविदा प्रक्रिया पूर्ण केलेली नाही. मुरुम व खडक या साहित्याचा विनियोग कसा केला याबाबत खुलासा करणे आवश्यक होते तसेच कामावर नियुक्त कामगारांचा विमा उतरविला नाही. तांत्रिक मंजुरीपूर्वी प्रशासकीय मान्यता घेतलेली नाही. पूर्ण केलेल्या कामाबाबत कालबद्ध कार्यक्रमासह खुलासा सादर करणे आवश्यक होते. तसेच सदर कामासाठी लागणा-या पाण्यासाठी वापरलेल्या पंपाचे लॉगबुक तपासले असता प्रदान केलेल्या रुपये १५,३०९ रकमेची वसुली करून चलनाची प्रत लेखापरीक्षणास सादर करणे आावश्यक होते. ठेकेदाराकडून कामाच्या करारनाम्यापूर्वी अंदाजपत्रकीय रकमेच्या १ टक्के इसारा रक्कम व २ टक्के अनामत रक्कम रुपये २९,४६६ वसुल करणे आवश्यक, बांधकामाची जागा ताब्यात असल्याबाबत व जिल्हा परिषदेच्या मालकीची असलेबाबत ७/१२ अथवा बक्षिसपत्र असलेबाबत कागदपत्र लेखापरीक्षणासाठी प्राप्त झाले नाही. सिमेंट आयएसआय मार्कचे असल्याबाबतचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणाच्या वेळी आढळले नाही. कामाच्या ठिकाणी ५ × ४ आकाराचा लोखंडी नामफलक लावलेला नाही.

उपरोक्त लेखा आक्षेपाच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी खुलाशाच्या आधारे समितीने घेतलेल्या साक्षीत समितीच्या निदर्शनास आले की, मौजे कौंढर बौद्धवाडी येथील वहाळ बंधा-याचे ६ महिन्याचे काम असताना १९ दिवसांमध्ये ७७ टक्के काम पूर्ण झाले व यासंदर्भात जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेला खुलासा समाधानकारक नसल्यामुळे रुपये १५,३०९ वसुल करण्यात यावेत असे समितीने निदेश दिले तसेच बंधा-याच्या कामाच्या ठिकाणी ८ तास पाणी उपसा करून ९ दिवसांमध्ये ९६ टक्के काम उन्हाळयामध्ये पूर्ण करण्यात आल्याप्रकरणी समितीने सखेद आश्चर्य व्यक्त केले.

सदर वहाळ बंधा-याच्या कामावर असलेल्या कामगारांचा विमा उतरविला नसताना सुद्धा शासन निर्णय दिनांक ८ मे, २००२ नुसार कामाचा विमा उतरविला नसल्यास प्रथम देयकातून एक टक्का रक्कम वसुल करण्याची तरतूद आहे. देयकामधून एक टक्का रक्कम वसुल करण्यात आल्याचे लेखी स्पष्टीकरणात नमूद केलेले आहे. वास्तविक कामे सुरू असताना कामगारांच्या सुरक्षेसाठी विमा काढला जातो तसेच कामाचा कार्यारंभ आदेश (वर्क ऑर्डर) दिल्यानंतर कामाचा विमा काढणे अत्यावश्यक आहे परंतु काम पूर्ण झाल्यानंतर विम्याची रक्कम वसुल करण्यात आली आहे. कारण काम करीत असताना एखादा अपघात घडल्यास विमा नसल्यामुळे सदर कामगारांना विम्याचा फायदा मिळू शकत नाही. त्यामुळे काम पूर्ण झाल्यानंतर विम्याची रक्कम वसुल करण्याचे काही कारण नाही. कार्यारंभ आदेश झाल्यानंतर कामगारांचा विमा उतरविणे अत्यावश्यक आहे. सुरक्षिततेच्या हेतूने कामगारांचा विमा न उतरविता काम पूर्ण झाल्यानंतर विम्याची रक्कम वसुल केली जात असल्यास ही बाब गंभीर आहे. सर्व जिल्हा परिषदांमध्ये हीच परिस्थिती आहे.

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ च्या नियम १६६ (अ) (५) च्या तरतुदीनुसार मोजणीबाबतची प्रत्येक नोंद करणे आवश्यक आहे. नियम १८० अन्वये अंतिम मोजमाप घेऊन रक्कम प्रदान केल्यानंतर मोजमाप पुस्तिकेवर लाल शाईने कर्णरेषा मारणे आवश्यक आहे असे असतानाही त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच शासन निर्णयानुसार विहित मुदतीत म्हणजेच कार्यारंभ आदेश दिल्यानंतर विमा न काढता काम पूर्ण झाल्यावर विमा काढण्यात आल्याप्रकरणी ज्यांनी पैसे स्वीकारले ते सुद्धा यामध्ये दोषी आहेत कारण यामुळे शासनाच्या १ टक्के निधीचे नुकसान झाले आहे. त्यामुळे समिती याप्रकरणी तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे. त्यामुळे यासंदर्भात ग्रामविकास विभागाने राज्यातील सर्व जिल्हा परिषदांनी जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील सर्व बांधकाम प्रकल्प उभारताना तेथे काम करणा-या कामगारांचे विमा उतरविण्यासाठी कार्यारंभ आदेश वितरीत झाल्यानंतर १ टक्का रक्कम कपात करण्याची कार्यवाही त्वरीत करण्यात यावी. काम पूर्ण झाल्यानंतर कामगार विमा रक्कम भरल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित अधिकारी व कंत्राटदाराची जबाबदारी निश्चित करून त्यांचेविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात यावी, तसेच उपरोक्त नमूद अनियमितता केल्याप्रकरणी सर्वंकष चौकशी करून संबंधित दोषी अधिकारी / कर्मचारी यांचेविरुद्ध कडक स्वरूपाची कार्यवाही करावी. अशी समिती शिफारस करीत आहे. याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.**

प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, रत्नागिरी

### थकित आगावू रक्कमा (थकित अग्रिम)

**परिच्छेद क्रमांक ३.१०७१ (३)/९ (सन २०१२-१३)**

जिल्हा परिषदांमध्ये निरनिराळया योजना, बांधकाम वगैरे बाबी कार्यान्वित करण्यासाठी संबंधित ठेकेदार, विभाग प्रमुख व कर्मचारी यांना वेळोवेळी आगाऊ रक्कमा देण्यात येतात. अशा प्रकारे दिलेल्या रक्कमांचे संबंधित वर्षाअखेर खर्चाची प्रमाणके व हिशेब देऊन समायोजन/वसुली करणे आवश्यक आहे. अशाप्रकारे अगोदर दिलेल्या आगाऊ रक्कमांचे समायोजन झाल्यावर नवीन आगाऊ रक्कमा देता येतात परंतु जिल्हा परिषदांकडील आगाऊ रक्कमांच्या नोंदवहया पहाता वेळोवेळी दिलेल्या आगाऊ रक्कमांचे समायोजन/वसुली होत नसल्याचे आढळून येते. अशा थकीत आगाऊ रक्कमांमध्ये फार जुन्या म्हणजेच १९६२ पासूनच्या आगाऊ रक्कमांचे समायोजन/वसुली थकीत असल्याचे दिसून येते. उदाहरणादाखल पुढील जिल्हा परिषदांमध्ये सन २०१२-२०१३ अखेर खाली दिल्याप्रमाणे आगाऊ रक्कमा समायोजन/वसुली अभावी थकीत होत्या.

| अ. क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ३ | रत्नागिरी | वित्त | ९ | ५,९४,८८६ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

रत्नागिरी जिल्हा परिषदेकडील थकीत अग्रिम सन १९४९-१९५० ते सन २०१२-१३ मधील एकूण थकीत अग्रिम रुपये ५,९४,८८६ पैकी सन १९४९-१९५० ते सन १९७८-७९ मधील थकीत अग्रिम रुपये ५,००,४४०.२८ जुने अभिलेख उपलब्ध होत नसल्याने सदरच्या रक्कमांची वसुली होणार नसल्याने पंचायती राज समितीने दिनांक २० जून, २००१ ते दिनांक २६ जून, २००१ या कालावधीत दिलेल्या भेटीच्या वेळी दिलेल्या सुचनेनुसार क्षमापनाचा प्रस्ताव शासनाकडे दिनांक ३० जुलै, २००१ रोजी सादर करणेत आला आहे.

त्यानंतर या संदर्भात पुढील तारखांना स्मरणपत्राद्वारे शासनाकडे क्षमापनाबाबत कळविणेत आले आहे.

दिनांक २२ ऑक्टोबर, २००२, दिनांक २६ मे, २००४, दिनांक २० जून, २००५, दिनांक २३ मार्च, २००९, दिनांक १९ मे, २००९, दिनांक १९ जानेवारी, २०१०, दिनांक २३ डिसेंबर, २०१३, दिनांक १२ डिसेंबर, २०१४ व दिनांक ४ मार्च, २०१६

(१) सन २०११-१२ मधील रक्कम रुपये १५,००० ची वसुली करणेत आली आहे. प्रमाणक क्रमांक-४४/ दिनांक ८ जुलै, २०१३ रक्कम रुपये १०,००० व रक्कम रुपये ५,००० ची वसुली प्रमाणक क्र. ५३/ दिनांक १६ नोव्हेंबर, २०११ ने करणेत आली आहे.

(२) सन २०१२-१३ मधील रक्कम रुपये ७०,००० ची वसुली प्रमाणक क्र.१४६/ दिनांक ३० ऑक्टोबर, २०१४ ने करणेत आली आहे.

तसेच सन २००७-०८ मधील रक्कम रुपये ५,००० व सन २००८-०९ मधील रक्कम रुपये ४,४२५ मिळून रुपये ९,४२५ इतके अग्रिम सामान्य प्रशासन विभागाकडील अनुक्रमे डिझेल अग्रिम व फर्निचर अग्रिमाची रक्कम असून सदर अग्रिमाचे समायोजन होणेचे आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

रत्नागिरी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २६ एप्रिल, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, शासनाकडे पाठविण्यात आलेल्या क्षमापन प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे, सामान्य प्रशासन विभागाकडील थकित अग्रिम वसूल न होण्याची कारणे काय आहेत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, सन १९४९-५० ते सन १९७८-७९ या कालावधीतील थकित अग्रिम रुपये ५,००,४४०.२८ इतक्या रकमेचे जुने अभिलेखे उपलब्ध होत नसल्याने तत्कालीन पंचायती राज समितीने सन २००१ मध्ये दिलेल्या भेटीच्या वेळी केलेल्या सूचनेनुसार उक्त रकमेच्या क्षमापनाचा प्रस्ताव ग्रामविकास विभागाकडे दिनांक ३० जुलै, २००१ रोजी सादर केलेला आहे. जिल्हा परिषदेने अनेकदा स्मरणपत्रे पाठवून सुद्धा अद्यापपर्यंत शासनाकडून या संदर्भात काहीच कळविण्यात आलेले नाही.

यावर समितीने पुढे विचारणा केली की, जिल्हा परिषदेकडून थकीत अग्रिम रकमांच्या क्षमापनाचा प्रस्ताव शासनाकडे जुलै, २००१ मध्ये पाठवून सुद्धा अद्यापपर्यंत या प्रकरणी निर्णय होत नाही. शिवाय जिल्हा परिषदेने या बाबतीत स्मरणपत्रे पाठवून सुद्धा शासन स्तरावरुन काहीच कळविण्यात आलेले नाही.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली :—**

जिल्हा परिषदेकडून थकित अग्रिम रकमांच्या क्षमापनाचा प्रस्ताव शासनाकडे माहे जुलै, २००१ मध्ये पाठवून सुद्धा अद्यापपर्यंत याप्रकरणी निर्णय न होण्याची कारणे काय आहेत, या संदर्भात सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार प्रस्तुत प्रकरणी संबंधितांची जबाबदारी निश्चित करून त्यांचेविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

सन १९९७-९८ या वित्तीय वर्षाचा लेखापरीक्षण पुर्नविलोकन अहवालासंदर्भात पंचायती राज समितीने दिनांक २० जून, २००१ ते २६ जून, २००१ या कालावधीत रत्नागिरी जिल्हा परिषदेला भेट दिली आहे. भेटीच्यावेळी सन १९९७-९८ या वर्षाचा लेखापरीक्षण पुर्नविलोकन अहवालाबाबत तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेण्यात आली. सदर साक्षीचे वेळी परिच्छेद क्र.३.३०८ (२) ३०३ बाबत चर्चा करणेत आली. सन १९४९-१९५० ते सन १९७८-१९७९ या कालावधीत निरनिराळ्या विभागांना अग्रिम रक्कमा मंजूर करणेत आलेल्या आहेत. प्रदीर्घ कालावधी झाला असल्यामुळे या संदर्भातील कार्यालयीन अभिलेख उपलब्ध नसल्याने सदरच्या अग्रिम रक्कमांचे समायोजन करता आलेले नाही. सदर प्रकरणी प्रलंबित अग्रिमाची रक्कम रुपये ५,००,४४०.२८ ही निर्लेखित करणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करणेचे पंचायती राज समितीने निर्देश दिले आहेत. त्यानुसार उपरोक्त संदर्भ क्र.२ अन्वये प्रलंबित अग्रिम रक्कम रुपये ५,००,४४०.२८ निर्लेखित तथा क्षमापित होऊन मिळणेबाबतचा प्रस्ताव आपले विभागाकडे सविनय सादर करणेत आला आहे. प्रस्तुत प्रकरणी या विभागाने निम्न संदर्भिय स्मरणपत्र/अशापत्राने आपले कार्यालयाकडे वारंवार पाठपुरावा केला आहे.

(१) पंचायती राज समितीने जिल्हा परिषद, रत्नागिरीला दिनांक २० जून, २००१ ते २२ जून, २००१ या कालावधीत दिलेली भेट.

(२) या कार्यालयाकडील पत्र क्र.रजिप/वित्त/फ-३/ताळमेळ/२३०४/२००१, विभाग, जिल्हा परिषद, रत्नागिरी दिनांक ३० जुलै, २००१.

(३) या कार्यालयाकडील पत्र क्र.रजिप/वित्त/फ-३/ताळमेळ/३४२१/२००२, विभाग, जिल्हा परिषद, रत्नागिरी दिनांक २२ ऑक्टोबर, २००२

(४) या कार्यालयाकडील अशा.पत्र क्र.रजिप/वित्त/१४०७/जिल्हा परिषद, रत्नागिरी दिनांक २६ मे, २००४.

(५) या कार्यालयाकडील अशा. पत्र क्र.रजिप/वित्त/फ-३/ताळमेळ/१६१२/२००५, विभाग, जिल्हा परिषद, रत्नागिरी दिनांक २० जून, २००५.

(६) या कार्यालयाकडील अशा. पत्र क्र.रजिप/वित्त/फ-३/ताळमेळ/७७६/२००९, विभाग, जिल्हा परिषद, रत्नागिरी दिनांक २३ मार्च, २००९.

(७) या कार्यालयाकडील अशा. पत्र क्र.रजिप/वित्त/फ-३/ताळमेळ/१११३/२००९, विभाग, जिल्हा परिषद, रत्नागिरी दिनांक १९ मे, २००९.

(८) या कार्यालयाकडील अशा. पत्र क्र.रजिप/वित्त/सभा/इअग्रिम/३७५३/२०१३, विभाग, जिल्हा परिषद, रत्नागिरी दिनांक २३ डिसेंबर, २०१३.

(९) या कार्यालयाकडील अशा. पत्र क्र.रजिप/वित्त/सभा/इअग्रिम/३१३२/२०१४, विभाग, जिल्हा परिषद, रत्नागिरी दिनांक १२ डिसेंबर, २०१४.

(१०) या कार्यालयाकडील अशा. पत्र क्र.रजिप/वित्त/सभा/इअग्रिम/ /२०१६, विभाग, जिल्हा परिषद, रत्नागिरी दिनांक ४ मार्च, २०१६.

(११) या कार्यालयाकडील अशा. पत्र क्र.रजिप/वित्त/सभा/इअग्रिम/२०६७/२०१८, विभाग, जिल्हा परिषद, रत्नागिरी दिनांक १९ जुलै, २०१८.

(१२) या कार्यालयाकडील अशा. पत्र क्र.रजिप/वित्त/सभा/इअग्रिम/४१९०/२००१, विभाग, जिल्हा परिषद, रत्नागिरी दिनांक २६ डिसेंबर, २०१८.

सन २०१२-२०१३ या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षा पुर्नविलोकन अहवालाबाबत दिनांक २६ एप्रिल, २०१८ ते २८ एप्रिल, २०१८ या कालावधीत पंचायती राज समितीने निम्न स्वाक्षरीकार यांची साक्ष घेतली आहे. सदर साक्षीच्या वेळी प्रलंबित अग्रिम रक्कमांचा निर्लेखनाचा फेर प्रस्ताव ग्रामविकास विभागाला सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. सदर साक्षीच्यावेळी आपले विभागाचे उप सचिव, यांना सदर प्रस्तावास मंजुरी देणे संदर्भात निर्देश दिले आहेत.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय.—** (वित्त-९) जिल्हा परिषद रत्नागिरीने सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले असता निर्लेखन प्रस्तावातील रक्कमा वेगवेगळ्या प्रकरणातील सन १९४९ ते १९७८ या कालावधीतील आहेत. महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील वित्तीय नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग १ ते ५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारामध्ये सुधारणा करण्याबाबत शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनिमय, भाग-२ दिनांक १७ एप्रिल, २०१५ मधील भाग पहिला उपविभाग-१ अनुक्रमांक २५ ब नियम १४६ नुसार या प्रकरणी करावयाची कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावरील असल्याने, यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हा परिषदेला देण्यात येत आहेत.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने रत्नागिरी जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ जुलै, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीस प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी माहिती दिली की, ही चाळीस-पन्नास वर्षांपूर्वीची प्रकरणे आहेत. याचे सर्व अधिकार विभागीय आयुक्तांना प्रदान करण्यात येतील. हे अधिकार शासनाचे आहेत. या रकमा एकदम कमी म्हणजे दोन रुपये ते पाच रुपये या दरम्यानच्या आहेत. हे अधिकार प्रदान करण्याच्या तयारीत आहे. याकरिता काही आवश्यक स्वाक्ष-या लागतील. हे सर्व निर्लेखित होणार आहे.

**अभिप्राय व शिफारशी**

रत्नागिरी जिल्हा परिषदेंतर्गत निरनिराळ्या योजना, बांधकाम वगैरे बाबी कार्यान्वित करण्यासाठी संबंधित ठेकेदार, विभाग प्रमुख अगर कर्मचारी यांना वेळोवेळी आगाऊ रकमा देण्यात आल्या आहेत. अशाप्रकारे दिलेल्या रकमांचे संबंधित वर्षाअखेर खर्चाची प्रमाणके व हिशेब देऊन समायोजन किंवा वसुली करणे आवश्यक आहे. अशाप्रकारे अगोदर दिलेल्या आगाऊ रकमांचे समायोजन झाल्यावर नवीन आगाऊ रकमा देता येतात. परंतु जिल्हा परिषदांकडील आगाऊ रकमांच्या नोंदवह्या पहाता वेळोवेळी दिलेल्या आगाऊ रकमांचे समायोजन/वसुली होत नसल्याचे आढळून आले.

सन १९४९-१९५० ते सन २०१२-२०१३ मधील रत्नागिरी जिल्हा परिषदेकडील थकीत अग्रिम रुपये ५,९४,८८६ या रकमेपैकी सन १९४९-१९५० ते सन १९७८-१९७९ मधील थकीत अग्रिम रक्कम रुपये ५ लाख ४४० रुपये २८ पैसे जुने अभिलेख उपलब्ध होत नाहीत. सदर रकमाची वसुली होणार नसल्याने पंचायती राज समितीने दिनांक २० जून, २००१ ते दिनांक २६ जून, २००१ या कालावधीत रत्नागिरी जिल्हा परिषदेला भेटीच्या वेळी दिलेल्या सुचनेनुसार क्षमापनाचा प्रस्ताव शासनाकडे दिनांक ३० जुलै, २००१ रोजी सादर करण्यात आल्याचे रत्नागिरी जिल्हा परिषदेकडून लेखी खुलाशाद्वारे कळविण्यात आले आहे. तद्नंतर जिल्हा परिषदेने शासनाला एकूण ११ वेळा स्मरणपत्रे पाठविलेली आहेत. तथापि, शासनाकडून यासंदर्भात कोणतीही कार्यवाही केल्याचे कळविण्यात आलेले नाही. याबाबत समिती नापसंती व्यक्त करीत आहे. **यासंदर्भात ग्रामविकास विभागाने रुपये ५ लाख ४४० रुपये २८ पैसे एवढी रक्कम सन १९४९-१९५० ते सन १९७८-१९७९ या कालावधीतील थकित असून सदर रक्कम निर्लेखित/क्षमापित करण्याबाबत तातडीने कार्यवाही करावी तसेच अशा थकित अग्रिमासंदर्भात तातडीने कार्यवाही व्हावी तसेच भविष्यात असे प्रसंग उद्‌भवू नयेत यासाठी सर्व संबंधितांना तात्काळ सूचना निर्गमित करण्यात याव्यात अशी समिती शिफारस करीत आहे व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा.**

प्रकरण सहा

## जिल्हा परिषद, रत्नागिरी

### सन २०१२-२०१३ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी (अपहार/अफरातफर प्रकरणे)

**परिच्छेद क्रमांक ३.१०७२ (२)/१० (सन २०१२-१३)**

| अ.क्र. | नियमबाह्य बाबीचे स्वरूप | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| २ | अफरातफर/अपहार प्रकरणे | रत्नागिरी | सामान्य प्रशासन | १० | १६,२६,९५५ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

सन २०१२-२०१३ अखेर १३७ अपहार प्रकरणे प्रलंबित होती. त्यापैकी ११५ प्रकरणे निकाली झाली असून सदर प्रकरणातील रक्कम रुपये २७,१८,२९८ ची वसुली व रक्कम रुपये १,२६,५३,०४४ चे समायोजन झाले आहे. वसुल रक्कम संबंधित ग्रामपंचायतीच्या बँक खातेवर भरणा करणेत आली आहे. उर्वरति २२ प्रकरणे निकाली काढण्याची कार्यवाही सुरू आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

रत्नागिरी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २६ एप्रिल, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, रुपये १.२६ कोटीचे समायोजनाचे लेखापरीक्षण स्थानिक निधी लेखापरीक्षण विभागाकडून करण्यात आलेले आहे काय, उक्त २२ प्रकरणांची स्थिती काय आहे. यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांनी खुलासा केला की, अहवाल वर्षात अपहाराची १३७ प्रकरणे प्रलंबित होती, त्यापैकी ११५ प्रकरणे निकाली काढली असून रुपये २७,१८,२९८ इतक्या रकमेची वसुली झाली असून रुपये १,२६,५३,०४४ इतक्या रकमेचे समायोजन झाले आहे. सन २०१६-१७ पर्यंत ६१ प्रकरणे निकाली काढली होती.

यावर समितीने अशी विचारणा केली की, उर्वरित रकमेचे समायोजन करण्यात आले असले तरी लेखा परिक्षणाच्या वेळी समायोजनाबाबतची अभिलेखे का दाखविली नाहीत. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा संचालनालय यांनी विदित केले की, जिल्हा परिषदेने २ कोटी रुपये रकमेच्या व्हाऊचर्सची ॲडजस्टमेंट केली आहे. लेखापरीक्षणाच्या वेळी अशी शंका व्यक्त केली होती की, यामध्ये अफरातफर झालेली आहे. जिल्हा परिषदेने उक्त व्हाऊचर्सची तपासणी लेखापरिक्षकांकडून करून घ्यावी व त्यानंतर हा परिच्छेद निकाली काढावा.

यावर समितीने विचारणा केली की, अधिका-यांनी हा मुद्दा क्लिअर का केला नाही. यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांनी खुलासा केला की, जेव्हा एखादे प्रकरण निकाली काढतो, त्यावेळी त्याची प्रत सहायक संचालक, स्थानिक निधी लेखा यांनाही देत असतो. दरवर्षी लेखापरीक्षण होते, त्यावेळी त्यावर्षी निकाली काढलेली प्रकरणे सुद्धा आम्ही पुढे दाखवितो. ती नस्ती उपलब्ध आहे, तश्या नस्ती समितीस सादर करून देण्यात येतील.

याबाबत संचालक, स्थानिक निधी लेखा संचालनालय यांनी विदित केले की, समितीने विचारले आहे की, त्यामध्ये समायोजन केलेले आहे हे दाखविले पाहिजे. लेखापरीक्षण झाल्यानंतर व्हाऊचर दाखवून तो आक्षेप वगळला पाहिजे. दोन-दोन कोटीच्या रक्कमा आहेत, त्याचे लेखापरीक्षण केले जात नाही म्हणून आक्षेप काढले जातात. काही वेळा संशय व शंका निर्माण होतात. विभागाला आवश्यक ते अभिलेखे दाखवून असे परिच्छेद वगळावेत.

यावर समितीने सहाय्यक आयुक्तांना अशी विचारणा केली की, सन २०१२-२०१३ अखेर १३७ अपहार प्रकरणे प्रलंबित होती. त्यापैकी ११५ प्रकरणे निकाली झाली असून सदर प्रकरणातील रक्कम रुपये २७,१८,२९८ एवढी वसुली केली आहे व रुपये १ कोटी २६ लाख ५३ हजार ०४४ रकमेचे समायोजन केलेले आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, याबाबत अधिकारी वर्गाने अधिकारी स्तरावर काही तपासण्या केल्या आहेत का, यावर प्रभारी उप अभियंता (बांधकाम) यांनी खुलासा केला की, जिल्हा परिषदेचे नियुक्ती प्राधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी असल्यामुळे अशा अपहार प्रकरणात आरोपपत्र १ ते ४ देऊन त्याची खाते चौकशी जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडे प्रस्तावित केली जाते. विभागीय आयुक्त कार्यालयात सहायक आयुक्त चौकशी हे पद आहे. आयुक्त कार्यालयाकडून स्वतंत्रपणे खाते चौकशी केली जाते. अहवाल वर्षात जेवढी खाते चौकशीची प्रकरणे जिल्हा परिषदेकडे प्राप्त झाली आहेत, पंचायती राज समितीच्या दौ-यापूर्वी त्याचा प्रकरणनिहाय आढावा घेतला आहे, त्याची सद्य:स्थिती उपलब्ध आहे.

यावर समितीने एक-दोन प्रकरणे दाखवून देण्यात यावीत असे सांगितले. यावर सहाय्यक आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय यांनी अशी माहिती विशद केली की, सन २०१२-२०१३ मध्ये रत्नागिरी जिल्हा परिषदेची १९ प्रकरणे प्रलंबित होती. त्यातील १० प्रकरणे निकाली काढली आहेत व ९ प्रलंबित राहिली आहेत. सन २०१३-२०१४ मध्ये मागील ९ व त्या वर्षाची ५ अशी १४ प्रकरणे होती, त्यापैकी ८ प्रकरणे त्या वर्षात निकाली निघाली आहेत. ३१ मार्च २०१८ ची रत्नागिरी येथील मागील वर्षीपर्यंत प्रलंबित १२ प्रकरणे आहेत व नवीन ११ प्रकरणे प्राप्त झाली होती अशी एकूण २३ प्रकरणे आहेत व त्यातील १० प्रकरणे निकाली निघाली आहेत. यातील चार प्रकरणांची यापूर्वीच सुनावणी पूर्ण झालेली आहे. सध्या फक्त ९ प्रकरणे प्रलंबित आहेत.

यावर समितीने विचारणा केली की, १५ प्रकरणे विभागीय आयुक्त कार्यालयाकडे पाठविली नाही. यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांनी खुलासा केला की, अशा प्रकरणाबाबत जिल्हा परिषद स्तरावर आम्हाला अधिकार आहे. यावर समितीने सदर अफरातफर कशा प्रकारची आहे, हे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) यांनी सांगावे असे विदित केले. यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) यांनी खुलासा केला की, ही ग्रामपंचायत स्तरावरील प्रकरणे आहेत, रोजगार हमी योजनेतील गैरव्यवहाराची प्रकरणे आहेत. संबंधित ग्रामसेवकांवर कारवाई केली आहे.

यावर समितीने विचारणा केली की, केवळ ग्रामसेवकांवर कारवाई केली जाते, जिल्हा परिषद स्तरावरील ११५ प्रकरणे समायोजन केलेली आहेत, गुन्हेगारांना पाठिशी घातले आहे, कागदी घोडे नाचवून सर्व हिशोब पूर्ण केला आहे. समितीचा आक्षेप आहे की, ग्रामसेवक ही सर्वात लहान पदावरील व्यक्ती आहे. त्याच्यावर नियंत्रण ठेवणारे विविध विभागाचे विस्तार अधिकारी आहेत. त्यांच्यावर तालुक्याचे प्रमुख गट विकास अधिकारी आहेत. गट शिक्षणाधिकारी, महिला व बालकल्याण विभागाचे अधिकारी आहेत. जेथे अपहाराची प्रकरणे झाली आहेत, त्यांच्यावरील वरिष्ठ नियंत्रण अधिकारी यांचा यामध्ये दोष नाही का ? ज्या कालावधीमध्ये अपहार झालेला दिसला आहे, त्या कालावधीत पंचायत विभागाचे विस्तार अधिकारी यांनी ग्रामपंचायतीस भेट दिली असेल. खंड विकास अधिका-यांनी भेट दिली असेल, त्यांच्या निदर्शनास ही बाब का आली नाही. ते जबाबदार नाही का, शासनाने ग्रामपंचायतीचे कामकाज पाहण्यासाठी जी व्यवस्था तयार केली आहे, त्यांचे कामकाज पाहण्यासाठी पंचायती राज समिती आलेली आहे. परंतु वरिष्ठ प्रशासन अधिकारी स्वतःला वाचविण्यासाठी ग्रामसेवकाला बळीचा बकरा करीत आहेत. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना समिती सांगू इच्छिते की, ज्या कालावधीतील ही अपहाराची प्रकरणे असतील त्या कालावधीतील तत्कालिन ग्रामसेवकांवर त्यावेळी आरोप ठेवलेले आहेत, त्या कालावधीतील ज्या खंड विकास अधिका-यांनी किंवा विस्तार अधिका-यांनी त्या ग्रामपंचायतीची पाहणी केली असेल त्यांच्यावरही या प्रकरणी जबाबदारी निश्चित करण्यात यावी. ग्रामपंचायतीची तपासणी केली तेव्हा त्यांना ही अपहाराची प्रकरणे का दिसली नाहीत. लहान अधिका-यांना पकडता व मोठ्या अधिका-यांना सोडून देता हे दिसत आहे. वरिष्ठ अधिका-यांनी रितसर वेळोवेळी तपासणी केली तर ग्रामसेवक अडकणार नाहीत. वरिष्ठ अधिकारी ग्रामपंचायतीच्या तपासणीस जाताना पत्र देतात. लेखा परिक्षणामध्ये हे अपहार दिसतात. ज्याने ग्रामपंचायतीची तपासणी केली तो देखील जबाबदार असला पाहिजे.

यावर जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी खुलासा केला की, सन २०१२-१३ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या प्रकरणामध्ये १६ लाख २६ हजार ९५५ रक्कम आहे. सन २०१२-२०१३ मध्ये एक प्रकरण निकाली काढले आहे, एका वर्षाची ही रक्कम आहे. हे एक प्रकरण रत्नागिरी येथील होते. या प्रकरणी वसुली २० हजार फक्त झालेली आहे. एकूण ११५ प्रकरणामध्ये २७ लाख १८ हजार २९८ ची वसुली झालेली आहे. १ कोटी २६ लाख रकमेचे समायोजन झाले आहे, आता फक्त २२ प्रकरणे शिल्लक आहेत.

यावर समितीने आक्षेप घेत विचारणा केली की, मुख्य कार्यकारी अधिका-यांकडून उत्तर अपेक्षित आहे. ग्रामसेवकांवर कारवाई करता, कोठेही अफरातफर झाली असेल तर जिल्हा परिषदेकडे यंत्रणा आहे. पंचायत समितीला सहायक लेखा अधिकारी आहेत, ते देखील तपासणी करतात, विस्तार अधिकारी व गट विकास अधिकारी देखील आहेत. जिल्हा परिषदेचे विभाग प्रमुख व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचेपर्यंत एवढी सर्व यंत्रणा असताना नेमका ग्रामसेवक या एकाच माणसावर ठपका ठेवणे, केवळ त्यांच्यावरच कारवाई करणे, बाकीच्यांना सोडून देणे हा कोणता प्रकार आहे. याबाबत सर्व जण जबाबदार आहेत. म्हणून या सर्व अफरातफरीच्या प्रकरणात सखोल चौकशी मुख्य कार्यकारी अधिकारी स्तरावर करण्यात यावी. जे दोषी आहेत, त्यांच्यावर जबाबदारी निश्चितच करण्यात येऊन दोषींवर कारवाई करण्यात यावी. याबाबत अहवाल एक महिन्याचा आत समितीला सादर करण्यात यावा. तसेच या प्रकरणी सचिवांची साक्ष देखील आयोजित करण्यात यावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली :—**

सन २०१२-२०१३ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी (अफरातफर/अपहार प्रकरणे) प्रकरणात मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांची जबाबदारी निश्चित करून पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

सन २०१२-२०१३ अखेर जिल्हा परिषद, रत्नागिरी कडील ग्रामपंचायत विभागाकडे एकूण १३७ अपहार प्रकरणे प्रलंबित होती. सदर अपहार प्रकरणात रक्कम रुपये १,९८,५९,०९६ गुंतलेली आहेत. त्यापैकी ११५ अपहार प्रकरणे निकाली झाली असून सदर प्रकरणातील रक्कम रुपये २७,१८,२९८ ची वसुली व रक्कम रुपये १,२६,५३,०४४ चे समायोजन झाले आहे. वसुल रक्कम संबंधित ग्रामपंचायतीच्या बँक खातेवर भरणा करणेत आली आहे. उर्वरित २२ प्रकरणांमध्ये एकूण रक्कम रुपये ४४,८७,७५४ गुंतलेली होती.

या २२ प्रकरणांपैकी साखर, पोसरे, देवरुख, खेरशेत व शिवाजी नगर साखरोली या पाच प्रकरणांमध्ये पूर्णतः व चोरवणे, देवडे, ओणनवसे, मांदिवली, चिरणी आणि कुंभाड या प्रकरणांमध्ये अंशतः असे एकूण ९,९९,३४४ रुपये वसूल व समायोजन झालेले आहेत. उर्वरित एकूण प्रकरणांच्या सद्यःस्थितीबाबतची माहिती सोबतच्या तक्त्यात दिली आहे. (परिशिष्ट - अ)

एकूण २२ प्रलंबित प्रकरणांपैकी ५ प्रकरणे पूर्णतः निकाली निघाली असून ७ प्रकरणे अंशतः निकाली निघाली आहेत. एकूण ६ प्रकरणांमध्ये ग्रामसेवक मयत असल्यामुळे क्षमापीत करणेबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त यांचेकडे प्रस्तावित करण्यात येईल. उर्वरित प्रकरणांपैकी एका प्रकरणामध्ये कोर्ट केस प्रलंबित आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय.—** (वित्त-९) जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी शासन सहमत आहे.

**परिशिष्ट-अ**

| अ.क्र. | तालुका | ग्रामपंचायत व नाव | जबाबदार ग्रामसेवकाचे/ सरपंचाचे नाव | अपहारीत रक्कम | वसुली/समायोजन रक्कम रुपये | कर्मचारी/पदाधिकारी यांची सद्यःस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १ | दापोली | ओणनवसे | श्री टी.डी. पाटील (मयत), श्री. एस.डी. बैकर श्री. व्ही.ए.इंगळे, | ६७३९२ | २३५५७ वसूल व ४३८३५ बाकी | श्री टी.डी. पाटील यांच्या निवृत्ती वेतनातून रु. १०१३९ व सरपंच श्री. बैकर यांत्या कडून रु. ३३६९६ इतक्या वसूलीची कार्यवाही सुरू आहे. सदर प्रकरणात गट विकास अधिकारी यांचा चौकशी अहवाल प्राप्त आहे. |
| २ | दापोली | मांदिवली | टी.डी. पाटील (मयत), डी. एस. भूवड | ४१८३५ | २९४६१ वसूल १२३७४ बाकी | श्री. टी. डी. पाटील यांच्या कुटुंब निवृती वेतनातून व श्री. भूवड यांच्या वेतनातून वसुली सुरू आहे. सदर प्रकरणात गट विकास अधिकारी यांचा चौकशी अहवाल प्राप्त आहे. |
| ३ | खेड | चोरवणे | आर.पी. शिरसाट, ए. वाय. चव्हाण, | ५८८७६ | ५२१३१ वसुल ६७४५ बाकी सी. एन. नार्वेकर | श्री. आर.पी. शिरसाठ व व श्री. ए. वाय. चव्हाण यांचेकडील पूर्ण रक्कम वसूल असून उर्वरीत रक्कमेस श्री. नार्वेकर हे जबाबदार असून यांच्या सेवानिवृत्ती वेतनातून वसुली कार्यवाही सुरू आहे. सदर प्रकरणात गट विकास अधिकारी यांचा चौकशी अहवाल प्राप्त आहे. |
| ४ | खेड | चिरणी | डी. एस. गोयथळे, टी. जी. कदम, एस. नागवेकर | २९५०७ | ७२० वसूल २८७८७ बाकी | श्री. कदम व श्री. नागवेकर यांचेकडील रक्कम वसूल करण्यात आली असून गोयथळे पती-पत्नी मयत असून निर्लेखनासाठी कार्यवाही सुरू |

**परिशिष्ट-अ**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | आहे. तसेच गोयथळे यांचे कालावधीत कार्यरत असणारे गट विकास अधकारी, विस्तार अधिकारी पंचायत व सहाय्यक लेखाधिकारी यांचे विरुध्द गट विकास अधिकारी यांचे अहवालानुसार कारवाई करत आहोत. |
| ५ | खेड | नांदिवली | आर. के. मार्गी | ३२८०६८ | ० | श्री. आर.के. मार्गी पती-पत्नी मयत असून निर्लेखनासाठी कार्यवाही सुरू आहे. तसेच मार्गी यांचे कालावधीत कार्यरत असणारे गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी पंचायत व सहाय्यक लेखाधिकारी यांचे विरुध्द गट विकास अधिकारी यांचे अहवालानुसार कारवाई करत आहोत. |
| ६ | खेड | नांदिवली | पी. टी. कदम (सरपंच) व आर.के मार्गी | १९१०७४ | ० | सरपंच सध्या पदावर नाही त्यांच्या मालमतेचा शोध सुरू आहे. श्री. मार्गी पती-पत्नी मयत असून निर्लेखना साठी कार्यवाही सुरू आहे.तसेच मार्गी यांचे कालावधीत कार्यरत असणारे गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी पंचायत व सहाय्यक लेखाधिकारी यांचे विरुध्द गट विकास अधिकारी यांचे अहवालानुसार कारवाई करत आहोत. |
| ७ | खेड | कुंभाड | व्ही.पी. काळे | १२८८४१ | ९४८४१ वसूल ३४००० बाकी | श्री व्ही.पी. काळे यांच्या सेवानिवृत्ती वेतनातून वसुली सुरू असून गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी पंचायत व सहाय्यक लेखाधिकारी यांचे विरुध्द गट विकास अधिकारी यांचे अहवालानुसार कारवाई करत आहोत. |
| ८ | खेड | नांदिवली | पी.टी.कदम | ३३४०८३ | ० | दुबार नोंद |
| ९ | खेड | चिरणी | श्री गोयथळे श्री. नागवेकर | १५६०१८ | ४५३२८ वसूल ११०६९० बाकी | श्री. नागवेकर यांचेकडील अपहारीत रक्कम पुर्ण वसूल. गोयथळे पती-पत्नी मयत असून निर्लेखना साठी कार्यवाही सुरू आहे. तसेच गोयथळे यांचे कालावधीत कार्यरत असणारे गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी पंचायत व सहाय्यक लेखाधिकारी यांचे विरुध्द गट विकास अधिकारी यांचे अहवालानुसार कारवाई करत आहोत. |
| १० | खेड | आंबडस | श्री डी. एस. गोयथळे | ६९७९४ | ० | गोयथळे पती-पत्नी मयत असून निर्लेखना साठी कार्यवाही सुरू |

**परिशिष्ट-अ**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | आहे.तसेच गोयथळे यांचे कालावधीत कार्यरत असणारे गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी पंचायत व सहाय्यक लेखाधिकारी यांचे विरुध्द गट विकास अधिकारी यांचे अहवालानुसार कारवाई करत आहोत. |
| ११ | खेड | नांदिवली | आर. के. मार्गी | ३१२०६६ | ० | श्री. मार्गी पती-पत्नी मयत असून निर्लेखना साठी कार्यवाही सुरू आहे. तसेच मार्गी यांचे कालावधीत कार्यरत असणारे गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी पंचायत व सहाय्यक लेखाधिकारी यांचे विरुध्द गट विकास अधिकारी यांचे अहवालानुसार कारवाई करत आहोत. |
| १२ | चिपळूण | टेरव | बी. आर. नलावडे, श्री. वासकर, श्री कुंभार | १५७७३९६ | ० | कोर्टकेस प्रलंबित. श्री. बी. आर. नलावडे, सेवा निवृत्त असून त्यांचे सेवा निवृत्तीचे सर्व लाभ रोखलेले आहेत. श्रीम. वास्कर श्री. कुंभार हे तत्कालीन सरपंच असून त्यांचे मालमत्तेवर बोजा चढवणेकरीता तहसिलदार चिपळूण यांना गट विकास अधिकारी चिपळूण यांनी पत्र दिले आहे. सदर प्रकरणात गट विकास अधिकारी यांचा चौकशी अहवाल प्राप्त आहे. |
| १३ | चिपळूण | मार्गताम्हाणे | ए. जे. जांभवडेकर | १६३१४८ | ० | श्री जांभवडेकर मयत असून कुटुंब निवृत्ती वेतनातून वसुली सुरू आहे. सदर प्रकरणात गट विकास अधिकारी यांचा चौकशी अहवाल प्राप्त आहे. |
| १४ | चिपळूण | कोसबी | ए. डी. मालगुडकर | ३९७१० | ० | श्री मालगुंडकर ग्रामसेवक पती-पत्नी मयत. निर्लेखनाची कार्यवाही सुरू आहे. प्रकरणात गट विकास अधिकारी यांचा चौकशी अहवाल प्राप्त आहे. |
| १५ | संगमेश्वर | कोंड कदमराव | श्री बी. आर. नलावडे | ९७५७८ | ० | ग्रामसेवक नलावडे सेवानिवृत्त झाले असून त्यांचे सेवानिवृत्ती प्रकरण व सेवानिवृत्ती नंतर मिळणारे सर्व लाभ रोखून ठेवण्यात आले आहेत. गट विकास अधिकारी यांच्या चौकशी अहवालानुसार श्री. नलावडे यांचे मालमत्तेचा शोध घेऊन त्यावर बोजा चढणेचा प्रस्ताव महसूल विभागाकडे सादर करत आहेत. |
| १६ | संगमेश्वर | देवडे | डी. जी. मूरकर | १७०२९२ | ११७०९० समायोजन व ४०६०२ वसूल बाकी १२६०० | श्री मूरकर यांच्या कुटुंब निवृत्ती वेतनातून वसुली सुरू आहे. गट विकास अधिकारी यांचा चौकशी अहवाल प्राप्त आहे. |

**परिशिष्ट-अ**—समाप्त

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| १७ | संगमेश्वर | खडी कोळवण | श्री एम. जी. सुर्यवंशी | १२६४७२ | ० | ग्रामसेवक सुर्यवंशी बडतर्फ झालेले असल्यामुळे वसुली प्रलंबित. श्री. सुर्यवंशी यांच्या मालमत्तेचा शोध सुरू आहे. गट विकास अधिकारी यांचा चौकशी अहवाल प्राप्त आहे. |
| | | | एकूण | ३८९२१५०/- | वसूल ४०३७४०/- शिल्लक ३४८८४१०/- | |

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने रत्नागिरी जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ४ जून, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, २२ मधील ५ प्रकरणे निकाली काढलेले आहेत. अंशतः निकाली म्हणजे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, यामध्ये जिल्हा परिषदेकडे एकूण १३७ प्रकरणे होती. २२ प्रकरणे प्रलंबित होती. ०९ प्रकरणे निकाली काढून १० लाख रुपये वसूल झालेले आहेत. ७ प्रकरणांमध्ये क्षमापन प्रस्ताव आहेत. ग्रामसेवक दाम्पत्य मयत झालेली आहेत. सेवानिवृत्त झाल्यानंतर काही प्रकरणे झालेली आहेत. सेवानिवृत्तीनंतर ते मयत झाले व कुटुंब निवृत्ती पेन्शनमधून क्षमपनाचे प्रस्ताव पाठविण्यात आलेले आहेत. एक दुबार प्रकरण होते. आता केवळ तीन प्रकरणे शिल्लक आहेत, त्यामधून रुपये ३,८७,००० वसुली आहे. त्यापैकी एक एफआयआरचे प्रकरण आहे. फौजदारी गुन्हे असल्यामुळे अंतिम कार्यवाही थांबलेली आहे. एक कर्मचारी आपला बडतर्फ केलेला आहे. एक कुटुंब निवृत्ती पेन्शनमधून कपात सुरू करण्यात आलेली आहे. यावर समितीने ही प्रकरणे देखील निकाली काढण्यात यावी असे निदेश दिले.

**अभिप्राय व शिफारशी**

जिल्हा परिषद, रत्नागिरी अंतर्गत सन २०१२-२०१३ अखेर जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी संबंधातील १३७ अपहार प्रकरणे प्रलंबित होती. सदर अपहार प्रकरणात रुपये १,९८,५९,०९६/- एवढी रक्कम गुंतलेली आहे. त्यापैकी ११५ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून सदर प्रकरणातील रक्कम रुपये २७,१८,२९८/- एवढी वसुली झाली आहे व रक्कम रुपये १,२६,५३,०४४/- एवढे समायोजन झाले आहे. सन २०१६-२०१७ पर्यंत ६१ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून वसुल रक्कम संबंधित ग्रामपंचायतीच्या बँक खातेवर भरणा करण्यात आली आहे. उर्वरित २२ प्रकरणे निकाली काढण्याची कार्यवाही सुरू आहे.

उपरोक्त माहितीच्या आधारे समितीने साक्ष घेतली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, लेखा परिक्षणाच्या वेळी समायोजनाबाबतचे अभिलेखे दाखविले नाहीत. सदर अफरातफर व इतर नियमबाह्य प्रकरणे ग्रामपंचायत स्तरावरील आहेत. त्यामध्ये रोजगार हमी योजनेतील गैरव्यवहाराची प्रकरणे आहेत. यामध्ये केवळ ग्रामसेवकावर कारवाई करण्यात आली आहे. वास्तवित पहाता ग्रामसेवक हा सर्वात लहान पदावर कार्यरत असतो. ग्रामसेवकावर नियंत्रण ठेवणारे विविध विभागाचे विस्तार अधिकारी आहेत. त्यांच्यावर तालुक्याचे प्रमुख गट विकास अधिकारी आहेत. गटशिक्षणाधिकारी, महिला व बालकल्याण विभागाचे अधिकारी आहेत. त्यामुळे ज्या ठिकाणी अपहाराची प्रकरणे झाली आहेत त्यांच्यावरील वरिष्ठ नियंत्रण अधिकारी यांच्याविरुध्द कारवाई केल्याचे दिसून येत नाही. याबाबत समिती सखेद आश्चर्य व्यक्त करीत आहे.

रत्नागिरी जिल्हा परिषदेमधील उर्वरित २२ प्रकरणांमध्ये गुंतलेल्या रक्कम रुपये ४४,८७,७५४/- पैकी साखर, पोसरे, देवरुख, खेरशेत व शिवाजीनगर साखरोली या पाच प्रकरणांमध्ये पूर्णतः व चोरवणे, देवडे, ओणनवसे, मादिवली, चिरणी आणि कुंभाड या सात प्रकरणांमध्ये अंशतः असे एकूण ९,९९,३४४/- रुपये वसूल व समायोजन झालेले आहेत. ६ प्रकरणांमध्ये ग्रामसेवक मयत झाल्यामुळे क्षमापित करणेबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे प्रस्तावित करण्यात येणार आहे व एक प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. उर्वरित तीन प्रकरणामधून रुपये ३,८७,०००/- वसुली बाबतची सद्यःस्थिती समितीला अवगत करण्यात यावी.

गटविकास अधिकारी आणि विस्तार अधिकारी यांनी ग्रामपंचायतींना महिन्यातून किमान दोन वेळा आणि ८ वेळा सामान्य सखोल तपासणी करणे आवश्यक आहे. गटविकास अधिकारी व विस्तार अधिका-यांना ग्रामपंचायतीमध्ये अफरातफर झाल्याचे लक्षात येत नसेल तर त्यांनी जाणीवपूर्वक त्याकडे दुर्लक्ष केलेले आहे असे समजण्यास कोणताही प्रत्यवाय नाही. तसेच ग्रामपंचायतींची कोणतीही तपासणी न करता मोघम स्वरुपाची कार्यवाही केलेली आहे.

**अधिकारी क्षेत्रीय स्तरावर भेटी न देताच कामे करतात. शासन निर्णयात जिल्हा परिषदेच्या पंचायत समिती व जिल्हा परिषद स्तरावर सर्व अधिका-यांनी त्या त्या क्षेत्रात किंवा त्यांच्या कार्यक्षेत्रात किती वेळा भेटी देऊन तपासणी करणे, पाहणी करणे, सूचना देणे, कारवाई करणे इत्यादी बाबी अपेक्षित आहेत, याबाबतचा स्वयंस्पष्ट शासन निर्णय निर्गमित करण्यात यावा. त्यामध्ये उल्लंघन करणा-या अधिका-यावर कडक कारवाईचे बंधन टाकावे इत्यादीबाबत विभागाने सत्वर कारवाई करून त्याबाबतचा शासन निर्णय त्वरेने निर्गमित करण्यासंदर्भात ठोस कारवाई करावी व याबाबत केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला दोन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण सात

## जिल्हा परिषद, रत्नागिरी

सन २०१२-२०१३ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी (अपहार/अफरातफर प्रकरणे)

(१) परिच्छेद क्रमांक ४.४४२ (४)/३३ (सन २०१२-१३)

सन २०१२-२०१३ या वर्षात पंचायत समित्यांमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी :—

| अ.क्र. | नियमबाह्य बाबींचे स्वरुप | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| ४ | अपहार/ अफरातफर प्रकरणांबाबत | रत्नागिरी | दापोली | ३३ | १३,७५,३५७/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

सन २०१२-२०१३ अखेर ग्रामपंचायतींकडील २० अपहार प्रकरणांपैकी १७ प्रकरणे निकाली झाली असून रक्कम रुपये १,३५,२६६ वसुली झाली आहे व रक्कम रुपये ११,३६,४०८/- चे समायोजन झाले आहे. उर्वरित ३ प्रकरणे निकाली काढण्याची कार्यवाही सुरू आहे.

**(२) परिच्छेद क्रमांक ४.४४२ (४)/११ (सन २०१२-१३)**

**सन २०१२-२०१३ या वर्षात पंचायत समित्यांमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी :—**

| अ.क्र. | नियमबाह्य बाबींचे स्वरुप | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| ४ | अपहार/ अफरातफर प्रकरणांबाबत | रत्नागिरी | खेड | ११ | ९,८०,७६६/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

एकूण २६ प्रकरणांपैकी रक्कम रुपये २५,८९,४८६ गुंतलेली होती. त्यापैकी १५ प्रकरणे निकाली झाली असून वसुल रक्कम रुपये १,५६,५५५/- झाली असून रक्कम रुपये ६,८८,६४९ चे समायोजन झाले आहे. उर्वरित ११ प्रकरणांमध्ये रक्कम रुपये १७,४४,२८२/- गुंतलेले आहेत. त्यापैकी ६ प्रकरणांतील संबंधित २ ग्रामसेवक मयत असून ५ प्रकरणे निकाली काढण्यासाठी कार्यवाही सुरू आहे.

**(३) परिच्छेद क्रमांक ४.४४२ (४)/१९ (सन २०१२-१३)**

**सन २०१२-२०१३ या वर्षात पंचायत समित्यांमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी :—**

| अ.क्र. | नियमबाह्य बाबींचे स्वरुप | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| ४२ | अपहार/ अफरातफर प्रकरणांबाबत | रत्नागिरी | चिपळूण | १९ | ३१,३४,९००/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

एकूण ३२ प्रकरणांपैकी २८ प्रकरणे निकाली झाली असून वसुल रक्कम रुपये ५,४७,२८४ वसूल झाली असून रक्कम रुपये १३,७६,०१४ चे समायोजन झाले आहे. उर्वरित २ प्रकरणांमध्ये संबंधित ग्रामसेवकांवर फौजदारी दाखल असून २ प्रकरणे निकाली काढणेची कार्यवाही सुरू आहे.

**(४) परिच्छेद क्रमांक ४.४४२ (४)/१५ (सन २०१२-१३)**

**सन २०१२-२०१३ या वर्षात पंचायत समित्यांमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी :—**

| अ.क्र. | नियमबाह्य बाबींचे स्वरुप | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | अपहार/ अफरातफर प्रकरणांबाबत | रत्नागिरी | संगमेश्वर (देवरुख) | १५ | १९,७७,३००/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सन २०१२-२०१३ अखेर ग्रामपंचायतीकडील १० अपहार प्रकरणे प्रलंबित होती. त्यापैकी ७ प्रकरणे निकाली झाली असून सदर प्रकरणातील रक्कम रुपये २,२०,३४९/- ची वसुली व रक्कम रुपये १५,१२,४१५ चे समायोजन झाले आहे. वसुल रक्कम संबंधित ग्रामपंचायतीच्या बँक खात्यावर भरणा करणेत आली आहे. उर्वरित ३ प्रकरणे निकाली काढणेची कार्यवाही सुरू आहे.

**(५) परिच्छेद क्रमांक ४.४४२ (४)/२७ (सन २०१२-१३)**

**सन २०१२-२०१३ या वर्षात पंचायत समित्यांमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी :—**

| अ.क्र. | नियमबाह्य बाबींचे स्वरुप | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| ४ | अपहार/ अफरातफर प्रकरणांबाबत | रत्नागिरी | मंडणगड | २७ | २५,४०,९४४/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

एकूण सर्व १७ प्रकरणे निकाली झाली असून रक्कम रुपये ९,७०,७८६ ची वसुली व रक्कम रुपये १६,५०,८३८/- चे समायोजन झाले आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

रत्नागिरी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २६ एप्रिल, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, प्रश्नावलीतील अनुक्रमांक ५७ ते ६१ वरील परिच्छेद क्र. ४.४४२ (४) हे पाचही परिच्छेद दापोली, खेड, चिपळूण, संगमेश्वर व मंडणगड पंचायत समित्यांमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी व अफरातफरीच्या प्रकरणांची आहेत. समितीने अफरातफरीच्या प्रकरणांबाबत अनेक उपप्रश्न उपस्थित केलेले आहेत. समितीचे मत आहे की, अफरातफरीच्या प्रकरणात वरिष्ठ अधिका-यांऐवजी कनिष्ठ अधिकारी/कर्मचारी यांना जबाबदार धरले जाते. जर नियमबाह्य वा अफरातफरीच्या बाबीमध्ये ग्रामसेवकांना जबाबदार धरले जात असेल तर त्या प्रकरणामध्ये सहायक लेखा अधिकारी, विस्तार अधिकारी,

गट विकास अधिकारी यांचा सुद्धा संबंध येतो. तसेच या प्रकरणी लेखा परिक्षकांकडून लेखा परीक्षण करून घेणे आवश्यक होते. परंतु त्यांनी ते करून घेतलेले नाही. पंचायत समित्यांमध्ये अफरातफर झाल्याची शंका लेखा परिक्षकांनी व्यक्त केलेली आहे. अफरातफरीच्या प्रकरणास कोण जबाबदार आहे हे लेखा परिक्षकांनी ठरविलेले नाही. अहवाल वर्षात ज्यांनी कामकाज पाहिले किंवा भेटी दिल्या त्यांना त्याच वेळी अशा प्रकारे नियमबाह्य गोष्टी घडलेल्या आहेत हे का समजले नाही.

अफरातफरीच्या प्रकरणी केवळ खालच्या दर्जाचे एकटे अधिकारी दोषी असू शकत नाहीत. सहायक लेखा अधिकारी, विस्तार अधिकारी, गट विकास अधिकारी यांची वित्त विषयक कामकाज पाहण्याची जबाबदारी असते. परंतु त्यांना मात्र जबाबदार धरण्यात येत नाही. समितीचे मत आहे की, या अफरातफरींच्या प्रकरणांना जे जबाबदार असतील त्यांना दोषी ठरविले पाहिजे. मुख्य कार्यकारी अधिका-यांनी खालच्या दर्जाच्या अधिका-यांपासून वरिष्ठ दर्जाच्या गट विकास अधिका-यांपर्यंची सखोल चौकशी करावी. या प्रकरणी जबाबदार असलेल्या सर्व संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून, केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला एक महिन्यात सादर करावा. तसेच या प्रकरणी जे आक्षेप आलेले आहेत त्याचे लेखा परीक्षण सुद्धा व्यवस्थित करून घ्यावे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली :—**

(१) सन २०१२-१३ मधील ग्राम पंचायतीकडील एकूण २० प्रकरणांपैकी १७ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून उर्वरीत ३ प्रकरणांमध्ये एकूण किती रक्कम वसूल करणे बाकी आहे. प्रस्तुत प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांची जबाबदारी निश्चित करून पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

(२) दापोली, खेड, चिपळूण, संगमेश्वर व मंडणगड पंचायत समित्यांमध्ये झालेल्या इतर नियमबाहय बाबी व अफरातफरींच्या प्रकरणांसंदर्भात मुख्य कार्यकारी अधिका-यांच्या खालील दर्जाच्या अधिका-यांपासून वरिष्ठ दर्जाच्या गटविकास अधिका-यांपर्यंतची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांची जबाबदारी निश्चित करून पुढे कोणती कारवाई केली आहे,नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

(१) सन २०१२-१३ मधील ग्रामपंचायतींकडील एकूण २० प्रकरणांपैकी सद्य:स्थितीत १८ प्रकरणे निकाली काढणेत आली असून उर्वरीत २ प्रकरणांमध्ये रक्कम रुपये ५६,२०९ वसुली करणे बाकी आहे. प्रस्तुत प्रकरणी चौकशी करणेत आली असून वसुलीची कार्यवाही सुरू आहे. ३ प्रकरणांसंदर्भातील चौकशी मध्ये खालील बाबी आढळून आल्या.

**(१) ग्रामपंचायत मांदीवली, ता. दापोली येथील सन १९९१-१९९२ ते १९९९-२००० या कालावधीतील ग्रामनिधीचे लेखा परीक्षण अहवालातील अपहारित रकमेबाबत.**

दापोली येथील सन १९९१ ते १९९२ ते १९९९ ते २००० या कालावधीतील ग्रामनिधीचे लेखा परिक्षणामध्ये पाणीपट्टी व घरपट्टी कीर्दीत जमा न करणे, बँकेतून काढलेली व हाती असणारी रक्कम जमा न करणे तसेच प्रमाणके व मूळ खर्च पावती न ठेवणे इ. विषयी झालेल्या आर्थिक अनियमितेत रक्कम रुपये ४१,८३५ इतकी अपहारीत रक्कम आढळून आली आहे.

सदर अपहारास श्री. टी. डी. पाटील, सेवानिवृत्त ग्रामसेवक हे १६,९०३ इतक्या रकमेस जबाबदार असून श्री. डी. एस. भुवड, तत्कालिन ग्रामसेवक हे २४,९३२ इतक्या रकमेस जबाबदार आहेत.

वरील विषयांकित रक्कमेपैकी रक्कम रुपये ९१३५ एवढ्या रक्कमेची वसुली श्री. टी. डी. पाटील यांच्याकडून करणेत आली असून रक्कम रुपये ७७६८ एवढी रक्कम त्यांचे कुटुंब निवृत्तीवेतनातून वसुली करणेत आली आहे. तसेच श्री. डी. एस. भुवड, ग्रामसेवक हे जबाबदार असणा-या रकमेपैकी रक्कम रुपये १२,५५८ एवढ्या रक्कमेचे समायोजन झालेले असून उर्वरित शिल्लक रक्कम रुपये १२,३७४ वसुली करणेबाबत या कार्यालयाकडून गट विकास अधिकारी, पंचायत समिती मंडणगड यांना कळविणेत आले असून गट विकास अधिकारी, मंडणगड यांचेकडून सदर अपहारित रक्कम श्री. डी. एस. भुवड ग्रामसेवक यांचे माहे जानेवारी पेड ईन फेब्रुवारी चे वेतनातून वसुली करणेत येत आहे.

श्री. भुवड यांचेकडील रक्कम रुपये १२,५५८ रकमेचे समायोजन सन २०१८ मध्ये करणेत आलेले आहे. तसेच श्री. भुवड यांचेवर खातेनिहाय चौकशी करणेसाठी शिफारस करणेत आली आहे. श्री. टी. डी. पाटील यांचेकडून रक्कम रुपये ९,१३५ भरणा करणेत आलेली आहे. उर्वरीत रक्कम सन २०१८ मध्ये त्याच्या कुटुंब निवृत्ती वेतनातून वसूल करणेत आली आहे.

**(२) ग्रामपंचायत शिवाजीनगर (सा), ता. दापोली येथील सन १९९९-२००० ते सन २००७-२००८ या कालावधीतील ग्रामनिधीचे लेखा परिक्षण अहवालातील अपहारित रकमेबाबत**

दापोली येथील सन १९९९-२००० ते २००७-२००८ या कालावधीतील ग्रामनिधीचे लेखा परिक्षणामध्ये वसुलीच्या रकमा कमी जमा करणे, कामाचे प्राकलन व मुल्यांकन न घेता रकमा काढणे, प्रमाणके व पोच पावती शिवाय रकमा खर्च टाकणे, मुल्यांकनापेक्षा जादा खर्च करणे, प्रमाणाकावरील खर्च रकमेपेक्षा जादा रकम प्रदान दाखवून रोख रकमेचा अपहार करणे, खरेदी साहित्याचे प्रदान उशीरा करणे, वसुलीच्या रकमा कमी जमा करणे, बोगस उसनवार रकमा दाखविणे, विद्युत बिले उशीरा भरणे इ. विषयी झालेल्या आर्थिक अनियमितेबाबत कायम अपहार रकम रुपये ८५,३४६ व संशयीत अपहार रकम रुपये ३३१७ अशी एकूण रकम रुपये ८८,६६३ एवढया रकमेचा अपहार झालेचे आढळून आलेले आहे.

सदर अपहारित रकमेस श्री. सुर्यकांत शंकर शेंबेकर, ग्रामसेवक हे जबाबदार होते. सद्यःस्थितीत अपहारित वरील रकम रुपये ८८,६६३ एवढ्या रकमेची श्री. शेंबेकर, ग्रामसेवक यांचे कुटुंब निवृत्ती वेतनातून व त्यांना देय असलेल्या रकमेतून वसुली करणेत आलेली आहे.

वरील प्रकरणाची संबधित ग्रामसेवक श्री. सुर्यकांत शंकर शेंबेकर यांच्याकडून दिनांक ११ ऑक्टोबर, २००७ रोजी रकम रुपये ४२,२०१ वसूल करणेत आलेली असून त्यांच्या कुटुंब निवृत्तीवेतनातून सन २०१८ मध्ये उर्वरित रक्कम रुपये ४६,४६२ वसुली पूर्ण करणेत आलेली आहे. संबधित प्रकरणात संपूर्ण वसुली सन २०१८ साली पुर्ण करणेत आलेली आहे.

**(३) ग्रामपंचायत ओणनवसे, ता. दापोली येथील सन १९८९-१९९० ते २०००-२००१ या कालावधीतील जरयो/ जग्रासयो/आश्वासित रोजगार योजना लेखा परीक्षण अहवालातील अपहारित रकमेबाबत.**

दापोली येथील सन १९९९-२००० ते २००७-२००८ या कालावधीतील जरयो/जग्रासयो/ आश्वासीत रोजगार योजना लेखा परिक्षणामध्ये खर्च प्रमाणके न ठेवणे, कॅशबुक न ठेवणे एकाच कामावर दोन वेळा खर्च करणे, पोहच न ठेवणे, आरंभीची शिल्लक कमी घेणे इ. विषयी झालेल्या आर्थिक अनियमितेत रकम रुपये ६७,३९२ इतकी कायम अपहारित रकम आढळून आली आहे.

सदर अपहारित रकमेस श्री. टी. डी. पाटील, ग्रामसेवक हे रकम रुपये २१,४७१ इतक्या रकमेस तसेच रकम रुपये १२,२२५ एवढ्या रकमेस श्री. व्ही. ए. इंगळे, ग्रामसेवक व श्री. शंकर धाकू बैकर, तत्कालिन सरपंच हे ३३,६९६ एवढ्या रकमेस जबाबदार आहेत.

विषयांकित अपहारित रकमेपैकी सद्यःस्थितीत श्री. व्ही. ए. इंगळे, ग्रामसेवक यांच्या निवृत्तीवेतनातून रक्कम रुपये १२,२२५ श्री. टी.डी. पाटील, ग्रामसेवक यांच्याकडून रोखीने व कुटुंब निवृत्तीवेतनातून रक्कम रुपये ११,३३२ अशी दोन्ही मिळून रक्कम रुपये २३,५५७ एवढी रकम वसूल करणेत आली आहे. उर्वरित रकम रुपये ४३,८३५ पैकी श्री. टी. डी. पाटील यांचे निवृत्तीवेतनातून रकम रुपये १०,१३९ व रकम रुपये ३३,६९६ श्री. शंकर धाकु बैकर, तत्कालिन सरपंच यांचेकडून वसुली करणेची कार्यवाही करणेत येत आहे.

वरील प्रकरणाची संबधित ग्रामसेवक श्री.टी.डी. पाटील हे असून त्यांच्याकडून एकूण २१,४७१ रकमेपैकी रकम रुपये ७८०० सन २००३ मध्ये व रकम रुपये ३५३२ रुपये कुटुंब निवृत्ती वेतनातून वसुली सन २०१८ मध्ये करणेत आलेली आहे. उर्वरीत रकम रुपये १०१३९ रकमेची वसुली यांच्या कुटुंब निवृत्ती वेतनातून सुरू आहे. श्री. व्ही. ए. इंगळे हे सेवा निवृत्त ग्रामसेवक असून त्यांच्या निवृत्ती वेतनातून पूर्ण वसूली सन २०१८ मध्ये करणेत आलेली आहे.

**(२) पंचायत समिती दापोली (परि. क्र. ४.४४२(४)/३३) :—**

सन २०१२-१३ मधीलग्रामपंचायतकडील २० प्रकरणांपैंकी १७ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून उर्वरित ३ प्रकरणांमध्ये एकुण रकम रुपये ५६,२०९ एवढी रकम वसूल करणे बाकी आहे. सदर प्रकरणांमध्ये एकुण ४ ग्रामसेवक जबाबदार असून त्यातील २ ग्रामसेवक मयत आहेत. १ ग्रामसेवक सेवानिवृत्त झाले आहेत व १ कार्यरत आहे. तसचे सदर प्रकरणांमध्ये १ सरपंच सुद्धा जबाबदार आहे. मयत ग्रामसेवकांच्या कुटूंबनिवृत्ती वेतनातून व सेवानिवृत्त ग्रामसेवकांच्या निवृत्तीवेतनामधून वसूलीची कार्यवाही करणेत आली आहे. तसेच कार्यरत ग्रामसेवकांचे वेतनातुन व जबाबदार सरपंच यांचेकडूनही वसुलीची कार्यवाही करणेत येत आहे.

**पंचायत समिती खेड - ४.४४२(४)/११ खेड :—**

तालुक्यातील सन २०१२-१३ मध्ये ग्रामपंचायत अपहाराची एकूण २६ प्रकरणे होती. त्यामध्ये रकम रुपये २५,८९,४८६ गुंतलेली होती. त्यापैकी आजअखेर १५ प्रकरणे निकाली काढलेली आहेत. त्यामध्ये वसूल झालेली रकम रुपये १,५६,५५५ व समायोजन झालेली रकम रुपये ६,८८,६५० अशी एकूण रकम रुपये ८,४५,२०५ ची वसुली व समायोजन झाले आहे. उर्वरीत ११ प्रकरणांमध्ये रुपये १७,४४,२८१ रकम गुंतलेली असून १ प्रकरण दुबार नोंदले असल्याने त्यांची रकम रुपये ३,३४,०८३ कमी केली असता शिल्लक

रुपये १४,१०,१९८ आहेत. त्यापैकी ४ प्रकरणाची रकम रुपये २,८३,९२७ इतकी वसूल झाली आहे. शिल्लक रुपये ११,२६,२७१ ची वसुली व समायोजन करणेची कार्यवाही सुरू आहे. यामध्ये गुंतलेल्या ग्रामसेवकांपैकी ६ प्रकरणातील तत्कालिन संबधित २ ग्रामसेवक व त्यांचे वारस पत्नी मयत आहेत त्यांची वसुली होऊ शकत नाही. त्यामुळे क्षमापनाचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. याप्रकरणी जबाबदार असणा-या सर्व संबंधितांवर प्रशासकीय कारवाई करणेची कार्यवाही या कार्यालयाकडून करणेत येत आहे.

**पंचायत समिती चिपळूण (परि. क्र.४.४४२(४)/१९) :—**

पंचायत समिती, चिपळूणकडे सन २०१२-१३ मध्ये एकूण ३२ अपहार/अफरातफरीची प्रकरणे होती पैकी २८ प्रकरणे निकाली निघालेली असून प्रलंबित ४ प्रकरणांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

(१) ग्रामपंचायत कोसबी ज.रो.यो.व जवाहर ग्राम समृध्दी योजनेंतर्गत एकूण रूपये ३९,७१० चा अपहार असून त्यापैकी रुपये २५०० वसुली झालेली आहे. तत्कालिन ग्रामसेवक, श्री.ए.डी. मालगुंडकर व त्यांची पत्नी देखील मयत असल्याने उर्वरित रक्कम रुपये ३७,२१० वसुली झालेली नाही. सदरची रक्कम क्षमापित करणेबाबतची कार्यवाही सुरू आहे.

(२) ग्रामपंचायत मार्गताम्हाणे येथे ग्रामनिधीतील रक्कम रुपये ३००० वसूल झालेली आहे. सदर ग्रामसेवक, श्री.सी.जे.जांभवडेकर हे मयत झालेले असल्याने उर्वरित रक्कम रुपये १,६०,१४८ त्यांचे मूळ गाव कुडाळ, जिल्हा सिंधुदूर्ग येथून कुटुंब निवृत्ती वेतनातून वसुलीची कार्यवाही सुरू आहे.

(३) ग्रामपंचायत टेरव येथे ग्रामनिधी/जरोयो अंतर्गत रक्कम रुपये १५,७७,३९६ अपहारित असून पैकी रक्कम रूपये १३,२०,३२० वसूल असून सदर ग्रामपंचायतीची चौकशी होवून तत्कालिन ग्रामविकास अधिकारी, श्री.बी.आर नलावडे यांचेविरुध्द गुन्हा दाखल करणेत आलेला असून चिपळूण न्यायालयात केस क्र.७०००३०/२०१२ सुरू आहे.

(४) ग्रामपंचायत खेरशेत येथे संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत अपहारीत रक्कम रुपये ५०,५०० बाबत चौकशी होऊन तत्कालीन ग्रामसेवक, श्री.आर.जी.डोंगरे यांचे विरूद्ध गुन्हा दाखल करणेत आलेला असून चिपळूण न्यायालयात केस क्र. ७०००८२/२०१२ सुरू आहे.

**पंचायत समिती संगमेश्वर (परि. क्र. ४.४४२(४)/१५) :—**

पंचायत समिती, संगमेश्वर गटाकडे सन २०१२-१३ अखेर अपहाराची एकूण १० प्रकरणे प्रलंबित होती. त्यापैकी ७ प्रकरणे निकाली निघाली असून ३ प्रकरणे प्रलंबित आहेत. प्रलंबित प्रकरणांची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे.

(१) ग्रामपंचायत कोंडकदमराव- तत्कालिन ग्रामसेवक, श्री.बी.आर.नलावडे हे सद्य:स्थितीत निलंबित असून अपहार प्रकरणांची पूर्तता न केल्यामुळे संबंधित जबाबदार असणा-यांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यासाठी श्री.शंकर पांडुरंग घुले, विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, संगमेश्वर यांना आदेश क्र.पंसस/ग्रापं.४/३४२४/१८ दिनांक १७ मार्च, २०१८ अन्वये प्राधिकृत करण्यात आले आहे. सोबत आदेशाची प्रत जोडण्यात आली आहे. संबंधित जबाबदार असणा-यांवर फौजदारी गुन्हा दाखल करणेसाठी पोलीस निरिक्षक, पोलीस ठाणे, देवरुख यांचेशी समक्ष चर्चा केली असता मूळ अभिलेखे नसलेमुळे गुन्हा दाखल करता येणार नसल्याचे त्यांनी सांगितले आहे.

(२) ग्रामपंचायत खडीकोळवण - तत्कालिन ग्रामसेवक, श्री.एम.जी.सुर्यवंशी हे सद्य:स्थितीत बडतर्फ असून अपहार प्रकरणांची पुर्तता न केल्यामुळे संबंधित जबाबदार असणा-यांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यासाठी श्री.शंकर पांडुरंग घुले, विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, संगमेश्वर यांना आदेश क्र.पंसस/ग्रापं.४/३४२३/१८ दिनांक १७ मार्च, २०१८ अन्वये प्राधिकृत करण्यात आले आहे. सोबत आदेशाची प्रत जोडण्यात आली आहे. संबंधित जबाबदार असणा-यांवर फौजदारी गुन्हा दाखल करणेसाठी पोलीस निरिक्षक, पोलीस ठाणे देवरुख यांचेशी समक्ष चर्चा केली असता मूळ अभिलेखे नसलेमुळे गुन्हा दाखल करता येणार नसल्याचे त्यांनी सांगितले आहे.

(३) ग्रामपंचायत देवडे - तत्कालिन ग्रामसेवक, श्री.जी.डी.मुरकर हे सेवानिवृत्त झालेले असून आदेश क्र.पंसस/ग्रापं.४/२२५३/१८दि.२०.३.२०१८ अन्वये कायम अपहारीत रक्कम रुपये ५३,२०२ मात्र वसुलीपैकी आजअखेर रक्कम रुपये ३४,४५२ वसुली झालेली आहे. रोजकिर्दीची प्रत यासोबत सादर करण्यात येत आहे.

**पंचायत समिती मंडणगड (परि. क्र.४.४४२(४)/२७) :—**

पंचायत समिती, मंडणगडकडील झालेल्या इतर नियमबाहय बाबी व अफरातफरीच्या प्रकरणासंदर्भात ग्रामपंचायत पातळीवर चौकशी करणेत आलेली आहे. त्यामध्ये एकूण गुंतलेली रक्कम ३४,३९,०८३ होती. सदर १९ प्रकरणांची पूर्तता झालेली आहे. चौकशीअंती गुंतलेल्या व्यक्ती ११ असून त्यापैकी ३ कर्मचारी सेवानिवृत्त झाले असून ३ कर्मचारी मयत झालेले आहेत. ५ कर्मचा-यांची वेतनवाढ रोखणेत आलेली आहे. असे एकूण ११ कर्मचा-यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करणेत आलेली आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**(१) ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :—** (वित्त-९) जिल्हा परिषद स्तरावरुन या प्रकरणी कार्यवाही करणेत येत आहे.

**(२) ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :—** (वित्त-९) जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी विभाग सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने रत्नागिरी जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ जुलै, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, २२ प्रलंबित प्रकरणांमधील ५ प्रकरणे निकाली काढलेले आहेत. अंशतः निकाली काढणे म्हणजे काय ?

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, यामध्ये एकूण १३७ प्रकरणे होती. २२ प्रकरणे प्रलंबित होती. ०९ प्रकरणे निकाली लागून रुपये १० लाख रक्कम वसूल झालेली आहेत. ११, १२ व १३ हे मुद्दे सारखे आहेत. ७ प्रकरणांमध्ये क्षमापन प्रस्ताव आहेत. ग्रामसेवक दाम्पत्य मयत झालेली आहेत. सेवानिवृत्त झाल्यानंतर काही प्रकरणे आपल्या समोर झालेली आहेत. सेवानिवृत्तीनंतर ते मयत झाले व कुटुंब निवृत्ती पेन्शनमधून क्षमापनाचे प्रस्ताव पाठविण्यात आलेले आहेत. एक दुबार प्रकरण होते. आता केवळ तीन प्रकरणे शिल्लक आहेत, त्यामधून ३,८७,००० वसुली आहे. त्यापैकी एक एफआयआरचे प्रकरण आहे. फौजदारी गुन्हे असल्यामुळे अंतिम कार्यवाही थांबलेली आहे. एक कर्मचारी आपला बडतर्फ केलेला आहे. एक कुटुंब निवृत्ती पेन्शनमधून कपात सुरू करण्यात आलेली आहे.

यावर समितीने ही प्रकरणे निकाली काढण्याचे निदेश दिले.

**अभिप्राय व शिफारशी**

सन २०१२-२०१३ या वर्षामध्ये रत्नागिरी जिल्हा परिषदेअंतर्गत दापोली, खेड, चिपळूण, संगमेश्वर (देवरुख) व मंडणगड या पंचायत समित्यांमध्ये अपहार व अफरातफरीच्या प्रकरणांमध्ये एकूण रुपये १००,०९,२६७ एवढी रक्कम आहे. दापोली पंचातय समिती अंतर्गत ग्रामपंचायतीकडील २० अपहार प्रकरणांपैकी १८ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून २ प्रकरणांमध्ये रुपये ५६,२०९ एवढी रक्कम वसुल करणे बाकी आहे. त्यापैकी १५ प्रकरणे निकाली काढलेली असून उर्वरित ११ प्रकरणांमध्ये रुपये १७,४४,२८१ एवढी रक्कम गुंतलेली असून १ प्रकरण दुबार नोंदले असल्याने प्रकरणाची रक्कम रुपये ३,३४,०८३ एवढी रक्कम केली असता शिल्लक रक्कम रुपये १४,१०,१९८ एवढी आहे तसेच ४ प्रकरणाची रक्कम रुपये २,८३,९२७ इतकी वसूल झाली असून शिल्लक रुपये ११,२६,२७१ एवढ्या रकमेची वसुली व समायोजन करण्याची कार्यवाही सुरू आहे. यामधील ६ प्रकरणातील तत्कालिन २ ग्रामसेवकांवर कार्यवाही सुरू आहे. यामधील ६ प्रकरणातील तत्कालिन २ ग्रामसेवक व त्यांचे वारस पत्नी मयत आहे त्यांची वसुली होऊ शकत नसल्याने क्षमापनाचा प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे.

पंचायत समिती चिपळूणकडे एकूण ३२ अपहार/अफरातफरीची प्रकरणे होती. पैकी २८ प्रकरणे निकाली काढणेत आली असून प्रलंबित ४ प्रकरणांपैकी १ प्रकरणाची रक्कम रुपये ३७,२१० वसुली झालेली नाही. तत्कालीन ग्रामसेवक व त्यांची पत्नी देखील मयत असल्याने सदर रक्कम क्षमापित करण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे. उर्वरित ३ प्रकरणांमधील रक्कम रुपये १५,३०,९६८ वसुल करण्यासाठी कार्यवाही सुरू आहे. पंचायत समिती, संगमेश्वरकडे एकूण १० अपहार/अफरातफरीची प्रकरणे होती. पैकी ७ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून ३ प्रलंबित प्रकरणांपैकी एका प्रकरणामधील रुपये ५३,२०२ या अपहारीत रकमेपैकी रुपये ३४,४५२ वसूल झालेली असून उर्वरित रक्कम रुपये १८,७५० एवढी वसुली बाकी आहे. उर्वरित दोन प्रकरणामधील मुळ अभिलेखे नसलेमुळे गुन्हा दाखल करता येणार नसल्याचे नमूद केले आहे. पंचायत समिती, मंडणगडकडे एकूण १९ प्रकरणांची पूर्तता झालेली आहे. त्यामध्ये गुंतलेली रक्कम रुपये ३४,३९,०८३ एवढी होती. याप्रकरणी ११ कर्मचा-यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात आलेली आहे. अशाप्रकारे दापोली, खेड, चिपळूण, संगमेश्वर (देवरुख) व मंडणगड या पाच पंचायत समित्यांमध्ये एकूण १३७ प्रकरणे होती. त्यामधील २२ प्रकरणे प्रलंबित होती, त्यामधील ९ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून रुपये १० लक्ष एवढी रक्कम वसूल झालेली आहे. तसेच ७ प्रकरणांमध्ये क्षमापनाचा प्रस्ताव सादर केलेला आहे. काही प्रकरणांमध्ये ग्रामसेवक दाम्पत्य मयत झालेली आहेत. एक प्रकरण दुबार होते त्यामुळे सध्या केवळ तीन प्रकरणे शिल्लक आहेत, त्यामधून रुपये ३,८७,००० एवढ्या रकमेची वसुली बाकी आहे. त्यापैकी एक एफआयआरचे प्रकरण आहे. फौजदारी गुन्हे असल्यामुळे अंतिम कार्यवाही थांबलेली आहे. एक कर्मचारी बडतर्फ केलेला असून एक कुटुंब निवृत्ती पेन्शनमधून कपात सुरू करण्यात आलेली आहे. याबाबत समिती समाधान व्यक्त करीत आहे. तथापि, **उर्वरित तीन प्रकरणांमधील वसुली लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावी व फौजदारी गुन्हे असलेल्या प्रकरणाची कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी पाठपुरावा करण्यात यावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दोन महिन्याच्या आत सादर करण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण आठ

## जिल्हा परिषद, रत्नागिरी

### कशेडी, दरेकरवाडी, गवाणवाडी, पवारवाडी ते कोंडवाडी २/२०० मोरी दुरुस्तीतील अनियमितता

**परिच्छेद क्रमांक ४.१२१/४ (सन २०१२-१३)**

प्रमाणक क्रमांक ११ दिनांक ३० मार्च, २०१३ रक्कम रुपये १,००,००० याबाबत खालीलप्रमाणे आहेत :—

(१) महाराष्ट्र शासन, उद्योग व ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.भाखस १०९४/२६७९/उद्योग ०६, दिनांक ३० मार्च, १९९४ मधील तरतुदीनुसार तसेच प्रसिध्द केलेल्या जाहीरातीतील निविदेच्या अटी व शर्ती प्रमाणे २ लिफाफा निविदा पद्धतीप्रमाणे निविदाकाराने कागदपत्रे सादर केलेली नसताना निविदा कशाच्या आधारे मंजूर केली ? याबाबत खुलासा करणे आवश्यक आहे.

(२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ परिच्छेद क्र.१४३ (२) अन्वये अंदाजपत्रकीय रक्कमेच्या २ टक्के अनामत रक्कम रुपये २००० व १ टक्का इसारा रक्कम रुपये १००० अशी एकूण रक्कम रुपये ३००० वसुल करणे आवश्यक आहे.

(३) शासन निर्णय क्रमांक निवर-२०००/प्र.क्र.८३७/४५ दिनांक ८ मे, २००२ अन्वये कामावर नियुक्ती केलेल्या कामगारांचा विमा कामास सुरूवात करण्यापूर्वी उतरविणे आवश्यक असताना तसे न करता विम्याची रक्कम देयकातून कपात केलेली आहे.

(४) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्र.व्ही.पी.एस/१०९९/प्र.शा.९९, दिनांक ५ ऑक्टोबर, १९९७ अन्वये कामाच्या ठिकाणी ५ X ४ आकाराचा लोखंडी नामफलक न लावल्याने रक्कम रुपये २००० वसुल करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

(१) महाराष्ट्र शासन, उद्योग व ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.भाखस १०९४/२६७९/उद्योग ०६, दिनांक ३० मार्च, १९९४ मधील तरतुदीनुसार तसेच प्रसिध्द केलेल्या जाहीरातीतील निविदेच्या अटी व शर्ती प्रमाणे २ लिफाफे निविदा पध्दतीप्रमाणे निविदाकाराने कागदपत्र सादर केल्यामुळेच निविदा मंजूर करणेत आली असून सदर कामाची नस्ती यासोबत आहे.

(२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ परिच्छेद क्र.१४३ (२) अन्वये अंदाजपत्रकीय रक्कमेच्या २ टक्के अनामत रक्कम रुपये २००० मात्र ही प्रमाणक क्र.११ दिनांक ३० मार्च, २०१३ ने वसुल करणेत आली असून इसारा रक्कम रुपये १००० वसुल करण्यात आली आहे.

(३) शासन निर्णय क्रमांक निवर-२०००/प्र.क्र.८३७/४५ दिनांक ८ मे, २००२ अन्वये कामावर नियुक्ती केलेल्या कामगारांचा विमा कामास सुरूवात करण्यापूर्वी उतरविणे आवश्यक होते, परंतू त्यावेळी न घेतल्याने सदर विम्याची रक्कम प्रमाणक क्र.११ दिनांक ३० मार्च, २०१३ ने वसुल करून भरणा केली आहे.

(४) सदर कामाच्या ठिकाणी ५ X ४ आकाराचा लोखंडी नामफलक लावणेत आलेला आहे. फोटो नस्तीसोबत जोडण्यात आला आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

रत्नागिरी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २६ एप्रिल, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने खेड- कशेडी, दरेकरवाडी, गवाणवाडी, पवारवाडी ते कोंडवाडी २/२०० मोरी दुरुस्तीतील अनियमितता या परच्छिेदाच्या अनुषंगाने सचिवांची साक्ष घेण्यात येईल असे निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली :—**

कशेडी दरेकरवाडी गवाणवाडी पवारवाडी ते कोंडवाडी २/२०० मोरी दुरुस्तीतील अनियमिततेप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांची जबाबदारी निश्चित करून कोणती कारवाई करण्यात आली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

कशेडी, दरेकरवाडी, गवाणवाडी, पवारवाडी ते कोंडवाडी २/२०० मोरी दुरुस्तीतील अनियमिततेबाबत चौकशी करण्यात आली आहे.

रक्कम रुपये १,००,००० च्या कामाचे कार्यारंभ आदेश देताना संबंधित मक्तेदाराकडून अनामत रक्कम रुपये १००० भरणा करून न घेता मक्तेदाराला कार्यारंभ आदेश दिले गेले आहेत. सदर झालेल्या चुकीच्या कार्यवाहीबाबत संबंधित मक्तेदाराकडून अनामत रक्कम रुपये १०००, दिनांक ४ एप्रिल, २०१८ अन्वये भरणा करून घेण्यात आली आहे. तथापि, समितीने आदेश दिल्याप्रमाणे अनामत रक्कम न भरता कार्यारंभ आदेश देण्यात आलेल्या अनियमिततेबाबत संबंधित तत्कालिन कनिष्ठ सहाय्यक, श्री.एस.के.मेस्त्री यांना दिनांक २१ डिसेंबर, २०१८ च्या पत्रान्वये ताकीद देण्यात आली आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :—** (बांधकाम-३) जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी सहमत.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने रत्नागिरी जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ४ जून, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, कशेडी, दरेकरवाडी, गवाणवाडी, पवारवाडी ते कोंडवाडी मोरी दुरुस्तीतील अनियमिततेबाबत चौकशी करण्यात आलेली आहे काय आणि त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आलेली आहे, याची माहिती समितीला देण्यात यावी.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, खेड-कशेडी, दरेकरवाडी, गवाणवाडी, पवारवाडी ते कोंडवाडी या रस्त्याचे काम १३ व्या वित्त आयोगाच्या निधीमधून करण्यात आलेले होते. सदरहू काम हे पंचायत समितीकडून करण्यात येणार होते. सदरहू कामाची अंदाजपत्रकीय रक्कम १ लाख रुपये होती. लेखा परिक्षण अहवालामध्ये तीन विषय उपस्थित करण्यात आलेले होते. पहिला विषय असा होता की, संबंधित व्यक्तीने ३००० रुपयांची इसारा रक्कम भरलेली नव्हती. परंतु आता सदरहू रक्कम वसूल करण्यात आलेली आहे.

यावर समितीने विचारणा केली की, सदरहू विषय अतिशय गंभीर आहे. सुरक्षा अनामत रक्कम न भरता कार्यादेश निर्गमित केलेला आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, अनामत रक्कम न भरता कार्यारंभ आदेश दिल्याबद्दल संबंधितास सक्त ताकीद देण्यात आलेली आहे. यावर समितीने पुढे विचारणा केली की, सदरहू कर्मचारी प्रशासकीय नियमानुसार कोणत्या शिक्षेस पात्र होता, अनामत रक्कम जमा झालेली आहे किंवा नाही, याची खात्री न करता कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, खातेप्रमुख साप्ताहिक आणि आढावा बैठक घेत नाहीत. जर अशा प्रकारच्या बैठका घेऊन सर्व विभागाचा आढावा घेतला असता तर असे प्रकार उद्‌भवले नसते. या सर्वांवर लक्ष ठेवण्याची जबाबदारी ही मुख्य कार्यकारी अधिकारी यांची आहे. केवळ ताकीद देऊन चालणार नाही. यामध्ये जे अधिकारी, कर्मचारी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करून त्याबाबतचा अहवाल समितीला देण्यात यावा.

यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग) यांनी खुलासा केला की, याबाबत पुन्हा चौकशी करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच यामध्ये कोण जबाबदार आहे. याची विभागीय चौकशी करण्यात यावी. अशा प्रकारचे आदेश देण्यात आलेले आहेत.

**अभिप्राय व शिफारशी**

कशेडी, दरेकरवाडी, गवाणवाडी, पवारवाडी ते कोंडवाडी २/२०० मोरी दुरुस्तीच्या रुपये १ लाखाच्या कामामध्ये पुढीलप्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. जाहिरातीतील निविदेच्या अटी व शर्ती प्रमाणे २ लिफाफा निविदा पध्दतीप्रमाणे निविदाकाराने कागदपत्रे सादर केलेली नसताना निविदा कोणत्या आधारे मंजूर करण्यात आली. अंदाजपत्रकीय रकमेच्या २ टक्के अनामत रक्कम रुपये २००० व १ टक्का इसारा रक्कम रुपये १००० वसुल करणे आवश्यक आहे. उपरोक्त कामावर नियुक्त केलेल्या कामगारांचा विमा कामास सुरूवात करण्यापूर्वी उतरविणे आवश्यक असताना तसे न करता विम्याची रक्कम देयकातून कपात केलेली आहे. कामाच्या ठिकाणी ५ × ४ आकाराचा लोखंडी नामफलक न लावल्याने रक्कम रुपये २००० वसुल करणे आवश्यक आहे.

उपरोक्त लेखा आक्षेपाच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने साक्ष घेतली असता समितीच्या निदर्शनास आले की, **कशेडी, दरेकरवाडी, गवाणवाडी, पवारवाडी ते कोंडवाडी २/२०० मोरी दुरुस्तीकरीता रुपये १ लाख रकमेच्या कामाचे कार्यारंभ आदेश देताना संबंधित मक्तेदाराकडून अनामत रक्कम रुपये १००० भरणा करून न घेता मक्तेदाराला कार्यारंभ आदेश दिले गेले आहेत. सदर झालेल्या चुकीच्या कार्यवाहीबाबत संबंधित मक्तेदाराकडून अनामत रक्कम रुपये १००० दिनांक ४ एप्रिल, २०१८ अन्वये भरणा करून घेण्यात आली आहे. तथापि, अनामत रक्कम न भरता कार्यारंभ आदेश देण्यात आल्याप्रकरणी तत्कालिन संबंधित कनिष्ठ सहाय्यक श्री.एस.के.मेस्त्री यांना दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ रोजीच्या पत्रान्वये ताकीद देण्यात आली आहे. तथापि, समितीच्या मते याबाबत पुन्हा चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.**

प्रकरण नऊ

## जिल्हा परिषद, रत्नागिरी

**साखरी भागडेवाडी, बाणकोट किल्लावाडी, गोठे, तिडे (ता. मंडणगड) येथे अंगणवाडी इमारत बांधकाम करणेबाबत**

परिच्छेद क्रमांक ४.१२२/१४ (सन २०१२-१३)

**नाबार्ड बँक अर्थसहाय योजना या लेखाशीर्षातून साखरी भागडेवाडी येथे अंगणवाडी इमारत बांधकाम करणे.**

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :–

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ मधील परिच्छेद क्र.१४३ (१) नुसार कामाची मूळ मुदत संपण्यापूर्वी १५ दिवस अगोदर मुदतवाढीसाठी अर्ज करणे आवश्यक असताना मक्तेदाराने अर्ज केला नाही. मुदतवाढीस सक्षम अधिका-यांची मंजूरी घेतली नाही. बी-१ निविदा शर्त खंड २ नुसार देयकातून १ टक्के दंडाची रक्कम कपात करणे आवश्यक असताना कपात न करता देयक पारित केले. दंडाची रक्कम रुपये ३,५०० वसुल करणे आवश्यक आहे.

(२) देयक मोजमाप नोंदवही तपासता रक्कम रुपये ६०० एवढे गौण खनिज शुल्क कपात करणे आवश्यक असताना रक्कम रुपये ३०० कमी कपात केलेली आहे.

(३) आयकर अधिनियम १९६१ चे कलम १९४ क नुसार २.३० टक्के आयकराची रक्कम रुपये ७,६६७ देयकातून कपात करणे आवश्यक आहे.

(४) विक्रीकर विभागाकडील अधिसूचना दिनांक ४ एप्रिल, २०१२ च्या अनुसूचीतील अनुक्रमांक १ मध्ये स्तंभ ३ नुसार अनोंदणीकृत कंत्राटदाराच्या देयकातून ४ टक्के ऐवजी ५ टक्के विक्रीकर कपात करावी असे नमूद केले आहे. परंतू सदर देयकाची तपासणी केली असता कामावर झालेला एकूण खर्च रुपये ३,३३,३६५ या रक्कमेपैकी एप्रिल, २०१२ पूर्वी या कामावर रक्कम रुपये ६४,७३४ एवढा खर्च आला असल्याने या रक्कमेवर ४ टक्के विक्रीकर रक्कम रुपये २,५८९ उर्वरित रक्कम रुपये २,६८,६३१ चे ५ टक्के रक्कम रुपये १३,४३२ अशी एकूण रक्कम रुपये १६,०२१ विक्रीकर कपात करणे आवश्यक आहे.

(५) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक संकीर्ण २००८/प्र.क्र.१२३ परा-७, दिनांक ३० ऑक्टोबर, २००९ अन्वये कामगार उपकराची १ टक्का रक्कम कामाच्या देयकातून कपात केली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

(१) सदर कामाला मक्तेदार यांनी मुदतवाढ घेतली नसल्याने मुतदवाढी करीता १ टक्का प्रमाणे कामाचे देयक प्रमाणक क्रमांक १२, दिनांक २२ मार्च, २०१३ नुसार रक्कम रुपये ३,३०० वसुल करणेत आली आहे व चलनाने रुपये २०० घेणेत आली असून एकत्रित रक्कम रुपये ३५०० वसुल झालेली आहे.

(२) कामाची गौणखनिजाची उर्वरित रक्कम रुपये ३०० मक्तेदार यांचेकडून वसुल करणेत आली आहे.

(३) सदर कामाची देयक आयकर रक्कम रुपये ७,६६७ पैकी कामाच्या देयकातून प्रमाणक क्रमांक १०/९ जानेवारी, २०१२ नुसार रुपये १४८९ वसुल करणेत आली आहे. उर्वरित रक्कम रुपये ६१७८ मक्तेदार यांच्याकडून वसुल करणेत आली आहे.

(४) कामाचे करीता विक्रीकर रक्कम रुपये १६,०२१ वसुल करणे आवश्यक आहे. सदर कामावर कामाच्या देयकातून प्रमाणक क्रमांक १०/९ जानेवारी, २०१२ नुसार रक्कम रुपये १२९५ वसुल करणेत आली असून उर्वरित रक्कम रुपये १४७२६ वसुल करणेत आली आहे.

(५) शासन परिपत्रकानुसार कामापोटी कामगार उपकराची १ टक्का रक्कम मक्तेदार यांचेकडून वसुल करणेत आली आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.१२३/१५ (सन २०१२-१३)**

पंचायत समितीने सन २०१२-१३ या वर्षात नाबार्ड बँक अर्थसहाय योजना या लेखाशीर्षातून बाणकोट किल्लावाडी इमारत बांधकामावर रक्कम रुपये ३,३३,३६५ इतका खर्च करणेत आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :—

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ मधील परिच्छेद क्र.१४३ (१) नुसार कामाची मूळ मुदत संपण्यापूर्वी १५ दिवस अगोदर मुदतवाढीसाठी अर्ज करणे आवश्यक असताना कामाची मुदत दिनांक १४ एप्रिल, २०११ पर्यत होती. परंतू काम दिनांक १० डिसेंबर, २०१२ रोजी पूर्ण झाले आहे. जवळजवळ २० महिने विलंब झाल्याचे दिसून येते. बी-१ निविदा अट

शर्त क्रमांक २ नुसार कामाच्या रक्कमेतून १ टक्का किंवा १० टक्के एवढी रक्कम दंड म्हणून कपात करणे आवश्यक आहे. देयकातून १ टक्के रक्कम रुपये ३,५०० सक्षम प्राधिका-यांची मंजूरी न घेता कपात केलेली आहे.

(२) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक संकिर्ण- २००८/ प्र.क्र/ १२३/पंरा-७, दिनांक ३० ऑक्टोबर, २००९ अन्वये बांधकाम कामगार कल्याण उपकराची १ टक्का रक्कम देयकातून कपात करणे आवश्यक असताना कपात केलेली नाही. रक्कम रुपये ३,५०० वसुल करणे आवश्यक आहे.

(३) आयकर अधिनियम १९६१ चे कलम १९४ क नुसार देयकातून २.३० टक्के आयकर वसुल केलेला नाही. आयकर रक्कम रुपये ७,६६७ वसुल करणे आवश्यक आहे.

(४) महाराष्ट्र शासन, महसुल व वनविभाग, अधिसूचना क्रमांक गौणखनिज १०/२००१/प्र.क्र.२४/ २९ (३), दिनांक १५ जानेवारी, २००३ व गौणखनिज १०/२००६ दिनांक १५ डिसेंबर, २००६ नुसार देयकातून गौणखनिज रक्कम कपात केलेली नाही. कामावर वापरलेले गौणखनिजाची रक्कम परिगणीत करून संबंधिताकडून वसुल करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

(१) सक्षम अधिका-याची मुदतवाढ आदेशाची प्रत घेणेत आली आहे.

(२) शासन निर्णयानुसार बांधकाम कामगार कल्याण उपकराची १ टक्का रक्कम मक्तेदार यांच्याकडुन वसुल करणेत आली आहे.

(३) सदर कामाचे देयक प्रमाणक क्रमांक २९/३१ मार्च, २०११ मधून आयकर रक्कम रुपये ९९० वसूल करणेत आली आहे. उर्वरित रक्कम रुपये ६१७८ ची वसुली मक्तेदार यांचेकडून घेणेत आली आहे

(४) सदर कामाचे गौणखनिजाची रक्कम रुपये ६०० मक्तेदार यांचेकडून वसूल करणेत आली आहे.

परिच्छेद क्रमांक ४.१२४/१६ (सन २०१२-१३)

**गोठे अंगणवाडी इमारत बांधणे :—**

पंचायत समिती सन २०१२-१३ या वर्षात जिल्हा वार्षिक योजना या लेखाशीर्षाखाली गोठे अंगणवाडी इमारत बांधकामावर रक्कम रुपये ३,३३,३७४ एवढा खर्च करणेत आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :—

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ मधील परिच्छेद क्र.१४३(१) नुसार कामाची मूळ मुदत संपण्यापूर्वी १५ दिवस अगोदर मुदतवाढीचा अर्ज करणे आवश्यक असताना व कामाला १५ महिने विलंब झाला असताना कामाला मुदतवाढ मिळणेबाबतचा अर्ज केलेला नाही. सक्षम प्राधिका-याची मुदतवाढीसाठी मंजूरी नसल्याने बी-१ निविदा अट शर्त क्रमांक २ नुसार कमीत कमी १ टक्का व जास्तीत जास्त १० टक्के दंड आकारणे आवश्यक होते, परंतू दंडाची रक्कम कपात न करता देयक प्रदान केले आहे. दंडाची १ टक्के रुपये ३,५०० वसुल करणे आवश्यक आहे.

(२) आयकर अधिनियम, १९६१ चे कलम १९४ क नुसार २.३० टक्के रक्कम रुपये ७,६६८ देयकातून कपात करणे आवश्यक आहे.

(३) महाराष्ट्र शासन, विक्रीकर विभागाची अधिसूचना दिनांक ४ एप्रिल, २०१२ च्या अनुसूची १ मध्ये स्तंभ ३ नुसार अनोंदणीकृत कंत्राटदाराच्या देयकातून दिनांक १ एप्रिल, २०१२ पासून ४ टक्के ऐवजी ५ टक्के रक्कम कपात करणे आवश्यक असताना देयकातून विक्रीकर कपात केले नाही. मक्तेदारास एकूण प्रदान केलेली रक्कम रुपये ३,३३,३७४ या रक्कमेपैकी रुपये ७८,०८७ माहे एप्रिल २०१२ पूर्वी अदा केली असल्याने या रक्कमेवर ४ टक्के विक्रीकर रुपये ३,१२३ व उर्वरित रक्कम रुपये २,५५,२७८ चे ५ टक्के उर्वरित रुपये १२,७६४ अशी एकूण विक्रीकर रक्कम रुपये १५,८८७ वसुल करणे आवश्यक आहे.

(४) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ नियम ८७ नुसार कामावर वापरलेले वाळु, खडी मेटल यांची गुणवत्ता चाचणी अहवाल प्रयोगशाळेकडुन प्राप्त करून त्यानंतरच पूर्ण देयकाचे प्रदान करणे आवश्यक आहे. चाचणी अहवाल प्राप्त असताना संपूर्ण देयक अदा केले आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

(१) सदर कामाला मक्तेदार यांनी मुदतवाढ घेतली नसल्याने मुदतवाढीकरिता १ टक्का प्रमाणे रक्कम रुपये ३,५०० वसुल करणेत आली आहे. तसेच मुदतवाढ आदेशाची सक्षम अधिका-याची मंजूरीची प्रत जोडणेत आलेली आहे.

(२) सदर कामाचे देयक प्रमाणक क्रमांक १०/७ ऑक्टोबर, २०११ मधून आयकर रक्कम रुपये १७९६ वसुल करणेत आली आहे. उर्वरित रक्कम रुपये ५८७२ मक्तेदार यांचेकडुन वसुल करणेत आली आहे.

(३) सदर कामाचे देयक प्रमाणक क्रमांक १०/७ ऑक्टोबर, २०११ मधून विक्रीकर रक्कम रुपये १५६२ वसूल करणेत आली आहे. उर्वरित रक्कम रुपये १४,३२५ मक्तेदार यांचेकडुन वसूल करणेत आली आहे.

(४) सदर कामाचे वाळू, खडी मेटल यांचे गुणवत्ता चाचणी अहवाल कामाचे पंजिकेमध्ये जोडणेत आले आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.१२५/१८ (सन २०१२-१३)**

**तिडे येथे अंगणवाडी बांधकाम करणे :—**

पंचायत समितीने २०१२-१३ या वर्षात जिल्हा वार्षिक योजना या लेखाशीर्षातून तिडे येथे अंगणवाडी बांधकामावर रक्कम रुपये ३,३३,३६४ इतका खर्च करणेत आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :—

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ मधील परिच्छेद क्र.१४३ (१) नुसार कामाची मूळ मुदत संपण्यापूर्वी १५ दिवस अगोदर मुदतवाढीसाठी अर्ज करणे आवश्यक असताना मक्तेदारांनी मुदतवाढीचा अर्ज केला नाही. तसेच सक्षम प्राधिका-याची मंजूरी घेतलेली नाही. त्यामुळे निविदा खंड २ नुसार ठेकेदाराकडून कमीत कमी १ टक्के दंडाची रक्कम रुपये ३,५०० कपात करणे आवश्यक होते.

(२) आयकर अधिनियम १९६१ चे कलम १९४ (क) नुसार २.३० टक्के आयकराची रक्कम रुपये ७,६६७ देयकातून कपात केलेली नाही.

(३) देयकातून १ टक्के बांधकाम कामगार कल्याण उपकारांची रक्कम ३,५०० कपात करणे आवश्यक आहे.

(४) उप अभियंता यांनी मोजमाप नोंदवहीमधील मापाची ५ टक्के तपासणी केलेली आहे. मात्र त्यावर दिनांक नमूद नाही.

(५) कामावर वापरलेले सिमेंट, वाळू, खडी मेटल यांची गुणवत्ता चाचणी अहवाल सादर केलेला नाही.

(६) देयकातून विक्रीकराची ५ टक्के रक्कम रुपये १६,६६८ वसूल करणे आवश्यक आहे.

(७) कामाची बाब क्रमांक ०६-९०० मिली व्यासाचे पाईप वापरुन सेप्टीक टँकचे काम करणे आवश्यक असताना काम मात्र जांभा दगडाचे केलेले आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ नियम १५३ नुसार सदर बदलास कार्यकारी अभियंता यांची लेखासंहिता १५३ नुसार सक्षम प्राधिका-याची मंजुरी घेतली नाही.

(८) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्ही पी एन १०९९/ प्र.क्र.५४/०८, दिनांक २०१५/९९ व शासन निर्णय क्रमांक स्थाविका/ २००३/प्र.क्र./३६९/१४४५, दिनांक २८ नोव्हेंबर, २००३ नुसार कामाचे नामफलक बसविणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

(१) सदर कामाला मक्तेदार यांनी मुदतवाढ घेतली नसल्याने मुदतवाढीकरिता १ टक्का प्रमाणे रक्कम रुपये ३,५०० वसुल करणेत आली आहे. तसेच मुदतवाढ आदेशाची सक्षम अधिका-याची मंजुरीची प्रत जोडणेत आलेली आहे.

(२) सदर कामाचे देयक प्रमाणक क्रमांक २८/३१ मार्च, २०११ मधून आयकर रक्कम रुपये २१८३ वसुल करणेत आली आहे. उर्वरित रक्कम रुपये ५४८४ मक्तेदार यांचेकडून वसुल करणेत आली आहे.

(३) या कामाचे बांधकाम कामगार कल्याण उपकरांची रक्कम रुपये ३,५०० मक्तेदार यांचेकडून वसुल करणेत आली आहे.

(४) कामाची मापे उप अभियंता यांनी तपासणी केल्याचा दिनांक मापवहीमध्ये नमूद केले आहे. त्या मापवहीची छायांकित प्रत सोबत जोडणेत आली आहे.

(५) कामाकरिता वापरलेला सिमेंट, वाळू, खडी मेटलचे गुणवत्ता चाचणी अहवाल कामाचे पंजिकेमध्ये जोडणेत आला आहे.

(६) सदर कामाचे देयक प्रमाणक क्रमांक २८/३१ मार्च, २०११ मधून विक्रीकर रक्कम रुपये १८९८ वसूल करणे आली आहे. उर्वरित रक्कम रुपये १४,७७० मक्तेदार याचेकडून वसूल करणेत आली आहे.

(७) बाब क्र. ६ नुसार ९०० मिली व्यासाचे पाईप वापरुन सेप्टीक टॅकचे काम करणेचे होते, त्या ऐवजी थोड्या मोठ्या आकाराची जांभ्या दगडाची सेप्टीक टँकचे काम उपअभियंता यांचे सूचनेप्रमाणे मार्गदर्शनप्रमाणे करून घेणेत आले आहे. मात्र अंदाजपत्रक मंजूर रक्कमेला अधिन राहून काम करणेत आले आहे.

(८) सदर कामाचे नामफलक तयार करून कामाचे ठिकाणी लावणेत आला आहे. सदर नामफलकाचा फोटो कामाच्या पंजिकेमध्ये जोडणेत आला आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

रत्नागिरी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २६ एप्रिल, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, अनुक्रमांक ४२ नाबार्ड बँक अर्थसहाय्य योजना या लेखाशीर्षातून साखरी भागडेवाडी येथे अंगणवाडी इमारत बांधकाम करणे, अनुक्रमांक ४३ बाणकोट किल्लावाडी येथे अंगणवाडी इमारत बांधणे, अनुक्रमांक ४४ गोठे अंगणवाडी इमारत बांधणे, अनुक्रमांक ४५ तिडे येथे अंगणवाडी बांधकाम करणे (ता.मंडणगड) या अनुक्रमांक ४२ ते ४५ आक्षेपांमधील रक्कम वसूल करण्यात आलेली आहे काय ?

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, नाबार्ड बँक अर्थसहाय्य योजना या लेखाशीर्षातून साखरी भागडेवाडी येथे अंगणवाडी इमारत बांधकाम करणे संदर्भातील दिनांक १९ मार्च, २०१८ रोजी ३,५०० रुपये वसूल केलेले आहेत. यावर समितीने पुढे विचारणा केली की, गोठे अंगणवाडी इमारत बांधकामाचे कंत्राटदार कोण होते ? ग्रामपंचायत कंत्राटदार होते काय? सन २००८ मध्ये या संदर्भात सीएजीचा आक्षेप आला होता. ग्रामपंचायत जी कामे करते त्यातून विक्री कराची रक्कम कपात करणे योग्य नाही. अद्याप तो आक्षेप स्पष्ट झालेला नाही. जोपर्यंत या संदर्भातील आक्षेप स्पष्ट होत नाही तोपर्यंत कार्यवाही करू नये. ग्रामपंचायत जी कामे करते त्यातून विक्री कराची रक्कम कापून घेणे योग्य नाही. ग्रामपंचायतीकडे सीएसटी, बीएसटी क्रमांक नाही. मग त्यांच्या बिलातून विक्री कराची रक्कम का कपात करावयाची ? सन २००८ मधील सीएजीचा आक्षेप बघून घ्यावा.

यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी विदित केले की, विक्री कराची रक्कम वसूल करू नये असे त्यामध्ये म्हटले आहे. यावर समितीने विचारणा केली की, या संदर्भात आक्षेप घेतलेला आहे. विक्री कर कोणाकडून घेतो, ज्यांच्याकडे सीएसटी, बीएसटी क्रमांक आहे त्यांच्याकडून विक्री कराची रक्कम घेतली जाते. ग्रामपंचायतीकडे सीएसटी, बीएसटी क्रमांक नाही. यावर समितीने मत व्यक्त करून निदेश दिले की, ग्रामपंचायत नफा कमविणारी संस्था नाही, ती स्थानिक स्वराज्य संस्था आहे. ग्रामपंचायत एजन्सी म्हणून काम करते. ग्रामपंचायतीने सेवा दिलेली आहे. मग त्यांच्याकडून विक्री कराची रक्कम कशी काय घेतो, त्यामुळे या संदर्भात ग्राम विकास व वित्त विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली :—**

ग्रामपंचायतीकडे सीएसटी, बीएसटी क्रमांक नसताना देखील ग्रामपंचायतीकडून विक्रीकराची रक्कम कपात करण्यात आल्याप्रकरणी महालेखापरिक्षकांनी घेतलेल्या आक्षेपासंदर्भात ग्रामविकास विभाग व वित्त विभागाने कोणता निर्णय घेतला आहे.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली** :—

बाणकोट किल्लावाडी हे काम नाबार्ड बँक अर्थसहाय्य योजना व गोठे, तिडे अंगणवाडी इमारती ही बांधकामे जिल्हा वार्षिक योजनेतून घेणेत आली होती. बांधकाम देयकातून संबंधित ठेकेदाराकडून महाराष्ट्र शासन विक्रीकर विभागाची अधिसूचना दिनांक ४ एप्रिल, २०१२ च्या अनूसुची १ स्तंभ ३ नुसार अनोंदणीकृत कंत्राटदाराच्या देयकातून दिनांक १ एप्रिल, २०१२ पासून ४ टक्के ऐवजी ५ टक्के विक्रीकराची रक्कम वसुल करून भरणा करणेत आली आहे.

ग्रामविकास विभाग पत्र क्र. झेडपीए-२०१३/प्र.क्र.२७/वित्त-९ दिनांक १२ मे, २०१६ नुसार ग्रामपंचायतीच्या विकास कामाच्या देयकातून विक्रीकराची रक्कम कपातीसंदर्भात मार्गदर्शक सुचना दिलेल्या आहेत.

सदर पत्रान्वये दिलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार जर ग्रामपंचायत कार्यकंत्राट कामाकरीता आवश्यक असलेले साहित्य स्थानिक पुरवठादाराकडून खरेदी करून मजुराकरवी स्वतःच काम पूर्ण करून घेत असेल (डिपार्टमेंटल पद्धत) तर सदर व्यवहारामध्ये मुळ स्त्रोतातून कराची (टी.डी.एस) कपात करणे आवश्यक नाही. ग्रामपंचायतीने केलेली कोणतेही प्रकारची खरेदी ही करबिजक (Tax Invoice), विक्रीचे देयक (Sales Bill) व रोखीचे ज्ञाप (Cash Memo) इ. आधारे केलेली असल्यास देयकातून मूळ स्त्रोतातून कराची (टी.डी.एस) कपात करणे आवश्यक नाही.

तथापि, सदरची कामे ग्रामपंचायतीने स्वतः न करता पोट मक्तेदाराकरवी केले असल्यामुळे विक्रीकराची रक्कम वसुल करण्यात आलेली आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :—** (वित्त-९) जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी विभाग सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने रत्नागिरी जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ जुलै, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, बाणकोट

किल्लावाडी, ता. मंडणगड येथे अंगणवाडी इमारत बांधकाम करण्याबाबत मुद्दा आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांकडून विक्रीकराची रक्कम कापता येत नाही. या संबंधी स्थानिक स्वराज्य संस्था काम करतात. त्यांच्याकडे जीएसटी, बीएसटी क्रमांक नसतो. आतापर्यंत जेवढे ग्रामपंचायत व जिल्हा परिषदेने काम केले त्या कामाच्या बिलातून विक्री कराची रक्कम कपात केली. सीएजी यांनी आक्षेप घेतला होता. यासंबंधी आतापर्यंत शासनाने परिपत्रक का काढले नाही ?

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, दिनांक १२ मे, २०१६ रोजीच्या परिपत्रकान्वये शासनाने खुलासा केला होता. दोन पद्धतीने ग्रामपंचायती काम करू शकतात. स्वतः काम केले असेल तर विक्री कर कपात करायची नाही. पोट मक्तेदार नियुक्त केला असेल तर त्यातून कपात करावी. या ठिकाणी पोट-मक्तेदार नियुक्त केला असल्यामुळे विक्री कराची वसुली केली होती. यावर समितीने विचारणा केली की, या ठिकाणी ग्रामपंचायतीने कंत्राटदाराकडून रक्कम कपात करायची होती. जिल्हा परिषदेने ग्रामपंचायतीच्या देयकातून रक्कम कापायची नव्हती. दोन्ही ठिकाणी कपात झालेली आहे.

यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, एनआरएसमध्ये जिल्हा परिषदेने ग्रामपंचायतीला काम दिले तर कोणतीही कपात होत नाही. बिल केले जाते तेव्हा कपात होते. ग्रामपंचायतीला पैसे देताना त्यातून कपात होत नाही. मुद्या असा आहे की, कपात करण्यासाठी त्यांच्याकडे क्रमांक नव्हता. क्लास ऑफ एम्प्लॉयरमध्ये ते असल्यामुळे नंबर नसला तरी कपात करू शकतात. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, या ठिकाणी दोन वेळा कपात झाली नाही. जिल्हा परिषदेने कपात करण्याची गरज नव्हती. ग्रामपंचायतीनेच कपात करायला हवी होती. मात्र तरी देखील जिल्हा परिषदेने कपात केली आहे.

यावर समितीने विचारणा केली की, कंत्राटदार नोंदणीकृत होता काय, हे काम ग्रामपंचायतीनेच केले होते. मग आपल्याला कापायचीच गरज नव्हती. आपण लेबर सोसायटी, सुशिक्षित बेरोजगार, ओपन टेंडर अशा ३ घटकांना काम दिले जाते. यापैकी कोणीच काम केले नाही. म्हणजेच काम ग्रामपंचायतीने केले आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, तो नोंदणीकृत कंत्राटदार नव्हता, त्यांनी मक्तेदार नियुक्त केलेला होता. यावर समितीने पुन्हा विचारणा केली की, सदर देयक पुरवठादार जीएसटी कापूनच सादर करेल. रजिस्ट्रेशन नसताना त्याला मक्तेदार म्हणताच येत नाही.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, त्यांनी सब कॉन्ट्रॅक्टर नेमलेला आहे. यावर समितीने आक्षेप घेत विचारणा केली की, तो सब कॉन्ट्रॅक्टर अनाधिकृत आहे. जिल्हा परिषदेचा करार ग्रामपंचायतीसोबत झालेला असतो. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, ग्रामपंचायतीने मक्तेदार नेमून काम करून घेतले. पण ग्रामपंचायतीकडे सीएसटी, बीएसटी क्रमांक नसताना त्यांनी रक्कम का कपात करून घेतली, असा प्रश्न आहे. जिल्हापरिषदेकडून ग्रामपंचायतीकडे काम नेमून दिले गेले. ग्रामपंचायतीने हे काम मक्तेदारांकडून करून घेतले.

यावर समितीने खुलासा केला की, हा विषय वेगळा आहे. मुळात करार कोणाचा झाला, हा विषय आहे. त्यांनी आपल्या लोनवर तो मक्तेदार नेमलेला आहे. त्याचा यामध्ये कोणताही संबंध येत नाही. मूळ करार ग्रामपंचायत आणि जिल्हापरिषद यांचा आहे, त्यामुळे पैसे कपात करूच नये, एवढाच विषय आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, समितीचा मुद्दा पटलेला आहे. आपण जेव्हा त्यांच्याकडून बिल घेतो, त्यावेळी त्यांनी मक्तेदाराच्या नावावर करार केलेला आहे, असे कागदपत्रे प्राप्त होते. यावर समितीने पुढे विचारणा केली की, तो मक्तेदार अनाधिकृत आहे. त्यांना तसे करता येत नाही. रजिस्टर्ड मक्तेदार असता तर सीएसटी बीएसटी नंबर मधून ग्रामपंचायतीलाच कापता आला असता.

यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, ग्रामपंचायतीकडे सीएसटी आणि बीएसटी क्रमांक नाही, तरी ग्रामपंचायतीला पैसे देताना कपात कशी झाली, असा हा परिच्छेद आहे. सीएसटी व बीएसटी असेल नसेल ग्रामपंचायतीचे पैसे कपात करायला नको, ग्रामपंचायतीने दुस-या कंत्राटदाराला काम दिले तर त्यांना पैसे देताना कपात करून संबंधित विभागाकडे जमा करायला पाहिजे. समितीच्या मते ते जे पुरवठादार असतात, ते जीएसटी कापूनच आपली देयके ग्रामपंचायतीला सादर करतात. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी विदित केले की, यामध्ये प्रक्रियात्मक प्रमाद (प्रोसिजरल लॅप्स) झालेला आहे. ग्रामपंचायतीने पूर्ण पैसे द्यायला पाहिजे, ठेकेदाराच्या नावावर कपात करायला पाहिजे होते, त्याच्या सीएसटी बीएसटी वर पैसे टाकायला पाहिजे होते, त्यांनी हे पैसे विक्रीकर विभागामध्ये पैसे भरलेले आहेत. त्या ठेकेदाराला त्याची काही सूट मिळाली नाही. त्याची काही पत (क्रेडिट) मिळाली नाही. यामध्ये ठेकेदाराचे नुकसान झालेले आहे. ही रक्कम त्यांच्या नावावर जमा झाली असती तर त्याला याची पत (क्रेडिट) मिळाली असती.

यावर समितीने मत व्यक्त केले की, यामध्ये नुकसान ग्रामपंचायतीचे झालेले आहे. यामध्ये पाच टक्के काम जास्त झाले असते. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी विदित केले की, त्यांनी कपात करून जास्त पैसे ठेकेदाराच्या नावावर भरले असते. मक्तेदार नोंदणी केलेला असेल तर दोन टक्के रक्कम आणि नोंदणी केलेला नसेल तर चार टक्के रक्कम भरायची आहे, असा नियम आहे. जर ठेकेदार नोंदणी केलेला नसेल तर चार टक्के कपात करण्यात यावी, त्याच्या नावाने सबमिट करावे. हे परिपत्रक दिनांक १२ मे, २००६ चे आहे.

यावर समितीने मत व्यक्त केले की, ग्रामपंचायत स्थानिक स्वराज्य संस्था असून त्यांच्याकडून हे कपात करणे अपेक्षित नाही. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी विदित केले की, ही प्रक्रियात्मक प्रमाद (प्रोसिजरल लॅप्स) आहे. जिल्हा परिषदेने कपात न करता ग्रामपंचायतीने ठेकेदाराकडून कपात करणे अपेक्षित होते. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, दिनांक १२ मे,२००६ च्या परिपत्रकानुसार नोंदणी वा नोंदणी न झालेल्या मक्तेदारांकडून अनुक्रमे २ ते ५ टक्के कर कपात करण्यात यावी, असा नियम आहे.

यावर समितीने विचारणा केली की, हा मुद्दा संदिग्ध आहे. आतापर्यंत याबाबत चर्चाच झाली नाही. यामुळे करोडो रुपये सरकारच्या खात्यात जमा होतील. हे पैसे विकासाच्या कामात येतील. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी विदित केले की, ही प्रक्रियात्मक प्रमाद (प्रोसिजरल लॅप्स) आहे. जिल्हा परिषदेने कपात न करता ग्रामपंचायतीने कपात करणे अपेक्षित होते. यामध्ये पैशांचे नुकसान झालेले नाही. यावर समितीने विचारणा केली की, ग्रामपंचायतीने जी कामे करायची होती, त्यामध्ये हे ५ टक्के समाविष्ट करायची गरज नव्हती. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, एकाच ठेकेदाराला साहित्य व कामगारांचे सर्व कंत्राट दिलेले आहे. यावर समितीने विचारणा केली की, हे ग्रामपंचायतीचे कंत्राट आपल्याकडे आहे का, ठेकेदाराने देयके पक्की आणली असतील, त्यावेळी सर्व करासहित देयके सादर केली गेली. म्हणजे आपण साहित्यावरील रकमेवर विक्रीकर कापून दिली. अगोदरच साहित्याची देयके करासहित घेतलेली आहे. म्हणजे या केसमध्ये दोन वेळा विक्रीकर कापलेला आहे. यामुळे या लेखाशिर्षावरील पाच टक्के रक्कम जास्त खर्च झाली.

यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी विदित केले की, यात ठेकेदाराचे नुकसान झाले. याचा सखोल अभ्यास करून खात्री करतो व आदेश देतो की, जिल्हा परिषदेने ग्रामपंचायतीला काम दिले असेल तर त्यामध्ये कोणतीही कपात केली जाऊ नये, त्यांना पूर्ण रक्कम दिली जाईल. जर त्यांनी ठेकेदाराला काम देतांना पूर्ण नियमाप्रमाणे आदेशांचे पालन करून कोणत्याही प्रकारची कपात करण्यात येऊ नये. प्रत्येक जिल्हा परिषद वेगवेगळया प्रकारे काम करीत असते. ग्रामपंचायतीबरोबर ते करार करतात.

यावर समितीने निदेश दिले की, याचा खुलासा करून सर्व जिल्हा परिषदांना, मुख्य कार्यकारी अधिकारी यांना मार्गदर्शक सूचना देण्यात याव्यात, या सर्व मार्गदर्शक सुचना खालपर्यंत वितरीत करणे अत्यावश्यक आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी गटविकास अधिकारी यांच्यापर्यंत माहिती देणे अपेक्षित असते. तात्काळ याची माहिती करून याबाबत सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आदेशित करावे. याबाबत जे परिपत्रक काढणार आहात, ते समितीला देखील सादर करावे. या परिपत्रकाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी गटविकास अधिकारी यांना सांगत नाही. तसेच, गटविकास अधिकारी सरपंचांना सांगत नाही. सदर परिपत्रक तात्काळ काढण्यात यावे, तसेच ते तात्काळ सगळीकडे सादर करण्यात येईल. याकरिता पंचायती राज समितीचा संदर्भदेखील देण्यात यावा. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, सदर परिपत्रकाकरिता दहा दिवसांचा कालावधी देण्यात यावा.

**अभिप्राय व शिफारशी**

सन २०१२-२०१३ या वर्षामध्ये साखरी भागडेवाडी, बाणकोट किल्लावाडी, गोठे, तिडे (ता.मंडणगड) येथील अंगणवाडी इमारत बांधकामाबाबत असे लेखा आक्षेप नोंदविण्यात आले आहेत की, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ मधील परिच्छेद क्रमांक १४३ (१) नुसार कामाची मूळ मुदत संपण्यापूर्वी १५ दिवस अगोदर मुदतवाढीसाठी मक्तेदाराने अर्ज करणे आवश्यक होते. मुदतवाढीसाठी सक्षम अधिका-याची मंजूरी घेतली नाही त्यामुळे निविदा रक्कम कपात करणे आवश्यक होते. कामगार उपकराची १ टक्का रक्कम कामाच्या देयकातून कपात केली नाही. गौण खनिज शुल्क कपात करण्यात आले नाही.

उपरोक्त लेखा आक्षेपाच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने साक्ष घेतली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, नाबार्ड बँक अर्थसहाय्य योजना या लेखा शीर्षातून साखरी भागडेवाडी येथे अंगणवाडी इमारत बांधकाम करणे संदर्भातील मुळ मुदत संपण्यापूर्वी १५ दिवस अगोदर मुदतवाढीसाठी अर्ज करणे आवश्यक असताना मुदतवाढीसाठी सक्षम अधिका-यांची मंजूरी घेतली नाही त्यामुळे निविदेतील शर्तीनुसार दंडाची रक्कम रुपये ३५०० वसूल केलेले आहेत. तसेच बाणकोट किल्लावाडी हे काम नाबार्ड बँक अर्थसहाय्य योजना व गोठे तिडे अंगणवाडी इमारत बांधकामे जिल्हा वार्षिक योजनेतून घेण्यात आली होती. बांधकाम देयकातून संबंधित ठेकेदाराकडून महाराष्ट्र शासन विक्रीकर विभागाची अधिसूचना दिनांक ४ एप्रिल, २०१२ च्या अनुसूची १ स्तंभ ३ नुसार अनोंदणीकृत कंत्राटदाराच्या देयकातून दिनांक १ एप्रिल, २०१२ पासून ४ टक्के ऐवजी ५ टक्के विक्रीकराची रक्कम वसूल करून भरणा करणेत आली आहे व दिनांक १२ मे, २०१६ नुसार ग्रामविकास विभागाने पत्रान्वये दिलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार ग्रामपंचायत कार्यकंत्राट कामाकरीता आवश्यक असलेले साहित्य स्थानिक पुरवठादाराकडून खरेदी करून मजुराकरवी स्वतःच काम पूर्ण करून घेत असल्यास सदर व्यवहारामध्ये मूळ स्त्रोतातून कराची (टीडीएस) कपात करणे आवश्यक नाही. तथापि, उपरोक्त कामे ग्रामपंचायतीने स्वतः न करता पोट मक्तेदाराकरवी केली असल्यामुळे विक्रीकराची रक्कम वसूल करण्यात आलेली आहे, याबाबत समिती समाधान व्यक्त करीत आहे.

यावरुन समितीच्या असे निदर्शनास आले की, स्थानिक स्वराज्य संस्थाकडून विक्रीकराची रक्कम कपात करता येत नाही. स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत जी कामे करण्यात येतात त्यांच्याकडे जीएसटी, बीएसटी क्रमांक नसतो. आतापर्यंत जेवढ्या ग्रामपंचायत व जिल्हा परिषदेने कामे केली त्या कामाच्या बिलातून विक्री कराची रक्कम कपात केली आहे व याबाबत लेखापरिक्षकांनी आक्षेप घेतला आहे. त्यामुळे यासंबंधी अद्याप शासनाने परिपत्रक काढलेले नाही, त्यामुळे समिती याबाबत सखेद आश्चर्य व्यक्त करीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, दिनांक १२ मे, २०१६ रोजीच्या परिपत्रकान्वये ग्रामपंचायती दोन पध्दतीने काम करू शकतात. ग्रामपंचायतीने जर स्वतः काम केले असेल तर विक्रीकर कपात करायची आवश्यकता नाही. पोट मक्तेदार नियुक्त केला असेल तर त्यातून कपात करावी. याठिकाणी ग्रामपंचायतीने कंत्राटदाराकडून रक्कम कपात करायची होती. जिल्हा परिषदेने ग्रामपंचायतीच्या देयकातून विक्रीकराची रक्कम कपात केल्यामुळे दोन ठिकाणी कपात करण्यात आलेली आहे. जिल्हा परिषदेने विक्रीकराची रक्कम कपात करण्याची आवश्यक नव्हती, ग्रामपंचायतीने कपात करणे आवश्यक होते. ग्रामपंचायतीमध्ये कामगार सोसायटी, सुशिक्षित बेरोजगार खुल्या निविदा पध्दतीने अशा तीनपैकी एका घटकाद्वारे कामाचे वाटप करण्यात येते. तथापि, प्रस्तुत कामे या ३ घटकांपैकी कोणीही काम केले नाही म्हणजेच ग्रामपंचायतीने स्वतः काम केलेले आहे. ग्रामपंचायतीने स्वतः मक्तेदार नेमून काम करून घेतले पण ग्रामपंचायतीकडे सीएसटी, बीएसटी क्रमांक नसताना जिल्हा परिषदेकडून विक्रीकराची रक्कम कपात करण्यात आली आहे. मक्तेदार नोंदणीकृत असल्यास दोन टक्के रक्कम आणि मक्तेदार नोंदणीकृत नसल्यास चार टक्के रक्कम कपात करणेसंदर्भात ग्रामविकास विभागाचे दिनांक १२ मे, २००६ रोजीचे परिपत्रक आहे. **जिल्हा परिषदेने ग्रामपंचायतीला काम दिले असेल तर त्यामध्ये कोणतीही कपात केली जाऊ नये, त्यांना पूर्ण रक्कम दिली जाते. ग्रामपंचायतीने ठेकेदाराला काम देताना नियमाप्रमाणे आदेशाचे पालन करून कोणत्याही प्रकारची कपात करण्यात येऊ नये. जिल्हा परिषदेकरीता ग्रामपंचायत ही एक काम करणारी संस्था आहे. ग्रामपंचायतीचे कार्य नफा किंवा तोटा या धर्तीवर चालत नसून ते कल्याणकारी तत्वावर चालते, त्यामुळे राज्यातील सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांना उपरोक्त प्रकरणी मार्गदर्शक सूचना परिपत्रकान्वये निर्गमित करणे आवश्यक आहे. सदर मार्गदर्शक सूचना बाबतची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी गटविकास अधिका-यांपर्यंत देणे अपेक्षित आहे. सदर परिपत्रक तातडीने निर्गमित करण्यात यावे व त्यामध्ये पंचायती राज समितीचा संदर्भ देण्यात यावा व परिपत्रकाची एक प्रत समितीला सादर करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्याच्या आत सादर करण्यात यावा.**

प्रकरण दहा

# जिल्हा परिषद, रत्नागिरी

## लेखापरीक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करून देणेबाबत

**(१) परिच्छेद क्रमांक ३.२२४/९ (सन २०१२-१३)**

**कर्ली देवघर येथे ग्रामपंचायत इमारत बांधणे तालुका संगमेश्वर**

प्रमाणक क्रमांक ५०४ दिनांक ३१ मार्च, २०१३ रक्कम रुपये २,६३,००० अनियमितता खालीलप्रमाणे आहेत :—

(१) कामाच्या टिपणीत दिनांक, लेखाशीर्ष सांकेतांक नमूद नाही. अंदाजपत्रकीय रक्कम आदेश नमूद नाही.

(२) ग्रामपंचायत तांत्रिक व आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेबाबतचा दाखला नाही.

(३) रोख पुस्तकाचा उतारा सन २००६-०७ व सन २००७-०८ चा असून त्यावर सरपंचाची स्वाक्षरी नाही.

(४) कार्यकारी अभियंता यांचे पत्र दिनांक १ जून, २०११ नुसार बयाना रक्कम व अनामत रक्कम वसूल केलेली नाही. तथापि, १५,००० रुपये वसूल करणे आवश्यक आहे.

(५) करारनाम्यावर दिनांक नमूद नाही व मुद्रांक विवरण करारपत्र अपूर्ण राहिलेले आहे.

(६) ग्रामविकास व जलसंधारण विभाग दिनांक ८ मे, २००२ च्या परिपत्रकानुसार कामावर नियुक्त केलेल्या कामगाराचा विमा उतरविला नाही.

(७) जिल्हाधिकारी यांचे प्रशासकीय आदेश दिनांक १० मार्च, २०११ अन्वये सदर काम पूर्ण झालेले असून खर्च ही झालेला आहे. सदर कामाचे उपयोगिता प्रमाणपत्र जिल्हाधिकारी यांना सादर केलेले नाही.

(८) उर्वरित वैधानिक विकास मंडळ, मुंबई यांचे आदेश दिनांक ३१ जानेवारी, २०११ तील अट क्र.८ नुसार काम सुरू करताना कामाच्या ठिकाणी नामफलक लावलेला नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

(१) अनावधानाने सदरच्या नोंदी राहिल्या होत्या. तथापि, प्रथम पूर्ततेवेळी दिनांक व सांकेतांक नंबर व लेखाशीर्ष नमूद करणेत आलेले आहे. आदेशात अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ५,००,००० नमूद केलेली असून वरिष्ठ सहाय्यक यांची दिनांकित स्वाक्षरी आहे.

(२) ग्रामपंचायत आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेबाबतचा गट विकास अधिकारी यांचा दिनांक ६ मे, २०११ चा दाखला नस्तीसोबत जोडणेत आलेला आहे. ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचा शासन निर्णय क्रमांक झेडपीए-२००८/प्र.क्र. ४७२/वित्त ९ (३३) मधील दिलेल्या सुचनानुसार तांत्रिक सल्ला संबंधित उप विभागामार्फत देण्यात येतो.

(३) नस्ती मध्ये सन २००६-०७ ते सन २००९-१० नमुना नंबर १३ व नमुना नंबर १४ जोडण्यात आलेले असून प्रथम पूर्ततेवेळी रोखपुस्तकाच्या सन २००६-२००७ व सन २००७-२००८ च्या उता-यावर सरपंचाची स्वाक्षरी घेणेत आलेली आहे.

(४) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ मधील नियम १३८ (६) नुसार ग्रामपंचायतींना बयाणा रकमेतून सुट देण्यात आलेली आहे व सुरक्षा अनामत रुपये ५,२६० वसूल करून जिल्हा परिषद खाती भरणा केलेले आहे.

(५) प्रथम पूर्ततेवेळी करारनाम्यावर दिनांक १ जून, २०११ नमूद करणेत आलेला असून, मुद्रांक विवरण करारपत्र पूर्ण आहे.

(६) उपविमा संचालक, विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक प्रविनी-२३१०/सांबावि/विमा वसुली/अभि-३ दिनांक ८ सप्टेंबर, २०१० नुसार कामगारांच्या कामावर विम्याची रक्कम सदर कामाचे पहिले रनिंग बिल रक्कम रुपये २,३६,८२९ मधून विम्याची १ टक्के रक्कम रुपये ५,००० वसूल करणेत आलेली आहे.

(७) दिनांक १४ मार्च, २०१३ रोजी उपयोगिता प्रमाणपत्र जिल्हाधिकारी यांना सादर केलेले आहे. छायांकित प्रत सोबत सादर केलेली आहे.

(८) ग्रामपंचायत कर्ली देवघर येथील ग्रामपंचायत इमारतीच्या नावाचा फलक लावणेत आलेला असून त्याची फोटोप्रत नस्तीसोबत जोडणेत आलेली आहे.

**(२) परिच्छेद क्रमांक ३.१०६९ (५)/१७ (सन २०१२-१३)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० मधील कलम (३) प्रमाणे ज्या तारखेस लेखापरीक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग / पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरीक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/ पंचायत समित्या यांना अर्धमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरी सुद्धा लेखापरीक्षणास कागदपत्रे/अभिलेख उपलब्ध केले जात नाही. त्या त्या जिल्हा परिषद/विभाग/पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखापरीक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेद लेखापरिक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत सादर करणेबाबत सुचित केले जाते. तथापि, या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमूद केलेप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देऊन सुद्धा लेखापरीक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरूपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल जिल्हा परिषदेचे विभाग आणि पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्यांबाबत घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांकग | गुंतलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ५ | रत्नागिरी | सामान्य प्रशान विभाग | १७ | — |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सन २०१२-१३ अखेर एकूण ३१ ग्रामपंचायतींकडील १०३ घटकांचे अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध नव्हते. त्यापैकी ०८ ग्रामपंचायतींकडील १८ घटकांचे लेखापरीक्षण झालेले असून ०४ ग्रामपंचायतींकडील १८ घटकांचे अभिलेख उपलब्ध असून लेखापरीक्षण करणेस संचालक, स्थानिक निधी संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई यांना कळविले आहे. तसेच ०२ ग्रामपंचायतींचे ०७ घटक जळीत, ०१ ग्रामपंचायतीचे ०३ घटक पूरहानी ०७ ग्रामपंचायतींचे १५ घटकांचे अभिलेख वाळवीमुळे नष्ट, ०१ ग्रामपंचायतींचा ०१ घटक न्यायालयीन प्रकरणामुळे व उर्वरित ११ ग्रामपंचायतींचे ४१ घटक लेखापरीक्षणास उपलब्ध नाही. त्यापैकी ०८ ग्रामपंचायतींच्या ग्रामसेवकांकडून दंडात्मक वसुली करणेत आली असून ०३ ग्रामसेवकांकडून वसुली सुरू आहे. एका ग्रामपंचायतीचे अभिलेख सध्या लेखापरीक्षणास उपलब्ध असून, संबंधित ग्रामसेवकांकडून दंडात्मक वसुली सुरू आहे.

**(३) परिच्छेद क्रमांक ४.६१/३६ (सन २०१२-१३)**

**नाविण्यपूर्ण योजनांतर्गत इयत्ता ८ ते १० वी मध्ये शिकत असलेल्या किशोरवयीन मुलींना शेंगदाणेयुक्त लाडू आहारात पुरवठा करणे.**

पंचायत समितीने सन २०१२-१३ मध्ये नाविण्यपूर्ण योजनेतून प्रमाणक क्रमांक ६२ दिनांक ३० मार्च, २०१३ रुपये १,९८,८८२ एवढा खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

इयत्ता ८ वी ते १० मध्ये शिक्षण घेत असलेल्या किशोरवयीन मुलींच्या रक्तामध्ये हिमोग्लोबीनचे प्रमाण वाढावे यासाठी नाविण्यपूर्ण योजना राबविली असून या योजनेस जिल्हाधिका-यांनी, जिल्हा नियोजन समिती यांनी प्रशासकीय मंजूरी दिली आहे. जिल्हाधिका-यांनी जिल्हा शल्य चिकित्सक व शिक्षणाधिकारी यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी यांना कळविले आहे. ज्या किशोरवयीन मुलींना शेंगदाणेयुक्त लाडूचे वाटप करण्यात येणार आहे, त्यांचे योजनापूर्व व योजनेत्तर (लाभ दिल्यानंतर) हिमोग्लोबीनची तपासणी करणे आवश्यक आहे.

सदर योजनेचे अनुक्रमांक १ ते २४ शाळांना रक्कम रुपये १,९८,८८२ वाटप केलेले आहे. परंतु इयत्ता ८ वी १० वी मधील मुलींनाच अनुज्ञेय दिवसांपर्यंत आहार दिल्याचे लेखे, कोणत्या कालावधीत आहार देण्यात आला, साहित्य केव्हा खरेदी केले, तसेच मुलींचे हिमोग्लोबीनचे प्रमाण असलेले प्रमाणपत्र योजनापूर्व व योजने नंतरचे लेखे लेखा परिक्षणास उपलब्ध केलेले नाहीत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

नाविण्यपूर्ण योजनेअंतर्गत इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिकत असलेल्या किशोरवयीन मुलींना शेंगदाणेयुक्त लाडू या आहाराचा पुरवठा करण्यात आलेला आहे. तसेच जिल्हा स्तरावरील मंजूर यादीप्रमाणे संबंधित शाळांना रक्कम व्हॉ.क्र. ६२ दिनांक ३० मार्च, २०१३ अन्वये वर्ग करणेत आलेली आहे. सदर मंजूर आदेशासोबत खर्ची टाकणेत आलेले देयक शाळांच्या दप्तरी ठेवले आहे.

इयत्ता ८ वी १० वी च्या शिक्षण घेत असलेल्या २४ माध्यमिक शाळांतील किशोरवयीन मुलींना रक्तामध्ये हिमोग्लोबीनचे प्रमाण वाढावे यासाठी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी दिलेल्या आदेशानुसार या गटाकडील संबधीत शाळांच्या मुलींची योजनापूर्व व योजनेनंतरचे प्रमाणपत्र हिमोग्लोबीन तपासणी करण्यात आलेली असून सदर अहवालाच्या प्रती शाळां स्तरावर उपलब्ध आहेत. सदर योजनेअंतर्गत रुपये १,९८,८८२ संबंधित २४ माध्यमिक शाळांसाठी आदेश क्रमांक रजिप/शिक्षण/ माध्य.१ /२४३१-३९/२०१३ दिनांक १२ मार्च, २०१३ अन्वये प्राप्त झाली होती. या शाळांनी शेंगदाणेयुक्त लाडू वाटप केल्याचा कालावधी सर्वसाधारणपणे दिनांक ०६ मार्च, २०१३ ते दिनांक २२ मार्च, २०१३ असा आहे. अनुज्ञेय दिवसापर्यंत आहार दिल्याचे व हिमोग्लोबीनचे योजनापूर्व व योजनेनंतरचे प्रमाणपत्र संबधित शाळास्तरावर उपलब्ध आहे तसेच आहार खरेदीची देयके शाळा स्तरावर उपलब्ध आहेत.

**(४) परिच्छेद क्रमांक ४.२१२/१५ (सन २०१२-१३)**

**पाणी टंचाई अंतर्भूत ग्रामीण भागात टँकरद्वारे पाणी पुरवठा खर्चातील अनियमिततेबाबत**

पंचायत समिति, दापोली, जिल्हा रत्नागिरी यांनी सन २०१२ मधील टँकरद्वारे पिण्याचे पाणी पुरवठा केलेबाबत रक्कम रुपये ४,२५,९४२ चे देयक प्रदान झाले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :—

(१) टँकरची भार मर्यादा १२ मे. टन असलेबाबतचे प्रमाणपत्र नस्तीत आढळले नाही.

(२) पाणी पुरवठा करण्याचे स्थळ व स्त्रोत कोठून घेण्यात आला यामधील अंतर प्रमाणित केलेले नाही.

(३) टंचाईग्रस्त गावाला पाणी पुरवठा झाल्याबद्दल तेथील दोन महिलांच्या दररोज स्वाक्ष-या घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही न करता दर्शविलेल्या खेपांचे प्रदान करण्यात आलेला तपशिल खालीलप्रमाणे आहे :—

प्रमाणक क्रमांक ३०, दिनांक २४ जुलै, २०१२ रुपये ३,०८,५७९ , प्रमाणक क्र.३१, दिनांक २४ जुलै, २०१२ रुपये ५५,२५३ प्रमाणक क्र.४०, दिनांक ०७ नोव्हेंबर, २०१२ रुपये २९,४६४ , प्रमाणक क्र.१२०, दिनांक ३० मार्च, २०१३ रुपये १०,००० आणि प्रमाणक क्रमांक १२१, दिनांक ३१ मार्च, २०१३ रुपये २२,६४६ अशी एकूण रक्कम रुपये ४,२५,९४२ आहे.

वरील प्रमाणकान्वये सदरचा डिझेल वंगण व दुरुस्तीसाठी खर्च केलेला आहे. सदरच्या रक्कमा डिझेल पुरवठादार यांना अदा केल्या आहेत.

सदरचा खर्च वाहन क्रमांक : (१) MWU - ९१६८ (२) MTF - ७२४१, (३) MTD - ७६४१ या तीन अधिग्रहीत टँकरमध्ये डिझेल, वंगण व दुरुस्तीसाठी केलेला असून सदर वाहनाची स्कंद नोंदवही तपासता डिझेल भरल्याच्या नोंदी आहेत. परंतु सदरच्या नोंदी जबाबदार अधिकारी यांनी प्रमाणित करून स्वाक्ष-या केलेल्या नाहीत.

(४) खर्च प्रमाणक ३० व ३१ दिनांक २४ जुलै, २०१२ च्या खर्चाच्या मंजूरी आदेशावर क्रमांक दिनांक नमूद नाही.

(५) प्रमाणक क्र. १२० दिनांक ३० मार्च, २०१३ रक्कम रुपये १०,००० डिझेल भरण्यासाठी अग्रिम दिला असताना सदर खर्च टँकर दुरुस्तीसाठी करण्यात आला आहे. डिझेल वंगणासाठी देण्यात आलेला अग्रिम टँकर दुरुस्तीसाठी खर्च का करण्यात आला.

(६) दुरुस्तीवर खर्च करण्यात आलेल्या बाबींची नोंद स्कंद नोंदवहीत घेण्यात आली आहे. सदरची नोंद इतिहास नोंदवहीत नोंद न घेतल्यामुळे सदर टँकरच्या दुरुस्तीवर दुबार खर्च होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

(७) प्रमाणक क्रमांक १२० दिनांक ३० मार्च, २०१३ दुरुस्तीवर झालेल्या खर्चाच्या आदेशावर क्रमांक/दिनांक नमूद नाही याबाबत खुलासा करावा.

(८) जिल्हाधिकारी रत्नागिरी यांजकडील आदेश क्र. सासाशा/कार्या-२/अनुदान/०८ दिनांक १७ फेब्रुवारी, २०१२ व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडील आदेश क्र/रजिप/ग्रा.पा.पू./लेखा-१/११८१/ ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद, रत्नागिरी दिनांक २१ डिसेंबर, २०१३ नुसार एकूण अनुदान रुपये ९,३६,५०० एवढे प्राप्त झाले आहे. सदर आदेशातील नमूद टिपे प्रमाणे झालेल्या खर्चाबाबत व कार्यवाही बाबत जिल्हाधिकारी यांना उपयोगिता प्रमाणपत्र पाठविणे आवश्यक असताना लेखापरीक्षण कालावधीपर्यंत पाठविणेत आलेचे दिसून आले नाही.

उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—

(१) टँकरची भार मर्यादा १२ मे.टन असलेबाबत आर.सी. बुकाची झेरॉक्स दप्तरी उपलब्ध करून ठेवणेत आली आहे.

(२) पाणी भरण्याचे स्थळ आपटी, ता. दापोली येथे असून त्यापासून पाणी पुरवठा करणेत आलेले अंतर प्रमाणित करणेत आले असून याबाबत बांधकाम विभागाचे पत्र उपलब्ध आहे.

(३) टँकरनिहाय टंचाईग्रस्त गावाला पाणीपुरवठा झाल्याबद्दल तेथील दोन महिलांच्या दररोज स्वाक्ष-या घेणेत आलेल्या असून त्याप्रमाणे नोंदवही ठेवण्यात आलेली आहे.

वाहन क्र. MWU - ९१६८, MTF - ७२४१, MTD - ७६४१ या वाहनांना डिझेल, वंगण व दुरुस्तीसाठी खर्च केलेला असून सदर वाहनाची स्कंध नोंदवहीमध्ये डिझेल भरल्याच्या नोंदी सक्षम अधिकारी यांची स्वाक्षरी घेऊन प्रमाणित करणेत आलेल्या आहेत.

(४) खर्च प्रमाणक क्रमांक ३० व ३१ च्या खर्चाच्या मंजुरी आदेशावर क्रमांक व दिनांक नमूद करण्यात आला आहे.

(५) टंचाईग्रस्त गावाना तातडीने टँकरने पाणीपुरवठा करणे आवश्यक असल्यामुळे वाहनाचे इंधन, वंगण व दुरुस्तीकरिता प्रमाणक क्रमांक १२०, दिनांक ३० मार्च, २०१३ अन्वये रुपये १०,००० अग्रिम घेणेत आला होता व त्याच कामासाठी खर्च करण्यात आला आहे.

(६) अधिग्रहीत केलेल्या शासकीय टँकरची फक्त स्कंध नोंदवही ठेवणेत आलेली आहे. त्याची इतिहास नोंदवहीत नोंद करणेत आली नव्हती. तथापि, वाहनांच्या दुरुस्तीच्या नोंदी स्कंध नोंदवहीमध्ये ठेवणेत आलेल्या असून प्रमाणित करण्यात आलेल्या आहेत. स्कंध नोंदवही उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करणेत येत आहे.

(७) प्रमाणक क्रमांक १२० दिनांक ३० मार्च, २०१३ खर्चाच्या आदेशावर जा. क्र. व दिनांक नमूद करण्यात आलेला आहे.

(८) सन २०१२-१३ मध्ये टँकरने पाणीपुरवठा करणेकामी झालेला खर्च रक्कम रुपये ४,२५,९४२ इतक्या रकमेचे उपयोगिता प्रमाणपत्र जिल्हा परिषद, रत्नागिरीला जा. क्र. पंसदा/आस्था-२/टँकर/१४४७/१३ दिनांक ५ एप्रिल, २०१३ अन्वये सादर करण्यात आले आहे. शिल्लक रक्कम रुपये ५,१०,५५८/- पुढील आर्थिक वर्षात खर्च झालेली आहे. त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र जा. क्र. पंसदा/आस्था-२/टँकर/२४२६/१४ दिनांक १४ एप्रिल, २०१४ अन्वये सादर करण्यात आले आहे.

**(५) परिच्छेद क्रमांक ४.२४८/१९ (सन २०१२-१३)**

५० टक्के अनुदानावर सौर कंदिलाचा पुरवठा करणेबाबत.

कृषी विभागाने पंचायत समिती सेस अनुदानातून प्रमाणक क्र. २३ दिनांक ३१ मार्च, २०१३ रक्कम रुपये १,९७,९५०/- एकूण ७४ नग सौरकंदीलांचा पुरवठा केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :—

(१) सदर खर्चास गट विकास अधिकारी यांचे पत्र क्र.पंसरा/कृषी/पंसस/१३, दिनांक ३१ मार्च, २०१३ ने मंजुरी दिली व खर्चास प्रशासकीय मंजुरी गटविकास अधिकारी यांच्या पत्र क्र. १६०८ दिनांक २२ मार्च, २०१३ नुसार दिली व मालाचा पुरवठा आदेश गटविकास अधिकारी यांच्या जा. क्र. १६०९ दिनांक २२ मार्च, २०१३ उपरोक्त आदेशाचे अवलोकन केले असता सदर खर्चास मंजुरी मिळण्याअगोदरच प्रशासकीय मंजूरी व मालाचा पुरवठा आदेश दिनांक २२ मार्च, २०१३ रोजी पुरवठादार यांना देण्यात आला आहे.

(२) पुरवठादार मे. रेन्युग्रीन एनर्जी प्रा. लि., कोल्हापूर बिल नंबर १७१३, दिनांक २९ मार्च, २०१३ एकुण ७४ नग दर रुपये २,६७५ एकूण १,९७,९५० सन २०१२-१३ मध्ये केलेल्या दर कराराची मूळप्रत सादर केली नाही.

(३) सौर कंदीलाचा पुरवठा आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांच्या आत पुरवठा करावयाचा आहे. सदर पुरवठा झाल्याबाबत डिलिव्हरी चलन उपलब्ध झाले नाही. त्यामुळे कोणत्या दिवशी पुरवठा झाला याची खात्री होत नाही.

(४) एकुण लाभार्थी ७४ × १३३८ = रुपये ९९,०१२ लाभार्थी हिश्श्यांची रक्कम पुरवठादार यांचे नावे भरणा केल्याबाबत अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत.

(५) सदर वस्तुचा पुरवठा साठा नोंदवहीत नमुना नंबर ३३ पान क्र. १३७ ते १४१ नुसार लाभार्थ्यांना वस्तु एकूण ७४ लाभार्थ्यांपैकी ७२ लाभार्थ्यांना पुरवठा करण्यात आलेला आहे. उर्वरित दोन लाभार्थ्यांची नावे व वस्तु प्राप्तीच्या स्वाक्ष-या प्राप्त नाहीत.

(६) लाभार्थी हिस्सा वसूल केल्याबाबत लेखाशाखेकडील पावत्यांच्या स्थळप्रती उपलब्ध झाल्या नाहीत.

(७) लाभार्थ्यांच्या नावाची मंजूर यादी नावांसह पंचायत समिती मासिक सभेत मंजूर झाल्याबाबत नावांसह व ठराव क्रमांकासह उपलब्ध झाली नाही.

(८) उपरोक्त आक्षेपांत नमूद केलेले अप्राप्त अभिलेखे व कागदपत्रांबाबत मुंबई स्थानिक लेखा परीक्षा अधिनियम, १९३० चे कलम ६ अ व ६ ब नुसार पत्र क्र. ५ दिनांक ८ ऑक्टोबर, २०१३ देऊन सुद्धा सदरचे अभिलेखे लेखा परिक्षणास उपलब्ध केले नाहीत.

(९) **महाराष्ट्र शासन राजपत्र,** अधिसूचना विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई दिनांक ४ एप्रिल, २०१२ अन्वये सदर बिलातून मुल्यवर्धीत कराची ५ टक्के रक्कम रुपये ९,८९८ वसूल केलेली नाही. तसेच आयकराची रक्कम रुपये ४,०५३ वसूल करण्याऐवजी रुपये २,२७६ देयकात वसूल केल्याचे नमूद आहे. तरी आता मूल्यवर्धित कराची रक्कम रुपये ९,८९८ व आयकराची रक्कम रुपये ४,५५३ अशी एकूण रक्कम रुपये १४,४५१ शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

परिच्छेदामध्ये नमूद केलेनुसार कार्यालयाकडील पत्र क्र.पंसरा/कृषि/पं.स.से./१३ दिनांक ३१ मार्च, २०१३ हे सदरच्या ५० टक्के सौर कंदील खरेदी करावयाच्या देयकासोबत जोडलेला आदेश आहे. सदर खर्चाला मंजुरी दिलेले पत्र नाही. त्याचप्रमाणे या कार्यालयाचे जा.क्र/पं.स.रा/कृषी/ १६०८/दिनांक २२ मार्च, २०१३ ने सदर योजनेस प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. तसेच जा.क्र./पं.स.रा/कृषी/ १६०९ दिनांक २२ मार्च, २०१३ ने मालाचा पुरवठा करणेचे आदेश देणेत आलेले आहेत. त्यामुळे सदरचे योजनेला मंजुरी घेऊनच प्रशासकीय मंजूरी व मालाचा पुरवठा करणेचे आदेश देणेत आलेले आहेत.

दरकराराची मूळ प्रत पुढील लेखा परिक्षणास दाखविण्यात आली असून ती सोबत जोडली आहे.

सौर कंदिल पुरवठा आदेशानुसार ७४ नग सौर कंदिलाचा पुरवठा, पुरवठादाराकडून ७ दिवसांच्या आत म्हणजेच दिनांक २६ मार्च, २०१३ रोजी केला असून तशी नोंद साठा रजिस्टर पृष्ठ क्रमाक १३७ वर घेणेत आली आहे. तसेच डिलिव्हरी नोट क्रमांक १५४६ दिनांक २६ मार्च, २०१३ लेखा परिक्षणास सादर करणेत येत आहे.

लाभार्थी हिश्श्याची रक्कम प्रत्यक्षात प्रत्येक लाभार्थी रुपये १३३७ प्रमाणे आहे. त्यानुसार ७४ लाभार्थ्यांची रककम ७४ × १३३७ = ९८,९३८ असून प्रमाणक क्रमांक ११ दिनांक ११ जुलै, २०१४ ने खर्च पडलेले असून संबधित पुरवठादार यांना प्राप्त झाले बाबत पुरवठादाराची पोहोच पावती लेखापरीक्षणास सादर करणेत येत आहे.

उर्वरित दोन लाभार्थ्यांना सौरकंदील बंद असल्याने कंपनीने बदलून दिल्यानंतर वाटप करून स्वाक्ष-या घेण्यात आल्या आहेत. सदर लाभार्थ्याच्या वस्तू प्राप्त झाले नंतरची नावे व स्वाक्षरीची सत्य प्रत लेखापरीक्षणास सादर करणेत येत आहे.

लाभार्थी हिस्सा वसूल केल्याबाबत लेखा शाखेकडील पावत्यांच्या स्थळप्रती उपलब्ध असून लेखापरीक्षणास सादर करणेत येत आहेत.

लाभार्थ्यांच्या नावाची मंजूर यादी नावासह पंचायत समिती सभा ठराव क्रमांक ९१, दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१३ ने मंजूर झाली असून लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात येत आहे.

लेखापरीक्षणास आवश्यक असणारे वरीलप्रमाणे सर्व अभिलेखे व कागदपत्रे आता लेखापरीक्षणास उपलब्ध करून देणेत येत आहेत.

सौर उपकरणासाठी शासनाने मुल्यवर्धित करात सुट दिली असल्यामुळे सदरची रक्कम कपात करण्यात आली नाही. परंतु आयकराची रक्कम रुपये २२७६ प्रमाणक क्रमांक ११, दिनांक ११ जुलै, २०१४ मध्ये वसूल करणेत आली असून व उर्वरित आयकराची रक्कम रुपये २२७७ रोखीने भरणा केली असून सोबत भरणा केलेल्या चलनांची झेरॉक्स प्रत सादर करणेत येत आहे.

**(६) परिच्छेद क्रमांक ४.३८३/९ (सन २०१२-१३)**

**ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील महिलांना घरघंटी पुरविणे बाबत.**

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.झेडपीए/२०१०/ अनौसक्र.३३/प्र. क्र.१६८/परा-१, दिनांक १० मार्च, २०११, अ.क्र.१५ नुसार महिला व बालकल्याण विभाग प्रकल्प - १ व २ यांनी दारिद्रय रेषेखालील महिलांना घरघंटी पुरविणे यावर प्र.क्र.७६ व ८१, दिनांक २८ मार्च, २०१३ नुसार एकूण रक्कम रुपये ७,३५,०८४ एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :—

(१) प्रकल्प १ व २ साठी एकुण ४२ लाभार्थींना घरघंटीचे वाटप केलेले आहे. प्रति लाभार्थी रुपये १९,४४७ × एकूण ४२ लाभार्थ्यांनुसार ९० टक्के अनुदान रुपये ७,३५,०८४ व १० टक्के लाभार्थी हिस्सा रुपये ८१,६९० एकूण रु. ८,१६,७७४ एवढा खर्च केलेला आहे व साद एन्टरप्रायजेस देवरुख, संगमेश्वर यांचेकडून वस्तूची खरेदी करण्यात आलेली आहे. सदर पुरवठादाराच्या देयकातून आयकर रुपये १८,७८६ वसूल करण्या ऐवजी रुपये १६,९०६ देयकातून वसूल केलेला आहे. तसेच **महाराष्ट्र शासन राजपत्र,** अधिसूचना, विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई दिनांक ०४/०४/२०१२ नुसार मूल्यावर्धित कराची ५ टक्के रुपये ४०,८३९

देयकातून वसूल केलेली नाही. त्यामुळे शासनाचे नुकसान झाले आहे. तरी आता मूल्यवर्धित कराची रक्कम रुपये ४०,८३९ व आयकराची रक्कम रु. १८,७८६ अशी एकूण रक्कम रुपये ५९,६२५ शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

(२) १० टक्के लाभार्थी हिस्साची भरणा पावती लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

(१) पंचायत समिती, रत्नागिरी महिला व बालकल्याण विभाग यांचे प्रकल्प रत्नागिरी १ व २ मधून दारिद्रय रेषेखालील महिलांना घरघंटी पुरविणे या योजनेमधून ४२ लाभार्थ्यांना घरघंटी वाटप केलेले आहे. प्रती लाभार्थी रक्कम रुपये १९,४४७ प्रमाणे ९० टक्के अनुदानाच्या देयकातून आयकर रक्कम रुपये १६,९०६ इतका वसूल करणेत आलेला आहे.

उर्वरीत रक्कम रु. १,८८० प्रमाणक क्र. २२४, दिनांक २९ मार्च, २०१४ रक्कम रुपये ९४० व प्रमाणक क्र. १७, दिनांक २७ जून, २०१४ मधून रक्कम रुपये ९४० असे एकूण १,८८० इतकी रक्कम वसूल करून शासन सदरी भरणा केलेली आहे. तसेच मुल्यवर्धीत कराची ५ टक्के एकूण रक्कम रुपये ४०,८३८ प्रमाणक क्र. ९१, दिनांक ३० नोव्हेंबर, २०१५ रुपये १०,३९९ व प्रमाणक क्र. ९२, दिनांक ३० नोव्हेंबर, २०१५ रुपये १९,९९९ असे एकुण ३०,३९८ देयकातून व उर्वरित रक्कम रुपये १०,४४० पावती क्र. १०५९१२ दिनांक ७ जानेवारी, २०१६ रोजी वसूल करण्यात आली आहे.

सदर रक्कम धनाकर्षाने विक्रीकर कार्यालय रत्नागिरी येथे दिनांक २८ जानेवारी, २०१६ रोजी पाठविणेत आलेली असून सदर रक्कम विक्रीकर कार्यालयाने दिनांक ८ फेब्रुवारी, २०१६ रोजी शासन सदरी भरणा केली आहे.

(२) १० टक्के लाभार्थी हिस्सा रोखीने वसूल करून संबधित मक्तेदार साद एंटरप्रायझेस यांना रक्कम रुपये ८१,६९० इतकी प्रमाणक क्रमांक २२४ दिनांक २९ मार्च, २०१४ व प्रमाणक क्रमांक १७, दिनांक २७ जून, २०१४ ने अदा करण्यात आली आहे.

**(७) परिच्छेद क्रमांक ४.४३७/७ (सन २०१२-१३)**

**पंचायत समित्यांनी लेखापरीक्षणासाठी अभिलेख सादर न करणे.**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम ६ (३) प्रमाणे ज्या तारखेस लेखापरीक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग / पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरीक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद /पंचायत समित्या यांना अर्धमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरी सुद्धा लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखापरीक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेदांबाबत लेखापरिक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना १५ दिवसांचे आत सादर करणेबाबत सुचित केले जाते. तथापि, या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभिर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमूद केलेप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देऊन सुद्धा लेखापरीक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्यांबाबत लेखापरीक्षणात घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| ७ | रत्नागिरी | रत्नागिरी | २ | — |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

सदरचे अभिलेख व कागदपत्रे पंचायत समिती शिक्षण विभाग अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचे आहे. एकूण २५ प्राथमिक शाळांची शालेय पोषण आहाराची मासिक नोंदवही शाळा स्तरावरून उपलब्ध करून घेणेत आली असून सदरचे अभिलेख व कागदपत्रे कार्यालयात उपलब्ध करून ठेवणेत आले आहेत.

२५ प्राथमिक शाळांचे सादिल खर्चांचे डेडस्टॉक नोंदवह्या नमुना नं. ३२ व साठा नोंदवह्या नमुना नं. ३३ शाळास्तरावरून उपलब्ध करून ठेवणेत आले आहेत. संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून दंडाची रक्कम वसूल करून घेण्यात येत आहे.

**(८) परिच्छेद क्रमांक ४.४३७/८ (सन २०१२-१३)**

**पंचायत समित्यांनी लेखापरीक्षणासाठी अभिलेख सादर न करणे.**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम ६ (३) प्रमाणे ज्या तारखेस लेखापरीक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग / पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरीक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद /पंचायत समित्या यांना अर्धमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरी सुद्धा लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखापरीक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेदांबाबत लेखापरिक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना १५ दिवसांचे आत सादर करणेबाबत सुचित केले जाते. तथापि, या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभिर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमूद केलेप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देऊन सुद्धा लेखापरीक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्यांबाबत लेखापरीक्षणात घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| ८ | रत्नागिरी | राजापूर | १७ | २०,३१,७४० |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

परिच्छेदामध्ये नमूद केलेनुसार पंचायत समिती राजापूर, बांधकाम विभागाकडील सन २०१२-२०१३ मधील एकूण २३ कामांच्या नस्त्या व मोजमाप नोंदवह्या लेखा परिक्षणावेळी उपलब्ध करून देणेत आलेल्या नव्हत्या. सदरच्या सर्व २३ कामांच्या नस्त्या व मोजमाप नोंदवह्या आता या कार्यालयाकडे उपलब्ध असून लेखा परिक्षणास उपलब्ध करून देणेत येत आहेत.

तसेच दिनांक ३० मार्च, २०१६ च्या परिपत्रकान्वये संबंधित ज्या शाखा अभियंता यांनी फाईल्स तसेच मोजमाप नोंदवह्या लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिलेल्या नाहीत त्यांच्याकडून रक्कम रुपये २५,००० प्रमाणे दंड वसूल करणेची कार्यवाही करणेत येत आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

रत्नागिरी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २६ एप्रिल, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने असे निदेश दिले की, सन २०१२-१३ या वर्षाच्या लेखापरीक्षा पुर्नविलोकन अहवालातील परिच्छेद क्रमांक ३.२२४/९, ३.१०६९ (५)/१७, ४.६१/३६, ४.२१२/१५, ४.२४८/१९, ४.३८३/९, ४.४३७ (७)/२, ४.४३७ (८)/ १७ हे सर्व परिच्छेद लेखापरीक्षणास अभिलेखे सादर न करण्यासंदर्भातील आहेत. त्यामुळे या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस अहवाल सादर करावा व यासंदर्भात मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अन्वये २५ हजार रुपये दंड आकारावयाचा असून सेवापुस्तिकेत नोंदही घ्यावयाची आहे. तसेच, वेतनवाढ रोखण्यासंदर्भात देखील तरतूद आहे. ही सर्व कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपल्या स्तरावर करावी व समितीला एक महिन्याच्या आत अहवाल सादर करावा. त्यानंतर विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली :—**

(१) सन २०१२-१३ या अहवाल वर्षात लेखा परिक्षणास कागदपत्र उपलब्ध करून दिले नसल्याप्रकरणी संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर समितीच्या निदेशानुसार महाराष्ट्र स्थानिक लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अनुसार दंडाची व एक वेतनवाढ रोखून तशी नोंद संबंधितांचे सेवा पुस्तिकेमध्ये घेण्याची कारवाई केली आहे काय, त्यानुसार प्रकरण व परिच्छेद निहाय अहवाल वर्षाची माहिती समितीस सादर करण्यात यावी.

(२) भविष्यात लेखा परिक्षणास अभिलेख उपलब्ध न करून देणे असे आक्षेप वारंवार उपस्थित होऊ नयेत याबाबत काटेकोर अंमलबजावणी करण्यासंदर्भात मंत्रालयीन विभागाकडून कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे ?

(३) संबंधित अधिनियमात दुरुस्ती करून रुपये ५०,००० दंड अथवा परिच्छेदातील एकूण रकमेच्या १० टक्के इतकी रक्कम दंड म्हणून आकाराण्याची तरतूद करण्याची वित्त विभाग कारवाई करेल काय ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

**बांधकाम रत्नागिरी परिच्छेद क्र. ३.२२४/९ :-**

कर्ली देवघर येथे ग्रामपंचायत इमारत बांधणे ता.संगमेश्वर या कामाची पंजिका दिनांक १७ ऑक्टोबर, २०१३ ते दिनांक ७ नोव्हेंबर, २०१३ या कालावधीमध्ये झालेल्या स्थानिक निधी लेखा परीक्षणास या विभागाकडून उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. सदर नस्तीची तपासणी करून निरिक्षण टिपणीमध्ये मुद्दा क्र.९ नुसार परिच्छेद घेण्यात आलेला आहे. सदर परिच्छेदाची वेळीच पूर्तता करून सादर केलेली आहे. त्यामुळे संबंधितांनी लेखापरीक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून दिलेली आहेत. त्यामुळे संबंधितांकडून नोटीसा देऊन त्यांचेकडून खुलासा मागविणेत आलेला नाही.

**ग्रामपंचायत परिच्छेद क्र.३.१०६९ (५)/१७ :—**

सन २०१२-१३ अखेर एकूण ३१ ग्रामपंचायतींकडील १०३ घटकांचे अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध नव्हते. त्याबाबतचा खुलासा पुढील प्रमाणे आहे.

७ घटकांचे दप्तर ग्रामपंचायतीला लागलेल्या आगीत जळून खाक झालेले आहे. ३ घटकांचे दप्तर पुरात नष्ट, १५ घटक वाळवीमुळे नष्ट व एका घटकाचे दप्तर न्यायालयाने त्यांचेकडील दप्तर नाशन प्रक्रीयेत नष्ट केले असल्याने १८ घटकांचे लेखापरीक्षण पूर्ण झाल्याने सदरचे आक्षेप वगळण्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना कळविणेत आले आहे. तसेच एकूण १८ घटकांचे अभिलेखे उपलब्ध असल्याने लेखा परिक्षण करून घेण्याबाबत संचालक, स्थानिक निधी लेखा यांना कळविणेत आले आहे. उर्वरित ४१ घटकांचे दप्तर उपलब्ध नाही. त्यापैकी १५ घटकांकरीता रुपये २५,००० इतक्या दंडाच्या रकमेची वसुली करणेत आली आहे.

**पंचायत समिती, मंडणगड परिच्छेद क्र.४.६१/३६ :—**

इयत्ता ८ वी ते १० मध्ये शिक्षण घेत असलेल्या किशोरवयीन मुलींच्या रक्तामध्ये हिमोग्लोबीनचे प्रमाण वाढावे यासाठी नाविण्यपूर्ण योजने अंतर्गत ही योजना राबविण्यात आलेली असून सन २०१२-१३ च्या लेखापरीक्षण मुद्दा क्र.३६/२/१२-१३ नुसार पुढील आक्षेप नोंदविण्यात आले होते :—

(१) लाभार्थी मुलींचे योजना पूर्व व योजने नंतर हिमोग्लोबीनचे प्रमाण असलेचे प्रमाणपत्र

(२) आहार वाटप कालावधी माहिती

(३) लाभार्थी मुलींनाच वाटप केल्याचे लेखे

(४) लाडू वाटप साहित्य केव्हा खरेदी केले ? सदरचे लेखे उपलब्ध करून देईपर्यंत खर्च तात्पुरता अमान्य करण्यात आला होता.

या आक्षेपांनुसार गटशिक्षणाधिकारी मंडणगड यांनी संबंधित शाळांकडून वरील अभिलेखे एकत्रित करून प्रथम पूर्तता अहवालासोबत स्थानिक निधी लेखा कार्यालयास सादर केले होते. त्यामुळे लेखापरीक्षणासाठी कागदपत्रे उपलब्ध करून दिले नाहीत या कारणास्तव कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.

**पंचायत समिती, दापोली परिच्छेद क्र. ४.२१२/१५१ :—**

स्थानिक निधी लेखापरीक्षण सन २०१२-१३ मध्ये लेखापरीक्षास आवश्यक अभिलेख तपासणीकरीता सादर करण्यात आलेले होते. तसेच अभिलेखात टँकरची भारमर्यादा (INTD Capacity) १२ मेट्रीकटन असलेबाबतचे भारमर्यादा प्रमाणपत्र अभिलेखात

आढळून आलेले नाही. असे स्थानिक निधीच्या मुळ लेखापरक्षिणास आक्षेप घेण्यात आलेला आहे. सोबत स्थानिक निधी लेखापरीक्षण अहवाल सन २०१२-१३ चे मूळ आक्षेप जोडण्यात येत आहे. तसेच आरसीबुकची छायांकित प्रत लेखापरीक्षण झाल्यानंतर उपलब्ध करून देण्यात आली आहे. आरसी बुकची छायांकीत प्रत या सोबत जोडण्यात येत आहे.

(२) लेखा परिक्षणास आवश्यक अभिलेख उपलब्ध करून देण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

(३) स्थानिक निधी लेखापरीक्षणास आवश्यक ते अभिलेखे वेळीच उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.

**पंचायत समिती, राजापूर परिच्छेद क्र.४.२४८/१९ :—**

सदर परिच्छेदातील घेणेत आलेला आक्षेप क्रमांक-८ मध्ये मुंबई स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० चे कलम ६ अ व ६ ब नुसार पत्र क्रमांक-५ दिनांक ८ ऑक्टोबर, २०१३ ने देवून सुद्धा अभिलेखे उपलब्ध केले नाहीत असे नमूद केले आहे. तथापि सदरचे परिच्छेदामध्ये क्रमांक ०१ ते ०७ असे ०७ आक्षेप व त्यानंतरचा ०९ नंबरचा आक्षेप लेखापरीक्षणासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे उपलब्ध करून दिलेनंतरच घेणेत आलेला असल्याने संबंधितावर दंडात्मक अथवा वेतनवाढ रोखणेची कारवाई करणेत आलेली नाही. सदरची कागदपत्रे आता लेखा परिक्षणास उपलब्ध करून देणेत येत आहेत.

**पंचायत समिती, रत्नागिरी परिच्छेद क्र.४.३८३/९**

सदर परिच्छेद क्र.४.३८३/९ लेखापरीक्षणाचे वेळी कागदपत्रे दाखविण्यात आलेली नाहीत असे नाही. घरघंटी खरेदीबाबत लेखापरीक्षणाला कागदपत्रे दाखविणेत आलेली होती.

**पंचायत समिती, रत्नागिरी परिच्छेद क्र.४.४३७(७)/२**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० कलम (७) (१) अन्वये लेखा परिक्षणास कागदपत्रे सादर न केलेने दंडात्मक कारवाई करून संबंधित कर्मचा-यांकडून एकूण रक्कम रुपये २५,००० इतका दंड सा.पा.क्र.१४७१५९ दिनांक १७ एप्रिल, २०१८ अन्वये वसूल करणेत आलेला आहे. सदरचा दंड शासन सदरी जमा करणेत आलेला आहे. तसेच या कार्यालयाकडील पत्र क्र.पंसर/शिक्षण/आ-४/३९५१/१८ दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ ने संबंधितांना नोटीस काढून खुलासा मागविणेत आलेला आहे.

**पंचायत समिती, राजापूर परिच्छेद क्र.४.४३७(८)/१७**

लेखापरीक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न दिलेबाबत तत्कालीन उपअभियंता, श्री. निवृत्ती महादेव सुतार यांचेकडून दंडाची रक्कम रुपये २५,००० पावती क्र.१३७२८१, दिनांक २५ एप्रिल, २०१८ वसूल करणेत आलेली आहे. तत्कालीन उपअभियंता, श्री.निवृत्ती महादेव सुतार हे दिनांक ३१ जानेवारी, २०१४ रोजी सेवानिवृत्त झाले असल्याने त्यांचे मूळ सेवापुस्तकात नोंद करण्यात आलेली नाही.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :- (वित्त-७)**

(१) महाराष्ट्र स्थानिक लेखापरीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावर करण्यात येते.

(२) महालेखापाल व स्थानिक निधी लेखा परिक्षण सुरू असताना त्यांना लेखा परिक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध करून देणेसाठी नोडल ऑफीसरची नियुक्ती करण्याबाबतच्या सूचना सर्व जिल्हा परिषदांना या विभागाच्या परिपत्रक क्र. लेखाप-२०१३/(७/९३) वित्त-८ दिनांक ११ जानेवारी, २०१३ व परिपत्रक क्र. पंरास-२०१५/प्र.क्र.२८/वित्त-७ दिनांक ३० मार्च, २०१६ अन्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने रत्नागिरी जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ जुलै, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीस अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी माहिती दिली की, प्रस्तुत प्रकरणामध्ये पूर्णपणे २५ हजार रुपयांची वसुली संबंधितांकडून केलेली आहे. त्याबाबतचे परिपत्रक देखील निर्गमित केलेले आहे. यावर समितीने विचारणा केली की, सेवा पुस्तिकेत याची नोंद घेतलेली आहे का, यावर अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी खुलासा केला की, होय, २५ हजार रुपयांचे वसूलीचे प्रोव्हिजन केलेले आहे. केवळ दोन प्रकरणांमध्ये ३० हजार रुपये शिल्लक आहेत. दहा-दहा हजार वसूल झालेले आहेत. याबाबत उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांना प्राधिकृत केलेले आहे. यावर समितीने उर्वरित वसुली देखील लवकर करण्यात यावी असे निदेश दिले.

**अभिप्राय व शिफारशी**

रत्नागिरी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या समवेत झालेल्या साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, सन २०१२-१३ च्या स्थानिक निधी लेखा परिक्षणाच्या वेळी लेखा परिक्षकांस ते तपासणी करीत असताना त्यांनी मागितलेली कागदपत्रे संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी दाखविली नाहीत. सन २०१२-१३ या वर्षाचे एकूण ८ परिच्छेदांच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार रुपये २५००० इतकी दंडाची शास्ती तसेच एक वेतनवाढ रोखण्याची कारवाई करून तशी नोंद संबंधितांचे सेवा पुस्तिकेमध्ये घेण्याची कारवाई करण्याची शिफारस करून देखील काही अधिकारी या नियमास न जुमानता लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून देत नाहीत.

समिती राज्यात अनेक ठिकाणी भेट देत असताना लेखा परीक्षकांना अभिलेखे संबंधित अधिका-यांकडून वेळीच उपलब्ध करून दिले जात नाहीत. त्यामुळे लेखापरीक्षण करता येत नाही. या बाबींचा फायदा संबंधितांकडून घेतला जातो हे टाळण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या दंडात्मक तरतुदीत बदल करणे आवश्यक आहे. सदर बाब विचारात घेता आता समिती अशी शिफारस करीत आहे की, **'जी कोणतीही व्यक्ती कलम ६ पोटकलम (१) खंड (अ) किंवा खंड (ब) अन्वये कायदेशीररित्या तिला केलेल्या कोणत्याही आज्ञेचे पालन करण्यात जाणूनबुजून दुर्लक्ष करेल किंवा तिचे अनुपालन करण्याचे नाकारेल ती विभागीय आयुक्तांपुढे सदर बाब सिद्ध झाल्यानंतर लेखापरीक्षणास उपलब्ध न झालेले दस्तऐवज/अभिलेख यामध्ये गुंतलेल्या एकूण रकमेच्या ५ टक्के किंवा रुपये ५०,००० यापैकी जास्त असणा-या रकमे इतक्या दंडात्मक रकमेस पात्र ठरविण्यात यावी. तसेच त्यांची एक वेतनवाढ रोखण्याची कारवाई करून तशी नोंद संबंधितांच्या सेवा पुस्तिकेमध्ये घेण्याची कारवाई करण्यात यावी' अशी सुधारणा संबंधित अधिनियमात करण्यात यावी व करण्यात आलेल्या रक्कमेबाबतची माहिती समितीला कळविण्यात यावी.**

ज्या प्रकरणामध्ये अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आलेली नाहीत, त्या प्रकरणांमध्ये दंडात्मक कारवाई केलेली दंड आकारणी करण्यात यावी. समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी केलेल्या अनुपालन अहवालामध्ये सदर अभिलेखे उपलब्ध असल्याचे स्पष्टीकरण केले आहे. मात्र सदर अभिलेखे लेखापरिक्षणाच्या वेळी उपलब्ध करून देणे आवश्यक होते. **रत्नागिरी जिल्हा परिषदेद्वारे सन २०१२-१३ या वर्षामध्ये एकूण ८ परिच्छेदांसंदर्भात लेखा परिक्षणाच्यावेळी अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आलेले नसल्यामुळे अशा परिच्छेदासंदर्भात महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ६ मधील पोटकलम (१) खंड (अ) किंवा खंड (ब) नुसार कायदेशीर कारवाई करून वसूल केलेली रक्कम व गुंतलेली एकूण रक्कम याबाबतचा सविस्तर अहवाल समितीला दोन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण अकरा

## जिल्हा परिषद, रत्नागिरी

**सर्वसाधारण शिफारशी**

**१. गैरव्यवहार/अपहार/अखर्चित रकमा जमा करण्याबाबत**

समितीने राज्यातील जिल्हा परिषदांना भेटी दिल्या असता विशेषतः रत्नागिरी जिल्हा परिषदेत गैरव्यवहार व अपहाराच्या मोठमोठ्या रकमा वसुलीविना प्रलंबित आहेत. अशी अनेक प्रकरणे समितीसमोर तपासणीसाठी आली असता समितीने या प्रकरणात सदरच्या रकमा शासन खाती जमा करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निदेशित केले आहे. सदर गैरव्यवहाराची/अपहाराची अनेक प्रकरणे असून ती जुनी आहेत. जिल्हा परिषदांनी वेळीच कार्यवाही केली असती तर शासनाचा कोट्यवधी रुपयांचा निधी या प्रकरणांमध्ये अडकून पडला नसता व तो वेळीच वसूल झाला असता. जिल्हा परिषदांनी सदरच्या रकमा संबंधितांवर प्रशासकीय कारवाई करून वसूल केल्या असत्या तर या रकमा केंव्हाच शासन खाती जमा झाल्या असत्या. शासनाचा विविध योजनांवरील निधी हा गैरव्यवहाराने जेव्हा हडपला जातो तेव्हा त्या त्या योजना राबविताना त्यात निश्चितच मोठ्या प्रमाणावर अनियमितता होऊन योजनेच्या फलनिष्पत्तीवर त्याचा विपरीत परिणाम होतो असे समितीला आढळून आले आहे. जिल्हा परिषदांकडून त्यांच्या कर्मचा-यांवर कारवाई करण्यात विलंब होत असल्यामुळे जिल्हा परिषदा अशा कर्मचा-यांना पाठीशी घालत असून त्यांचेवरील संभाव्य कार्यवाहीस पुढे ढकलण्याचा प्रयत्न करताना दिसतात. त्याद्वारे एकप्रकारे शासनाचा निधी वेळीच वसूल होत नसल्यामुळे याबाबत मोठ्या प्रमाणात प्रशासकीय अनियमितता होत असल्याचे समितीला आढळून आले आहे. **याप्रकरणी समिती अशी शिफारस करीत आहे की, जिल्हा परिषदेची योजना राबविताना संबंधित योजनेत एखादा गैरव्यवहार अथवा अपहार उघडकीस आला असल्यास त्या गैरव्यवहारासंदर्भात कोणत्याही परिस्थितीत तीन महिन्यात दोषारोपपत्र दाखल करून असे प्रकरण सहा महिन्यात निकाली काढण्यासंदर्भात शासनाने निश्चित अशी भूमिका घ्यावी त्याचप्रमाणे अशी कार्यवाही मुदतीत पूर्ण करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेच्या संबंधित विभाग प्रमुखांवर सोपविण्यात यावी व असे विभाग प्रमुख गैरव्यवहाराच्या अथवा अपहाराच्या रकमा सहा महिन्यात शासन खाती जमा करण्यात अयशस्वी झाल्यास त्यांचेविरुध्द जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर त्या प्रकरणी शिस्तभंगाची कार्यवाही करण्याबाबत विभागाने ठोस भूमिका घ्यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

शासनाकडून एखादी योजना राबविताना कोट्यवधी रुपयांचा निधी तरतुदी करून मिळविला जातो व असा निधी वेळेत खर्च केला जात नाही व तो शासन खाती जमादेखील केला जात नाही. त्यामुळे वित्तीय बाबीत मोठ्या प्रमाणावर अनियमितता होत असून संबंधित अधिका-यांकडून रकमा वेळीच खर्च करण्याबाबत कमालीचा हलगर्जीपणा करण्यात येतो. कोट्यवधी रुपये अखर्चित ठेवल्यामुळे शासनाला असा निधी आवश्यक असणा-या अत्यंत महत्वाच्या योजनांवर खर्च करता येत नाही. पर्यायाने विविध भौगोलिक भागातील निधी वाटपातील असंतोष वाढतो. खर्चाच्या बाबतीतील अनियमितता व योजना राबविण्याच्या कामातील अधिका-यांद्वारा होत असलेला हलगर्जीपणा हा प्रशासकीयदृष्ट्या अत्यंत गंभीर असून त्यामुळे अखर्चित निधी राहून तो दुस-या महत्वाच्या योजनांवर खर्च केला जात नाही. **म्हणून एखाद्या योजनेसाठी मागितलेला निधी त्या योजनेची उपयुक्तता तसेच जनसामान्यांच्या हिताचा विचार करून राबविणे आवश्यक आहे. जनतेला देय असलेल्या सुविधा योजना राबवून वेळीच मिळत नसल्याने जनतेत नैराश्य व संतापाच्या भावना वाढीस लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता अखर्चित रकमांवर बंधन टाकण्यासंदर्भात शासनाने यासंदर्भात कडक धोरण आखून त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात जिल्हा परिषदांना एका परिपत्रकाद्वारे कळविण्यात यावे अशीही समितीची शिफारस आहे.**

**गैरव्यवहार/अपहार/अखर्चित रकमा जमा करण्यासंदर्भात समितीने उपरोक्तप्रमाणे केलेल्या शिफारशीनुसार यासंदर्भात शीघ्रतेने कार्यवाही करून रत्नागिरी जिल्हा परिषदेमधील रक्कमा शासन खाती जमा करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी व पंचायती राज समितीने तपासणी केलेल्या अहवालासंदर्भात एकूण किती रकमेची शासन खाती वसुली केली याबाबीची माहिती समितीला कळविण्यात यावी, अशीही समितीची शिफारस आहे.**

**२. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणे :**

समितीने रत्नागिरी जिल्हा परिषदेला भेट दिली असता अनेक लेखा परिच्छेदांमध्ये लेखा परीक्षकांना संबंधित लेख्यांवरील कागदपत्रे उपलब्ध करून दिली नसल्याने त्याबाबतचा अंतिम अभिप्राय लेखा परिक्षकांस व्यक्त करता आला नाही. याबाबत समितीने असे लेखे विचारात घेतले असता अनेक प्रकरणात लेखा परीक्षणाच्या वेळी कागदपत्रे उपलब्ध नव्हती आता उपलब्ध आहेत असे समितीला सांगण्यात आले. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध नव्हती त्याची कारणे काय या शोधात समितीला अनेक गंभीर बाबी निदर्शनास आल्या.

**मुळात कागदपत्रे उपलब्ध असतानाही ते लेखा परिक्षणास न दाखविणे ही गंभीर बाब आहे. तो सरळ शिस्तभंगाचा प्रकार आहे. लेखा परीक्षक सुरूवातीला कागदपत्रे उपलब्ध करून देण्यासाठी चार महिन्यांचा वेळ देतात व त्यानंतर पुन्हा दोन महिन्यांचा कालावधी संबंधितांना दिला जातो. असे असूनदेखील संबंधित अधिकारी लेखा परीक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून देत नाहीत. मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ मध्ये सन २०११ पूर्वी लेखा परीक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करून देणा-या अधिका-यास केवळ १०० रुपयांचा दंड आकारण्यात येत असे. कदाचित त्यामुळे लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध होत नसतील अशी समितीने भावना व्यक्त केल्यानंतर शासनाने सन २०११ मध्ये उक्त अधिनियमाच्या कलम ७ मध्ये सुमारे २५,००० रुपये (पंचवीस हजार रुपये) दंडाच्या रकमेची तरतूद केली आहे. समितीने या प्रकरणी जिल्हा परिषदांना ज्या कोणी लेखा परीक्षणाचे वेळी लेखा परिक्षकांस कागदपत्रे उपलब्ध करून दिली नाहीत अशा जबाबदार असणा-या सर्व संबंधितांना अधिनियमातील तदतुदीनुसार रुपये २५,००० इतका दंड आकारण्याची शास्ती करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार रत्नागिरी जिल्हा परिषदेमध्ये अशा किती व्यक्तींना प्रत्येक प्रकरणी दंड करण्यात आला व एकूण किती रक्कम शासन खाती जमा करण्यात आली याची संपूर्ण माहिती प्रकरणनिहाय समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**३. नियमानुसार व नैसर्गिक न्याय तत्वाला अनुसरुन दोषीतांवर कारवाई करण्याबाबत :**

संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीततेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, प्रभावी व अर्थपूर्ण असे नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे म्हणून कार्यकारी प्रशासन राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी पंचायती राज समितीची रचना करण्यात आली. समितीला अधिकार मिळाल्यावरुन समितीने अनेक प्रकरणात दोषीतांवर कार्यवाही करण्याबाबत शासनाला निर्देश दिले आहेत. असे निर्देश देत असताना समितीने एखाद्या अधिकारी/कर्मचा-याची प्रथमदर्शनी चूक आढळून देखील संबंधित दोषींविरुध्द जाणीवपूर्वक निलंबनाची कारवाई प्रस्तावित केली जात नाही. भारतीय संविधानाने प्रत्येकाला समान संधी देण्याचे धोरण अंगिकारल्याने कारवाई करतानादेखील दोषीताने तो निर्दोष असल्याचे अभिकथन करणे आवश्यक आहे असे समितीला प्रकर्षाने वाटते. कोणत्याही निर्दोष व्यक्तीवर दोष लादले जाणे हे नैसर्गिक न्याय तत्वाला अनुसरुन नाही असे समितीला वाटते. म्हणून प्रशासनाने कार्यवाही करताना कोणत्याही निर्दोष व्यक्तीला शास्ती करून नये आणि दोषी व्यक्तीला कोणत्याही परिस्थितीत शास्तीविना सोडू नये असे समितीला वाटते. भेटीच्या वेळी संबंधित प्रकरणाची निःष्पक्षपणे चौकशी करून चौकशी अहवालामध्ये दोषीविरुद्ध कार्यवाही करून त्यास शिक्षा करणे योग्य आहे. **तथापि, एखाद्या निर्दोष व्यक्तीवर कार्यवाही केल्यास ती समितीच्या सूचनेनुसार कार्यवाही केली असे म्हणणे ही बाब समाजाची लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास उडवणारी आहे. जनमानसात समितीची भूमिका ही प्रशासनाने केलेल्या चांगल्या व वाईट बाबींना शोधून काढून त्यातून जनतेप्रती महत्वाची कामे कशी केली जातील याबाबतची प्रतिमा उभी करणे हे संसदीय लोकशाहीने दिलेले एक कर्तव्य आहे. समितीची नाहक बदनामी काही कर्तव्यपारायणवत व सचोटी नसलेले अधिकारी निर्माण करतात आणि जाणीवपूर्वक वैयक्तिक द्वेषापोटी, हेवेदाव्यापोटी निर्दोष व्यक्तींवर कार्यवाही करून समितीची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतात. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सतर्क राहणे आवश्यक असून एखादा गुन्हेगार सुटत असताना त्यास नैसर्गिक न्याय मिळेल परंतु एखाद्या निर्दोष व्यक्तीला शिक्षा होता कामा नये ही समितीची भूमिका असल्यामुळे समितीने ज्या ज्या प्रकरणांमध्ये चौकशी करण्याचे निर्देश दिलेले आहेत. अशा सर्व प्रकरणांमध्ये दोषारोपांची चौकशी करताना सर्व संबंधित व्यक्तींना नैसर्गिक न्याय तत्वानुसार तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार संपूर्ण वस्तुस्थिती विचारात घेतल्यानंतरच निःपक्षपातीपणे कार्यवाही करून दोषींना शास्ती तर निर्दोषींना मुक्ती या तत्वानुसार कारवाई करण्यात यावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

# रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या
# सन २०१३-२०१४ च्या
# वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात

प्रकरण एक

## जिल्हा परिषद, रत्नागिरी (प्रशासन)

### रत्नागिरी जिल्हा परिषदेमध्ये बांधकाम व पाणीपुरवठा विभागांमध्ये रिक्त असलेली पदे, रत्नागिरी जिल्हयाच्या एमआयडीसी मधील सी.एस.आर.निधीचा खर्च व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व एमआयडीसी मधील अधिकारी जिल्हा परिषद बैठकींना उपस्थित राहत नसल्याबाबत.

पंचायती राज समितीने दिनांक २६ ते २८ एप्रिल, २०१८ या कालावधीत रत्नागिरी जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१३-१४ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान रत्नागिरी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेच्या बांधकाम व पाणीपुरवठा विभागातील कार्यकारी अभियंत्याचे पद रिक्त आहे. किती तरी अधिका-यांकडे विभाग प्रमुखांचा प्रभारी कार्यभार आहे. अशा परिस्थितीत जिल्हा परिषद चालविली जात आहे. पशुसंवर्धन विभागात ६० टक्के पदे रिक्त आहेत. समिती रत्नागिरी जिल्हा परिषदेतील सर्व रिक्त पदांचा आढावा घेणार आहे. जिल्हा परिषदेमधील रिक्त पदांबाबत सचिवांची साक्ष आयोजित करण्यात यावी.

जिल्हा परिषद, सदस्य, यांनी समितीस विशद केले की, एमआयडीसीमध्ये केमिकल झोन असून त्याकरिता २ टक्के सीएसआर निधी मिळतो. तो निधी स्थानिक लोकांसाठी खर्च करावा असा नियम आहे. परंतु याबाबत रत्नागिरी जिल्हयात अंमलबजावणी केली जात नाही. एमआयडीसी असलेल्या लोटे, भोसरे आणि धामण या ३ जिल्हा परिषद गटांमध्ये सर्वात जास्त रुग्ण आढळून येत आहेत. या संदर्भात कंपन्यांकडून खर्च केला जात नाही. यावर समितीने सांगितले की, नवीन कायद्यानुसार प्रथम सीएसआर खर्च करणे अत्यावश्यक आहे. यावर सदस्य, जिल्हा परिषद, यांनी समितीस विशद केले की, सन १९८३ पासून कंपनी असून त्यांच्याकडून सीएसआरचा निधी खर्च केला जात नाही. यावर समितीने निदेश दिले की, सीएसआरचा निधी खर्च करणे बंधनकारक आहे. यासंबंधी विवरण (डेटा) तयार करावे व सदर माहिती समितीकडे सादर करावी.

तद्नंतर सदस्य, जिल्हा परिषद, यांनी समितीस आणखी असे विशद केले की, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ किंवा एमआयडीसी यांचे विभाग प्रमुख जिल्हा परिषदेने आयोजित केलेल्या बैठकांना बोलावून सुद्धा उपस्थित राहत नाहीत. यावर समितीने निदेश दिले की, या संदर्भात आपण सदर विभाग प्रमुखांना बैठकींना उपस्थित राहण्याबाबत १५ दिवस अगोदर लेखी पत्र देऊन कळवू शकतात. सदर विभाग प्रमुख एखाद्या बैठकीच्या वेळी महत्वाचे कारण असल्यास गैरहजर राहू शकतात, परंतु ते नेहमी बैठकींना विनाकारण गैरहजर राहू शकत नाही. पुढे समितीने विचारणा केली की,सदर पत्र कोणाच्या सहीने पाठविले जाते. यावर सदस्य, जिल्हा परिषद, यांनी समितीस विशद केले की, विषय समितीच्या सचिवांच्या सहीने त्यांना सदर बैठकीला उपस्थित राहण्याबाबत कळविले जाते.

समितीने याबाबत असे निदेश दिले की, रितसर पत्र पाठविल्यानंतर विभाग प्रमुखांनी बैठकीला उपस्थित राहणे आवश्यक आहे. परंतु असे घडत नसल्यास आपण मुख्य कार्यकारी अधिकारी, यांच्या सहीने सदर विभाग प्रमुखांना बैठकीला उपस्थित राहण्याबाबत पत्र पाठवावे. तसेच सदर पत्राची प्रत जिल्हाधिकारी यांच्याकडे द्यावी. यावर सदस्य, जिल्हा परिषद, यांनी समितीस विशद केले की, याबाबत माननीय मुख्य सचिवांपर्यंत सदर माहिती कळविली आहे. यावर समितीने निदेश दिले की, या संबंधी संबंधित विभागाच्या सचिवांची साक्ष घ्यावी लागेल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) रत्नागिरी जिल्हा परिषदेमध्ये बांधकाम व पाणीपुरवठा विभागांमध्ये कार्यकारी अभियंत्यांची पदे रिक्त आहेत. बहुतांश अधिका-यांकडे विभाग प्रमुखांचा प्रभारी कार्यभार देण्यात आलेला आहे. तसेच पशुसंवर्धन विभागात ६० टक्के पदे रिक्त आहेत, सदरहू रिक्त पदांचा आढावा ग्रामविकास विभागाने घेतलेला आहे काय, असल्यास त्यानुसार रिक्त पदे भरण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(२) रत्नागिरी जिल्हयाच्या एमआयडीसी मध्ये केमिकल झोन असून त्यातील कंपन्याकडून मिळणारा २ टक्के सीएसआर निधी स्थानिक लोकांच्या कल्याणकारी कामांसाठी खर्च करावा असा नियम असतानाही रत्नागिरी जिल्हयामध्ये सीएसआर निधी खर्च करण्याची अंमलबजावणी होत नसल्याप्रकरणी उद्योग व पर्यावरण विभागाने कोणती कार्यवाही केली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत.

(३) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ आणि औद्योगिक विकास महामंडळाचे विभाग प्रमुख जिल्हा परिषदेने आयोजित केलेल्या बैठकींना लेखी पत्राद्वारे कळवून सुद्धा अनुपस्थित राहत असल्या प्रकरणी पर्यावरण तसेच उद्योग विभागाने संबंधितांविरूद्ध चौकशी करून कोणती कारवाई केली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**बांधकाम विभाग :-** कार्यकारी अभियंता व उप अभियंतांच्या रिक्त पदांची स्थिती खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | पदांचे नावे | मंजूर पदे | ३१.०३.२०१८ अखेर रिक्त पदे | ३१.१२.२०१८ अखेर रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता | ०२ | ०२ | ०२ |
| २ | उप अभियंता | ११ | ०६ | ०१ |
| | **एकूण ...** | **१३** | **०८** | **०३** |

मा.प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांना जावक क्रमांक २७६६/२०१८ दिनांक २५ मे, २०१८ अन्वये या जिल्हयातील कार्यकारी अभियंता ०२ पदे व उप अभियंता ०६ पदे रिक्त असल्याने सदरची पदे भरण्याबाबत विनंती करण्यात आलेली होती. त्याप्रमाणे ०५ उप अभियंत्यांची पदे भरलेली असून शासन आदेश क्रमांक टीएफएस १११८/प्र.क्र.२२५ (६) / सेवा-१ दिनांक ०४ जानेवारी, २०१९ अन्वये कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग रत्नागिरी-१ नियुक्ती करण्यात आलेली असून अद्याप रुजू झालेले नाहीत.

**ग्रामीण पाणीपुरवठा :-** ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडील कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांची रिक्त पदांची स्थिती खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | पदांचे नावे | मंजूर पदे | ३१.०३.२०१८ अखेर रिक्त पदे | ३१.१२.२०१८ अखेर रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता | ०१ | ०१ | ०१ |
| २ | उप अभियंता | १२ | ०६ | ०६ |
| | **एकूण ...** | **१३** | **०७** | **०७** |

सदर रिक्त पदे भरणेबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचे मार्फत मा.प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई व मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांना खालील संदर्भान्वये अर्धशासकीय पत्राद्वारे सदर रिक्त पदी अधिका-यांची नियुक्ती करणेबाबत कळविण्यात आले आहे.

१ मा.मु.का.अ.जि.प.रत्नागिरी यांचेकडील अ.शा.प.क्र.रजिप/ग्रापापु/आस्था-२/३४४८ दि.०२/०८/२०१६

२ मा.मु.का.अ.जि.प.रत्नागिरी यांचेकडील अ.शा.प.क्र.रजिप/ग्रापापु/आस्था-२/७५५८ दि.२७/१२/२०१६

३ मा.मु.का.अ.जि.प.रत्नागिरी यांचेकडील अ.शा.प.क्र.रजिप/ग्रापापु/आस्था-२/३४१ दि.२०/०१/२०१७

४ मा.मु.का.अ.जि.प.रत्नागिरी यांचेकडील अ.शा.प.क्र.रजिप/ग्रापापु/आस्था-२/१३८० दि.३०/०३/२०१७

मजिप्रा कडील आदेश जा.क्र.मजिप्रा-२०१८/प्र.क्र.१०८/आ-६ दिनांक ०३ जानेवारी, २०१९ अन्वये ०३ उप अभियंत्यांची नेमणूक झाली असून अद्याप रुजू झालेले नाहीत.

**पशुसंवर्धन विभाग :-** पशुसंवर्धन विभागाकडील अधिका-यांची रिक्त पदांची स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | पदांचे नावे | मंजूर पदे | ३१.०३.२०१८ अखेर रिक्त पदे | ३१.१२.२०१८ अखेर रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी | ०१ | ०० | ०० |
| २ | पशुधन विकास अधिकारी | २९ | २३ | २२ |
| | पशुधन विकास अधिकारी (गट-ब) | ०४ | ०३ | ०३ |
| | **एकूण ...** | **३४** | **२६** | **२५** |

सन २०११ पासून पशुधन विकास अधिकारी गट अ व ब ची पदे सातत्याने रिक्त असून सदर रिक्त पदे भरणेबाबत दरवर्षी मा.आयुक्त पशुसंवर्धन महाराष्ट्र राज्य, पुणे व शासनाकडे खालीलप्रमाणे पाठपुरावा करणेत आलेला आहे.

१. पत्रक.रजिप/पसंवि/कार्या-२/१४२०/२०११ दि.१६/०७/२०११

२. पत्रक.रजिप/पसंवि/कार्या-२/८०५/२०१२ दि.१३/०४/२०१२

३. पत्रक.रजिप/पसंवि/कार्या-२/११४३/२०१२ दि.०६/०६/२०१२

४. पत्रक.रजिप/पसंवि/कार्या-२/२२९०/२०१२ दि.१६/११/२०१३

५. पत्रक.रजिप/पसंवि/कार्या-२/२२२१/२०१३ दि.०३/०८/२०१३

६. मा.अध्यक्ष जिल्हा परिषद रत्नागिरी यांजकडील दि.२४/१२/२०१३ चे पत्र

७. पत्रक.रजिप/पसंवि/कार्या-२/४४५/२०१५ दि.१८/०३/२०१५

८. अ.शा.पत्रक. रजिप/पसंवि/कार्या-२/१०३१/२०१५ दि.२४/०६/२०१५

९. अ.शा.पत्र रजिप/पसंवि/कार्या-२/१६५३/२०१६ दि.०३/०८/२०१६

१०. अ.शा.पत्र रजिप/पसंवि/कार्या-२/१७०६/२०१७ दि.१८/०९/२०१७

११. अ.शा.पत्र रजिप/पसंवि/कार्या-२/११११/२०१८ दि.२३/०५/२०१८

१२. अ.शा.पत्र रजिप/पसंवि/कार्या-२/२४७९/२०१८ दि.१३/१२/२०१८

(२) रत्नागिरी जिल्हयाच्या एमआयडीसी मध्ये केमिकल झोन असून त्यातील कंपन्याकडून मिळणारा २ टक्के सीएसआर निधी स्थानिक लोकांच्या कल्याणकारी कामांसाठी खर्च करण्याबाबतची अनौपचारीक चर्चा पंचायती राज समितीच्या भेटी दरम्यान उपस्थित झाली होती. सदर कंपन्याकडून याबाबत अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने शासनस्तरावरून धोरणात्मक कार्यवाही अपेक्षित आहे.

(३) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे स्थानिक अधिकारी यांनी जिल्हा परिषद रत्नागिरीच्या सर्वसाधारण सभा व स्थायी समिती सभेला उपस्थित रहाणेसाठी खालील प्रमाणे पत्र/सभेचे नोटीस पाठविण्यात आली आहे.

(१) या कार्यालयाचे पत्र क्रमांक २९४१ दिनांक १८/५/२०१७

(२) या कार्यालयाचे पत्र क्रमांक ४३३९ दिनांक ११/८/२०१७

(३) या कार्यालयाचे पत्र क्रमांक ५३५५ दिनांक २/११/२०१७

(४) या कार्यालयाचे पत्र क्रमांक ११८१ दिनांक ९/३/२०१८

(५) या कार्यालयाचे पत्र क्रमांक ४०५४ दिनांक २०/८/२०१८

(६) या कार्यालयाचे पत्र क्रमांक ५०९१ दिनांक १५/११/२०१८

(७) या कार्यालयाचे पत्र क्रमांक ३४५१ दिनांक २६/३/२०१८

(८) या कार्यालयाचे पत्र क्रमांक २०७४ दिनांक २१/४/२०१८

(९) या कार्यालयाचे पत्र क्रमांक २७४५ दिनांक ३१/५/२०१८

(१०) या कार्यालयाचे पत्र क्रमांक ३४०९ दिनांक १२/७/२०१८

(११) या कार्यालयाचे पत्र क्रमांक ३५२९ दिनांक २१/७/२०१८

(१२) या कार्यालयाचे पत्र क्रमांक ३९३३ दिनांक १३/८/२०१८

(१३) या कार्यालयाचे पत्र क्रमांक ४३०९ दिनांक ११/९/२०१८

स्थानिक अधिकारी जिल्हा परिषदेने आयोजित केलेल्या बैठकांना उपस्थित न राहिल्याने जिल्हयाचे विभाग प्रमुख या नात्याने मा.जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना १) राजिप/ साप्रवि/परिषद/३५९३/२०१६ दिनांक २०/०७/२०१६. २)) राजिप/ साप्रवि/परिषद/२७७९/२०१८ दिनांक ०१/०६/ २०१८ अन्वये संबंधित अधिका-यांनी उपस्थित रहावे याकरिता विनंती करण्यात आली होती. त्यानुसार मा. जिल्हाधिकारी, रत्नागिरी कार्यालयाकडूनही १) ससाशा/कार्या-१३/कवि-११७४/२०१६ दिनांक ९/०८/२०१६ २) ससाश/जिबी-एल-४/कवि ७६१/२०१८ दिनांक ०२/०७/२०१८ अन्वये उपस्थित रहाणे बाबत व त्यांची अनुपस्थिती गंभीर स्वरूपाची असले बाबत कळविणेत आले होते.

तसेच कार्यालयीन पत्र क्र. ५६७७ दिनांक २१/१२/२०१८ ने मा. प्रधान सचिव, पर्यावरण विभाग,मंत्रालय मुंबई यांना त्यांचे नियंत्रणाखालील जिल्हा स्तरावरील अधिकारी यांना सदर बैठकीसाठी उपस्थित रहाणे बाबत आदेश होणे कामी विनंती करणेत आली आहे.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे प्रतिनिधी दिनांक १३/१२/२०१७, १९/०९/२०१८ व दिनांक २८/१२/२०१८ रोजीच्या स्थायी समिती सभेला उपस्थित होते.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय :**

**ग्रामविकास विभागाचा अभिप्राय :-** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम, २४३ अन्वये जिल्हा परिषदेतील महाराष्ट्र विकास सेवेतील वर्ग १ व वर्ग २ च्या संवर्गातील पदे संबंधित प्रशासकिय विभागामार्फत प्रतिनियुक्तीने भरण्यात येतात.

जिल्हा परिषदांमधील उपरोक्त वर्ग १ व वर्ग २ संवर्गातील रिक्त पदांच्या अनुषंगाने त्रैमासिक आढावा घेवून सदर रिक्त पदे भरण्याबाबत वेळोवेळी संबंधित प्रशासकिय विभागाकडे पाठ पुरावा करण्यात येतो.

**सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे अभिप्राय :-** महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ या प्रक्रियेमध्ये सहभागी नसते.

**उद्योग विभागाचे अभिप्राय :-** केंद्र सरकारच्या कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने कंपनी कायदा -२०१३ कलम १३५ व अनुसूची ७ संदर्भात अधिसूचना काढून ०१ एप्रिल, २०१४ पासून कंपन्यांसाठी उद्योजकांचे सामाजिक उत्तरदायित्वा यासंदर्भात धोरण अंमलात आणले आहे.

Corporate social Responsibility (CSR) comprises of the efforts and commitment made by businesses to contribute economic and social development of the local community and society at large, though CSR initiatives, companies provide voluntary support to address various social environmental and economic issues related to their business operations and / or the needs of the local community needs.

सदर कायदा पुढील अटी पूर्ण करणा-या मर्यादित, खाजगी किंवा सार्वजनिक कंपन्यांना लागू आहे.

(१) नेटवर्थ रूपये ५०० कोटी किंवा (२) १,००० कोटी रूपयांची वार्षिक उलाढाल किंवा (३) निव्वळ नफा रूपये ५ कोटी.

सदर कंपन्याना त्यांच्या निव्वळ नफ्याच्या किमान २ ऽ इतकी रक्कम सामाजिक उत्तर-दायित्वासाठी खर्च करणे आवश्यक आहे. उद्योजकांच्या समाविष्ट होणा-या १० बाबींची यादी कंपनी कायदा-२०१३ च्या अनुसूची ७ मध्ये नमूद केली आहे.

सदर कायदा हा केंद्र सरकारच्या अखत्यारितील बाब असल्यामुळे त्याची अंमलबजावणी Ministry of Corporate Affairs यांच्या मार्फत केली जाते.

**(३) पर्यावरण विभागाचे अभिप्राय :-** महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अधिकारी/ कर्मचा-यांचे नियुक्ती प्राधिकारी हे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ असल्यामुळे संबंधित अनुपस्थित राहिलेल्या अधिका-यांवर मंडळाकडून कारवाई होणे आवश्यक आहे. यास्तव संबंधित अधिका-यांवर त्वरित कारवाई करून अहवाल सादर करण्याबाबत तसेच, मा.प्रधान सचिव, (पर्यावरण) यांच्या वतीने साक्षीस उपस्थित राहण्याबाबत सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांना शासनाच्या दिनांक १४ जानेवारी, २०१९ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

पंचायती राज समितीने रत्नागिरी जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ०४ जून,२०१९ व १६ जुलै, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, रत्नागिरी जिल्हा परिषदेमध्ये बांधकाम व पाणीपुरवठा विभाग यांमध्ये कार्यकारी अभियंत्यांची पदे रिक्त आहेत. बहुतांश अधिका-यांकडे विभाग प्रमुखांचा प्रभारी कार्यभार देण्यात आलेला आहे. तसेच पशुसंवर्धन विभागात ६० टक्के पदे रिक्त आहेत. सदरहू रिक्त पदांचा आढावा ग्रामविकास विभागाने घेतला आहे काय आणि त्यानुसार रिक्त पदे भरण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली आहे यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, समितीच्या दौ-याच्या वेळी आपल्याकडे कार्यकारी अभियंता, बांधकाम या संवर्गाची २ पदे रिक्त होती. आता एका पदावर रुजू झाले आहेत आणि सध्या १ पद रिक्त आहे. उप अभियंता संवर्गाची ६ पदे रिक्त होती आणि आता २ पदे रिक्त आहेत. कार्यकारी अभियंता संवर्गाचे १ पद रिक्त होते, ते सध्याही रिक्त आहे. उप अभियंता संवर्गाची ६ पदे रिक्त होती आणि आता ४ पदे रिक्त आहेत. यावर समितीने विचारणा केली की, मग त्यासाठी विभागाने कोणती कार्यवाही केली. तसेच सदर रिक्त पदे शासकीय विभागाच्या माध्यमातून तात्काळ भरण्याकरिता आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत का? आता ३-४ वर्षे पदे रिक्त आहेत. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विशद केले की, वर्ग १ व २ मधील रिक्त पदांच्या संदर्भात आमच्याकडे किती पदांची गरज आहे आणि किती पदे रिक्त आहेत या संदर्भात संबंधित विभागांना कळविण्यात येते आणि त्यांच्या सामान्य बदल्यांमध्ये (जनरल ट्रान्सफर्स) ते आम्हाला ती पदे देतात.

तद्नंतर मुख्य अधिकारी व विशेष कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, आता नुकतेच उप अभियंता पदावरुन कार्यकारी अभियंता पदावर २६ जणांची पदोन्नती करण्यात आली आहे. यावर समितीने विचारणा केली की, तुम्ही आता केले आहे. मात्र पदे ब-याच वर्षांपासून रिक्त आहेत. यावर मुख्य अधिकारी व विशेष कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, नव्याने पदोन्ती केली आहे. सर्व जिल्हा परिषदांना कार्यकारी अभियंता उपलब्ध करून देण्यात आले आहेत. समितीने विचारणा केली की, आपण आता करीत आहात. मात्र या अगोदर का केले नाही यावर मुख्य अधिकारी व विशेष कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, आता पदोन्नती असल्यामुळे ते या आठवड्यात रुजूही होतील. समितीने विचारणा केली की, आता साक्ष असल्यामुळे सांगत आहात. मात्र या अगोदर ४-५ वर्षांपासून पदे रिक्त आहेत. आपण तेव्हापासून ही प्रक्रिया का केली नाही अशी समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, उमेदवार पदोन्नतीमध्ये उपलब्ध नव्हते. कार्यकारी अभियंत्यांची पदे होती, त्यामध्ये असणा-या लोकांची प्रक्रिया सुरू होती. समितीने विचारणा केली की, यासाठी लागलेल्या विलंबाची तसेच ही प्रक्रिया इतक्या उशिरा करण्याची कारणे काय आहेत यावर मुख्य अधिकारी व विशेष कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, हा आस्थापनाचा विषय आहे. माझ्याकडे आता त्याची माहिती उपलब्ध नाही. मी उपलब्ध करून देतो. समितीने विचारणा केली की, आपणच आस्थापनाची प्रक्रिया पाहत असता. त्यामुळे त्यासाठीच हे मंत्रालय आहे. ४-५ वर्षे पदोन्नती नाही. आस्थापनेचा विषय जरी असला तरी तुम्ही तो पाहिला पाहिजे होता. आता पदोन्नती होणार आहेत. मात्र अजून झालेल्या नाहीत. यावर मुख्य अधिकारी व विशेष कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, पदोन्नती प्रक्रिया झाली आहे आणि त्यांच्या रुजू होण्याच्या ऑर्डर देखील निघाल्या आहेत. आचारसंहितेच्या अगोदरच ऑर्डर निघाल्या होत्या. मात्र नंतर त्या आचारसंहितेमुळे थांबविल्या होत्या.

समितीने विचारणा केली की, कार्यकारी अभियंता, उप अभियंता, कनिष्ठ अभियंता यांच्यापासून सर्व पदे भरत आहोत का यावर मुख्य अधिकारी व विशेष कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, कार्यकारी अभियंत्यांच्या पदोन्नतीच्या पदांच्या संदर्भातच बोलत आहे. मला बाकीच्या पदांची कल्पना नाही. यावर समितीने विचारणा केली की, या पदांची माहिती कोणाला आहे यावर मुख्य अधिकारी व विशेष कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, समितीला माहिती उपलब्ध करून देण्यात येईल. तद्नंतर समितीने विचारणा केली की, कनिष्ठ अभियंता संवर्गाची, उप अभियंता संवर्गाची, कार्यकारी अभियंता संवर्गाची किती पदे रिक्त आहेत. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विशद केले की, वर्ग ३ व ४ च्या रिक्त पदांच्या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी सांगू शकतील. पुढे प्रधान सचिव ग्रामविकास विभाग यांनी समितीस विशद केले की, महाराष्ट्रात वर्ग ३ व ४ मधील रिक्त पदांची महाभरतीची कार्यवाही सुरू झाली आहे. विभागाने त्यामध्ये १३ हजार पदांच्या भरतीची जाहिरात काढली आहे. आता त्याची परीक्षा वगैरे इतर सर्व कार्यवाही सुरू होईल. उमेदवारांचे अर्ज देखील आले आहेत. वर्ग ३ व ४ च्या संदर्भात ऑनलाईन परिक्षा घेण्यात येणार आहे. सर्वात मोठी भरती जिल्हा परिषदेतच होत आहे. १३ हजार पदे जिल्हा परिषदांचीच आहेत. वर्ग १ व २ ची भरती संबंधित विभाग पदोन्नतीने किंवा सरळसेवा भरतीने करीत आहेत. आम्ही सर्वांना पत्राने कळवित राहत असतो. आपल्याला जर एकूण वर्ग १ व २ ची माहिती हवी असेल तर मिळू शकेल.

समितीने विचारणा केली की, आपण कार्यवाही करीत असताना फार विलंब लावत आहात. आपण या संदर्भातील प्रक्रिया तात्काळ करीत नाही. शासन स्तरावरुन रिक्त पदांच्या संदर्भातच सांगण्यात येत आहे. तात्काळ प्रक्रिया करून सदर पदे भरली पाहिजेत. विभागाकडून फार विलंब होत आहे. कालबद्ध कार्यक्रम तयार करून तात्काळ भरती प्रक्रिया आटोपली पाहिजे, असे केल्यामुळे उमेदवारांमध्ये उत्साह वाढतो. कर्मचारी-

अधिकारी यांची पदोन्नती झाल्याने उत्साह वाढतो. वेतन वाढल्याने जास्त काम केले पाहिजे, जबाबदारीने काम केले पाहिजे असे वाटते. यावर प्रधान सचिव ग्रामविकास विभाग यांनी समितीस विशद केले की, वर्ग १ व २ ची पदे संबंधित विभाग देत राहतात. तरीही राज्यात १५ ते २० टक्के रिक्त पदे राहतात. समितीला या संदर्भातील माहिती हवी असेल तर आतापर्यंतचा संपूर्ण राज्यातील वर्ग १ व २ च्या रिक्त पदांचे विवरण तयार करून देण्यात येईल. समितीने पुढे असे निदेश दिले की, विभागाने तत्संदर्भातील विवरण करून द्यावे व रिक्त पदांच्या संदर्भातील प्रक्रिया तात्काळ करावी.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, रिक्त पदांच्या संदर्भात विषय मांडावयाचा होता. रत्नागिरीमध्ये प्राथमिक व माध्यमिक असे दोन्ही कार्यभार एकाच शिक्षणाधिका-यांकडे आहेत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, प्राथमिक व माध्यमिक यांचा कार्यभार एकाच शिक्षणाधिका-यांकडे आहे. त्यामुळे तेथे फार ताण आहे. शिक्षणाधिकारी प्राथमिक यांचे १ पद भरले आहे आणि त्यांच्याकडेच शिक्षणाधिकारी माध्यमिक यांचा कार्यभार देण्यात आला आहे.

समितीने विचारणा केली की, शिक्षणाधिकारी माध्यमिक हे पूर्ण वेळ मिळावेत अशी मागणी शासनाकडे केली पाहिजे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, जिल्हा परिषदेने अर्धशासकीय पत्राने शासनाला मागणी कळविली आहे.

समितीने विचारणा केली की, आपण त्या संदर्भातील मागणी शासनाला केव्हा कळविली आहे यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, मार्चमध्ये ते बदली होऊन गेले, त्यानंतर कळविले होते. नव्याने भरती केलेल्या शिक्षणधिकारी प्राथमिक यांना दोन्ही अधिभार देण्यात आले. शासनाकडूनही सांगण्यात आले की, एकाच व्यक्तीकडे दोन्ही अधिभार द्यायचे आहेत. त्यामुळे त्यांच्यावर ताण आहे.

समितीने निदेश दिले की,नवीन शिक्षणाधिकारी आले पाहिजेत या संदर्भातील पाठपुरावा करावा. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस होय असे होकारात्मक उत्तर दिले.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, रत्नागिरी जिल्ह्याच्या एमआयडीसीमध्ये केमिकल झोन असून त्यातील कंपन्यांकडून मिळणारा २ टक्के सीएसआर निधी स्थानिक लोकांच्या कल्याणकारी कामांसाठी खर्च करावा असा नियम असतानाही रत्नागिरी जिल्ह्यामध्ये सीएसआर निधी खर्च करण्यात येत नाही. उद्योग व पर्यावरण विभागाने या संदर्भात कोणती कार्यवाही केली याबाबत माहिती देण्यात यावी. तसेच सीएसआर निधी खर्च करण्याची मार्गदर्शक तत्वे (गाईडलाईन्स) काय आहेत. उत्तरात सांगण्यात आले आहे की, शासन स्तरावरुन धोरणात्मक कार्यवाही अपेक्षित आहे. ही समितीची दिशाभूल आहे. शासन स्तरावरुन धोरणात्मक कार्यवाही आहेच. सीएसआर निधी खर्च करण्याचा निकष आहेच. जिल्हा परिषदेने कोणती धोरणात्मक कार्यवाही केली आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, जिल्हा परिषदेच्या वतीने हे उत्तर दिले होते. विभागाने त्याच्या समोर उत्तर दिले आहे.

समितीने विचारणा केली की, जिल्हाधिकारी या समितीचे अध्यक्ष आहेत. सीएसआरचा निधी कुठून खर्च होतो हे माहीत आहे. जिल्हाधिकारी ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) देतात. जिल्ह्यामध्ये कोणताही प्रकल्प असेल तर जिल्हाधिका-यांचे ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) मिळते. पर्यावरण विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) जिल्हाधिका-यांकडे सादर केले जाते. सदर प्रकल्पाला मान्यता देताना शासनाने ठरवून दिलेल्या सर्व अटी व शर्ती यांच्या अधीन राहून कार्यवाही केली जाते. त्यामध्ये सीएसआर निधी असतो. आपल्याला अजून कोणते धोरण अपेक्षित आहे ? कंपन्या, उद्योग सीएसआर निधी कुठे खर्च केला हे कधीही जिल्हाधिका-यांच्या लक्षात आणून देत नाहीत. एखाद्या लोकप्रतिनिधीने सीएसआर निधीची मागणी केली तर जिल्हाधिका-यांच्या ना-हरकत प्रमाणपत्राची (एनओसी) मागणी केली जाते. मात्र त्यांच्या मनाने करण्यासाठी जिल्हाधिका-यांची ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) घेत नाहीत. यावर सह सचिव, उद्योग विभाग यांनी समितीस विशद केले की, ही प्रक्रिया जिल्हाधिकारी स्तरावरुन होते.

समितीने विचारणा केली की, समाजामध्ये सामाजिक दायित्वाच्या जबाबदारीच्या अंतर्गत कंपन्यांना सीएसआर निधी द्यावा लागतो. कंपन्यांमुळे परिसरात प्रदूषण तयार होते, तयार केलेले रस्ते खराब होतात, जिल्हा परिषदांच्या सुविधा वापरत असतात आणि त्याच्या माध्यमातून नफा कमावितात, त्यामुळे त्यांना त्यांच्या नफ्यातील २ टक्के निधी खर्च करावा लागतो. आपल्या जिल्ह्यात असे किती उद्योग आहेत की, ज्यांना ५ कोटी रुपयांचा नफा झाला आहे, ज्यांची हजारो कोटी रुपयांची उलाढाल आहे, ज्यांचे नेटवर्थ ५०० कोटी रुपये आहे. आपण याचा शोध घेतला आहे का ? तुम्ही समितीला उत्तर दिले आहे. आपण याचा अभ्यास करून तत्संदर्भातील यादी आणली पाहिजे होती. जिल्हाधिका-यांकडे संनियंत्रण समिती असते. जिल्ह्यात अशा किती कंपन्या आहेत याची माहिती मुख्य कार्यकारी अधिका-यांना आहे का, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माहिती सांगू शकणार नाही असे सांगितले. यावर समितीने नापसंती व्यक्त करून असे मत व्यक्त केले की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या सर्व बाबींची तयारी करून आले पाहिजे होते. यासंदर्भात शासन निर्णय तुमचा असून तो जिल्हाधिका-यांना लागू झाला आहे. ताळेबंद (बॅलन्स शीट)

मागत असाल, कंपन्यांना नफा किती झाला हे माहीत असले पाहिजे. कंपनी फायद्यात आहे की तोट्यात आहे हे तरी समजले पाहिजे. काहीही माहीत नसताना उत्तर दिले आहे, हा फार महत्त्वाचा विषय आहे. सदर विषयाच्या संदर्भातील सविस्तर माहिती पाहिजे होती. जिल्ह्यात किती कंपन्या आहेत, किती कंपन्या किती रकमेच्या नफ्यात आहेत, किती सीएसआर निधी होतो, सीएसआरच्या माध्यमातून कुठे खर्च करण्यात आला आहे हे माहीत असले पाहिजे. मात्र आपण या उत्तरात काहीही दिलेले नाही. कोणताही उद्योग नफ्यात आहे की तोट्यात आहे याचा कोणताही हिशोब नाही. शासन इतक्या मोठ्या प्रमाणात सवलत (सबसिडी) देते तर ते पाहिले पाहिजे. एमआयडीसीमध्ये सवलती (सबसिडी) विना कोणता उद्योग सुरू आहे का, सर्व मूलभूत सुविधा पुरव्यावा लागतात. समितीचे सांगणे असे होते की, महसूल विभागाकडून सीएसआर निधीच्या संदर्भात चांगल्याप्रकारे माहिती मिळू शकेल. उद्योग व पर्यावरण विभाग यांना जिल्ह्यात किती उद्योग आहेत हे माहीत असले पाहिजे. समितीच्या प्रश्नांवर तयारी करून आले पाहिजे होते. जिल्ह्यात नेमके किती उद्योग आहेत हे उद्योग विभागाने सांगितले पाहिजे. अधिका-यांनी प्रश्नाचे सविस्तर उत्तर दिलेले नाही.

समितीने पुढे विचारणा केली की, अनेक ठिकाणी ग्रामपंचायत, जिल्हा परिषद यांच्या मार्फत विविध योजनांच्या माध्यमातून कामे केली जातात, ती कामे सीएसआर निधीत घेतल्याचे दाखवितात. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस होय असे होकारात्मक उत्तर दिले. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, त्यामुळे बनावट काम (ड्युप्लीकेशन ऑफ वर्क) होते. ज्या उद्योगांकडून सीएसआरचा पैसा खर्च होतो, ते उद्योग कामाची खात्री करीतच नाहीत, किंवा त्याच कामावर देयके काढली जातात. असे अनेक प्रकार घडले आहेत. सीएसआरचा पैसा एखाद्या रस्त्याच्या कामावर खर्च केला आणि तोच रस्ता एमआरईजीएसमध्ये झाला असेल तर काय करायचे, त्यामुळे याची खात्री झाली पाहिजे. विषय पुढे यामुळे आला की, समिती एका गावाला भेट देण्यासाठी गेली होती, तेथे सौर ऊर्जेवरील (सोलार) लाईट लावले होते चौदाव्या वित्त आयोगातून हे काम केले आहे का, दलित वस्ती योजनेतून लावले का असे त्यांना विचारले असता, नाही असे सांगण्यात आले. सदर बाब ग्रामपंचायतीच्या सरपंचांना व सचिवांना देखील माहीत नव्हती. एखाद्या कंपनीच्या सीएसआर निधीतून केले का असे विचारण्यात आले, तेव्हा तो विषय उपस्थित होऊन आजच्या साक्षीच्या बैठकीसमोर आला. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, जिल्हाधिकारी कार्यालयातील समिती व एमआयडीसीचे विभागीय अधिकारी यांच्याकडून माहिती घेण्यात येईल.

समितीने विचारणा केली की, रत्नागिरी जिल्ह्याच्या एमआयडीसीमध्ये केमिकल झोन असून त्यातील कंपन्यांकडून मिळणारा २ टक्के सीएसआर निधी स्थानिक लोकांच्या कल्याणकारी कामांसाठी खर्च करावा, असा नियम असतानाही रत्नागिरी जिल्ह्यामध्ये सीएसआर निधी खर्च करण्याची अंमलबजावणी होत नसल्या प्रकरणी उद्योग व पर्यावरण विभागाने कोणती कारवाई केली, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, मागच्या बैठकीत समितीने असे निर्देश दिले होते की, निकषात बसणा-या किती कंपन्या आहेत, किती कंपन्यांची उलाढाल (टर्नओव्हर) रूपये ५०० कोटीच्या वर आहे, जिल्ह्यातील किती कंपन्यांचा निव्वळ नफा ५ कोटी किंवा त्यापेक्षा जास्त आहे, या अनुषंगाने क्षेत्रीय अधिकारी (आर.ओ.) जिल्हा उद्योग केंद्र यांच्याकडून माहिती घेतलेली आहे. तसेच, समितीचे असेही निर्देश होते की, २ टक्के सीएसआर निधीबाबत जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या समितीची माहिती डीआयसी यांच्याकडून घेतलेली आहे. त्यानुसार या सीएसआरच्या निकषात बसणा-या ८ कंपन्या पात्र होत्या. या संदर्भात जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे पत्रही माझ्याकडे आहे की, सध्या याबाबत जिल्हास्तरावर समिती व्हावी असे निर्देश प्राप्त नसल्याने जिल्हास्तरावर त्याबाबत प्रभावीपणे देखरेख करु शकत नाही. त्याबाबतीत शासनाने धोरण निश्चित करणे आवश्यक आहे. पुढे या संदर्भात प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विशद केले की, समितीचा असा समज होता की, जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली या २ टक्के सीएसआरचे विनियोजन करण्याबाबत समिती आहे. परंतु, वस्तुस्थिती तशी नाही. जिल्हाधिकारी कार्यालयाने त्यांना असे लिहून दिले आहे की, आमच्याकडे अशी कोणतीही कमिटी नाही. गौण खनिजाबाबत (मायनिंगबाबत) जशी समिती असते तशी सीएसआरबाबत नाही.

तद्नंतर विकास आयुक्त, उद्योग यांनी समितीस विशद केले की, सीएसआरच्या संदर्भातील हा कायदा वाणिज्यिक मंत्रालय यांनी तयार केलेला आहे. त्यांच्या मार्फत याच्या मार्गदर्शक सूचना (गाईडलाईन्स) बनविलेल्या आहेत. २ टक्के सीएसआरबाबत सन्माननीय सदस्यांनी मुद्दा मांडलेला आहे. त्या अनुषंगाने शिक्षण, आरोग्य, सामाजिक सबलीकरण, पर्यावरण, क्रीडा, ग्रामीण विकास या संदर्भामध्ये हा पैसा वापरावा अडचण फक्त एवढीच आहे की, या मार्गदर्शक सूचना (गाईडलाईन्स) केंद्र सरकारच्या असल्याने आपल्याला त्यांच्यावर असे कोणतेही बंधन घालता येत नाही की, तुम्ही येथेच खर्च केला पाहिजे.

समितीने विचारणा केली की, नवीन वर्गखोली पूर्ण डिजिटल असताना सीएसआर मधून पुन्हा डिजिटल वर्गासाठी पैसे देत असतील तर त्याचा उपयोग आहे काय. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विशद केले की, जिल्हा परिषदेच्या मालकीच्या शाळेवर कोणाला स्वतःचे पैसे खर्च करायचे असतील मग ते सीएसआर मधून असतील किंवा बक्षिस (गिफ्ट) म्हणून खर्च करावयाचे असतील तर त्यांना जिल्हा परिषदेची परवानगी घ्यावी लागेल कारण ती शाळा जिल्हा परिषदेच्या मालकीची आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, सीएसआरसाठी जे निकष लावून दिले आहेत की, कोणत्या विभागावर (डिपार्टमेटवर) किती पैसा खर्च केला पाहिजे जसे की, शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा विभाग यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विशद केले की, अशाप्रकारे पैसे खर्च करता येत नाहीत. पुढे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस विशद केले की, कोणत्या विभागावर किती टक्के असे कुठलेही बंधन घालून देण्यात आलेले नाही. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, टक्केवारी निहाय (पर्सेंटेजनिहाय) निकष नसतील परंतु, तेथेच खर्च करावयाचे आहेत. त्या संबंधात विभाग एखादा आदेश काढू शकत असेल तर तो काढावा. पूर्ण २ टक्के खर्च केलाच पाहिजे मात्र तो केला जात नाही. सरकारने कायदा करून २ टक्के सीएसआर खर्च करणे त्यांना बंधनकारक केले आहे. त्या २ टक्के सीएसआरचा हिशोब घेणारी यंत्रणा कोणती आहे. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विशद केले की, भारत सरकारमध्ये जे वाणिज्यिक मंत्रालय आहे. तसेच ओव्हरलॅपिंग म्हणजे जर आपल्या मालकीची जागा असेल तर आपल्या परवानगी शिवाय कोणीही खर्च करीत नाही, कारण त्याकरिता आपल्याला परवानगी पाहिजे. विभागानुसार न पाहता मालकीप्रमाणे म्हणजेच कृषी विभागामध्ये कृषी अधिकारी आहेत. त्यांच्या परवानगी शिवाय तुम्ही कृषी विभागामध्ये (ॲग्रिकल्चर सेक्टर) सीएसआरचा पैसा खर्च करु नये असे म्हणणे म्हणजे कृषी विभागामध्ये सीएसआरच्या निधीमध्ये अडथळा आणणे आहे. तो सेक्टर प्रमाणे नाही तर मालकी म्हणजे माझा रस्ता असेल त्या रस्त्यावर जर कोणाला काही बांधकाम करावयाचे असेल तर त्या रस्त्यावर जर ग्राम पंचायतीची मालकी असेल तर त्यांच्या ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) शिवाय काही करता येणार नाही. ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) देताना ग्राम पंचायतीने हे पहावयाचे आहे की, हा रस्ता आमदार फंडातून करून घेतला आहे काय वगैरे, कायद्याप्रमाणे असे आहे. परंतु, स्थानिक लोक मागणी करतात व कंपन्यांना २ टक्के खर्च करावयाचाच असतो तर ते साधारणपणे मागणी प्रमाणे ९९ टक्के खर्च करतात.

समितीने विचारणा केली की, भारत सरकारच्या अधिपत्याखाली एखादी कंपनी नसेल तर अशा कंपनीबाबत ग्रामविकास विभागाचे काय म्हणणे आहे. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विशद केले की, ते बजेटच्या बाहेरचे पैसे आहेत ते एकत्रित निधीचे नाहीत. ते वेगळे आहेत. पुढे मुख्य लेखा व वित्त अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, या कंपन्यांना वाणिज्यिक मंत्रालयाच्या अंतर्गत नोंदणीकृत (रजिस्ट्रेशन) करावेच लागते.

समितीने विचारणा केली की, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे विभाग प्रमुख जिल्हा परिषदेने आयोजित केलेल्या बैठकींना लेखी पत्राद्वारे कळवून सुद्धा अनुपस्थित राहत असल्याप्रकरणी पर्यावरण तसेच उद्योग विभागाने संबंधितांविरुद्ध चौकशी करून कोणती कारवाई केली आहे नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत. यावर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी समितीस विशद केले की, या संदर्भात त्यांनी संबंधितांना कारणे दाखवा (शो-कॉज) नोटीसा दिलेल्या आहेत. त्यात खुलाशामध्ये संबंधितांनी म्हटले की, आम्हाला कार्यालयीन (ऑफिशियल) काम असल्यामुळे आम्ही संबंधित बैठकांना उपस्थित राहू शकलो नाही. समितीच्या अनेक बैठकांच्या वेळी असे निदर्शनास आले की, नेहमी सदर अधिकारी सर्वसाधारण बैठकांना अनुपस्थित असतात, हे योग्य नाही. कंपन्यांनी सांडपाण्याचे व्यवस्थापन प्रक्रिया प्रकल्प न राबविल्यामुळे मोठया प्रमाणात मत्स्यव्यवसायाचे नुकसान होते, असे निदर्शनास आले होते. मासेमारी व्यवसाय यामुळे धोक्यात येत आहे. याकरिता प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिका-यांना कोणाचे संरक्षण आहे का. जिल्हापरिषदेचे कार्यालय प्रमुख, प्रशासन प्रमुख म्हणून आपण प्रदूषण नियंत्रण मंडळांच्या अधिका-यांना तेरा पत्रे व नोटीसा दिल्या,तरीही ते सभेला उपस्थित राहत नाहीत. याकरिता आपण शासनाकडे काही कारवाईकरिता पाठपुरावा केला का. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, याबाबत शासनाला अहवाल पाठविला होता. जिल्हापरिषद कायदा कलम १२० प्रमाणे कारवाई प्रस्तावित केलेली आहे.

समितीने विचारणा केली की, आपण येथे पुस्तिकेमध्ये उत्तर दिलेले आहे, तेही समितीच्या कार्यवाहीच्या व कामकाजाच्या अभिलेखावर (रेकॉर्डवर) आलेले आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, या प्रकरणामध्ये जर आपण वेळोवेळी कलम १२० आणि कलम ११४ प्रमाणे नोटीसा बजाविल्या, त्याप्रमाणे निर्णय घेतले होते. ज्यावेळी ते उपस्थित होते, त्याव्यतिरिक्त ते ज्या बैठकांना अनुपस्थित होते, त्या वेळेप्रमाणे माननीय जिल्हाधिका-यांना निदर्शनास आणून दिलेले आहे. यानंतरची कारवाई करण्याचे अधिकार जिल्हापरिषदेला नाहीत.

समितीने विचारणा केली की, तेरा पत्र पाठविल्यानंतरही वारंवार या बैठकांना अनुपस्थित राहणे योग्य नाही. जिल्हापरिषदेने या संबंधी लेखी पाठपुरावा करून कारवाई प्रस्तावित करणे अपेक्षित होते. या संदर्भामध्ये तत्काळ तत्परतेने कारवाई आवश्यक होती, ती केली नाही. या संदर्भात तात्काळ कारवाई केली पाहिजे, त्याचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा. सातत्याने ही बाब घडत असल्याने संबंधित अधिकारी आता कारवाईस पात्र आहेत, केवळ दूरध्वनीद्वारे (टेलिफोनिक) पाठपुरावा किंवा कारवाई करून चालण्यासारखे नाही. यावर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांनी समितीस विशद केले की, त्यांच्याकडून आपल्याकडे अहवाल आलेला नाही, मागच्या कार्यवृत्ता (मिनिट्स) प्रमाणे या संदर्भात कारवाईची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. समितीने निदेश दिले की, संबंधित अधिका-यांविरुद्ध तात्काळ पत्रक काढावे व ते तात्काळ निर्गमित करावे.

समितीने पुन्हा विचारणा केली की, समिती ज्यावेळेसे रत्नागिरी जिल्ह्याच्या दौ-यावर गेली होती, तेव्हा महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ व

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे विभाग प्रमुख जिल्हापरिषदेने आयोजित केलेल्या बैठकांना पत्रान्वये कळवून सुद्धा अनुपस्थित राहिले होते, या संदर्भात त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली होती. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, अनौपचारिक चर्चेच्या वेळी हा मुद्दा मांडण्यात आला होता. पुढे सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांनी सचिवांच्या वतीने समितीस माहिती दिली की, मुख्य कार्यकारी अधिकारी, यांच्याकडून सदर अधिका-यांबाबत निरोप मिळाल्यानंतर त्यांच्याकडे खुलासा मागितला होता. त्यांनी खुलासा दिलेला आहे. ते कोणत्या तारखेला अनुपस्थित होते हे तपासून त्यांना ताकीद दिलेली आहे. सध्या ते नियमितपणे बैठकीला उपस्थित होते, त्याचा अभिलेख (रेकॉर्ड) आहे. तसेच सर्व अधिकारी उपस्थित राहतील याची काळजी घेतली जाईल.

समितीने विचारणा केली की, कोणत्या कारणामुळे ते अधिकारी अनुपस्थित राहिले होते. यावर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांनी समितीस विशद केले की, कोणकोणत्या कारणामुळे ते अनुपस्थित राहिले याची माहिती पत्रान्वये दिलेली आहे. ते काही काळासाठी रजेवर होते.

समितीने विचारणा केली की, या संदर्भात सीईओ यांनी खात्री केली आहे काय. जिल्हापरिषदेच्या सर्वसाधारण सभेला उपस्थित राहण्याबाबत वारंवार सूचना देऊनही ते उपस्थित राहिले नाहीत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, प्रधान सचिव,पर्यावरण विभाग यांच्याकडे प्रस्ताव पाठविला असून त्यांना कारणे दाखवा (शो कॉज) नोटीस दिलेली आहे. या वर्षी ४ स्थायी समितीपैकी ३ समितीच्या बैठकांना ते हजर होते. एका बैठकीला काही अपरिहार्य कारणामुळे ते हजर राहू शकले नाहीत. या बाबत आम्ही खात्री केलेली आहे.

समितीने विचारणा केली की, एक अधिकारी ५-७ वेळा अनुपस्थित असेल तर केवळ ताकीद देऊन उपयोग होणार नाही. त्यांच्यावर कारवाई करावयास हवी होती. त्याशिवाय इतरांना कसे कळेल. चुकीचे कारण दाखवले जात असेल तर आपण कारवाई केली पाहिजे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, एमआयडीसी, विभागीय व्यवस्थापक (रिजनल मॅनेजर) यांच्या संदर्भात प्रधान सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांना कळविले आहे.

**अभिप्राय व शिफरशी :**

पंचायती राज समितीने दिनांक २६, २७ व २८ एप्रिल, २०१८ या कालावधीत रत्नागिरी जिल्हा परिषदेला भेट दिली असता सन २०१३-२०१४ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान रत्नागिरी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे रत्नागिरी जिल्हयातील विधिमंडळ सदस्य व जिल्हा परिषदेच्या पदधिका-यांसमवेत केलेल्या अनौपचारिक चर्चेच्यावेळी समितीच्या निदर्शनास आले की, रत्नागिरी जिल्हा परिषद बांधकाम व पाणीपुरवठा विभागातील कार्यकारी अभियंत्याचे पद गत अनेक दिवसांपासून रिक्त असल्यामुळे कित्येक अधिका-यांकडे विभाग प्रमुखांचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. तसेच पशुसंवर्धन विभागामध्ये ६० टक्के पदे रिक्त आहेत व रत्नागिरी जिल्हयाच्या एमआयडीसी मध्ये केमिकल झोन असून त्यातील कंपन्यांकडून मिळणारा २ टक्के सीएसआर निधी स्थानिक लोकांच्या कल्याणकारी कामांसाठी खर्च करावा असा नियम असतांनाही रत्नागिरी जिल्हयामध्ये सीएसआर निधी खर्च झाला नाही. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे विभाग प्रमुखांना जिल्हा परिषदेने लेखी पत्राद्वारे कळवून देखील उपस्थित राहत नाही याप्रकरणी समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

उपरोक्त प्रकरणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त लेखी माहितीच्या आधारे समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता समितीच्या निदर्शनास आले की, बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता दोन पदे तसेच उप अभियंता यांचे एक पद अशी एकूण ३ पदे दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ अखेर रिक्त होती आणि ग्रामीण पाणीपुरवठा विभागातील एक कार्यकारी अभियंता व ६ उप अभियंते अशी एकूण ७ पदे दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ अखेर रिक्त आहेत. सदर रिक्त पदे भरण्याबाबत प्रधान सचिव, पाणीपुरवठा विभाग व सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांना अर्धशासकीय पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. त्याचप्रमाणे पशुसंवर्धन विभागाकडील पशुधनविकास अधिका-यांची गट अ संवर्गातील २२ व गट ब संवर्गातील ३ पदे अशी एकूण २५ पदे दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ रोजीपर्यंत रिक्त असून सदर पदे भरण्याबाबत दिनांक १६ जुलै, २०११ रोजीपासून मा.आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे व शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. याव्यतिरिक्त असे दिसून आले की, **रत्नागिरी जिल्हा परिषदेमध्ये एकाच शिक्षणाधिका-याकडे प्राथमिक व माध्यमिक विभागाचे दोन्ही कार्यभार सोपविण्यात आले आहेत त्यामुळे विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित शिक्षणासारख्या महत्वाच्या विषयाकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे समिती यात्रकरणी तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. सबब, जिल्हा परिषदेतील बांधकाम विभाग, पाणीपुरवठा विभाग तसेच शिक्षण विभागातील उपरोक्त रिक्त पदे तातडीने भरण्यासंदर्भात तात्काळ कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्याच्या आत सादर करण्यात यावा.**

प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, रत्नागिरी (प्रशासन)

**प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेच्या पाणीपुरवठा वीज देयक प्रतिपूर्तीबाबत :**

पंचायती राज समितीने दिनांक ०१ ते ०३ ऑगस्ट, २०१८ या कालावधीत रत्नागिरी जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१३-१४ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान रत्नागिरी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेकडे चौदाव्या वित्त आयोगाचा निधी उपलब्ध आहे. तसेच उन्हाळयाच्या काळात फक्त विजेचे बिल थकित असल्यामुळे प्रादेशिक नळपाणीपुरवठा योजनेतून पाणीपुरवठा होऊ शकत नाही. परिणामी तेथील काही गावांमधील ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यापासून वंचित रहावे लागत आहे. तेथील महिलांना १ ते ५ कि.मी. जाऊन डोंगरावरुन पाणी आणावे लागत आहे. ही घटना अतिशय दुर्दैवी आहे. सीईओ, आपण स्वतः सदर प्रकरणी लक्ष द्यावे. सदर पाणीपुरवठा योजना तेथील गावातील लोकांना कशाप्रकारे तातडीने पाणीपुरवठा होऊ शकेल यासंबंधी कार्यवाही करावी. यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, सदर योजना सन १९८३-८४ मध्ये राबविण्यात आली होती. त्यानंतर स्वतंत्र पाणीपुरवठा योजना झाल्यामुळे सदर योजनेतून काही गावे बाहेर पडली. सन २०१६ च्या सुमारास जिल्हा परिषदेकडून सदर वीज बिल भरण्यात आले होते. सध्या जिल्हा परिषद सेसमधील देखभाल दुरुस्तीसाठी होणारा खर्च जास्त असल्यामुळे मोठया प्रमाणात नुकसान होत आहे. योजना सुरू राहत नसल्यामुळे फक्त ३० टक्के वसुली होत आहे. तसेच देखभाल दुरुस्तीसाठी जिल्हा परिषदेला जवळपास ३ कोटी रुपयांचा निधी प्राप्त होतो. त्यातील २ कोटी रुपये इतरत्र बाबींवर खर्च होत असतात. या संदर्भात एमएसईबीकडून तांत्रिकदृष्टया चूक झालेली आहे. एमएसईबीचे असे म्हणणे आहे की, वापरलेल्या विजेसंबंधी त्यांच्याकडून चुकीने कमी बिल आकारण्यात आले होते. त्यामुळे वीज बिलाची रक्कम दुप्पट झाली आणि ती रक्कम २० लाख रुपयांपर्यंत गेली. त्या रकमेमध्ये त्यांनी व्याज व दंडाची आकारणी सुद्धा केली आहे. जिल्हा परिषद ही सेवा पुरवणारी यंत्रणा आहे. यावर समितीने विचारणा केली की, आपण समितीला दिलेल्या माहितीनुसार एमएसईबीने नियमित विजेचे बिल न देता व्याज व दंडाची आकारणी करून वीज देयके दिलेली आहेत. या संदर्भात आपण सर्व तांत्रिक बाबी गृहीत धरुन त्या अनुषंगाने एक अहवाल तयार करावा. आपल्याला माननीय ऊर्जा मंत्र्यांना हा विषय सांगता येईल. सध्या उन्हाळा असल्यामुळे तेथील गावांमधील ग्रामस्थांना तातडीने पाणीपुरवठा करणे अत्यावश्यक आहे. सन्माननीय सदस्यांनी हा अतिशय महत्वाचा विषय उपस्थित केला असल्यामुळे तो तातडीने निकाली काढणे गरजेचे आहे.यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, त्या संदर्भात जिल्हा परिषदेने मध्यंतरीच्या काळात ४ लाख रुपये भरले होते. त्यानंतर तेथील पाणीपुरवठा सुरू झाला होता. त्यानंतर या विषयासंबंधी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षतेखाली असलेल्या जलव्यवस्थापन समितीमध्ये चर्चा झाली होती. त्यात असा निर्णय घेण्यात आला की, सदर विजेचे देयक भरण्याकरिता संबंधित उप अभियंता यांनी जलव्यवस्थापन समितीची मंजुरी न घेतल्यामुळे त्यांना जबाबदार धरुन त्यांच्यावर यासंबंधी कारवाई करावी. तसेच सदर समितीच्या बैठकीत पुन्हा अशी चर्चा झाली की, समितीच्या परवानगीशिवाय सदर देयक भरण्यात येऊ नये. समितीने असे मत व्यक्त केले की, अधिकारी हे लोकांच्या सेवेसाठी आहेत. मी या संदर्भात एमएसईबीचे अधीक्षक अभियंता यांच्यासमवेत प्रत्यक्ष चर्चा केली होती व त्यांना असे सांगितले की, पाणी टंचाईच्या काळात आपण पाणीपुरवठा बंद करु नये. आपण एकत्रित बसून यासंबंधी सविस्तर चर्चा करु व विजेचे देयक कशाप्रकारे कमी करता येईल या बाबतीत तोडगा काढू या. या संदर्भात आमची सर्व तयारी आहे. यासंबंधी पदाधिका-यांना विश्वासात घेऊन कामकाज करण्याची आमची इच्छा आहे. तसेच यासंबंधी तातडीने कार्यवाही करण्याबाबत पंचायती राज समितीने निदेश दिले असले तरी तरी मी समितीला नम्रपणे सांगू इच्छितो की, अधिकारी या नात्याने सदर कार्यवाही करण्यास आम्ही सक्षम नाही. त्याकरिता पदाधिका-यांचा सहभाग सुद्धा तेवढाच महत्वाचा आहे. तसेच जिल्हा परिषदेकडून एमएसईबीला पत्राद्वारे असे कळविले आहे की, आपण या संदर्भात केलेली कार्यवाही चुकीची आहे. त्यामुळे याबाबतीत तातडीने पाहणी करावी, अन्यथा आम्ही आपल्या विरुद्ध ग्राहक कायद्यानुसार न्यायालयात जाऊ शकतो.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, पदाधिकारी म्हणून आपल्याला कोणी सांगितले की, आम्हाला विचारल्याशिवाय देयक भरु नये.यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, या संदर्भात पैसे भरण्यासाठी जलव्यवस्थापन समितीचा विरोध नाही. परंतु सदर रक्कम भरीत असताना ती समितीच्या परवानगीशिवाय भरु नये असे समितीने सांगितले आहे. तसेच या संदर्भात एमएसईबीने कशा प्रकारे चूक केली आहे हे सुद्धा त्यांना समजले पाहिजे. तसेच या संदर्भात एमएसईबीने अतिशय टोकाची भूमिका घेतली असून ती योग्य नाही. प्रस्तुत प्रकरणी त्यांनी जिल्हा परिषदेसमवेत चर्चा करावी असे समितीचे म्हणणे आहे.

समितीने विचारणा केली की, आपल्याला यातून तातडीने मार्ग काढायचा आहे. गावक-यांना तातडीने पाणी मिळाले पाहिजे असा समितीचा मूळ उद्देश आहे. त्यात एमएसईबीने काही बाबींमध्ये अनियमितता केली असेल किंवा काही अडचणी निर्माण केल्या असल्यास त्यासंबंधी समिती वरिष्ठ स्तरावर चर्चा करणार आहे. परंतु आपल्या चुकीमुळे सदर पाणीपुरवठा बंद करून तेथील गावक-यांना वेठीस धरण्याचे काम होत असल्यास

ही बाब योग्य होणार नाही. यासंदर्भात बैठक न घेता अडीच लाख रुपये वीज बिलाची रक्कम भरण्यास काही अडचण नाही. आज या संदर्भात तातडीने निर्णय होणे अत्यावश्यक आहे. आम्ही प्रत्यक्षात पाहिले की, तेथे २०० ते ३०० महिला रस्त्यावर पाण्याची भांडी घेऊन पाण्यासाठी उभ्या होत्या. आपण नंतर यासंबंधी सविस्तर चर्चा करणार आहोत. समितीने आपल्याला दिलेल्या निदेशानुसार सर्व विषयासंबंधी अनुपालन अहवाल तयार करून तो तत्काळ समितीकडे सादर करावा. समितीकडे तक्रारींची अनेक प्रकरणे प्राप्त झाली आहेत. ती सर्व प्रकरणे आपल्याकडे देत आहे. त्या संदर्भात तातडीने पूर्तता करून केलेल्या कार्यवाहीसंबंधी संबंधितांना एक प्रत सादर करून त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करावा. तसेच त्याबाबतची एक प्रत समितीकडे देखील सादर करावी. तसेच समितीने दिलेल्या निदेशानुसार राज्यासाठी असलेल्या कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी रत्नागिरी जिल्हयाला गतिमान करण्यासाठी आपण सर्वांनी योग्य ती कार्यवाही करावी.

तद्नंतर समितीने संबंधितांना पुढीलप्रमाणे निदेश दिले की, समितीला ३ दिवसांच्या दौ-यात ज्या काही त्रुटी किंवा गैरव्यवहार झाल्याचे आढळून आलेले आहेत, त्यासंदर्भात समितीकडून लवकरात लवकर विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

बहुतांश जिल्हा परिषदे अंतर्गत असणा-या प्रादेशिक नळपाणीपुरवठा योजनेचे वीज देयक थकित असल्यामुळे सदर योजनेद्वारे ग्रामस्थांना पाणीपुरवठा होऊ शकत नाही. परिणामी ग्रामीण भागातील जनतेला १ ते ५ कि.मी. अंतरावरून पाणी आणावे लागते ही बाब विचारात घेता प्रादेशिक नळपाणीपुरवठा योजनेचा पाणीपुरवठा वीज देयक प्रतिपूर्ती अभावी खंडीत होऊ नये म्हणून कोणती तातडीची कार्यवाही वा उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहेत.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

रत्नागिरी जिल्हा परिषदेकडे प्रादेशिक नळपाणीपुरवठा योजनेची नियमित वीज देयके अदा करणे करीता देखभाल व दुरुस्ती या लेखाशीर्षांतर्गत जिल्हा परिषद फंडातून स्वतंत्र तरतूद करण्यात येते व सदर लेखाशीर्षाखाली प्रादेशिक योजनांची नियमित वीज देयके मुदतीत भरणा करण्यात येतात. तरी या जिल्हा परिषदेकडे नियमित वीज देयके प्रतिपूर्ती अभावी वीज खंडीत होणे सारखी बाब प्रलंबित नाही. तसेच सदर बाब यापुढेही उदभवणार नाही याची दक्षता घेण्यात येईल. सन २०१२-२०१३ मध्ये प्रादेशिक नपापु योजनेंच्या वीज देयकांवर जि.प. देखभाल दुरुस्ती निधीमधून एकूण ७७,२७,०१७/- खर्च झालेला आहे. तसेच सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात वीज देयकांवर एकूण १,१८,४१,९०४/- खर्च झालेला आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय :**

**पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषद रत्नागिरी यांनी दिलेल्या माहितीशी सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

पंचायती राज समितीने रत्नागिरी जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्दयांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ०४ जून,२०१९ व १६ जुलै, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, बहुतांश जिल्हापरिषदेअंतर्गत असणा-या प्रादेशिक नळपाणीपुरवठा योजनेचे वीज देयक थकित असल्यामुळे सदर योजनेद्वारे ग्रामस्थांना पाणीपुरवठा होऊ शकत नाही. परिणामी ग्रामीण भागातील जनतेला एक ते पाच कि.मी.अंतरावरुन पाणी आणावे लागते ही बाब विचारात घेऊन प्रादेशिक नळपाणीपुरवठा योजनेचा पाणीपुरवठा वीज देयक प्रतिपूर्ती अभावी खंडित होऊ नये म्हणून कोणती तातडीची कार्यवाही वा उपाययोजना करण्यात आल्या आहेत वा करण्यात येत आहेत. यावर प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग (अतिरिक्त कार्यभार) यांनी समितीस विशद केले की, दुरुस्ती निधीतून ते विशिष्ट रकमेची तरतूद करतात.तेथे कोणतेही प्रलंबित वीज देयके व इतर देयके प्रलंबित नाहीत. तेथे वीज पुरवठा खंडित करण्यात आलेला नाही. पुढे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की,आपल्याकडे आठ प्रादेशिक पाणीपुरवठा योजना आहेत. वीज खंडनामुळे कोणतीही पाणीपुरवठा योजना बंद नाही. जिल्हापरिषदेने निर्णय घेतलेली एक प्रादेशिक पाणीपुरवठा योजना होती, त्या योजनेचे थकित दोन कोटी रुपयांचे होते तसेच ती योजना ब-याच वर्षांपासूनची होती. जलव्यवस्थापन समिती व स्थायी समितीमध्ये ठराव घेऊन या वर्षीपासून त्या योजनेचे वीज देयक वाढविले आहे. ज्या पाणीपुरवठा योजनांची थकित रक्कम होती, त्यापैकी त्यांची वसूली ५० टक्क्यांपेक्षाही कमी आहे तशी एक योजना चिपळूण तालुक्यामध्ये आहे. ती सध्या बंद आहे. ती योजना मूळतः दहा गावांसाठी होती. त्यातून सध्या तीन गावांमध्ये पाणीपुरवठा होत आहे. ही योजना माहे डिसेंबर पासून बंद केली होती.

समितीने विचारणा केली की, जिल्हापरिषदेला ठराव घेऊन पाणीपुरवठा योजना बंद करण्याचे अधिकार शासनाने दिले होते का आपण तो ठराव तपासला का एमजेपीमार्फत या योजनेचे बांधकाम होऊन शासनाच्या माध्यमातून ही योजना जिल्हापरिषदेकडे नियम व निकषानुसार चालविण्याकरिता हस्तांतरीत केली जाते, हे आम्हाला माहिती आहे परंतु जिल्हापरिषदेने ज्या ठरावानुसार ही योजना बंद करण्याचा निर्णय घेतला, ते निकषामध्ये बसते का आपण तो ठराव वाचला का यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस होय असे उत्तर देत विशद केले की, ही योजना १९८० ची आहे. या योजनेची कालमर्यादा केवळ तीस वर्षे होती. ही योजना जिल्हापरिषदेला न परवडणारी आहे. त्याकरिता जिल्हापरिषदेला दरवर्षी एक करोड रुपये खर्च करावा लागतो.

समितीने विचारणा केली की, जिल्हापरिषदेला न परवडणारी योजना आपण हस्तांतरित कशी करून घेतली तेव्हा प्रस्ताव कसा दिला होता, जिल्हापरिषद कोणतेही ठराव घेऊ शकत नाही. शासनाने ठरवून दिलेल्या नियम, अटी व शर्तीच्या अधीन राहूनच जिल्हापरिषदेला ठराव घ्यावे लागतात. शासनाने या योजनेवर एवढा पैसा खर्च करून उपयोग काय आहे ? हा ठराव सयुंक्तिक आहे. आपण जे अंदाजपत्रकात तरतूद करतो, त्यामध्ये प्रादेशिक पाणीपुरवठा योजना चालविणे हा एक लेखाशीर्ष आहे. त्या लेखाशीर्षा अंतर्गत आपण नियम ३१५ अंतर्गत २० टक्क्यांमध्ये पाणीपुरवठयाकरिता जी तरतूद करतो, तो पैसा तेथे जमा होतो. अशा परिस्थितीत जिल्हापरिषदेला शासन ५० टक्क्यांपेक्षा कमी वसूली आहे म्हणून पाणीपुरवठा योजना बंद करण्याचे अधिकार देऊ शकत नाही. जिल्हा परिषद लोकांना पाण्यापासून वंचित ठेवू शकत नाही.यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, ही योजना मूळतः दहा गावांकरिता प्रस्तावित होती. सध्या तीन गावे त्या योजनेवर अवलंबून आहेत. तीन गावांपैकी दोन गावांमध्ये डोंगरी भाग आहे, विखुरलेल्या वस्त्या आहेत, त्यामुळे तेथे पाण्याची अन्य काही ना काही व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्यांना पाण्यापासून वंचित ठेवलेले नाही. कोणत्याही लोकांना पाण्यापासून वंचित ठेवले जाणार नाही, हे तपासून घेतले होते. सर्वांकडे छोटी छोटी बोअरवेल आहे. एक गाव असे आहे की, जेथे तीव्र उतार (स्टीप स्लोप) आहे, तेथे सध्या दुसरी योजना नव्हती. २०१९-२० च्या सेसमध्ये तरतूद करून तेथेही पाण्याची उपाययोजना करण्याचे काम चालू आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, उर्वरित सात गावांच्या पाणीपुरवठयाची काय व्यवस्था आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, उर्वरित सात गावांमध्ये ही प्रादेशिक पाणीपुरवठा योजना कार्यान्वितच झाली नाही.

समितीने विचारणा केली की, उर्वरित गावांमध्ये तात्पुरत्या पाणीपुरवठा योजना आहेत का, त्यांना कोणत्या मार्गाने पाणी मिळते. त्यांना बोअर, मिनिवॉटर सप्लाय स्कीमच्या माध्यमातून पाणीपुरवठा करण्यात आलेला आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस होकारात्मक उत्तर देत विशद केले की, वीज खंडनामुळे कोणतीही पाणीपुरवठा योजना बंद नाही. यावर समितीने विचारणा केली की, या योजनेचे थकित बिल केव्हापासून आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, सन २००९-२०१० पासूनची वीज देयके प्रलंबित आहेत. याबाबत अचूक माहिती घेऊन समितीला अवगत करण्यात येईल. चालू वर्षी देखील ग्रामस्थांना अपील केले की चालू बिल भरावे, थकित बिले भरु नका. या योजनेला तीस वर्षे झालेली असून यामध्ये बारा कि.मी.ची पाईपलाईन आहे. तेथे अनेक गळत्या आहेत.

समितीने निदेश दिले की, पुढील कालखंडांमध्ये त्या गावांमध्ये राष्ट्रीय पेयजल योजनांच्या माध्यमातून वगैरे पाण्याची व्यवस्था झाली पाहिजे. जेणेकरून योजना बंद झाली म्हणून गावांमध्ये पाणीपुरवठा झालेला नाही असे व्हायला नको.

**अभिप्राय व शिफारशी :**

पंचायती राज समितीने दिनांक ०१ ऑगस्ट ते ०३ ऑगस्ट, २०१८ या कालावाधीत रत्नागिरी जिल्हा परिषदेला भेट दिली असता सन २०१३-२०१४ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान नांदिवसे प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेच्या पाणीपुरवठा वीज देयक प्रतिपूर्तीबाबत रत्नागिरी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीच्या निदर्शनास आले की, रत्नागिरी जिल्हा परिषदेकडे १४ व्या वित्त आयोगाचा निधी उपलब्ध असताना विजेचे देयक थकित असल्यामुळे ऐन उन्हाळयाच्या काळामध्ये प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेतून पाणीपुरवठा होऊ शकत नाही. परिणामी संबंधित गावामधील ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यापासून वंचित रहावे लागत आहे. तसेच त्याठिकाणच्या महिलांना जवळपास १ ते ५ कि.मी. अंतरावरील डोंगरावरून पिण्याचे पाणी आणावे लागत आहे ही बाब अत्यंत खेदजनक असल्यामुळे समिती याप्रकरणी तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

समितीने यासंदर्भात अधिक माहिती जाणून घेतली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, नांदिवसे प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेचा लाभ कळकवणे, ओवळी, वालोटी या गावामधील ग्रामस्थांना होतो. तथापि, सदर योजनेच्या वीज देयक प्रतिपूर्तीअभावी पाणीपुरवठा करण्यात येत नाही. सन १९८३-१९८४ मध्ये उक्त योजना कार्यान्वित करण्यात आली होती. तद्नंतर स्वतंत्र पाणीपुरवठा योजना आल्यामुळे सदर योजनेतून काही गावे बाहेर पडली. सन २०१६ या वर्षाच्या सुमारास जिल्हा परिषदेकडून वीज देयक भरणा करण्यात आले होते. सध्या जिल्हा परिषदेच्या सेसमधील

देखभाल दुरुस्तीसाठी होणारा खर्च जास्त असल्यामुळे मोठया प्रमाणात नुकसान होत असून योजना कार्यान्वित नसल्यामुळे फक्त ३० टक्के वसुली होत आहे. तसेच देखभाल दुरुस्तीसाठी जिल्हा परिषदेला जवळपास ३ कोटी रूपयांचा निधी प्राप्त होतो. त्यातील २ कोटी रूपये इतर बाबींवर खर्च होतात. यासंदर्भात महावितरणकडून तांत्रिकदृष्टया चूक झालेली आहे. वापरलेल्या विजेसंबंधी चुकीने कमी देयक आकारण्यात आले होते. त्यामुळे वीज देयकाची रक्कम दुप्पट झाली आणि ती रक्कम २० लाख रूपयापर्यंत गेली असून त्यामध्ये व्याज व दंडाची रक्कम आकारणी केली आहे.

**सन २०१२-२०१३ मध्ये प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेच्या वीज देयकावर जिल्हा परिषद देखभाल दुरूस्तीमधून एकूण रूपये ७७,२७,०१७/- एवढा खर्च झालेला आहे. तसेच सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात वीज देयकावर एकूण रूपये १,१८,४१,९०४/- एवढा खर्च झालेला आहे. तथापि, सदर प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेचे वीज देयक थकित असल्यामुळे सदर योजनेद्वारे ग्रामस्थांना पाणीपुरवठा होऊ शकत नाही ही बाब रत्नागिरी जिल्हा परिषदेसाठी भूषणावह नाही. त्यामुळे अधीक्षक अभियंता वीज देयकाबाबत महावितरण व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी एकत्रितरित्या सविस्तर चर्चाकरून वीज देयकाची रक्कम कशाप्रकारे कमी करता येईल यासाठी जिल्हा परिषदेचे पदाधिकारी व जल व्यवस्थापन समिती या सर्वानुमते उचित पर्यायांचा अवलंब करून तोडगा काढावा व पुढील कालखंडामध्ये त्या गावांना पेयजल पुरवठा नियमितपणे व्हावा यासाठी राष्ट्रीय पेयजल योजनेच्या माध्यमातून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी, जेणेकरून वीज देयका अभावी पाणीपुरवठा योजना बंद झाल्याची पुनरावृत्ती यापुढे होऊ नये याची दक्षता घेण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे. याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्याच्या आत सादर करण्यात यावा.**

प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, रत्नागिरी (प्रशासन)

**पंचायत समिती रत्नागिरी सेस फंड :**

पंचायती राज समितीने दिनांक ०१ ते ०३ ऑगस्ट, २०१८ या कालावधीत रत्नागिरी जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१३-१४ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान रत्नागिरी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, पंचायत समितीला सेस फंडातून उत्पन्न मिळते. परंतु, तो निधी शासनाने ठरवून दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे खर्च होत नाही. आपण वैयक्तिक लाभाच्या योजना राबवितो. सदर निधी विहित वेळेत खर्च व्हावयास पाहिजे. समिती या संदर्भात सचिवांची साक्ष घेईल असे समितीने निदेश दिलेत.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**पंचायत समिती रत्नागिरी :-** पंचायत समितीला सेस फंडातून उत्पन्न मिळते परंतू सदर निधी शासनाने ठरवून दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे खर्च होत नाही. सदर निधी विहित कालावधीत खर्च होण्याच्या दृष्टीने ग्रामविकास विभागाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे, तसेच पंचायत समितीला प्राप्त होणारा निधी पंचायत समितीला आर्थिक वर्षात ४ टप्प्यात प्राप्त व्हावा या दृष्टीने कोणती उपाययोजना केली आहे.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायत समितीला प्राप्त होणारे अनुदान हे वर्षाचे सुरूवातीपासून न मिळता बहुतांशी अनुदान हे वर्षाअखेरीस मिळते. त्यामुळे शासनाने ठरवून दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे खर्च करता येत नाही.

सदर निधी वर्षाच्या सुरूवातीपासून प्राप्त होत नसून वर्षाच्या अखेरीस प्राप्त होतो त्यामुळे प्राप्त झालेला निधी पुढील वर्षात संभाव्य येणे रक्कमांसह अंदाजपत्रक तयार करून खर्च करणेत येतो.

मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी वेळोवेळी आढावा बैठकीमध्ये अंदाजपत्रक व अनुदान मागणीबाबत वारंवार मार्गदर्शन व सूचना केलेल्या आहेत. त्याप्रमाणे मा.जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना सेस अनुदानाची रक्कम मिळणेबाबत या कार्यालयाकडील पत्र नं.पंसर/सांख्यिकी/सेसअनु/३७८४/१३,दिनांक ०६.०८.२०१३ अन्वये पत्रव्यवहार करणेत आलेला आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय :**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (वित्त-३) अर्थसंकल्पात मंजूर अनुदान वित्त विभागाकडून प्राप्त झाल्यानंतर ग्रामविकास विभागाकडून जिल्हाधिकारी कार्यालये व मुद्रांक महानिरिक्षक कार्यालयांना १५ दिवसांच्या आत वितरित करण्यात येते.

सुधारित अंदाजानुसार वित्त विभागाकडून आर्थिक वर्ष अखेरीस काही अनुदान प्राप्त होते. सदर अनुदान तात्काळ जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्राम पंचायत यांना वाटपासाठी जिल्हाधिकारी कार्यालय व मुद्रांक महानिरिक्षक कार्यालयाकडे वितरित केले जाते.

दिनांक ६ जून, २००८ च्या वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.संकिर्ण १००२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय नुसार जिल्हा परिषद व प्राधिकरणाना एखादया आर्थिक वर्षात अखर्चित राहिलेला निधी पुढील आर्थिक वर्षाअखेर पर्यंत खर्चाची अनुमती देणेत आली आहे.

**अभिप्राय व शिफारशी :**

पंचायती राज समितीने रत्नागिरी जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी सन २०१३-२०१४ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीच्या असे निदर्शनास आले की, पंचायत समिती, रत्नागिरी अंतर्गत पंचायत समितीला सेस फंडातून उत्पन्न मिळते. परंतु सदर निधी शासनाने ठरवून दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे खर्च होत नाही. यासंदर्भात समितीला प्राप्त झालेल्या लेखी माहितीनुसार पंचायत समितीला प्राप्त होणारे अनुदान हे वर्षाच्या सुरूवातीपासून न मिळता बहुतांशी अनुदान हे वर्षाअखेरीस प्राप्त होते. त्यामुळे शासनाने ठरवून दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे निधी खर्च करता येत नाही. त्यामुळे सदर निधी पुढील वर्षात संभाव्य येणे रकमांसह अंदाजपत्रक तयार करून खर्च करण्यात येतो. याबाबत ग्रामविकास विभागाकडून प्राप्त झालेल्या अभिप्रायानुसार अर्थसंकल्पात मंजूर अनुदान वित्त विभागाकडून प्राप्त झाल्यानंतर ग्रामविकास विभागाकडून जिल्हाधिकारी कार्यालये व मुद्रांक महानिरीक्षक कार्यालयांना १५ दिवसांच्या आत वितरित करण्यात येते. सुधारित अंदाजानुसार वित्त विभागाकडून आर्थिक वर्ष अखेरीस काही अनुदान प्राप्त होते. सदर अनुदान तात्काळ जिल्हा परिषद, पंचायत समिती,

ग्रामपंचायत यांना वाटपासाठी जिल्हाधिकारी कार्यालय व मुद्रांक महानिरिक्षक कार्यालयाकडे वितरित केले जाते. तसेच दिनांक ०६ जून, २००८ रोजीच्या वित्त विभागाच्या शासन निर्णयानुसार जिल्हा परिषद व प्राधिकारणांना एखाद्या आर्थिक वर्षात अखर्चित राहिलेला निधी पुढील आर्थिक वर्षा अखेरपर्यंत खर्चाची अनुमती देण्यात आली आहे. **तथापि, समितीच्या मते पंचायत समितीस सेस फंडातून मिळणारे उत्पन्न शासनाने ठरवून दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे खर्च होण्यासाठी वित्त विभागाकडून ग्रामविकास विभागामार्फत जिल्हाधिकारी कार्यालये व मुद्रांक महानिरिक्षक कार्यालयांना अर्थसंकल्पीय वर्षाच्या किमान सहा महिन्याच्या आत वितरित करण्यात यावे व सेस फंडातून मिळणारे उत्पन्न पंचायत समितीने विहित कालावधीत ठरवून दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे खर्च करावे अशी समिती शिफारस करीत आहे व त्याप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस दोन महिन्याच्या आत सादर करण्यात यावा.**

# परिशिष्ट

## समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

**गुरुवार, दिनांक २६ एप्रिल २०१८**

**स्थळ : जिल्हा परिषद, रत्नागिरी**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(४) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

(५) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(६) श्री. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(७) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(८) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(९) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**जिल्हा परिषद पदाधिकारी, रत्नागिरी :**

१. श्रीमती स्नेहा सावंत, अध्यक्ष, जिल्हा परिषद रत्नागिरी

२. श्री. संतोष थेराडे, उपाध्यक्ष, जिल्हा परिषद रत्नागिरी

३. श्री. दिपक नागले, सभापती, अर्थ व शिक्षण समिती

४. श्री. अरुण कदम, सभापती, आरोग्य व बांधकाम समिती

५. श्रीमती चारुता कामतेकर, सभापती, समाजकल्याण समिती

६. श्रीमती ऋतुजा खांडेकर, सभापती, महिला व बालकल्याण समिति

७. श्री. उदय बने, सदस्य, जिल्हा परिषद, रत्नागिरी

८. श्री. विनोद झगडे, सदस्य, जिल्हा परिषद, रत्नागिरी

९. श्री. सुनिल मोटे, सदस्य, जिल्हा परिषद, रत्नागिरी

१०. श्री. अरविंद चव्हाण, सदस्य, जिल्हा परिषद, रत्नागिरी

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखा विभाग :**

(१) श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी लेखा

(२) श्री. रविंद्र खेडेकर, सहायक संचालक (लेखा)

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय :**

(१) श्री. पंडीत जाधव, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(२) श्री. सं. ह. धुरी, अवर सचिव, ग्रामविकास विभाग

**आयुक्त कार्यालय, कोकण विभाग :**

(१) श्री. गणेश चौधरी, उप आयुक्त (आस्था), आयुक्त कार्यालय, कोकण विभाग

(२) श्री. माणिक दिवे, सहाय्यक आयुक्त (चौकशी)

(३) श्री. नारायण परदेशी, सहायक आयुक्त (तपासणी)

**जिल्हा परिषद, रत्नागिरी :**

(१) श्री. आर. के. बामणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी

(२) श्री. मारुती कांबळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(३) डॉ. शिवप्रताप खोत, उप मुख्य लेखा वित्त अधिकारी

(४) डॉ. विवेक पनवेलकर, प्रकल्प संचालक, डी. आर.डी.ए.

(५) श्री. शे. शं.सावंत, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(६) श्री. एम. आर. आरगे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण)

(७) श्री. राजेंद्र अहिरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा व स्वच्छता)

(८) श्री. विश्वास सिद, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)

(९) श्री. जे. आर.शिंदे, प्रभारी कार्यकारी अभियंता (बांधकाम) रत्नागिरी व चिपळूण

(१०) डॉ. ए. ए. आठल्ये, जिल्हा आरोग्य अधिकारी

(११) श्री. एकनाथ आंबोकर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१२) श्री. राजेश क्षीरसागर, शिक्षणाधिकारी (माध्यामिक)

(१३) डॉ. पुजारी वाय.बी., जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१४) श्री. सुनिल सैद, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(१५) श्री. पी. एन. देशमुख, कृषि विकास अधिकारी

(१६) श्री. दयानंद परवडी, प्रभारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा

(१७) श्री. अरविंद धरणगुत्तीकर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मंडणगड

(१८) श्री. गुरुनाथ पारशे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, खेड

(१९) श्री. प्रशांत राऊत, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, दापोली

(२०) श्री. प्रकाश भोसले, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, गुहागर

(२१) श्री. जे. पी.जाधव, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, देवरुख (संगमेश्वर)

(२२) श्री. व्ही. व्ही.जमदाडे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, रत्नागिरी

(२३) श्रीमती एस.जे.पवार, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, चिपळूण

(२४) श्री. सचिन मठपती, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, लांजा

(२५) श्री. शिवाजी माने, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, राजापूर

(२६) श्री. वैभव चौधरी, प्रभारी उप अभियंता, बांधकाम, गुहागर

(२७) श्री. रमेश कादवडकर, प्रभारी उप अभियंता, बांधकाम, चिपळूण

(२८) श्री. आर. आर. रोकडे, उप अभियंता, बांधकाम, राजापूर

(२९) श्री. डी. पी. जालगांवकर, प्रभारी उप अभियंता, बांधकाम, मंडणगड व दापोली

(३०) श्री.एम.बी.खेडेकर, प्रभारी उप अभियंता, बांधकाम, खेड

(३१) श्री.श.स.शिंदे, लेखाधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी

**संक्षिप्त कार्यवृत :**

समितीने रत्नागिरी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०१२-२०१३ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदावर व सन २०१३-१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात साक्ष घेतली.

**शुक्रवार, दिनांक २७ एप्रिल २०१८**

**स्थळः जिल्हा परिषद, रत्नागिरी**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(४) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

(५) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(६) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(७) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(८) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.

(९) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(१०) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(३) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

**जिल्हा परिषद, रत्नागिरी :**

(१) श्री. गणेश चौधरी, उप आयुक्त, (आस्थापना), आयुक्त कार्यालय, कोकण विभाग

(२) श्री. आर. के. बामणे, मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) डॉ. विवेक पनवेलकर, प्रकल्प संचालक, डी.आर.डी.ए.

(४) श्री. एकनाथ आंबोकर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(५) श्री. राजेश क्षीरसागर, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(६) डॉ. ए. ए. आठल्ये, जिल्हा आरोग्य अधिकारी

(७) श्री. विश्वास सिद, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)

(८) श्री. एम. आर. आरगे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण)

(९) श्री. राजेंद्र अहिरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता)

(१०) डॉ. पुजारी वाय. बी., जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(११) श्री. सुनिल सैद, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(१२) श्री. पी. एन. देशमुख, कृषि विकास अधिकारी

(१३) श्री. दयानंद परवडी, प्रभारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा

(१४) श्री. आर. जी. शिंदे, प्रभारी कार्यकारी अभियंता

(१५) श्री. अरविंद धरणगुत्तीकर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मंडणगड

(३) श्री. नारायण परदेशी, सहाय्यक आयुक्त (तपासणीस)

**जिल्हा परिषद, रत्नागिरी :**

(१) श्री. आर. के. बामणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी

(२) श्री. मारुती कांबळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(३) डॉ. शिवप्रताप खोत, उप मुख्य लेखा वित्त अधिकारी

(४) डॉ. विवेक पनवेलकर, प्रकल्प संचालक, डी. आर. डी. ए.

(५) श्री. शे. शं. सावंत, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(६) श्री. एम. आर. आरगे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण)

(७) श्री. राजेंद्र अहिरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता)

(८) श्री. विश्वास सिद, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)

(९) श्री. जे. आर. शिंदे, प्रभारी कार्यकारी अभियंता (बांधकाम) रत्नागिरी व चिपळूण

(१०) डॉ. ए. ए. आबल्ये, जिल्हा आरोग्य अधिकारी

(११) श्री. एकनाथ आंबोकर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१२) श्री. राजेश क्षीरसागर, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(१३) डॉ. पुजारी वाय.बी., जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१४) श्री. सुनिल सैद, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(१५) श्री. पी. एन. देशमुख, कृषि विकास अधिकारी

(१६) श्री. दयानंद परवडी, प्रभारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवबा

(१७) श्री. अरविंद धरणगुत्तीकर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मंडणगड

(१८) श्री. गुरुनाथ पारशे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, खेड

(१९) श्री. प्रशांत राऊत, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, दापोली

(२०) श्री. प्रकाश भोसले, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, गुहागर

(२१) श्री. जे. पी. जाधव, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, देवरुख (संगमेश्वर)

(२२) श्री. व्ही. व्ही. जमदाडे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, रत्नागिरी

(२३) श्रीमती एस. जे. पवार, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, चिपळूण

(२४) श्री. सचिन मठपती, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, लांजा

(२५) श्री. शिवाजी माने, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, राजापूर

(२६) श्री. वैभव चौधरी, प्रभारी उप अभियंता, बांधकाम, गुहागर

(२७) श्री. रमेश कादवडकर, प्रभारी उप अभियंता, बांधकाम, चिपळूण

(२८) श्री. आर. आर. रोकडे, उप अभियंता, बांधकाम, राजापूर

(२९) श्री. डी. पी. जालगांवकर, प्रभारी उप अभियंता, बांधकाम, मंडणगड व दापोली

(३०) श्री. एम. बी. खेडेकर, प्रभारी उप अभियंता, बांधकाम, खेड

(३१) श्री. श. स. शिंदे, लेखाधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी

**संक्षिप्त कार्यवृत :**

समितीने रत्नागिरी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०१२-१३ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदावर व सन २०१३-१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात साक्ष घेतली.

**शनिवार, दिनांक २८ एप्रिल २०१८**

**स्थळ : जिल्हा परिषद रत्नागिरी**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(३) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

(४) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

(५) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

(६) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(७) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(८) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.

(९) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रक सदस्य**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.स

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय :**

(१) श्री. पंडीत जाधव, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(२) श्री. सं. ह. धुरी, अवर सचिव, ग्रामविकास विभाग

**आयुक्त कार्यालय, कोकण विभाग :**

(१) श्री. गणेश चौधरी, उप आयुक्त (आस्था), आयुक्त कार्यालय, कोकण विभाग

(२) श्री. माणिक दिवे, सहाय्यक आयुक्त, (चौकशी)

(३) श्री. नारायण परदेशी, सहाय्यक आयुक्त (तपासणी)

**जिल्हा परिषद, रत्नागिरी :**

(१) श्री. आर. के. बामणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी

(२) श्री. मारुती कांबळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(३) डॉ. शिवप्रताप खोत, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(४) डॉ. विवेक पनवेलकर, प्रकल्प संचालक, डी. आर. डी. ए. ए

(५) श्री. शे. शं. सावंत, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(६) श्री. एम. आर. आरगे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण)

(७) श्री. राजेंद्र अहिरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा व स्वच्छता)

(८) श्री. विश्वास सिद, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)

(९) श्री. जे. आर. शिंदे, प्रभारी कार्यकारी अभियंता (बांधकाम) रत्नागिरी व चिपळूण

(१०) डॉ. ए. ए. आठल्ये, जिल्हा आरोग्य अधिकारी

(११) श्री. एकनाथ आंबोकर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१२) श्री. राजेश क्षीरसागर, शिक्षणाधिकारी (माध्यामिक)

(१३) डॉ. पुजारी वाय.बी., जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१४) श्री. सुनिल सैद, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(१५) श्री. पी. एन. देशमुख, कृषि विकास अधिकारी

(१६) श्री. दयानंद परवडी, प्रभारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा

(१७) श्री. अरविंद धरणगुत्तीकर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मंडणगड

(१८) श्री. गुरुनाथ पारशे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, खेड

(१९) श्री. प्रशांत राऊत, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, दापोली

(२०) श्री. प्रकाश भोसले, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, गुहागर

(२१) श्री. जे. पी. जाधव, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, देवरुख (संगमेश्वर)

(२२) श्री. व्ही. व्ही. जमदाडे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, रत्नागिरी

(२३) श्रीमती एस. जे. पवार, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, चिपळूण

(२४) श्री. सचिन मठपती, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, लांजा

(२५) श्री. शिवाजी माने, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, राजापूर

(२६) श्री. वैभव चौधरी, प्रभारी उप अभियंता, बांधकाम, गुहागर

(२७) श्री. रमेश कादवडकर, प्रभारी उप अभियंता, बांधकाम, चिपळूण

(२८) श्री. आर. आर. रोकडे, उप अभियंता, बांधकाम, राजापूर

(२९) श्री. डी. पी. जालगांवकर, प्रभारी उप अभियंता, बांधकाम, मंडणगड व दापोली

(३०) श्री. एम. बी. खेडेकर, प्रभारी उप अभियंता, जांधकाम, खेड

(३१) श्री. श. स. शिंदे, लेखाधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी

**संक्षिप्त कार्यवृत :**

समितीने रत्नागिरी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०१२-१३ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदावर व सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक ४ जून २०१९**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(५) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

(६) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(७) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(९) प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.

(१०) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य :**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

(३) श्री. निरंजन डावखरे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का.)

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई :**

श्री. सु. रा. भोसले, संचालक

**विभागीय सचिव :**

(१) डॉ. प्रदिप व्यास, प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग (अतिरिक्त कार्यभार)

(२) श्री. असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग

(३) श्री. वि. रा. नाईक, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग)

(४) श्री. ई. रविंद्रन, सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

(५) श्री. दे. आ. गावडे, सह सचिव, ग्रामविकास विभाग

(६) श्री. संजय देवगांवकर, सह सचिव, उद्योग विभाग

(७) श्री. सु. कि. निकम, उप सचिव, पर्यावरण विभाग

(८) श्री. मच्छिंद्रनाथ शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग

(९) श्री. जयंत दिपटे, उप सचिव, वित्त विभाग

(१०) श्री. मनोहर बंदपट्टे, अवर सचिव, पर्यावरण विभाग

(११) श्री. आत्माराम लुडबे, अवर सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

(१२) श्री. विजयकुमार कलवले, सहाय्यक संचालक, मृद व जलसंधारण विभाग

(१३) श्री. शरद यादव, कार्यासन अधिकारी, ग्रामविकास विभाग

(१४) श्री निलेश ठाकूर, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग

(१५) श्री. नंदू मिस्त्री, कक्ष अधिकारी, उद्योग विभाग

**जिल्हा परिषद, रत्नागिरी :**

(१) श्रीमती आंचल गोयल, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. आर. के. बामणे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. शेखर सावंत, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग)

(४) श्री. चंद्रकांत गजभिये, मु.अ. व वि.का.अ.

(५) श्री. नितीन वानखेडे, अधीक्षक अभियंता, एमआयडीसी

(६) श्री. एस. बी. माने, कार्यकारी अभियंता, (बांधकाम)

(७) श्री. एस. आ. परदेशी, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग

(८) डॉ. वाय. बी. पुजारी, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(९) डॉ. ए. ए. आबल्ये, जिल्हा आरोग्य अधिकारी

(१०) श्री. एम. डी. कांबळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(११) डॉ. मानसिंग पाटील, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(१२) श्रीमती मनिषा देसाई, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)

(१३) श्री. दयानंद परवडी, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

(१४) श्री. देविदास कुलाळ, शिक्षणाधिकारी

(१५) श्री. परशुराम करावडे, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, रत्नागिरी

(१६) श्री. नागेश लोहळकर, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर

(१७) श्री. निलेश मरभळ, क्षेत्रिय अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पंचायती राज समिती जिल्हा परिषद

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २०१२-१३ च्या लेखा परिक्षा पुर्नविलोकन अहवाल व सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात रत्नागिरी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी, प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग (अतिरिक्त कार्यभार), प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास) विभाग, सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई विभाग, सह सचिव, ग्रामविकास विभाग, सह सचिव, उद्योग विभाग, उप सचिव, पर्यावरण विभाग, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, उप सचिव, वित्त विभाग, अवर सचिव, पर्यावरण विभाग, अवर सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, सहाय्यक संचालक, मृद व जलसंधारण विभाग, अवर सचिव, ग्रामविकास विभाग, कार्यासन अधिकारी, ग्रामविकास विभाग, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग कक्ष अधिकारी, उद्योग विभाग तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, रत्नागिरी यांची साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक १६ जुलै २०१९**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(४) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(५) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(६) श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य :**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२) श्री. निलय नाईक, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का)

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

(४) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई**

श्री. सु. रा. भोसले, संचालक

**विभागीय सचिव**

(१) श्री. असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग

(२) श्री. एकनाथ डवले, सचिव, मृद व जलसंधारण विभाग

(३) श्री. हर्षदिप कांबळे, विकास आयुक्त (उद्योग)

(४) श्री. ई रविंद्रन, सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

(५) श्री. संजय देवगांवकर, सह सचिव, उद्योग विभाग

(६) डॉ. ना. को. भोसले, उप सचिव, उद्योग विभाग

(७) श्री. र. आ. नागरगोजे, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(८) श्री. म. रं. शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग

(९) श्री. सु. कि. निकम, उप सचिव, पर्यावरण विभाग

(१०) श्री. संजय दिपटे, उप सचिव (कराधान), वित्त विभाग

(११) श्रीमती नीला रानडे, अवर सचिव, ग्रामविकास विभाग

(१२) श्री. शरद यादव, कार्यासन अधिकारी, ग्रामविकास विभाग

(१३) श्री. य. बा. सोनटक्के, सह संचालक, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ

(१४) श्री. नितीन वानखेडे, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ, पनवेल

(१५) श्री. परशुराम करावडे, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ, रत्नागिरी

**जिल्हा परिषद, रत्नागिरी :**

(१) श्रीमती आंचल गोयल, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. आर. के. बामणे आतिरिक्त, मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. मारुती कांबळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(४) श्री. शेखर सावंत, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(५) श्री. ए. आर. आरगे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण विभाग)

(६) श्रीमती मनिषा देसाई, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)

(७) डॉ. मानासिंग पाटील, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(८) श्री. म. दा. आरळेकर, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग

(९) श्री. आरिफ शाह, कृषि विकास अधिकारी

(१०) श्री. देविदास कुलाळ, शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक)

(११) श्री. एस. आर. परदेशी, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, रत्नागिरी

(१२) श्री. एस. बी. माने, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, चिपळूण

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २०१२-१३ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात रत्नागिरी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, मृद व जलसंधारण विभाग, विकास आयुक्त (उद्योग), सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई विभाग, सह सचिव, उद्योग विभाग, उप सचिव, उद्योग विभाग, उप सचिव, ग्रामविकास, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, उप सचिव, पर्यावरण विभाग, उप सचिव, (कराधान), वित्त विभाग, अवर सचिव, ग्रामविकास विभाग, कार्यसन अधिकारी, ग्रामविकास विभाग, सह संचालक, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, पनवेल, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, रत्नागिरी, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, रत्नागिरी यांची साक्ष घेतली.

## बैठकीचे कार्यवृत्त

पंचायत राज समिती (Panchayati Raj Samiti)ची बैठक बुधवार, दिनांक ०३ मार्च, २०२१ रोजी दुपारी ०३-०० वाजता, विसावा मजला, कक्ष क्र. २००१, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :-

**उपस्थिती :**

(१) श्री. संजय रायमुलकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. अनिल पाटील, वि.स.स.

(३) श्री. संग्राम जगताप, वि.स.स.

(४) श्री. शेखर निकम, वि.स.स.

(५) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.

(६) श्री. माधवराव जवळगावकर पाटील, वि.स.स.

(७) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स.

(८) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

(९) श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर, वि.स.स.

(१०) श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स.

**विशेष निमंत्रित सदस्य :**

(१) श्री. किशोर आप्पा पाटील, वि.स.स.

(२) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. रंगनाथ खैरे, अवर सचिव (समिती)

(३) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

(४) श्रीमती सुषमा लोंढे, कक्ष अधिकारी

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने बैठकीत सातव्या अहवालातील लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन व वार्षिक प्रशासन प्रारुपावर विचार करून किरकोळ दुरुस्त्यांसह संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.